TIGHT BINDING BOOK

UNIVERSAL
LIBRARY
OU_196123
UNIVERSAL
LIBRARY

OUP—391 29-4-72—10,000.

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. M294.59 B22S Accession No. M806

Author बापटशास्त्री, विष्णु वामन.

Title श्रीमच्छंकराचार्य:

This book should be returned on or before the date last marked below.

*'Kāvyasangraha'-Series 32.*

THE

# MAHĀBHĀRATA

OF

# MUKTEŚVARA.

(THE GREAT MARĀTHĪ POET OF THE MAHĀRĀSHTRA.

## 4. VIRĀTAPARVA.

Like a wheel prosperity and adversity revolve.

*(Virat-parva—20. 4.)*

EDITED WITH CRITICAL AND EXPLANATORY NOTES, INTRODUCTION AND APPENDICES &c.

BY

**DĀMODAR KESHAVA OKA, B. A.**

Rtd: Principal, Normal School, Amraoti,

and

Ex-Member of the Court and the Committee of Reference, Nagpur University; Sometime Examiner in Marathi Language and Literature at the Universities of Allahabad, Nagpur and the Osmania University of Hyderabad-Deccan &c.

**Second Edition.**

**PUBLISHED BY**

PĀṆḌURAÑG JĀWAJĪ,

PROPRIETOR, 'NIRṆAYA SĀGAR' PRESS,

BOMBAY.

1939.

*Price 1¼ Rupee.*

[All rights reserved by the publisher.]

Publisher:-Pandurang Jawaji, }
Printer:-Ramchandra Yesu Shedge, } Nirnaya-Sagar Press, 26-28, Kolbhat Street, Bombay.

First Edition ... ... ... ... ... 1899

Second Edition ... ... ... ... 1939

'काव्यसंग्रह'-ग्रंथमाला-३२

महाराष्ट्रकविवर्यमुक्तेश्वरकृत

# महाभारत.

## ४. विराटपर्व.

विराटपर्व ऐकतां विशेष । सर्व शत्रूंचा होय विनाश ॥
संपत्ति आयुष्य निर्दोष यश । प्राप्त होईल श्रवण करितां. ॥–श्रीधर.

हें

दामोदर केशव ओक, बी. ए.,
सेवानिवृत्त प्रिन्सिपाल, नॉर्मलस्कूल, उमरावती,
आणि
नागपुर विश्वविद्यालयाच्या कोर्टाचे व रेफरन्स कमिटीचे भूतपूर्व सदस्य,
दक्षिण-हैद्राबाद येथील उस्मानिया विश्वविद्यालय, नागपुर व
अलाहाबाद येथील विश्वविद्यालयें यांतील मराठी भाषेचे परीक्षक
यांनीं

अनेक हस्तलिखित प्रतींवरून शुद्ध करून, अर्थनिर्णायक, पुराणेतिहास-
विषयक व अवांतर माहितीच्या टीपा देऊन व उपोद्घात,
परिशिष्टें वगैरे जोडून तयार केलें,
तें

मुंबईत,
पांडुरंग जावजी यांनीं
'निर्णयसागर' छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

( द्वितीयावृत्ति )

इ. स. १९३९.

किंमत १। रुपया.

महाराष्ट्र भाषेचें आणि कवितेचें

आस्थापूर्वक अध्ययन

करूं इच्छिणाऱ्या सज्जनांस

ही अल्प सेवा

सप्रेम अर्पण करतों.

दा. के. ओक.

॥ श्री ॥

# कै० श्री० रा. रा. तुकाराम जावजी शेट चौधरी, जे. पी.

**'निर्णयसागर' छापखान्याचे मालक**

आणि

**'काव्यसंग्रह' मासिकाचे चालक.**



**जन्मः**—तारीख ९-४-१८६४ **मृत्युः**—तारीख २४-४-१९१८

श्रेष्ठिश्रेष्ठ न कैसा मान्य **तुकाराम जावजी** मजला ? ।
प्रेमें पाळी चवदा वर्षे जो **काव्यसंग्रहा !** तुजला. ॥

सत्पात्रिं दान करुनी जोडिसि तूं सुकृत हे **तु**कारामा ! ।
श्री गुणलुब्धा न तुला त्यजि, जेवि विलासहेतुका रामा. ॥

—मुकुंदराय.

# महाभारत-प्रशस्ति.

क्षीराब्धिशायी नारायण । तोचि कृष्णद्वैपायन ।
होवोनि, भारतमिसें जाण । पंचम वेद प्रकटिला. ॥ ११०

म्हणउनी भारतीं नसे कांहीं । तें ब्रह्मसृष्टींत जन्मलें नाहीं ।
शब्दब्रह्मीं असे जें पाहीं । तें सांठवलें भारतीं. ॥ १११

* * * * * * * * *

भारत पाहतां पांचवा वेद । श्रीव्यासें कथिला विशद ।
निर्धारेंशीं पदबद्ध । श्रवण करा श्रोते हो! ॥ १९२

कथामृत परम सुस्वाद । ऐकतां आनंद उद्बोध ।
पावती सज्जन स्वानंद । निजांगीं अतिवेगें. ॥ १९३

इतर आदरें ऐकतां । सकळ दोष जाती तत्वता ।
तया सायुज्यपद ये हाता । श्रवण करितां भावार्थें. ॥ १९४

आदरें कुळिंविती प्रीतीं । जे श्रवण करिती सुचित्तीं ।
त्यां निजपद सांपडे हातीं । पातकें जाती निःशेष. ॥ १९५

कुरुक्षेत्रीं आणि प्रयागीं । सहस्र कपिला सुवर्णशृंगी ।
गायी विप्रा वेदविदुषालागीं । देतां सुकृत जें जोडे; ॥ १९६

तें भारतींचें पर्व एक । श्रवण करितां पावती लोक ।
पापसिंधु प्राशिती देख । इतिहासरूपें अगस्ती. ॥ १९७

श्राद्धीं ब्रह्मविद ब्राह्मण । आमंत्रितां तृप्ती पितरां पूर्ण ।
तैसें एक पर्व करितां श्रवण । सर्व शास्त्रांचें फळ लाभे. ॥ १९८

मुक्तेश्वरकृत आदिपर्व, अध्याय १

# प्रस्तावना.

मुक्तेश्वरकविकृत विराटपर्व 'काव्यसंग्रहां'त खंडशः छापलें जाऊन तें इ. स. १८९९ मध्यें पूर्ण झालें होतें. त्याची आतां सुमारें ४० वर्षांनीं ही नवीन आवृत्ति प्रसिद्ध करण्याचा योग येत आहे, ही ईश्वराची मोठी कृपा होय. हींत निरनिराळ्या हस्तलिखित पोथ्यांच्या साहाय्यानें प्रथमावृत्तींतील अपपाठ काढून टाकून मूळ ग्रंथ शक्य तितक्या शुद्ध स्वरूपांत वाचकांस सादर करण्यांत येत आहे. ह्याखेरीज अर्थनिर्णायक व अवांतर माहितीच्या टीपा पूर्वीपेक्षां जास्त देऊन शेवटीं कांहीं परिशिष्टेंही जोडिलीं आहेत. ही सर्व सामग्री सामान्य वाचकांस व विश्वविद्यालयीन परीक्षांचा अभ्यास करणाऱ्या प्रौढ विद्यार्थ्यांच्या उपयोगीं पडेल, अशी आशा आहे.

२. इतिहासाचार्य कै० विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांस मुक्तेश्वराच्या सभापर्वाच्या कांहीं अध्यायांची एक फार जुनी हस्तलिखित प्रत आढळली होती. तिच्या आधारें त्यांनीं 'मुक्तेश्वराच्या भारताची एक जुनी तृटित प्रत' ह्या मथळ्याखालीं भारत–इतिहास–संशोधक–मंडळाच्या शके १८३६ च्या वार्षिक इतिवृत्तांत एक लेख लिहून प्रसिद्ध केला आहे. त्यांत ते म्हणतातः—'मुक्तेश्वराच्या काव्यांच्या जुनाट प्रती शोधून काढून मूळ शुद्ध पाठ जींत आहेत, अशी प्रत संपादिली पाहिजे. त्या व्यतिरिक्त मुक्तेश्वराचें प्रतिभावैभव आपल्या अनुभवावर यावें तसें येणें मुष्कील' कै० राजवाडे यांचें हें मत कोणासही मान्य होण्यासारखें आहे. त्यांनीं म्हटल्याप्रमाणें विराटपर्वाचें संपादन करून तें मूळ स्वरूपांत वाचकांस सादर करावें, अशी आमची फार इच्छा होती. म्हणून कै० राजवाडे यांना मिळालेल्या फार जुन्या प्रतीसारख्या प्रती निरनिराळ्या ठिकाणांहून मिळविण्याची पुष्कळ खटपट केली व त्याच उद्देशानें आम्ही गेल्या जुलै महिन्यांत पैठणासही गेलों होतों. परंतु तेथें अधिकृत व जुन्या प्रती मिळाल्या नाहींत, हें मोठ्या खेदानें नमूद करावें लागत आहे.

मुक्तेश्वराचे वंशज कोल्हापुराजवळ तेरवाड ह्या गांवीं असून ते त्या गांवचे इनामदार आहेत. आम्ही 'मुक्तेश्वरकृत काव्यें' ह्या ग्रंथाच्या संपादनाच्या वेळीं

म्हणजे ३२।३५ वर्षांपूर्वी सदर्हू इनामदारांच्या संग्रहीं मुक्तेश्वराच्या ग्रंथांच्या कांहीं पोथ्या, बाडें वगैरे आहेत कीं काय ? ही चौकशी केली होती. परंतु त्यांच्याकडे मुक्तेश्वराचा लेखी वा छापी कोणताही ग्रंथ नसल्याचें कळविण्यांत आलें होतें. त्यानंतर कै० राजवाडे यांनीं नीट चौकशीकरून, 'तेरवाडच्या इनामदारांजवळ मुक्तेश्वराचा एकही लेखी ग्रंथ, अस्सल किंवा नक्कल, संग्रहास नाहीं'—असें आपल्या मुक्तेश्वरावरील निबंधांत लिहून ठेविलें आहे. यामुळें ह्या बाबतींत त्यांच्याकडे पुन्हां चौकशी करणें इष्ट वाटलें नाहीं. खुद्द कवीच्या वंशजांकडे त्याचे ग्रंथ असूं नयेत, ह्यासारखी संशोधकाच्या मनास विषाद वाटणारी दुसरी कोणतीही गोष्ट नाहीं.

३. खुद्द ग्रंथकाराच्या हातच्या, त्याच्या देखरेखीखालीं नकलल्या गेलेल्या किंवा निदान त्याच्या हयातींत लिहिलेल्या पोथ्या मिळाल्यास शुद्ध पाठाचा निर्णय सहज करितां येतो. तसेंच तत्कालीन भाषेचें स्वरूप कसें होतें, हें कळण्याच्या कामीं प्रत्यक्ष प्रमाण म्हणूनही अशा हस्तलिखितांचा उपयोग होतो. 'मुक्तेश्वर एकनाथाचा[1] नातू. तेव्हां त्याची भाषा एकनाथाच्या व दासोपंताच्या[2] भाषेसारखी बरीच असली पाहिजे व मुक्तेश्वर रामदासांच्या[3] आधींचा. तेव्हां रामदासांहून मुक्तेश्वराची भाषा जुनी असली पाहिजे. दासोपंताचे व रामदासाचे अस्सल मूळप्रतीवरून छापलेले ग्रंथ उपलब्ध आहेत. तेव्हां तुलना करण्यास अनमान किंवा अंदाज यांची गरज नाहीं. प्रत्यक्ष प्रमाण उपलब्ध आहे.' ( कै० राजवाडे ). परंतु मुक्तेश्वराच्या भाषेचें अध्ययन करितां येण्यासारखी पोथी उपलब्ध झाली नाहीं. साधारणतः कोणताही लेखक एखाद्या ग्रंथाची नक्कल करितांना आपल्या स्वतःच्या काळीं प्रचारांत असलेल्या भाषेच्या वळणावर त्या ग्रंथांची भाषा व लेखनपद्धति नेतो. ओवीबद्ध ग्रंथांत तर हें आधुनीकरण लेखकास सहज करितां येतें. आम्हांस मिळालेल्या पोथ्या मुक्तेश्वराच्या काळानंतर १०० वर्षांनीं लिहिलेल्या आहेत. यामुळें कै० राजवाडे यांच्या सूचनेस मूर्तस्वरूप देतां आलें नाहीं, ही नाइलाजाची गोष्ट होय.

---

१. एकनाथाची हयात शके १४५० ते १५२१ ( किंवा १५३१ ). २. दासोपंत–शके १४७२ ते १५३७. ३. रामदास–शके १५३० ते १६०३. मुक्तेश्वराचा जन्म शके १५३१ मध्यें झाला, असा शोध लागला आहे ( उपोद्घात पहा ). तेव्हां मुक्तेश्वरच रामदासापेक्षां लहान ठरतात.

४. प्रस्तुत आवृत्ति तयार करण्याच्या कामीं पुढें दर्शविलेल्या हस्तलिखितांचा आम्हांस फार उपयोग झालाः—

(अ) 'भारत–इतिहास–संशोधकमंडळ,' पुणें, ह्या संस्थेच्या संग्रहांतील पोथ्या क्रमांक १४२ व १४२८ ह्या दोन्ही बहुतेक पूर्ण आहेत, पण शेवटच्चीं कांहीं पृष्ठें गहाळ झालेलीं किंवा फाटलीं आहेत. यामुळें त्या पोथ्यांचा लेखक, लेखनकाल इत्यादि माहिती मिळणें शक्य नाहीं.

(आ) 'श्रीसमर्थवाग्देवतामंदिर' धुळें—ह्या संस्थेच्या हस्तलिखित भांडारांतील बाडांक ४२४, १६१८ व ८५३.

(१) बाडांक ४२४ याच्या शेवटीं—'हें पुस्तक······हालि वस्ती मौजे देऊळगांव गाताच(चें) सोमेश्वर संनिधौ। हस्ताक्षर विरपा सिवलिंग बोरामनें ॥ सके १६७६ सावा(?) नाम संवत्सरे फाल्गुन वद्य तीज ते दिने लेखण(न) समाप्त। शके १६७६' (शके १६७६=इ. स. १७५४).

(२) बाडांक १६१८ ह्या पोथींत शेवटीं व मधून मधून एखाद्या अध्यायाच्या शेवटीं लेखकानें आपलें नांव व लेखनकाल वगैरे माहिती दिली आहे. दुसऱ्या अध्यायाच्या शेवटीं असलेल्या लेखांत इतर ठिकाणच्या लेखांपेक्षां ज्यास्त तपशील दिलेला आहेः—'हस्ताक्षर वासुदेव लक्ष्मण। शके १६९० सर्वधारी नाम संवत्सरे पौष वद्य १० बृ(भृ)गुवासरे तदिने प्रसंग संपूर्ण। पुस्तकं ग्रग्र(गृ) हे संग्रह कर्तव्यं.' ॥ (शके १६९०= इ. स. १७६८).

(३) बाडांक ८५३ यांतील अध्याय ६ याचीं व अध्याय ८ याचीं शेवटचीं कांहीं पृष्ठें गहाळ झालीं आहेत, किंवा नष्ट झालीं आहेत. यामुळें अंतिमलेख उपलब्ध नाहीं.

ह्याशिवाय आणखी कांहीं त्रुटित, फार अशुद्ध किंवा अगदीं अलिकडेच लिहिलेल्या पोथ्या 'वाग्देवतामंदिरां'त आहेत. पण वरील तीन निवडक पोथ्यांचाच आम्हीं विशेष उपयोग करून घेतला आहे.

५. धुळें येथील संस्थेसंबंधीं एक गोष्ट नमूद करून ठेवणें इष्ट वाटतें, ती ही, कीं ही संस्था म्हणजे श्री. देव यांच्या सुमारें ४० वर्षांच्या परिश्रमाचें व तपश्चर्येचें फळ आहे. ह्या संस्थेंत त्यांनीं सुमारें २००० बाडें जमवून व तीं जतन करून ठेविलीं आहेत. त्यांत निरनिराळ्या कवींची ग्रंथसंपत्ति सांठवून ठेविलेली आहे. आतां ह्या संस्थेच्या संग्रहीं श्रीसमर्थ रामदासांचें प्रसिद्ध व अ-प्रसिद्ध संपूर्ण वाङ्मय आहे व समर्थपरंपरेंतील ग्रंथकारांचेही ग्रंथ आहेत. तसेंच अनेक ज्ञात व अज्ञात संतकवींचे ग्रंथ आहेत. हा हस्तलिखितांचा अवाढव्य संग्रह पाहून आम्हांस असें वाटतें, कीं यापुढें कोणत्याही प्राचीन मराठी कवींच्या काव्यांची कोणास शुद्ध व संपूर्ण आवृत्ति काढावयाची असल्यास त्यानें प्रथम श्रीसमर्थवाग्देवतामंदिरांत येऊन प्रकाशित करावयाचे ग्रंथ तेथील बाडांतील प्रतींशीं ताडून पाहून शुद्ध करून घेणें इष्ट आणि अवश्य आहे. संस्थेंतील बाडांची वर्णनात्मक यादी छापून तयार झाली असून तिचे दोन भाग आहेत आणि त्यांना जोडलेली सूचि व्यापक आणि संपूर्ण आहे. यामुळें ज्याला जें हस्तलिखित पाहिजे असेल तें त्याला अगदीं थोड्या वेळांत सहज मिळूं शकतें. ह्यापुढें संपादक आणि प्रकाशक ह्या संस्थेचा निःसंकोच मनानें उपयोग करून घेतील, अशी आशा आहे.

६. ही आवृत्ति तयार करितांना **'काव्यसंग्रहां'**तील मूळ कायम ठेविलें असून आम्हांस मिळालेल्या हस्तलिखितांत आढळलेले पाठभेद टीपांत दिले आहेत. जेथें मुद्रणदोष दिसले किंवा पाठ चुकीचे वाटले, (उदाहरणार्थः—नेसा गोंऊनि—अध्याय ५।२९; भयाची काळजी—अध्याय ६।६४; सायक एक दोषें—अध्याय ६।१२० इत्यादि) तेथें ते हस्तलिखितांच्या सहाय्यानें दुरुस्त केले आहेत. ओवीछंदाच्या रचनेंत नियमबद्धता फारशी कडक नसल्यामुळें लेखक जाणून बुजून पाठभेद उत्पन्न करितो किंवा त्याच्या हातून न कळत उत्पन्न होतात. अगदीं मूळ प्रतीबर्हुकूम नक्कल करणारे लेखक क्वचित्. यामुळें महत्वाचे नसलेले (उदाहरणार्थः—'हातें' बद्दल 'हस्तें', 'देखिजे' बद्दल 'पाहिजे' वगैरे) पाठभेद गाळिले आहेत. पुढें परिशिष्ट ३ मध्यें जे पाठभेद दिले आहेत,

त्यांच्याकडे वाचकांनीं लक्ष दिल्यास त्यांत कांहीं सरस पाठ आढळतील, म्हणून त्यांच्याकडे त्यांनीं दुर्लक्ष करूं नये, अशी त्यांस सूचना आहे.

७. ती. कै. **वामन दाजी ओक** यांनीं श्रीमंत सरसेनासाहेब सुभे **भोंसले** सरकार, नागपुर, यांच्या हस्तलिखित ग्रंथभांडारांतील मूळ प्रतीवरून उतरवून घेतलेली **मैराळ**कृत **विराटपर्वाची** प्रत आमच्या संग्रहीं होती. तिचा उपयोग आम्हीं कसा करून घेतला आहे, हें पुस्तकाच्या शेवटीं जोडलेल्या परिशिष्टांवरून वाचकांच्या लक्षांत येईल. **मुक्तेश्वर** व **मैराळ** यांचा परस्परांशीं वस्तुतः कांहीं संबंध होता, असें दिसत नाहीं. तथापि **मुक्तेश्वराच्या** काव्यगुणांवर **मैराळ** किती लुब्ध झाला होता व त्याच्या मनांत **मुक्तेश्वराविषयीं** केवढा पूज्यभाव वसत होता, हें दिसून येतें. (पुस्तकाच्या शेवटीं दिलेल्या परिशिष्टांतील पहिल्या परिशिष्टाचा ५ वा परिच्छेद पाहावा). **मैराळाच्या** विराटपर्वासारखे कित्येक ग्रंथ वाचकांच्या व प्रकाशकांच्या अभावामुळें आतांपर्यंत नष्ट झाले असतील. पण त्या गोष्टीस आतां उपाय नाहीं. तथापि जे ग्रंथ सुदैवानें अद्याप अज्ञातवासांत असतील त्यांचें प्रकाशन करणें हें देवालयाच्या जीर्णोद्धारापेक्षां ज्यास्त पुण्यदायक, कीर्तिप्रद व महत्वाचें आहे, असें आमचें मत आहे. **मुक्तेश्वराच्या** विराटपर्वाच्या प्रकाशनाच्या संधीचा फायदा घेऊन **मैराळाच्या** कृतीचा थोडासा मासला वाचकांस दाखवितां आला व ती० कै० **वा. दा. ओक** यांच्या संग्रहांतील एका अप्रसिद्ध ग्रंथाचा अंशतः उपयोग करून घेण्याचा सुयोग आम्हांस लाधला, ही आमच्यावर ईश्वराची मोठी कृपा होय.

८. पुढें पुस्तकाच्या शेवटीं परिशिष्ट १ यांत ओवीबद्ध विराटपर्व रचणारे **मैराळ**कवि यांच्या संबंधानें कांहीं माहिती दिली आहे. ती छापून झाल्यानंतर आम्हांस **पंढरपुरास** जाण्याचा व श्री**पांडुरंगाचें** दर्शन घेण्याचा अचानक योग आला. तेथें **मोरोपंतांचें** ( वस्तुतः त्यांचे चिरंजीव **रामकृष्णपंत** यांचें ) वसतिस्थान, **बाबा पाध्ये** यांचा वाडा व त्यांची समाधी, **विठोबादादा चातुर्मासे** यांचा मठ व त्यांत त्यांची—त्यांस **दादामहाराज** असें म्हणण्याचा प्रघात आहे—व त्यांचे चिरंजीव **मैराळबोवा** यांची समाधी इत्यादि महत्वाच्या व पवित्र स्थळांचें दर्शन घेतां आलें.

चातुर्मासे यांच्या मठांत मैराळबोवासंबंधीं चौकशी केली असतां असें कळलें, कीं त्यांनीं कांहीं ग्रंथरचना केलेली नाहीं. इतकेंच नाहीं, तर त्यांनीं ग्रंथरचना केली आहे, अशा कल्पनेस आधारभूत कागदपत्रें देखील मठांत नाहींत. तसेंच ह्यासंबंधानें कांहीं दंतकथा किंवा लोकप्रवादही प्रचलित नाहींत. तेव्हां विराटपर्व रचणारे मैराळ हे अनवें ग्रामस्थ संत दादामहाराज यांचे सत्पुत्र मैराळबोवा नसून हे दुसरेच कोणी तरी असले पाहिजेत, हें निश्चितपणें कळून आलें.

सदहू पर्वांत रामटेक क्षेत्राचा उल्लेख असल्यामुळें तेथें चौकशी केली, तेव्हां असें कळलें, कीं तेथील विठोबाचे पुजारी मैराळ आडनांवाचे असून त्यांच्या पूर्वजांपैकीं मैराळबापू हे एक कवि होऊन गेले व त्यांनीं 'रामटेकमाहात्म्य' नांवाचा ओवीबद्ध ग्रंथ रचिला आहे. यावरून 'विराटपर्व' रचणारे मैराळ व 'रामटेक-माहात्म्य' रचणारे मैराळ ह्या दोन व्यक्ती नसून ते दोन्ही ग्रंथ एकाच व्यक्तीनें निर्माण केले असावे, असें सहजच दिसून येतें. सारांश, ओवीबद्ध विराटपर्वाचा कर्ता मैराळ हा पंढरपुर येथील नसून तो रामटेक येथील होता, असें निःसंदिग्धपणें म्हणावयास हरकत नाहीं.

९. कै० जावजी दादाजी शेट, जे. पी. यांनीं इ. स. १८९० मध्यें सुरू केलेला **'काव्यसंग्रह'**, त्यांच्या पाठीमागें, त्यांचे पितृभक्त व सुशील चिरंजीव कै० तुकाराम जावजी शेट, जे. पी. यांनीं सुमारें तेरा चौदा वर्षें महाराष्ट्र वाङ्मयाची व साधुसंतांची सेवा म्हणून अत्यंत निरपेक्षबुद्धीनें चालविला होता. परंतु त्याचे वर्गणीदार कमी होत होत त्यांची संख्या ६०।७० वर आल्यामुळें त्यांना तो नाइलाजास्तव १६२ वा अंक प्रसिद्ध करून इ. स. १९०७ च्या जून महिन्यांत मोठ्या दुःखानें बंद करावा लागला. त्या प्रसंगीं श्री० मुकुंदराय ह्या कवींनीं 'विविधज्ञानविस्तार'मासिकांत ( वर्ष ४० अंक ६, जून १९०७ ) 'काव्यसंग्रहास निरोप' ह्या मथाळ्याखालीं सुंदर आर्या रचून त्या नामशेष होणाऱ्या मासिकाविषयीं सौहार्द दाखविलें व त्याचे जनक, पालक, चालक व संपादक यांच्या सेवेचा गौरव केला. यामुळें त्या सर्वांस आपल्या श्रमाचें चीज झालें, असें खात्रीनें वाटलें असेल. श्री० मुकुंदराय यांच्या गुणग्राहकतेबद्दल श्री० पांडुरंग

ज्ञावजी शेट, जे. पी. हे त्यांचे फार आभारी आहेत, हें प्रस्तुत स्थळीं सांगणें इष्ट आणि अवश्य आहे.

श्री० कै० तुकारामजी शेट यांच्या फोटोखालीं श्री० मुकुंदराय यांच्या 'निरोपां'तील दोन पद्यें दिलीं आहेत. त्यांवरून 'स्थालीपुलाकन्यायानें' तीं सर्व पद्यें किती सुंदर व उच्च दर्जाचीं आहेत, तें वाचकांस सहज कळून येण्यासारखें आहे. अशा सत्कवीचा व आमचा परिचय नाहीं, ह्याबद्दल आम्हास वाईट वाटतें. परंतु त्यांच्याविषयीं आम्हास फार आदर वाटत आहे, हें त्यांस कळविण्याची अनायासें ही संधी आम्हाला मिळाली, याबद्दल फार आनंद वाटतो.

१०. ही मुक्तेश्वराची सेवा आमच्या हातून यथासांग पार पडावी म्हणून येथील व बाहेरच्या कांहीं विद्वान सज्जनांनीं आम्हांस निरनिराळ्या प्रकारें साह्य केलें. आम्ही इ. स. १९३७ च्या डिसेंबरांत तंजावरास गेलों होतों, त्या वेळीं श्री० रामचंद्र भाऊस्वामी गोसावी नरसिंहपुरकर, बी.ए., श्रीगोविंदबाळस्वामींच्या मठाचे अधिपति, यांनीं आम्हांस आतांपर्यंत अज्ञात असलेली मुक्तेश्वरासंबंधीं कांहीं अप्रसिद्ध व अमूल्य माहिती दिली. तसेंच 'भारत-इतिहास-संशोधक-मंडळ', पुणें, व 'श्रीसमर्थवाग्देवतामंदिर,' धुळें, ह्या संस्थांच्या संग्रहांतील हस्तलिखितें आमच्या फार उपयोगीं पडलीं. याबद्दल आम्ही आमच्या ह्या सर्व साह्यकर्त्यांचे व उपरिनिर्दिष्ट संस्थांचे फार आभारी आहों. तथापि श्री० रा. शंकर श्रीकृष्ण देव, बी. ए. एल्. एल्. बी., 'श्रीसमर्थवाग्देवतामंदिरा'चे कार्यकारी विश्वस्त व श्री० रा. शंकर नारायण जोशी, 'इतिहास-संशोधक-मंडळां'तील एक संशोधक यांचा नामोल्लेख करणें, हें आमचें कर्तव्य आहे.

११. आम्ही संपादिलेला **'मुक्तेश्वरकृत स्फुटकाव्यें'** हा ग्रंथ इ. स. १९०६ मध्यें **'काव्यसंग्रहां'**त प्रसिद्ध झाला. त्यानंतर पुन्हां इतक्या वर्षांनीं मुक्तेश्वराच्या काव्याची माधुरी घेण्याचा योग आला, याचा आम्हांला मोठा आनंद वाटतो. ह्या आनंदाचें सर्व श्रेय श्री० रा. पांडुरंग जावजी शेट, जे.पी. यांस आहे. त्यांनीं आमच्यावर सोंपविलेलें हें अवघड व अवजड काम आम्ही कसें

काय बजाविलें आहे, हें पाहाण्याचें काम प्राचीन मराठी काव्यांच्या भोक्त्यांचें आहे. ते ही अल्प सेवा मान्य करून घेतील, अशी आशा प्रदर्शित करून—

[मुक्तेश्वरकविकृतीचा] अर्थ । सांगतां वांकडें जाईल जेथ ।
सज्जनीं लावोनियां हात । नीट केलें पाहिजे. ॥
जें कां आपुलें हो! नव्हे । तेंची दूषण स्वभावें ।
आपुलें झालें तें झांकावें । लाज उघडें देखतां. ॥
[ सभापर्व, अध्याय ८ ओव्या ११०–१११ ]

ह्या मुक्तेश्वराच्या मधुर आणि विनम्र वचनाच्या द्वारें वाचकांपाशीं क्षमेची याचना करून तूर्त लेखणीस विश्रांति देतों.

मुक्तेश्वर दत्तसांप्रदायी होता व त्याचें आराध्यदैवत दत्त हें होय. त्यानें आपली दत्तभक्ति आपल्या ग्रंथांत पुष्कळ ठिकाणीं व्यक्त केली आहे. ह्या गोष्टीचा विचार करितां हें संपादनकार्य दत्तजयंतीच्या दिवशीं पूर्ण व्हावें, हा एक विलक्षण योगायोगच म्हटला पाहिजे.

नागपुर,
दत्तजयंती,
शके १८६०.

दा० के० ओक.

# उपोद्घात.

या नाथेन समर्पिता भगवते पीयूषबुद्ध्या सित
या चास्वाद्य मुखामृतेन हरिणा संभाव्य दत्ता पुन:
न्यस्ता साऽमृतपाणिनास्य रुदतो वक्त्रेऽग वत्सेदृशं
ब्रूहीति प्रभुणैव तस्य बत वाक् स्वाद्वीति किं ब्रूमहे. ॥[1]

( सुश्लोकलाघव-४०० ).

विठोबा-अण्णा दप्तरदार यांनीं वर वर्णन केल्याप्रमाणें मुक्तेश्वराची वाणी अत्यंत मधुर आहे, हें खरें आहे. ती इतकी स्वादु आणि रुचकर होण्याचें कारण एकनाथमहाराजांनीं त्याच्या तोंडांत घातलेला साखरेचा खडा असो, कीं ईश्वरी कृपाप्रसाद असो, त्याची वाणी प्रौढ व प्रसादयुक्त असून त्याचा रस-परिपाक अंतःकरण प्रसन्न व तन्मय करून सोडणारा आहे. अव्वल इंग्रजी अमदानींतील रसिकश्रेष्ठ विद्वद्रत्न कै० कृष्णशास्त्री चिपळूणकर हे मुक्तेश्वराच्या कवितेस फार मान देत असत. अशा ह्या थोर कवीच्या चरित्रासंबंधानें विशेष माहिती उपलब्ध नाहीं. त्यानें आपल्या ग्रंथांत आपल्यासंबधानें जी त्रोटक माहिती दिली आहे, तेवढीच काय ती आपणांस ठाऊक आहे. जेथें एकनाथा-सारख्या थोर माहात्म्याच्या मृत्युशकासंबंधीं व गोब्राह्मणप्रतिपालक व स्वराज्य-संस्थापक शिवछत्रपतीच्या जन्मशकासंबधीं अद्याप निर्णय होत नाहीं, तेथें बिचाऱ्या मुक्तेश्वरास कोण विचारतो व त्याच्या जन्ममरणाच्या शकांची चौकशी कोण करितो ?

मुक्तेश्वराचा जन्म पैठणास शके १५३१ मध्यें झाला, अशी नोंद कोडी-तकर अत्रे यांच्या दप्तरांतील टिपणवहींत व सरंजामे यांच्या जंत्रींत आढळते.

---

१. जी खडीसाखर अमृतभावनेनें भगवंतांनीं एकनाथास अर्पण केली होती व जी भग-वंतांनीं आदरबुद्धीनें आपल्या मुखामृतानें आस्वाद घेऊन परत दिली आणि रडत असलेल्या [ अर्थात् बाल-] मुक्तेश्वराच्या तोंडांत आपल्या अमृतमय करानें ठेविली आणि, 'हे मुला ! ह्या खडीसाखरेसारखें गोड बोल' असें सांगितलें, त्याची वाणी मधुर हें काय सांगितलें पाहिजे ? २. महाराष्ट्र-सारस्वत, पृष्ठ २८५ ( आवृत्ति तिसरी ).

पण त्याच्या मरणशकासंबंधीं कांहींच माहिती मिळत नाहीं. मुक्तेश्वर हा एकनाथाच्या मुलीचा मुलगा. तसेंच तंजावरप्रांतस्थ महाभारतरचनाकार श्रीमाधवस्वामी हेही नाथांचे दौहित्रच. तंजावर येथील श्रीगोविंदबाळस्वामींच्या मठांतील ग्रंथसंग्रहांत सुमारें १००।१५० वर्षांची जुनी एक हस्तलिखित वही आहे. तींत एक नोंद आढळते तीवरून आपणास पुढील नवीन माहिती कळते:—

१. जनार्दनस्वामीच्या मातुलाचे पुत्र विसाजीपंत म्हणून कोणी होते.

२. त्यांना तीन मुली होत्या.

३. पहिली एकनाथास, दुसरी सूरोपंतास व तिसरी कमळाकरपंतास दिली होती. विसाजीपंतानें ह्या कन्या 'आप्तकीनें दिधल्या' होत्या.

४. सूरोपंत ( सूर्याजीपंत ) हे श्रीसमर्थ रामदासाचे तीर्थरूप व एकनाथ हे त्याचे ( रामदासाचे ) मावसे.

५. कमळाकरपंत हेही रामदासाचे मावसे.

६. "एकनाथ मावसे समर्थांचे बारशास गंगातीरीं जांबगांवास आले होते." वरील विधानांवरून समर्थांच्या जन्माच्या सालीं म्हणजे शके १५३० मध्यें एकनाथ हयात होते, हें दिसून येतें. तेव्हां त्यांनीं मुक्तेश्वराच्या तोंडांत खडीसाखर घालून शुभाशीर्वाद दिला असेल, हें संभवनीय आहे.

एकनाथाचा समाधिशक १५२१ समजला जातो, पण तो कितपत विश्वसनीय आहे, ह्याविषयीं शंका आहे. एकनाथ शके १५२१ मध्यें समाधिस्थ झाले, असें त्यांचे चरित्रकार सांगतात. 'गाथापंचका'चे संपादक देखील तोच शक देतात. तंजावर येथील टिपणावरून एकनाथ शके १५३१ मध्यें

१. धोंडो बाळकृष्ण सहस्रबुद्धेकृत एकनाथ महाराजांचें चरित्र, पृष्ठ १९४. २. त्र्यंबक हरी आवटे यांनीं प्रकाशित केलेली श्रीएकनाथमहाराज यांच्या अभंगांची गाथा, प्रस्तावना, पृष्ठ ४.

समाधिस्थ झाले, असेंच म्हणावें लागतें,[1] नाहींतर ते रामदासाच्या बारशाला कसे गेले असते?

एकनाथ, मुक्तेश्वर व रामदास यांचे परस्पर संबंध काय होते, हें वाचकांस कळावें, म्हणून हा थोडा ऊहापोह केला आहे.

मुक्तेश्वर लहानपणीं मुका होता. तो सात आठ वर्षांचा झाला तरी त्याला बोलतां येईना. त्यास एकनाथांच्या कृपेनें वाचा आली, अशी एक दंतकथा आहे. तशीच दुसरी एक दंतकथा आहे. ती अशीः—समग्र महाभारत रचून झाल्यावर मुक्तेश्वरानें तें आपल्या मातामहास दाखविलें. तें वाचून नाथांस फार आनंद झाला पण मूळ व्यासकृतीपेक्षां मुक्तेशकृति अधिक सरस असल्यामुळें मूळ ग्रंथाचा लोकांकडून अनादर होऊं नये म्हणून नाथांनीं तो ग्रंथ गंगेस अर्पण करावयास सांगितलें. मुक्तेश्वरानें एकनाथांच्या आज्ञेप्रमाणें सर्व पर्वे गंगेंत बुडविलीं. पण आपले फार दिवसांचे श्रम फुकट गेले असें पाहून त्याला फार दुःख झालें. तेव्हां नाथांनीं गोदावरीजवळ ग्रंथ परत मागण्यास सांगितलें. मुक्तेश्वरानें तसें करितांच गंगेनें पहिलीं चार पर्वे मात्र परत केलीं.

ह्या दंतकथांवर भरंवसा कितपत ठेवावा किंवा त्यांत कितपत तथ्य आहे, हें ठरणें एकनाथांचा मृत्युशक निश्चित होण्यावर अवलंबून आहे. परंतु महाभारताविषयीं प्रचलित असलेली दंतकथा ही एक कोणीतरी रचलेलें भारूड किंवा तर्कट आहे, असें समजल्यावांचून गत्यंतर नाहीं. कारण एकनाथ हे मुक्तेश्वराचे आजोबा, तेव्हां त्यांनीं आपल्या नातवानें उच्च प्रतीचें काव्य

---

१. एकनाथ शके १५४६ त उत्तमलोकास गेले, असाही उल्लेख आढळतो. पण खरा मतभेद शके १५२१ कीं शके १५३१ यांत आहे. पहिला शक स्वीकारिल्यास एक अडचण उपस्थित होते, ती अशीः—'एकनाथांचा समाधिशक शोधकांनीं शके १५२१ हा दिला आहे. परंतु···एकनाथी भारूडांत एक गद्य अभयपत्र आहे. त्याच्या आरंभीं "स्वस्ति श्रीनृपशालिवाहन शके १५२५ आषाढ वद्य ५ गुरुवासरे" असा कालनिर्देश आहे. ज्या दिवशीं नाथांनीं हें अभयपत्र लिहिलें त्याच दिवसाचा जर हा उल्लेख असेल तर शके १५२१ च्या पुढें–शके १५२५ च्या आषाढांत-नाथ विद्यमान होते, असें म्हणणें भाग आहे; कारण शके १५२१ त समाधिस्थ झालेला मनुष्य आपल्या···रचनेचा काळ शके १५२५ हा देईल, ही गोष्ट बिलकूल संभवनीय नाहीं.' ( आजगांवकरकृत श्रीएकनाथ महाराज यांचें चरित्र, पृष्ठ १५७ ).

निर्माण केल्याबद्दल त्याचें कोडकौतुक केलें असेल, कीं तें बुडवावयास सांगितलें असेल, हें ज्यानें त्यानें स्वतः आपल्या मनाशींच ठरविणें बरें. शिवाय, एकनाथ 'विद्वानेव विजानाति विद्वज्जनपरिश्रमं' ह्या कोटींतील असल्यामुळें त्यांनीं मुक्तेश्वराच्या परिश्रमाचें फळ अशा रीतीनें नष्ट करण्याचा आदेश दिला असेल, असें वाटत नाहीं; आणि सर्वांत महत्वाची गोष्ट ही कीं मुक्तेश्वराचीं पहिलीं चारच पर्वे उपलब्ध नसून सौप्तिकपर्व हें एक व इतर कांहीं पर्वांतील फुटकळ अध्यायही उपलब्ध आहेत. तेव्हां एकंदरींत ही महाभारत ग्रंथ गंगार्पण करविण्यासंबंधीं प्रचलित असलेली दंतकथा विश्वसनीय नाहीं, हेंच खरें.

सारांश, एकनाथांचा मृत्युशक निश्चित झाल्यास मुक्तेश्वरासंबंधीं प्रचलित असलेल्या दंतकथांत तथ्य किती आहे, तें कळेल.

मुक्तेश्वराच्या चरित्राशीं निगडित असलेली आणखी एक महत्वाची बाब म्हणजे 'लीलाविश्वंभर' ह्या व्यक्तीसंबंधीं असलेलें आपलें गाढ अज्ञान, ही होय. कदाचित् हा जोडशब्द दोन व्यक्तींचा निदर्शक नसून दुर्गाशंकर, विजयाशंकर, गिरिजाशंकर अशा पद्धतीचें एकाच व्यक्तीचें तें नांव असावें, अशी अंधुक कल्पनाही डोकावते व मैराळाच्या पुढील ओवीवरून तिला पुष्टी मिळते:—

मूळ बोलिला सत्यवतीकुमर । पुढें साह्य 'जाला' लीलाविश्वंभर ।
प्राकृत मुक्तेश्वर । पांडवप्रतापीं श्रीधर बोलिला. ॥
(विराटपर्व, अध्याय १५।१००)

ह्या ओवींतील 'जाला' ह्या एकवचनी क्रियापदावरून 'लीलाविश्वंभर' हें एकाच व्यक्तीचें नांव होतें, असें म्हणावें लागतें. परंतु मुक्तेश्वरानें क्वचित् एकट्या विश्वंभराच्या[1] नांवाचा उल्लेख केलेला आढळतो. (विराटपर्व, अध्याय १।५ व अध्याय ८।१२१ पहा). यावरून लीला आणि विश्वंभर ह्या दोन व्यक्ती होत्या, असें जरी म्हणतां आलें, तरी 'लीलाविश्वंभर' ह्या पूर्ण नांवाचें 'विश्वंभर' हें संक्षिप्तरूप आहे, असेंही म्हणतां येईल. परंतु लीला व विश्वंभर

---

१. मुक्तेश्वर स्वकृत रामायणाच्या शेवटीं म्हणतोः—
विश्वंभर श्रीगुरुच्या प्रसादें । आनंदवाचा वदलों विनोदें. ॥
( उपसंहार-श्लोक ३ ).

हीं मुक्तेश्वराची माता व पिता यांचीं नांवें होतीं, असा समज आहे, तो सत्याच्या कसोटीस कितपत उतरेल, ह्याविषयीं शंका आहे. विठोबा-अण्णा दप्तरदार यांनीं 'विश्वंभर व लीला यांचा विवाहसंबंध हा मुक्तेश्वराच्या जन्मास कारण झाला,' असें म्हटलें[1] आहे. पण ह्या त्यांच्या विधानास निश्चित स्वरूपाचा कांहीं आधार असेल, असें वाटत नाहीं. शिवाय कालानुक्रमानें मैराळ हा विठोबा-अण्णांच्या १००।१२५ वर्षांपूर्वींचा, तेव्हां त्याला असलेली माहिती ज्यास्त विश्वसनीय आहे, असें समजणें क्रमप्राप्त ठरतें. मुक्तेश्वरानें आपल्या मातृजनकाचा ( एकनाथाचा ) उल्लेख केला आहे. पण प्रत्यक्ष जन्मदात्या जनकजननीसंबंधानें त्यानें मौन धारण केलें आहे, ही मोठ्या आश्चर्याची गोष्ट होय. 'लीला व विश्वंभर' यांचा उल्लेख त्यानें गुरु म्हणून केला आहे, हें 'लीलाविश्वंभरगुरुचरणीं' ( अध्याय ३।१६२ ) व 'लीलाविश्वंभरप्रसादें' ( अध्याय ४।५४ ) ह्या उल्लेखांवरून सिद्ध होतें.

मोरोपंतांनीं 'लीलाविश्वंभरां'चा उल्लेख आपल्या 'सन्मणिमालें'त[2] केला आहे ( गीति ३३ ) व तो त्यांनीं तेथें त्यांना गुरुस्थानापन्न समजूनच केलेला आहे, हें त्या गीतींतील 'स्पर्शे शिष्या यत्कर' ह्या शब्दयोजनेवरून सुस्पष्ट होत आहे. पुढें मागें मुक्तेश्वराचे जनक चिंतोपंत तेच विश्वंभरबोवा असा निश्चित स्वरूपाचा पुरावा आढळला, तरच ह्या समजुतीचा घोटाळा नाहींसा होईल. जयरामसुत[3]-कृत 'संतमालिकें'त[4] ''लीलाविश्वंभर, चिंतामणी, मुक्तेश्वर मुद्गल, दासोपंत…'' अशीं नांवें आढळतात. ह्यावरून चिंतामणी ( मुक्तेश्वराचे जनक ) व विश्वंभर ह्या दोन व्यक्ती होत्या, हें उघड आहे.

मुक्तेश्वराच्या चरित्रांतील ज्या दुसऱ्या गोष्टी प्रसिद्ध आहेत, त्या येथें देऊन निष्कारण काळाचा व स्थळाचा अपव्यय करणें इष्ट वाटत नाहीं.

---

१. श्रीविश्वंभरलीलायोगो मुक्तेशभूतिमातनुते ।
या हि महाभारतरणसमुद्यमे प्राकृतान्सतृष्णयति. ॥ (सुश्लोकलाघव–३९८).

२. श्रीलीलाविश्वंभरपदनति हेतु ध्रुवाचि यागाला ।
स्पर्शे शिष्या यत्कर, जेंवि हरदर ध्रुवाचिया गाला. ॥ ( सन्मणिमाला–३३ ).

३. जयरामसुताचा काळ शके १५८० पासून शके १६४० ( कै० वि. का. राजवाडे ).

४. अनेककविकृत पदसंग्रह, भाग ३, ( काव्यसंग्रह–ग्रंथमाला–३५ ) कटिबंध २४८ वा पहा ( पृष्ठें १०१–१०२ ).

## २. मुक्तेश्वर संत होते काय ?

संत म्हणजे काय ह्याची कांटेतोल व्याख्या करणें कठिण आहे. परंतु एकनाथ, दासोपंत, रामदास, तुकाराम, केशवस्वामी, रंगनाथ इत्यादि प्रातः-स्मरणीय सद्गृहस्थांच्या पंगतीस मुक्तेश्वरास बसविण्यास कांहीं हरकत आहे कीं काय ? ह्या दृष्टीनें आपण ह्या प्रश्नाकडे पाहूं.

जगांत 'चमत्कारावांचून नमस्कार नाहीं' ह्या न्यायानें पाहिल्यास तत्कालीन व तत्पूर्वकालीन साधुसंतांनीं जसे अद्भुत चमत्कार करून जनतेस चकित करून सोडलें, तसें कांहीं मुक्तेश्वरानें केल्याचें प्रसिद्ध नाहीं. 'लोकसंग्रहा'-साठीं किंवा इतर दुसऱ्या कोणत्या कारणाकरितां त्यानें असे कांहीं उपाय योजिल्याचें प्रसिद्ध नाहीं. तसेंच त्यानें एखादा मठ किंवा सांप्रदाय स्थापन[1] केलेला आढळत नाहीं. या दोन कारणांमुळें तो 'संत' म्हणून जितका प्रसिद्धीस यावा तितका आला नाहीं, एवढें खरें. शिवाय, कांहीं व्यक्ती स्वभा-वतःच प्रसिद्धिपराङ्मुख असतात, हेंही एक कारण असूं शकेल. 'संत' ही पदवी प्राप्त होण्यासाठीं ईश्वरभक्तिपरायणता, सच्छील व पवित्राचरण हे तीन गुण अंगीं असणें अवश्य आहे. तेव्हां मुक्तेश्वराच्या अंगीं ह्या गुणांचा अभाव होता कीं काय ? असा प्रश्न उत्पन्न होतो. ह्या मुद्यासंबंधीं साधकबाधक चर्चा केली असतां आपणास ह्या प्रश्नाचें उत्तर मिळेल.

कै० बाळकृष्ण अनंत भिडे मुक्तेश्वराची गणना संतमालिकेंत करीत नाहींत.[2] ते त्यास राष्ट्रहितैषी, समाजसुधारक, व तत्कालीन लोकस्थितीसंबंधीं पूर्ण जाणीव असलेले थोर पुरुष समजतात व ह्या नात्यानें त्याच्याकडे पाहातात.

---

१. मुक्तेश्वरानें एखादा सांप्रदाय स्थापन केला असावा, असें समजण्यासारखा पुरावा उपलब्ध नाहीं तथापि तो गुरूपदेश देत असावा, असें वाटतें. 'भारत-इतिहास-संशोधक-मंडळ,' पुणें, वार्षिक इतिवृत्त, शके १८३६ यांत मराळसिद्धकृत 'निरंजनभेदु' नामक ग्रंथाविषयीं माहिती दिलेली आहे. त्या ग्रंथाच्या शेवटीं पुढील ओवी आढळतेः—

शांति, निवृत्ति, क्षमा । हे तंव सद्गुरूची महिमा ।
परीस लागल्या पालटे दैन्या । **मराळसिद्ध संपन्न मुक्तेश्वराचेनी.** ॥

ह्या ओवीवरून मराळसिद्ध हा शिष्य व मुक्तेश्वर हा गुरु हें उघड दिसतें.

२. त्यांचा मुक्तेश्वरावरील निबंध, पृष्ठ ७० पहा.

कै० भावे तर मुक्तेश्वरावर सख्त नाराज आहेत; कारण त्यांच्या मतें श्रृंगाराचें वर्णन करितांना त्या भरांत वाहवत जाऊन मुक्तेश्वरानें सभ्यता आणि शिष्टता यांची क्वचित् प्रसंगीं हकालपट्टी केली आहे आणि त्यामुळें श्रृंगाराचें पर्यवसान अश्लीलपणांत झालें आहे; तसेंच प्रसंगवशात् त्यानें आचरट विनोदासही थारा दिला आहे. अशा प्रकारच्या वर्णनासंबंधानें कै. भावे यांची उपपत्ति अशी आहे:—'कदाचित् मनाचे हे असले अंकुर मुक्तेश्वरामध्यें आनुवंशिकही असतील, असें त्याच्या बापाच्या आख्यायिकेवरून आणि त्याच्या पणत्वाला दिलेल्या कोल्हापुरकरांच्या सनदेंत उल्लेखिलेल्या गायनकलेंतील नैपुण्यावरून सहज मनांत येतें.' तसेंच 'हे राजश्री काशींत अभ्यासाशिवाय दुसरेही कांहीं ढंग करीत असावे, असेंही वाटतें' असाही टोमणा कै० भावे यांनीं मारावयास सोडिलें नाहीं.

कै० भावे यांनीं मुक्तेश्वराच्या वडिलांच्या बाहेरख्यालीपणाचा संबंध मुक्तेश्वरापर्यंत आणून पोंचविला आहे, तो कदाचित् क्षम्य मानतां येईल. परंतु त्याच्या पणत्वापर्यंत ते त्याचा धागादोरा आणून पोंचवितात, हें विशेष आहे. कै० भावे यांनीं दाखविलेला कार्यकारणभाव अजब आहे, आणि त्यांनीं लढविलेलें तर्कशास्त्र तर त्याहून अजब आहे. त्यांच्या ह्या कोटिक्रमास 'भांगेंत तुळस' हें एक बिनतोड उत्तर पुढें करितां येण्यासारखें आहे. पण कै० भावे हे विकारवश झाल्यामुळें त्यांचा ह्या बाबतींत तोल सुटला आहे. एकदां मन पूर्वग्रहदूषित झाल्यावर, कावीळ झालेल्या माणसाप्रमाणें, कोणाही लेखकास वाटेल तें लिहितां येतें. आजकाल, कवीच्या काव्यांत त्याच्या चरित्राचें प्रतिबिंब असतें, असें समजण्याचा प्रघात पडला आहे. त्यामुळें लेखकाचें शील, त्याची वागणूक, त्याची सांपत्तिक स्थिति इत्यादि गोष्टींसंबंधानें भलत्याच कल्पना

---

१. कै. विनायक लक्ष्मण भावे यांचें 'महाराष्ट्र-सारस्वत' (आवृत्ति तिसरी), पृष्ठें २८८–२९० हीं पहावीं. प्रस्तुत प्रसंगीं आंग्लदेशीय त्रिखंडकीर्ति नाटककार शेक्सपीयर याच्या नाटकांसंबंधानें रशिअन तत्ववेत्ता कौंट लिओ टॉलस्टाय याचें मत काय होतें तें पाहा:—"The works of Shakespeare do not meet the demands of every art, and besides that, their tendency is very low and immoral." (Recollections and Essays by Leo Tolstoy).

वाचकांच्या मनांत उत्पन्न होतात, आणि त्या आधारावर बांधलेले सिद्धांत चुकीचे ठरतात.

मुक्तेश्वरासंबंधानें त्यांनीं जो आक्षेप घेतला आहे त्याच्या समर्थनार्थ कै० भावे लिहितातः—'ही असलींच ( अत्यंत शृङ्गारपर ) वर्णनें मुक्तेश्वरापासून उसनीं घेतलीं असतांही श्रीधरस्वामीचे ग्रंथ नित्य भक्तिभावानें घरोघर वाचले जातात, आणि मुक्तेश्वराच्या भारताचें एकाही ठिकाणीं पारायण झालेलें कां ऐकूं येत नाहीं, हा प्रश्न मनांत घोळत राहातोच.' हा प्रश्न त्यांच्या मनांत घोळत राहून तो अनिर्णीत राहाण्याचें कारण त्यांचें एकांगी विवेचन हें होय.

कै० भावे यांना घोटाळ्यांत पाडणाऱ्या प्रश्नाचें उत्तर शोधावयास फार दूर जावयास नको. पण ठरींव विचारप्रणालीच्या आजूबाजूस पाहावयाचेंच नाहीं, असें ठरविल्यानंतर दुसरी बाजू न दिसणें साहाजिक आहे.

मुक्तेश्वराच्या काव्यांतील माधुरी श्रीधराच्या काव्यांतील गोडीपेक्षां ज्यास्त आहे, हें खरें. पण श्रीधराचा आटोपशीरपणा त्याच्या फायद्यावर पडला आहे. शिवाय त्यानें आपल्या काव्यांस नांवें देण्यांतही चतुरपणा दाखविला आहे. नुसत्या 'रामायण', 'महाभारत' ह्या साध्या व जुनाट नांवांपेक्षां 'रामविजय', 'पांडवप्रताप' हीं नांवें जास्त कुतूहलोत्पादक आहेत. मुक्तेश्वराच्या फक्त आदिपर्वाचे ५० अध्याय असून ग्रंथसंख्या ७,००० पेक्षां ज्यास्त आहे, पण श्रीधरानें सर्व महाभारत ६४ अध्यायांत ग्रथित केलें असून ग्रंथसंख्या १३,००० पेक्षां थोडी ज्यास्त आहे. यावरून 'पांडवप्रताप' लोकप्रिय कां झाला व मुक्तेश्वरी पर्वे मागें कां पडलीं, हें सहज लक्षांत येईल. शिवाय, मुक्तेश्वराचीं सर्व पर्वें उपलब्ध नसल्यामुळें त्याच्या महाभारताचें 'पारायण' लोकांनीं कसें करावें, हा एक मोठा बिकट पेंचच आहे.

आतांपर्यंत कै० भावे यांच्या शंकेचें निरसन यथामति केलें आहे. परंतु त्यांची शंकाच कशी निर्मूळ आहे तें आपण पाहूं.

एकनाथांचा निधनकाळ अद्याप निश्चित झालेला नाहीं. ते शके १५४६ पर्यंत हयात असल्यास ( मागें पृष्ठ ३ टीप १ पहा ) त्यांचा दौहित्र पैठणास त्यांच्याच देखरेखीखालीं लहानाचा मोठा झाला असावा व त्यांनींच त्याला तत्कालीन रिवाजाप्रमाणें शिक्षण दिलें असावें. ह्या गोष्टींचा विचार केला

असतां आणि एकनाथांनीं आपले जामात चिंतोपंत ऊर्फ चिंतामणशास्त्री (मुक्तेश्वराचे जनक) यांस ताळ्यावर आणून सन्मार्गास लाविलें, हें आपणास माहीत असतां, मुक्तेश्वर उन्मार्गगामी होता, अशी कल्पना करणेंच हास्यास्पद होय, असें आम्हास वाटतें.

दुसरी विशेष महत्वाची गोष्ट, मुक्तेश्वराचा जन्म शके १५३१ मध्यें झाला, हें वर सांगितलेंच आहे. त्याच सुमारास रामदास, रंगनाथ, केशवस्वामी, जयरामस्वामी व आनंदमूर्ति हे सत्पुरुष—ज्यांना रामदासपंचायतन असें म्हणतात—महाराष्ट्रांत अवतीर्ण झाले. यांच्या भरीव आणि तेजस्वी कामगिरीसंबंधानें वाचकांस माहिती आहेच. या पंचायतनांतील रंगनाथस्वामी[1] निगडीकर यांनीं लिहिलेल्या संतमालिकेंत ( ओवी ३४ ) मुक्तेश्वरास नमन केलें आहे. ह्या एकाच गोष्टीवरून त्याला त्याचे समकालीन संत किती पूज्य मानीत असत व तत्कालीन समाजांत त्याची मानमान्यता केवढी मोठी होती, हें दिसून येतें. तसेंच रंगनाथानंतर थोड्याच वर्षांनीं प्रसिद्धीस आलेले संतकवि उद्धवचिद्धन यांच्या 'संतमालिकें'त पुढील ओवी आढळते:—

> एकनाथ जनार्दन । मुक्तेश्वर भक्त अभिधान ।
> जयाचेनि स्मरणेंकरून । होती पावन जड जीव. ॥ ४५ ॥

ही प्रशस्ति ज्याचे मातृजनक एकनाथमहाराज होते त्याच मुक्तेश्वराची आहे, हें कशावरून? अशी शंका कोणी घेईल, असें वाटत नाहीं.

सारांश, मुक्तेश्वर हा नामवंत महाकवि होता, तसाच तो परम वंद्य संतेही[2]

---

१. जन्मशक १५३४, निर्याणशक १६०६.

२. 'महाराष्ट्रकवि'—स्फुटसंग्रह, भाग १ यांत सिद्धचैतन्यकृत 'संतमालिका' छापलेली आहे. तींत पुढील ओंवी आहे:—

> अज्ञानसिद्ध नाथ प्रसिद्ध । मुक्तेश्वर मैराळसिद्ध ।
> मार्कंड रंगोबा प्रसिद्ध । ठाऊका आहे संतांसीं. ॥ १७ ॥

तसेंच भारत–इतिहास–संशोधक–मंडळ, पुणें, ह्या संस्थेच्या शके १८३६ च्या वार्षिक इतिवृत्तांत (पृष्ठें १५७–१६०) भगवानकवि कऱ्हाडकर यांच्या 'प्रातःस्मरामि' नांवाच्या प्रकरणाविषयीं माहिती दिलेली आहे. 'प्रातःस्मरामि' म्हणजे प्रातःकाळीं करावयाचें नामस्मरण. यांत संतांचीं नांवें आहेत व त्यांत मुक्तेश्वराचें नांव आहे. मराळसिद्ध आणि मैराळसिद्ध हीं एकाच व्यक्तीचीं नांवें असावीं, असें वाटतें.

होता. तो रामजोशीबुवां ( मोरोपंतांचे समकालीन ) सारखा नुसता रसिक व रंगेल कवि असता, तर त्याचा अंतर्भाव संतमालिकेंत कोणींही केला नसता. मुक्तेश्वर उन्मार्गगामी होता, असें निश्चितपणें सिद्ध न करितां केवळ त्याच्या 'फटकळ'पणाला वाजवीपेक्षां ज्यास्त महत्व देऊन त्याच्यावर कै० भावे यांनीं दोषारोप केला आहे, असें आमचें मत आहे. त्यांनीं विकारवश होऊन जे अनुदारपणाचे उद्गार काढिले आहेत, त्यांस तो कितपत पात्र आहे, हें वाचकांनींच ठरवावें, हें बरें.

मुक्तेश्वरानें दांभिक, दुराचारी व पोटभरू महंतांवर व शिष्यशिष्यीणींचा तांडा बाळगून समाजांत अनीतीचा प्रसार करणाऱ्या बकध्यानी भोंदूवर कसे कडक कोरडे उडविले[1] आहेत, तें पाहिलें असतां तो त्याच माळिकेंतील असेल, हें आम्हांस संभवनीय वाटत नाहीं.

---

## ३. मुक्तेश्वरानें अठरा[2] पर्वें रचिलीं होतीं काय ?

मुक्तेश्वरानें महाभारताच्या सर्व पर्वांवर ग्रंथरचना केली होती, असा लोकप्रवाद आहे, त्यांत कांहीं तथ्य आहे कीं नाहीं, हें आतां आपण पाहूं. त्यानें विराटपर्वाच्या शेवटीं:—

पांडव स्थापावे निजपदीं । ऐसी कृष्णाची बुद्धी ।
तया कार्याचिये सिद्धी । विराटनगरीं राहिला. ॥
तेंची निरूपण पुढारें । उद्योगपर्वीं सविस्तारें ।
श्रवण करिजे जें कां चतुरें । व्यासदेव बोलिले. ॥

(अध्याय ८ ओव्या ११९–१२०)

---

१. मुक्तेश्वरकृत स्फुटकाव्यें यांतील 'मूर्खांचीं लक्षणें,' ओवी ६२ ( पृष्ठ ७ ) व पद ५ वें ( पृष्ठ २८५ ) पहा.

२. आदिपर्व, सभापर्व । वन–विराट–उद्योगपर्व । भीष्म–द्रोण–कर्णपर्व । शल्य–गदा दहावें. ॥ १ ॥ सौप्तिक, स्त्रीपर्व, शांतिपर्व । अनुशासन, अश्वमेधपर्व । व्यासाश्रम, मौसलपर्व । हें सोळावें जाणिजे. ॥२॥ महाप्रस्थानिक सत्रावें । स्वर्गारोहण अठरावें । भारतपर्वांचीं हीं नांवें । अनुक्रमें जाणावीं. ॥ ( मुक्तेश्वरकृत आदिपर्व, अध्याय १ ओव्या ११६–११८).

असा उल्लेख केला आहे. याप्रमाणेंच उद्योगपर्वाचा उल्लेख मुक्तेश्वरानें आदिपर्वांतही केला आहेः—

ऐसे हे ययातीचे दौहित्र । चौघे माधवीचे सुपुत्र ।
यांचें सविस्तर चरित्र । **उद्योगपर्वीं** परिसणें. ॥
( अध्याय २० ओवी १७३ )

'मूर्खांचीं लक्षणें' हा मूळमहाभारताच्या आधारें रचिलेला उद्योगपर्वांतर्गत भाग प्रसिद्ध आहे. तसेंच भीष्मपर्वांतील भगवद्गीतेवर समपद्य ओवीबद्ध टीकाही प्रसिद्ध आहे. द्रोणपर्व लिहिण्याचा त्याचा विचार होताः—

[ अभिमन्यूचा ] पुरुषार्थ अचाट । **द्रोणपर्वीं** होईल प्रगट ।
ज्यासीं तुळावया वाट । उभय दळीं असेना. ॥
[ आदिपर्व–अध्याय ४८।६५ ]

'सौप्तिकपर्व' समग्र उपलब्ध झालेलें आहे. त्याच्या शेवटीं—

यापरी जन्मेजया! भूपति! । 'सौप्तिक' पावलें समाप्ती ।
पुढें **स्त्रीपर्वा**ची स्थिती । कर्णनेत्रीं विलोका. ॥
( अध्याय ४।१२७ )

असें म्हटलेलें आहे. यावरून पुढील पर्व लिहिण्याचें मुक्तेश्वराच्या मनांत होतें, हें खास. शांतिपर्वांतील 'शुकरंभासंवाद' हा भागही उपलब्ध आहे. तेव्हां मुक्तेश्वराचा सबंद महाभारत रचण्याचा विचार होता, ह्या गोष्टीसंबंधानें दुमत होण्याचें कारण नाहीं. पण त्याचा तसा विचार असला, तरी त्याप्रमाणें त्याच्या हातून कृति घडलीच असेल, हें कशावरून ? अशी शंका येणें साहाजिक आहे. परंतु देवदासकृत 'संतमालिकें'तील पुढील ओवीवरून ती शंका निर्मूळ ठरतेः—

मुक्तेश्वरा मुक्तदशा । दिधली तुंवा जगदीशा ।
पुरवून त्याची आशा । **भारथटीका वदविली.** ॥ ८८ ॥

ही संतमालिका देवदासानें शके १६०८ आषाढ शुद्ध ३ सोमवारीं रचिली, असें तिच्या शेवटीं उल्लेखिलेल्या कालावरून कै० राजवाडे यांनीं निश्चित केलें आहे.

'मुक्तेश्वरांचा जन्मशक, शके १५३१ म्हणजे इ. स. १६०९ हा सर्वत्र मानितात.'[1] यावरून त्यानें आपल्या वयाच्या पन्नाशीपूर्वीं म्हणजे शके १५८१ च्या सुमारास महाभारत रचिलें, अशी कल्पना केल्यास त्यानंतर देवदासानें सुमारें २५।३० वर्षांच्या आंतच आपली 'संतमालिका' रचिली, हें उघड आहे. ह्या सर्व गोष्टींचा समन्वय केल्यास असें दिसतें, कीं मुक्तेश्वरानें 'भारथटीका' रचिली ही गोष्ट त्यानें प्रत्यक्ष माहितीवरूनच लिहिली असावी, कारण मुक्तेश्वर व देवदास हे दोघे जवळजवळ समकालीनच होत. कदाचित् शके १६०८ मध्यें देवदास पंचविशीच्या आंतबाहेर असेल व मुक्तेश्वर विशेष वयोवृद्ध असेल, इतकेंच. पण देवदासाला मुक्तेश्वराच्या समग्र महाभारताविषयीं माहिती नसती तर 'जगदीशानें मुक्तेश्वराकडून भारथटीका वदविली' असें स्पष्ट विधान त्यानें केलें नसतें. मुक्तेश्वरानें फक्त चार ( किंवा पांच ) पर्वें रचिलीं अशी वस्तुस्थिति असती, तर त्यानें तसेंच सरळपणें सांगितलें असतें.

मोरोपंतांच्या पुढील उद्गारांवरून मुक्तेश्वरानें सर्व भारतावर काव्यरचना केली, अशी त्यांची समजूत होती, असें दिसतें:—

> मुक्तेश्वरकृत भारत आवडतें विठ्ठलासि कीं पर्व ।
> 'सर्व' श्रवणें हरितें आशा कविच्या अशेषही गर्व. ॥
>
> ( पांडुरंगदंडक )

कारण भारत जर 'सर्व' रचलें गेलें नसतें, तर 'सर्व श्रवणें' हे शब्द केवळ अनमानधपक्यानें पंतांसारख्या कारकुनीबाण्याच्या व कांटेकोरपणाबद्दल प्रसिद्ध असलेल्या कवीनें योजिले असते, असें वाटत नाहीं.

विठोबा-अण्णा दप्तरदार ( मृत्यु इ. स. १८७३ ) यांनीं आपल्या 'सुश्लोकलाघव' नामक काव्यांत (श्लोक ३९९ पहा) मुक्तेश्वरानें चारच पर्वें रचिलीं, असें म्हटलें आहे. अर्थात् त्यांनीं आपल्या माहितीप्रमाणें लिहिलें तें ठीकच लिहिलें. परंतु विठोबा-अण्णा यांचें लक्ष श्लेषादि अलंकारांकडे असल्यामुळें (जसें:— चार पर्वें म्हणजे मुक्ताहाराचे चार पदर ) त्यांचें काव्य इतिहासाच्या कसोटीस कितपत उतरेल, याविषयीं शंका वाटते. आणखी दुसरी गोष्ट ही, कीं

---

१. कै. भिडे यांचा मुक्तेश्वरावरील निबंध.

वर दर्शविल्याप्रमाणें उद्योग-भीष्म-शांति ह्या पर्वांतील कांहीं भाग उपलब्ध झाले असून सौप्तिकपर्वही उपलब्ध झालेलें असल्यामुळें त्यांच्या विधानास म्हणजे मुक्तेश्वरानें चारच पर्वें रचिलीं होतीं, ह्या गोष्टीस महत्व देण्याचें कांहींच कारण दिसत नाहीं.

आतां ह्याच्या पुढील महत्वाचा आणि सोडविण्यास अत्यंत कठिण असा प्रश्न म्हणजे 'जर मुक्तेश्वरानें अठरा पर्वें रचिलीं होतीं, तर तीं काय झालीं ?' हा होय. ह्या प्रश्नाकडे आपण जरा चौकस दृष्टीनें पाहिल्यास त्याचें उत्तर आपणास सहज सांपडेल. वेदान्तविषयक ग्रंथ मराठींत रचणें अनिष्ट व धर्मबाह्य समजलें जात असल्यामुळें काशीक्षेत्रस्थ विद्वान ब्राह्मणांनीं एकनाथमहाराजांना आपलें भागवत गंगेंत बुडविण्यास सांगितलें होतें. मुक्तेश्वराचे समकालीन तुकाराममहाराज यांच्या अभंगाच्या वह्या रामेश्वरभट्टानें इंद्रायणींत बुडविल्याच होत्या. याखेरीज आपसांतील द्वेष, मत्सर इत्यादि मनोविकार हे दुसऱ्याचा ग्रंथ बुडविण्यास किंवा अन्य रीतीनें नष्ट करण्यास कारणीभूत होतात, आणि मुक्तेश्वराचा मत्सर करणारे कांहीं लोक तेव्हां होते असें, 'मूढ अल्पकें बोलती वचनें । तें मत्सरें अथवा नेणतपणें.' ॥ (विराटपर्व, अध्याय १—६) ह्या त्याच्या उद्गारावरून दिसून येतें. परंतु अशा प्रकारें कांहीं विशिष्ट व्यक्तींनीं एकाद्याचा ग्रंथ बुडविण्याचा प्रयत्न केल्यास त्यांत त्यांना यश येण्याचा संभव फारच कमी असतो. आपल्या मनासारखी ग्रंथरचना झाली नाहीं म्हणून क्वचित्प्रसंगीं खुद्द ग्रंथकारच आपला ग्रंथ गंगेस अर्पण करितो. परंतु मुक्तेश्वरासारख्या प्रभावशाली कवीच्या बाबतींत हा प्रश्नच उद्भवत नाहीं. पण विशेष

१. प्रस्तुत स्थळीं पुढील उतारा वाचकांस मनोरंजक वाटेल अशी आशा आहे. हें पत्र पुरुषोत्तमभट नामक आश्रितानें चाफळ येथील मठाचे कारभारी रंगोपंतदादा यांस लिहिलेलें असून तें शके १७३० मधील आहे:—"आपण कार्य आम्हास सांगितलें होतें त्याचा मजकूर आम्ही पुण्यपुरीहून येऊन पंचवीस दिवस जाले. नंतर त्या उद्योगास आरंभ आम्ही तीन चार वेळ केला व कांहीं श्लोकही तयार जाले. परंतु श्रीस्वामीची इच्छा नाहीं, म्हणून तीं पत्रें श्रीकृष्णाबाईचा (च्या) उदकांत टाकिलीं. तात्पर्य अम्हास स्वप्नांत स्वामीनीं स्वकीय वेष द्विजरूप धारण करून आज्ञा केली जे आपण जा (ज्या) उद्योगास प्रवर्तलां आहां हा आम्हास मान्य नाहीं." (श्रीरामदाससंप्रदायाचीं कागदपत्रें, पत्रांक २७९).

विचार करून पाहतां 'अस्मानी' आणि 'सुलतानी' हीं कारणें मात्र खरीं महत्वाचीं होत.

अग्निप्रलयामुळें घरेंदारें अग्निसात् होणें, अतिवृष्टीमुळें घरेंदारें वाहून जाणें किंवा त्यांतील वस्तु खराब होणें, अशा प्रकारच्या संकटांपुढें कोणाचें कांहीं चालत नाहीं. तसेंच राजसत्तेचा किंवा राज्यकर्त्यांचा कोप झाल्यास त्यास तोंड देणें, हेंही फार कठिण आहे. ग्रंथाचा प्रसार होणें तत्कालीन राजकीय परिस्थितीवर अवलंबून असतें. आजकालही राजसत्तेस मान्य नसलेलें वाङ्मय जप्त केलें जातें, हें आपण पाहातोंच. सध्यां मुद्रणाच्या सोयीमुळें कोणत्याही ग्रंथाच्या हजारों प्रती अगदीं थोड्या वेळांत तयार होऊं शकतात. असें असूनही जर जप्त झालेला ग्रंथ लुप्त होऊन कालांतरानें नष्ट होऊं शकतो, तर ज्या काळीं हस्तलिखित प्रतींच्या द्वारेंच ग्रंथाचा प्रसार होत असे, त्या काळीं राजसत्तेच्या लेखणीच्या एकाच फटकाऱ्यासरसा एखादा ग्रंथ नष्ट करणें शक्य आणि अगदीं सोपें होतें.

मुक्तेश्वराच्या काळीं पैठण हें कांहीं वर्षें विजापुरकरांच्या व कांहीं वर्षें अहमदनगरकरांच्या पादशाहींत मोडत असे. तेरवाड हा गांवही मोंगलांच्या अमलाखालींच होता. तेव्हां मुक्तेश्वराच्या महाभारतावर तत्कालीन राज्यकर्त्यांची व त्यांच्या प्रतिनिधींची वक्र दृष्टी झाली असावी, अशी कल्पना केल्यास ती अगदीं वावगी आहे, असें वाटत नाहीं. मुक्तेश्वराच्या वाणींतील अद्भुत ओज आणि वीररसानें गांठलेली अत्युच्च परिसीमा, तसेंच त्यानें महाराष्ट्राच्या महत्वाविषयीं काढलेले उद्गार—

**महाराष्ट्र जें सर्व राष्ट्रांसि राजे।**
**जयाच्या भयें व्यापिले देव लाजे. ॥**

(रामायण, युद्धकांड, श्लोक ४६१)

यांच्याकडे बारकाईनें पाहिल्यास आमची कल्पना कोणासही मान्य होईल. शिवाय, ज्या महाराष्ट्रीयांस स्वराज्याचीं सुखस्वप्नें पडूं लागलीं होतीं त्यांच्या कानावर युद्धोपक्रमास प्रोत्साहन देणाऱ्या व भारतीय वीराच्या खड्गांचे खणखणाट ऐकतांच त्यांचे बाहु स्फुरण पावण्यास लावणाऱ्या युद्धप्रसंगाच्या स्फूर्तिदायक वर्णनांस बंदी करणें तत्कालीन परधर्मीय राज्यकर्त्यांस अवश्य

वाटणें साहाजिक होतें; आणि असाच कांहीं प्रकार घडला असावा, असें आमची मनोदेवता आम्हाला सांगते.

आमची ही कल्पना अगदींच नुसत्या तर्कावर उभारलेली नसून, तशी कल्पना होण्यास सबळ कारणही आहे. एकनाथांना उमा नांवाची एक कन्या होती. ती कर्नाटकांत नागनाथ नांवाच्या गृहस्थास दिलेली होती. तिचा कनिष्ठ पुत्र म्हणजे नाथांचा दौहित्र माधवस्वामी. यानें शके १६१५–१६२९ ह्या काळांत समग्र महाभारतावर ओवीबद्ध रचना केली. त्याचीं सर्व पर्वें तंजावराकडे उपलब्ध आहेत व कांहीं तेथील 'सरस्वती-महालां'तील ग्रंथालयांत आहेत. हें महाभारत रचण्याच्या वेळीं एकोजीराजे भोसले यांचे पुत्र शहाजी राजे राज्य करीत होते. ह्या सर्व लिहिण्याचा इत्यर्थ हा, कीं माधवस्वामी स्वराज्यांत राहात होते म्हणून त्यांचीं पर्वें टिकलीं. पण मुक्तेश्वर मोगलाईत राहात होता म्हणून त्याचीं वीरश्रीस उत्तेजन देणारीं पर्वें नष्ट झालीं. मुक्तेश्वर व माधवस्वामी हे मावसभाऊ. मुक्तेश्वर वयानें माधवस्वामींपेक्षां २५।३० वर्षांनीं तरी वडील असावे. निरनिराळ्या परिस्थितीमुळें दोघांच्या ग्रंथांची विल्हेवाट कशी लागली, तें पाहाण्यासारखें आहे.

ह्याखेरीज दुसरें अगदीं उघड आणि सुस्पष्ट कारण असें दिसतें, कीं त्या वेळीं छापण्याच्या कलेचा प्रसार आपल्याकडे झालेला नसल्यामुळें, ग्रंथकार बहुधा आपले ग्रंथ एकांतांत बसून लिहून काढी व तदनंतर ते स्वतःच लोकांस वाचून दाखवी, व वाचतांना त्यांतील वर्ण्यविषयांसंबंधीं आपल्या श्रोत्यांस सांगोपांग माहिती देई. मुक्तेश्वरासारखा मोठ्या धडाडीचा प्रतिभासंपन्न कवि आपलें बाड नुसतेंच वाचून न दाखवितां त्यांतील विषयाशीं श्रोते समरस होतील अशा प्रकारचें प्रवचनही करीत असला पाहिजे. ज्याप्रमाणें आजकालचे कांहीं प्रवचनकार व कीर्तनकार एखाद्या पौराणिक कथानकाचा आधार घेऊन त्याचा धागा सद्यःस्थितींतील घडामोडींशीं जोडतात, त्याप्रमाणेंच वर्ण्यविषयाचें विवेचन करण्याची मुक्तेश्वराची पद्धति असावी. मुक्तेश्वराच्या काव्यांत जेथें जेथें मल्लांच्या कुस्त्या, भूमंडळ दणाणून सोडणारीं युद्धें, सेनेच्या हालचाली, रणोत्साह उत्पन्न करणारीं भाषणें इत्यादि प्रसंग आले आहेत, तेथें तेथें त्या वेळीं त्याच्या अंगांत वीरश्रीचा संचार झाल्याचा भास होतो. आरणीच्या आनंद-

तनयासारखा तो 'शिपायी' म्हणून प्रसिद्ध नाहीं, हें खरें. पण तत्कालीन इतिहासाच्या अभावीं तो शिपायीगडी होता किंवा नाहीं, व त्यानें कोठें मर्दुमकी गाजविली होती कीं काय, हें समजण्यास कांहीं साधन नाहीं. परंतु युद्धप्रसंगाविषयीं त्यास चांगली माहिती होती, असें समजण्यास त्याच्या काव्यांत पुष्कळ आधार आहे.

पारतंत्र्यकर्दमांत खिचपत पडलेल्या महाराष्ट्रास त्यांतून वर काढण्याचे प्रयत्न शहाजीराजे यांच्या हयातींतच सुरू होते. अशा वेळीं स्वातंत्र्याचें वारें घरीं दारीं खेळविणारे पाईक आणि प्रचारक यांची गरज होती. तेव्हां मुक्तेश्वराचीं महाभारतावरील प्रवचनें तरुणांस स्फूर्तिदायक झालीं असतील व त्यामुळें त्याच्यावर व त्याच्या प्रवचनावर तत्कालीन राजसत्तेची वक्र दृष्टी झाली असावी आणि म्हणूनच त्याच्या ग्रंथाचा 'अनिष्ट' वाटणारा भाग नष्ट करण्याचा प्रयत्न झाला असावा.

कदाचित् प्रथम सर्वच महाभारत नष्ट करण्याचें फर्मान निघालें असून पुढें मोठ्या मिन्नतवारीनें युद्धास प्रवृत्त करणारीं व प्रोत्साहन देणारीं पर्वेंच तेवढीं अधिकाऱ्यांच्या क्रोधानळांत दग्ध होऊन बाकीचीं कशीबशीं बचावलीं असावीं. वर जो मुक्तेश्वराच्या भारतरचनेसंबंधीं तपशील दिला आहे, त्यावरून मुक्तेश्वर शांतिपर्वापर्यंत म्हणजे तेराव्या पर्वापर्यंत पोंचला होता, हें उघड आहे. त्याच्या पुढील पर्वें त्यानें रचिलीं असतील किंवा नसतील, कारण तो प्रस्तुत स्थळीं महत्वाचा प्रश्न नाहीं. कांहीं पर्वें संपूर्ण व कांहींचे मधलेच अध्याय उपलब्ध आहेत, याचें कारण मुक्तेश्वराच्या भक्तांनीं व चहात्यांनीं आपापल्या आवडीप्रमाणें ते ते भाग व तीं तीं पर्वें आधींच उतरून घेऊन संग्रहीं टेविलीं असावीं. अर्थात् अशा रीतीनें निरनिराळ्या ठिकाणीं प्रती गेल्यामुळें त्या नष्ट करणें, तसें करूं इच्छिणाऱ्या अरेरावांस शक्य झालें नसावें.

तत्कालीन जनतेचा स्वाभिमान जागृत झाला होता, त्यांच्या मनांत स्वराज्य आणि स्वधर्म यांच्याविषयीं उत्कट इच्छा उत्पन्न झाली होती व आपल्यावर राज्य

---

१. आनंदतनय आपल्या 'पूतनावध' काव्याच्या शेवटीं स्वतःस उद्देशून म्हणतोः—
'त्या कृष्णाचेच पायीं नमन करितसे **आरणीचा शिपायी.** ॥'

करणारा भूपति यशवंत, सामर्थ्यवंत, कीर्तिवंत, पुण्यवंत व नीतिवंत असावा अशी त्यांस जाणीव उत्पन्न होऊन तळमळ लागली होती. अशा आणीबाणीच्या वेळीं ही लाट नाहींशी करण्यास प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीनें उत्तेजन देणाऱ्या वाङ्मयास आळा घालणें, हा एक महत्वाचा उपाय आहे. सद्यःकालीन वाङ्मयनिर्मिति व प्रसिद्धि यांवरील निर्बंधांचें निरीक्षण केल्यास आमच्या म्हणण्याची सत्यता कोणासही पटण्यासारखी आहे. एखाद्या ग्रंथाच्या कांहीं भागांवरील निर्बंध दूर झालेले आपण पाहतों व त्याच ग्रंथाच्या कांहीं भागांवर ते तसेच राहातात, अशीं उदाहरणें सद्यःकालीन भाषणस्वातंत्र्य व लेखनस्वातंत्र्य यांचा डांगोरा पिटणाऱ्या राजवटींत देखील घडून येतात. तेव्हां मुक्तेश्वराचीं कांहीं पर्वें उपलब्ध असणें व कांहीं नसणें आणि तीं देखील उद्योग, भीष्म, द्रोण, कर्ण, शल्य, गदापर्व यांसारखीं कीं ज्यांत घनघोर युद्धांचीं वर्णनें आहेत तीं-ही घटना तत्कालीन राजसत्तेच्या प्रभावाची दर्शकच समजावी लागते. मुक्तेश्वरानें सर्व महाभारत रचलेंच नसावें, असें म्हणणाऱ्यांच्या समजुतीसाठीं इतका विस्तार करावा लागला आहे; आणि आतां ह्या बाबतींत दुराराध्य व्यक्तीखेरीज इतरांची तरी समजूत पटेल, अशी आशा आहे.

ग्रंथ नष्ट होण्याच्या बाबतींत राजसत्ता प्रत्यक्ष जरी जबाबदार नसली, तरी अप्रत्यक्ष रीतीनें ती जबाबदार असूं शकते. देशांत शांतता व सुव्यवस्था नसली म्हणजे वारंवार दंगेधोपे व लढाया होतात. त्या वेळीं देवस्थानें, तीर्थक्षेत्रें वगैरे पवित्र स्थळांस उपसर्ग पोचूं देऊं नये, असा निर्बंध नसल्यामुळें व असा निर्बंध असला तरी तो कोणी मानीत नसल्यामुळें, लढाईच्या धामधुमीच्या वेळीं अशा स्थळांचें संरक्षण होत नाहीं. यामुळें अशा प्रसंगीं नासधूस, मोडतोड, जाळपोळ, लुटालूट वगैरे फार होते. पैठणक्षेत्राला अशा रीतीनें

१. ह्या विधानास पोषक असा पुढील उतारा:—'द्रव्य उकळण्याची एक अजब युक्ति [राघोबा] दादानें शोधून काढिली. मोंगलांची फौज मदतीस घेऊन परत येतांना दादानें आपली जात, आपला धर्म, आपलें राष्ट्र व आपली संस्कृति यांचा कांहीं एक विचार न करितां [इ. स. १७६२ नोव्हेंबर १६ रोजीं] पैठण क्षेत्र लुटून फस्त केलें. हेतु हा कीं स्वारीचा खर्च भरून निघावा.' (श्री० स. अ. सहस्रबुद्धे-श्रीमंत थोरले माधवराव पेशवे, पृष्ठ ३७)

स्वधर्मीय व परधर्मीय लढवय्यांकडून वारंवार उपसर्ग पोंचत असे, पण अशा वेळीं समंजस लोक आपल्या द्रव्यसंचयाबरोबरच ग्रंथभांडारही कोठेंतरी, तळघरांत किंवा अन्य स्थळीं, सुरक्षिततेसाठीं लपवून ठेवीत असत. अर्थात् लपवून ठेविलेले ग्रंथ कालांतरानें ग्रंथकाराला व ग्रंथाला काळ अनुकूल आला म्हणजे उपलब्ध होऊं शकतात.

संस्कृत कवि **भास** याचीं लुप्त झालेलीं नाटकें कित्येक शतकांनंतर उपलब्ध झालीं आहेत. तशींच, ईश्वराची कृपा असल्यास व आपण त्यांचा आस्थेनें शोध केल्यास **मुक्तेश्वराचीं** पर्वें देखील अत्यंत अल्पावधींत उपलब्ध कां होणार नाहींत? **निजामसरकारच्या** पुराणवस्तु-संशोधन खात्यानें जमिनींत गाडलेलीं अनेक **पैठणें** प्रस्तुतच्या **पैठणाभोंवतीं** आहेत, असें नुकतेंच प्रसिद्ध केलें आहे. तेव्हां न जाणो, त्यांतील एखाद्या **पैठणांत** सुरक्षितपणें ठेवलेलें **मुक्तेश्वरी** भारत आढळेलही!

## ४. पांडवांचा अज्ञातवास पूर्ण झाला होता काय?

विराटपर्व हें महाभारताच्या अठरा पर्वांपैकीं चौथें. यांत भारतीयुद्धाचें बीज पेरिलें गेलें आहे. ह्या दृष्टीनें ह्या पर्वाचें महत्व विशेष आहे. पांडवांनीं

> पराभूतैर्हि वस्तव्यं तैश्च द्वादश वत्सरान्।
> वने जनपदेऽज्ञातैरेष एव पणो हि नः॥ (अध्याय ४७।३)

असा द्यूतांत हरल्यामुळें कौरवांशीं करार केला होता; त्याप्रमाणें त्यांनीं बारा वर्षें वनवासांत काढिलीं. त्यानंतर त्यांना अज्ञातवासांत एक वर्ष काढावयाचें असल्यामुळें ते वेष पालटून विराटराजाच्या पदरीं त्याचे आश्रित म्हणून व द्रौपदी दासी म्हणून राहिली. पुढें एक वर्षाचा अवधी संपतांच ते प्रकट झाले, असें दुर्योधनादि मंडळीनें कबूल केलें असतें, तर भांडणच उत्पन्न झालें नसतें; पण अज्ञातवासाचा अवधी संपला किंवा नाहीं या प्रश्नाचा साधकबाधक विचार

१ (द्यूतामध्यें) पराजित झाल्यास पांडवांनीं बारा वर्षेंपर्यंत वनांत राहावें व (नंतर एक वर्ष) कोणत्या तरी एखाद्या देशांत अज्ञातवास करावा, असाच आमचा पण झालेला आहे. [हें दुर्योधनाचें भीष्मादिकांस उद्देशून भाषण आहे].

न करितांच पांडवांना राज्याचा अर्धा वांटा द्यावयाचा नाहीं, असें दुर्योधनानें ठरविल्यामुळें परिस्थिति बिघडली, व ती दुर्योधनाच्या दुराग्रहामुळें व पांडवांच्या वांट्याच्या राज्याचा अपहार करण्याचा अनावर लोभ त्यास उत्पन्न झाल्यामुळें ती परिस्थिति अगदीं आटोक्याबाहेर गेली व घनघोर युद्ध झालें.

कै० भारताचार्य नानासाहेब वैद्य म्हणतात, कीं, 'पांडवांशीं अज्ञातवासाचा करार केला गेला असेल हें संभाव्य नाहीं........पांडव व द्रौपदी गुप्त वेषानें राहाणें शक्य नव्हतें......अर्जुन बृहन्नला होऊन अंतःपुरांत राहाणें ही गोष्ट अशक्य व केवळ कविकल्पित असून मूळ पांडवांच्या इतिहासांत ती नसावी, अशी बळकट शंका येते' (विराटपर्वाचा उपसंहार, पृष्ठें १५-१६). परंतु पुष्कळदां असंभाव्य वाटणाऱ्या घटना क्वचित्प्रसंगीं संभाव्य कोटींत आलेल्या आपण पाहातों. त्याप्रमाणें अज्ञातवास-प्रकरण असंभाव्य असलें तरी तें अशक्य कोटींतील आहे, असें म्हणवत नाहीं. तसेंच तें असंभाव्य असलें, तरी तें 'प्रक्षिप्त' आहे, असें भारताचार्य म्हणत नाहींत, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. तेव्हां आपण त्यांतील घटनांकडे त्या आहेत तशा स्वरूपांतच पाहावयास पाहिजे.

पांडवांस अज्ञातवासांत एक वर्ष काढावयाचें होतें, त्याप्रमाणें ते विराटराजाच्या पदरीं राहावयास आले, हें वर सांगितलेंच आहे. पण ते त्याच्याकडे कोणत्या महिन्यांत व कोणत्या तिथीस गेले, ह्यासंबंधीं महाभारतांत स्पष्ट उल्लेख नसल्यामुळें अज्ञातवासाचा अवधी संपल्यावर पांडव प्रकट झाले, कीं आधीं,— हें ठरविण्याचें काम मोठें बिकट झालें आहे. ज्योतिषशास्त्र व गणितशास्त्र ह्यांच्या साहाय्यानें हा प्रश्न सोडविणें शक्य आहे, परंतु त्या शास्त्रांत आमची गति नसल्यामुळें त्या भानगडींत आम्हीं पडूं इच्छीत नाहीं. आम्हाला केवळ विराटपर्वांत अज्ञातकालनिदर्शक जे उल्लेख आढळले त्यांच्या साहाय्यानें 'अज्ञातवासाचा अवधी संपला होता कीं नाहीं ?' हा प्रश्न सोडविण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहों.

पांडवांना विराटराजाकडे एक वर्ष अज्ञातवासांत राहावयाचें होतें, त्याप्रमाणें ते राहिले. त्यांचा अज्ञातवास टिकावयाला विराटराजाचा उदारपणा व मनाचा

मोठेपणा कारणीभूत झाला असेल. कदाचित् तो वृद्ध असल्यामुळें एकदम पांच पुरुष व एक रूपसंपन्न स्त्री आपल्याकडे आली तेव्हां ती मंडळी कोण असावी, हें त्याच्या लक्षांत आलें नसावें; कदाचित् जाणून बुजून ह्या प्रश्नाची विचक्षणा करण्याचें त्यानें टाळलें असेल. शिवाय, ते अज्ञातवासांत असतांना कोणीही त्यांस ओळखूं नये, असा त्यांना यमधर्माकडून वर मिळाला होता, त्याच्या प्रभावामुळेंही ते ओळखले गेले नसतील. ह्या किंवा वरील सर्व कारणांवर कोणाचा भरंवसा बसणार नाहीं, हें खरें. पण ते अखेरपर्यंत अज्ञातवासांत राहिले, हें संशयातीत आहे.

विराटराजाकडे पांडव एकंदर किती महिने होते तें आतां पाहूं. पांडवांचा शोध करण्यासाठीं दुर्योधनानें आपले गुप्त हेर पृथ्वीच्या पाठीवर जिकडे तिकडे पाठविले होते; परंतु पहिल्या चार महिन्यांत त्यांचा मागमूसही लागला नाहीं. शरदृतूमध्यें मत्स्यदेशांत धनधान्यादिकांची समृद्धि असल्यामुळें विराटनगरींत ब्रह्मोत्सव मोठ्या धडाक्यानें पाळला जात असे. या वेळीं पांडवांना विराटराजाकडे राहून चार महिने झाले होते. ह्या ब्रह्मोत्सवाच्या वेळींच जीमूतमल्ल व भीम यांची कुस्ती होऊन त्यांत तो मल्ल मारला गेला. यामुळें जीमूतीला मारणारा भीम असावा व विराटनगरींत पांडव असावे, अशी शंका दुर्योधनास आली व त्यानें पुन्हा तडफदार हेर पांडवांच्या शोधासाठीं पाठविले. तथापि—

> वैसमानेषु पार्थेषु मत्स्यस्य नगरे तदा ।
> महारथेषु च्छन्नेषु मासा दश समाययुः ॥

परंतु दहा महिन्यांनंतर, वर्ष संपत येण्याच्या सुमारास, विराटराजाच मेहुणा व सेनापति कीचक याच्या दृष्टीस सैरंध्री (द्रौपदी) पडली आणि तेव्हांपासून पांडवांच्या पाठीस साडेसाती लागली:—

> तस्मिन्वर्षे गतप्राये कीचकस्तु महाबलः ।
> सेनापतिर्विराटस्य ददर्श द्रुपदात्मजाम् ॥

---

१. मूळ विराटपर्व, अध्याय ११७. २. मूळ अध्याय ११०. ३. अध्याय १३ श्लोक १४. ४. पांडव मत्स्यराजाच्या नगरांत राहात असतां त्या गुप्त असलेल्या महारथांचे दहा महिने व्यतीत झाले (अध्याय १४।१). ५. तें वर्ष संपत येण्याच्या सुमारास विराटराजाचा सेनापति महाबलिष्ठ कीचक यानें द्रौपदीस पाहिलें (अध्याय १४।४). द्रौपदीला म्हणजे सैरंध्रीरूप धारण करणारीला.

कीचक सैरंध्रीला पाहून मोहित झाला, त्यानें तिच्यावर अत्याचार करण्याचा प्रयत्न केला व भरदरबारांत त्यानें तिला लाथ मारिली. हे प्रसंग तिच्यावर गुदरल्यामुळें तिनें आपलें दुःख एकांतांत भीमास (बल्लवाचार्यास) निवेदन केलें. तेव्हां त्यानें तिला सांगितलें कीं—

> [1]मादीर्घं क्षम कालं त्वं मासमर्द्धं च सम्मितम् ।
> पूर्णे त्रयोदशे वर्षे राज्ञां राज्ञी भविष्यसि ! ॥

बिचारी थोड्याच दिवसांनीं राजाची राणी होणार ! पण तिची संकटपरंपरा कोठें संपली होती ?

ठरल्याप्रमाणें भीमानें कीचकास नृत्यागारांत ठार मारिलें व तदनंतर उपकीचकांसही ठार मारिलें. ह्या कारणांमुळें सैरंध्रीला राजवाड्यांतून ताबडतोब निघून जाण्यास सुदेष्णाराणीनें सांगितलें. तेव्हां तिनें मोठ्या नम्रपणानें तिची विनवणी केली कीं—

> [2]त्रयोदशाहमात्रं मे राजा क्षम्यतु भामिनी ! ।
> कृतकृत्या भविष्यन्ति गन्धर्वास्ते न संशयः ॥

तिनें तेरा दिवस राहाण्याची परवानगी मागितली, यावरून तिला फक्त तेराच दिवसांची गरज होती, अर्थात् तेरा दिवसांनंतर अज्ञातवास संपत होता, हें पांडवांस व द्रौपदीस खात्रीनें माहीत होतें. वस्तुस्थिति तशी नसती तर नेमके तेराच दिवस मला आपल्या आश्रयास राहूं द्या, असें द्रौपदी कसें म्हणूं शकली असती ?

कीचक आणि उपकीचक यांचा नाश झाल्यामुळें दुर्योधनाची शंका बळावली व पांडवांचा शोध करण्याविषयीं त्यानें मोठ्या जोमानें उचल केली. त्यानें आपल्या हेतूच्या सिद्धीसाठीं मत्स्यदेशाच्या उत्तर व दक्षिण सरहद्दीवर एकदम हल्ला करून विराटाच्या गायी पळवून नेण्याचें ठरविलें. प्रथम कौरवांनीं दक्षिणेकडील गायी पळवून नेण्याचा प्रयत्न केला.

---

१. तूं थोडा काळ मला क्षमा कर. एक महिना किंवा अर्धा (महिना अवधी उरला आहे). तेरावें वर्ष संपलें, कीं तूं राजाची राणी होशील. (अध्याय २१।१७). मादीर्घ= मा+अदीर्घ–असा पदच्छेद. २. महाराज्ञि ! फक्त तेरा दिवस राजानें मला क्षमा करावी; (तोंपर्यंत) ते गंधर्व निःसंशय कृतकृत्य होतील (अध्याय २४।२९).

ह्या दक्षिणगोग्रहणाच्या वर्णनास आरंभ करितांनाच, पांडवांच्या अज्ञातवासाची मुदत संपली होती, असें वैशंपायनानें सांगितलें आहे:—

[1]व्यतीतः समयः सम्यग्वसतां वै पुरोत्तमे ।
कुर्वतां तस्य कर्माणि विराटस्य महीपतेः ॥

आणि सुशर्म्यानें गोहरण केलें तें तेराव्या वर्षाच्या शेवटीं (अर्थात् शेवटच्या दिवशीं) असें स्पष्ट विधान केलें आहे:—

[2]ततस्त्रयोदशस्यान्ते तस्य वर्षस्य भारत ! ।
सुशर्मणा गृहीतं तद्गोधनं तरसा बहु. ॥

यावरून पांडवांच्या अज्ञातवासाची मुदत कोणत्या दिवशीं संपते, हें दुर्योधनास व तत्पक्षपात्यांस अगदीं निर्भ्रान्तपणें माहित होतें, असें म्हणावयास हरकत नाहीं. पांडवांस आतां हुडकून काढलेंच पाहिजे, अशा हेतूनेंच हे दक्षिणोत्तर हल्ले एकदम करण्यांत आले होते. आपण जरा ढिलाई केली तर पांडवांची प्रतिज्ञा पूर्ण होणार व त्यांना राज्यार्ध द्यावें लागणार, हें शल्य दुर्योधनाच्या पोटांत खुपत होतें. यामुळें अज्ञातवासाची मुदत टळून न जाऊं देण्याविषयीं खबरदारी घेणें त्याला भागच होतें. पांडवही हा पेंच ओळखूनच होते आणि म्हणूनच धर्मराजानें भीमाला आपलें स्वरूप प्रकट न करितां युद्ध कर, असा[3] इषारा दिला.

दक्षिणगोग्रहणाच्या दुसऱ्याच दिवशीं उत्तरगोग्रहण झालें. त्या दिवशीं प्रकट होण्याला अर्जुनाला हरकत वाटली नाहीं आणि म्हणूनच तो उत्तराचें सारथ्य करण्यास तयार झाला. त्यानें 'अतीते[4] समये काले' म्हणजे प्रतिज्ञेचा काल पूर्ण झालेला पाहून, द्रौपदीला सांगितलें कीं, माझ्या सांगण्यावरून तूं उत्तराला सुचव, कीं बृहन्नळा अर्जुनाचा खंबीर सारथी होता. तो तुझा सारथी होईल'. त्याप्रमाणें त्यानें सारथ्य केलें व उत्तरास विजय मिळवून दिला. पुढें विराटराजानें उत्तराजवळ त्याच्या साह्यकर्त्यासंबंधीं चौकशी केली, तेव्हां त्यानें

१. ते पांडव विराटराजाचीं कामें करीत त्या उत्तम नगरांत राहत असतां त्यांचा तो (अज्ञातवासाचा) काल उत्तम प्रकारें संपला. (अध्याय ३१।२). २. हे जनमेजया ! पुढें त्या तेराव्या वर्षाच्या अखेरीस सुशर्म्यानें मोठ्या आवेशानें हल्ला करून अनेक गायी बलात्कारानें धरिल्या. (अध्याय ३१।४). ३. अध्याय ३३ श्लोक १९. ४. मूळ अध्याय ३६ श्लोक १०.

[1]अंतर्धानं गतस्तत्र देवपुत्रो महाबलः ।
स तु श्वो वा परश्वो वा मन्ये प्रादुर्भविष्यति. ॥

असें सांगितलें. हा देवपुत्र म्हणजे अर्जुनच होय. युद्ध आटोपतांच त्याला गुप्त होणें भाग होतें. म्हणूनच तो उद्यां किंवा परवां पुन्हां भेटेल, असें उत्तरानें सांगितलें. तें अर्जुनानें पढवून ठेविल्याप्रमाणें त्यानें सांगितलें, तें योग्यच होतें. हे आणखी दोन दिवस म्हणजे कालगणनेंत कांहीं चुकी आढळल्यास ती कसर भरून काढण्यासाठीं 'हातचे राखून' ठेवलेले असावे, ह्या हेतूनेंच पांडव आणखी दोन दिवस अज्ञातवासांत राहिले.

पुढें ते उत्तरगोग्रहणाच्या तिसऱ्या दिवशीं प्रकट झाले, यावरून त्यांनीं नीट कालगणना करून व आपला हिशेब बिनचूक आहे, असें पाहून ते त्या दिवशीं प्रकट झाले. सारांश, आपला अज्ञातवास केव्हां संपणार हें त्यांस नक्की माहीत होतें आणि म्हणूनच ते ठरीव दिवशीं जाणून बुजून प्रकट झाले. जर अज्ञातवासाचे आणखी कांहीं दिवस बाकी असते, तर ते तसेच कसे तरी पार पाडण्याची व्यवस्था त्यांनीं केली असती किंवा कांहीं युक्ति लढविली असती. त्यांचा अज्ञातवास उत्तरगोग्रहणाच्या तिसऱ्या दिवशीं संपत होता, हें व्यासशिष्य वैशंपायनच आपणास सांगतातः—

[2]ततस्तृतीये दिवसे भ्रातरः पञ्च पाण्डवाः ।
स्नाताः शुक्लाम्बरधराः समये चरितव्रताः ॥

येथपर्यंत आपण पांडवांच्या बाजूचें काय म्हणणें आहे तें पाहिलें. आतां आपण दुसऱ्या बाजूकडे वळूं

जीमूतमल्लाच्या वधामुळें पांडव विराटनगरींत असावे, अशी शंका दुर्योधनादि मंडळीच्या मनांत डोकावूं लागली. त्या बाबतींत 'भवति न भवति' होऊन विराटराजाला दक्षिणेकडून व उत्तरेकडून एकदम पकडींत कसें धरावें,

१. तो महाबलिष्ठ देवपुत्र तेथेंच गुप्त झाला. तो उद्यां किंवा परवां पुन्हा दिसेल, असें मला वाटतें (अध्याय ६९ श्लोक १४).

२. नंतर तिसरे दिवशीं त्या पांच पांडवबंधूंनीं स्नानें करून शुभ्र वस्त्रें परिधान करून योग्य काळीं [अज्ञातवासाचें] व्रत समाप्त केलें (अध्याय ७० श्लोक १).

ह्याविषयीं योजना आंखण्यांत आली, आणि ती अशा आणीबाणीच्या वेळीं अमलांत आणली गेली, कीं—

अल्पावशिष्टं कालस्य गतभूयिष्ठमन्ततः ।
तेषामज्ञातचर्यायामस्मिन्वर्षे त्रयोदशे ॥
अस्य वर्षस्य शेषं चेद्व्यतीयुरिह पाण्डवाः ।
निवृत्तसमयास्ते हि सत्यव्रतपरायणाः ॥

अर्थात् अज्ञातवासपालनाचा अवधी फार थोडा उरला होता आणि म्हणून दुर्योधनाचें हें करणें मुत्सद्दीपणाचें होतें, यांत संशय नाहीं.

अज्ञातवासाची मुदत केव्हां संपते, ह्यासंबंधीं विराटराजाचीं गुरेंढोरें हरण करून आणण्याच्या पूर्वीं पुष्कळ ऊहापोह झाला होता. त्या वेळीं पितामह भीष्मानें पांडवांच्या वनवासाच्या व अज्ञातवासाच्या वर्षांची निम्नलिखित पद्धतीस अनुसरून गणना केली—

[2]तेषां कालातिरेकेण ज्योतिषां च व्यतिक्रमात् ।
पञ्चमे पञ्चमे वर्षे द्वौ मासावुपजायतः ॥
एषामभ्यधिका मासा पञ्च च द्वादश क्षपाः ।
त्रयोदशानां वर्षाणामिति मे वर्तते मतिः ॥
सर्वं यथावच्चरितं यद्यदेभिः प्रतिश्रुतम् ।
एवमेतद् ध्रुवं ज्ञात्वा ततो बीभत्सुरागतः ॥

आणि अशा प्रकारें दुर्योधनाची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. 'पांडव मरणें पत्करितील पण खोटेपणा कधींहि करणार नाहींत' असेंही भीष्मानें त्यास स्पष्टपणें बजाविलें व पांडवांशीं सख्य करण्यास सांगितलें. पण त्या म्हाताऱ्याच्या

---

१. त्यांच्या ह्या तेराव्या वर्षाचा म्हणजे अज्ञातवासाचा बहुतेक काळ निघून गेला आहे; [आतां] अगदीं थोडा काळ उरला आहे. जर ह्या वर्षाचे उरलेले दिवस पांडवांनीं काढिले, तर त्या सत्यव्रतपरायणांची प्रतिज्ञा पार पडली, असें होईल. (अध्याय २६ श्लोक ३–४).

२. (कला, काष्टा, दिवस इत्यादिकांचा) काळ वाढल्यानें व नक्षत्रांच्या लंघनकालाशीं भेद पडल्यानें प्रत्येक पांचवे वर्षीं दोन दोन महिने अधिक उत्पन्न होतात. (ह्या हिशेबानें) यांच्या तेरा वर्षांत पांच महिने व बारा दिवस ज्यास्त उत्पन्न होतात, असें मला वाटतें. त्यांनीं आपली प्रतिज्ञा योग्य रीतीनें आचरण करून सर्व पार पाडली आहे आणि हें निश्चित जाणूनच अर्जुन (युद्धास) आला आहे (अध्याय ५२ श्लोक ३–५) २. मूळ अध्याय ५२ श्लोक ९.

सांगण्याचा विचार न करितां किंवा आपलें त्यावर उलट कांहीं म्हणणें असल्यास तें पुढें न मांडतां त्यानें अगदीं रोखठोक उत्तर दिलें, कीं—

नाऽहं राज्यं प्रदास्यामि पाण्डवानां, पितामह ! ।

आणि पांडवांशीं युद्ध करण्याची तयारी करण्याविषयीं त्यानें भीष्मास सांगितलें.

वरील विवेचनावरून कोणाची बाजू लंगडी होती, हें सहज लक्षांत येईल. अज्ञातवास केव्हां संपणार हें पांडवांस माहीत होतें आणि कौरवांसही माहीत होतें. दोघेही आपापल्या परी सावध होते; भीष्मानें ज्या पद्धतीनें कालगणना केली ती दुर्योधनास मान्य नव्हती, तर त्यानें आपलें म्हणणें काय आहे तें भीष्मापुढें मांडावयास पाहिजे होतें. त्याच्या मनांतून पांडवांना राज्याचा वांटा द्यावयाचाच नव्हता, म्हणून त्यानें कालगणनेच्या रुक्ष चर्चेंत मन घातलें नसावें. त्यानें भीष्माचा सल्ला लाथाडला, हें सरळपणाचें, न्यायाचें व नीतीचें लक्षण नसून तो केवळ दुराग्रह होय.

चांद्रवर्ष, सौरवर्ष, अधिक मास इत्यादि बाबींसंबंधानें विचार करण्याचें हें स्थळ नव्हे. पण कै० नानासाहेब वैद्य म्हणतात, कीं, पांडव हे जरी कौरव-वंशांतील होते, तरी त्यांचें वास्तव्य जन्मापासून हिमालयांत असल्यामुळें त्यांच्या चालीरीति भिन्न झाल्या होत्या. पण हें त्यांचें विधान सयुक्तिक दिसत नाहीं, कारण पांडव कांहीं पिढ्यान् पिढ्या कौरवांपासून दूर राहात नव्हते. ते समवयस्क असून एकाच गुरूच्या हाताखालीं एकत्र शिक्षण घेत होते. तेव्हां एक पक्ष सौरमास मानणारा व दुसरा चांद्रमास मानणारा ही कल्पना मनास पटत नाहीं. कदाचित् असे दोन पक्ष असते, तर दुर्योधनानें पांडवांच्या वनवासाच्या व अज्ञातवासाच्या बाबतींत तसा स्पष्ट करार करून घेतला असता. कदाचित् तो विसरला असता, तर त्याच्या भोंवतालच्या चांडाळचौकडीनें त्यास ह्या गोष्टीचें स्मरण देऊन पांडवांच्या हाल—अपेष्टांची मुदत शक्य तितकी ज्यास्त वाढविण्याची संधी साधली असती !

आपलीं वनवासाचीं बारा वर्षें भरतांच पांडव अज्ञातवासांत राहावयास गेले. ते अज्ञातवासांत राहावयास गेले ते आपल्याबरोबर असलेल्या आश्रितवर्गास व

---

१. आजोबा ! मी पांडवांना राज्य देणार नाहीं (अध्याय ५२ श्लोक १५).

ऋषी, ब्राह्मण, तपस्वी इत्यादिकांस निरोप देऊन त्यांनीं आपला तळ हालविला. तेव्हां त्यांचीं वनवासाचीं बारा वर्षें केव्हां भरलीं, हें सर्वांस जाहीर झालें होतें. पण त्या वेळीं बारा वर्षें पूर्ण झालीं नाहींत, अशी तक्रार कोणीच केली नाहीं. अज्ञातवासास आरंभ केव्हां झाला हेंही सर्वांस विदित होतेंच. तसेंच अज्ञातवास केव्हां संपतो हें पांडव व कौरव यांस नक्की माहीत होतें व दोघांच्या हिशेबानें सामान्यतः वेळही एकच येत होती. तेव्हां दोघेही एकाच पद्धतीनें कालगणना करीत असत, असें म्हणणें ओघास येतें. अद्यापही मुसलमान लोक चांद्रमास मानितात व त्यांचा मोहरमचा सण दरसाल मागें मागें कसा जात असतो, हें आपणास माहीतच आहे. तेव्हां महाभारतकाळीं चांद्रमास पद्धतीनेंच कालगणना करण्याचा प्रघात होता, असें समजावयास कांहीं हरकत दिसत नाहीं.

ज्या अर्थीं दुर्योधनानें भीष्मानें सांगितलेल्या कालगणनेस हरकत घेतली नाहीं व आपली बाजू भीष्मद्रोणांसमोर मांडली नाहीं, त्या अर्थीं कालगणनेंत कांहीं चुकी नव्हती, असें म्हणावें लागतें. कालगणनेंत किंवा इतर दुसऱ्या कोणत्या तपशिलांत कांहीं चुकी असती, तर ती पुढें मांडावयास व पांडवांस पुन्हा वनवासास पाठवावयास तो न चुकता. हें न सांगतांच कोणाच्याही सहज लक्षांत येईल.

## ५. विराटपर्व.

महाभारत हा आपला एक अत्यंत पूज्य व महत्वाचा असा राष्ट्रीय ग्रंथ आहे. त्याचीं मुख्य पर्वें अठरा असून प्रस्तुत पर्व हें चौथें आहे. ह्यांतील निरनिराळ्या घटनांचें वर्णन सुबोध असून तें वाचणाऱ्यास व्यावहारिक शिक्षणाचा लाभ करून देतें. राजदरबारांत निरनिराळ्या दर्जाच्या लोकांनीं एकमेकांशीं व राजाशीं कसें वागावें हें धौम्यमुनीनें सांगितलें आहे, तें सदैव मनन करण्यासारखें आहे. निरनिराळ्या प्रसंगीं पांडवांपैकीं कोण कसा वागला, द्रौपदीला कसें वागावें लागलें, कीचकाची दुर्दशा कशी व कां झाली?—इत्यादि गोष्टींच्या परिशीलनानें कोणत्याही व्यक्तीस धूर्त, धोरणी व चतुरस्त्र बनतां येईल.

मत्स्यदेशाधिपति **विराटराजा** मोठा बलवान् असून पांडवांवर त्याचें विशेष प्रेम होतें. शिवाय तो धर्मशील व उदार असून वृद्धही होता. आपल्या प्रजेचें प्रिय करण्याविषयीं तो सदा दक्ष असे. अशा प्रजापालनतत्पर नृपाच्या आश्रयास राहावयास पांडव आले, तें त्यांचें येणें सहेतुक असावें, असें वाटतें. विराटराजाकडे आपल्या भूमिकांचा अभिनय नीटपणें करितां येईल, कदाचित् त्यांत कांहीं उणेपणा राहिला, तरी तिकडे त्याचें लक्ष पोंचणार नाहीं, असा पांडवांचा त्याच्याकडे येण्यांत हेतु असणें संभवनीय वाटतें.

विराटराजा पूर्वीं कधीं काळीं बलवान् असला तरी तो प्रस्तुत पर्वांत आपणास तसा दिसून येत नाहीं. भरदरबारांत कीचकानें सैरंध्रीस लाथ मारून पाडिलें असतां, तिचें रक्षण करण्याचें तिला आश्वासन न देतां, कांहींतरी गुळमुळीत बोलून तिच्यावरच निर्लज्जपणें दोषारोप करण्याचा अत्यंत अश्लाघ्य प्रयत्न तो करितो; गंधर्वांनीं उपकीचकांस ठार मारल्यामुळें तो इतका घाबरून जातो, कीं त्या बिचाऱ्या सैरंध्रीला आपला वाडा तावडतोब सोडून जावयास सांगण्याची सुदेष्णेकडून सूचना देववितो; ज्याला सुशर्म्यानें उत्तरगोग्रहणयुद्धांत पराभूत करून बांधून नेलें व जो केवळ स्वार्थासाठीं, अर्थात् पांडवांसारख्या पराक्रमी व बलाढ्य वीरांशीं आपला चिरकाल स्नेहसंबंध असावा म्हणून, उत्तरेसारख्या १५।१६ वर्षांच्या अल्पवयी बालिकेला अर्जुनासारख्या ६०।६५ वर्षें वयाच्या प्रौढ व विवाहित वराशीं विवाहपाशानें बद्ध करूं इच्छितो—त्याला बलवान म्हणणें जीवावर येतें.

तो क्षत्रियकुलोत्पन्न असला, तरी त्याच्या अंगीं क्षात्रकुलोचित गुणांचा अभावच दिसतो; मुत्सद्दीपणा व व्यवहारचातुर्य हे गुण मुळींच आढळून येत नाहींत. साधारणतः त्याची स्थिति औरंगजेबाच्या पाठीमागून दिल्लीच्या तख्तावर बसलेल्या नामधारी बादशहांसारखी होती, असें म्हणावयास हरकत नाहीं. कीचक तर स्पष्टच सांगतो, कीं—

विराट माझा स्थापितू । मीच येथें नृपनाथू ।
वारावया मज समर्थू । दुजा नाहीं ब्रह्मांडीं. ॥

( विराटपर्व, अध्याय ३।३६ ).

हें ‘स्वल्पाक्षर’ वर्णन ‘बव्हर्थ’द्योतक असून अक्षरशः ‘सत्य’ आहे.

तो 'वृद्ध' होता, असें महाभारतकार वर्णितात. पण ज्याची कन्या केवळ १५।१६ वर्षांची आहे, अशा गृहस्थाचें वय ज्यास्तींत ज्यास्त किती असेल, ह्या विषयीं विचार केल्यास व तो आपला राज्यकारभार स्वतः चालवीत असे, ही गोष्ट विचारांत घेतल्यास तो जरेनें जर्जर झालेला व वार्धक्यानें पीडिलेला होता, असें वाटत नाहीं. तो जर खरोखर 'अंगं गलितं पलितं मुण्डं' असता तर भारती युद्धांत तो पांडवांच्या बाजूनें युद्ध करावयास गेलाच नसता. सारांश, तो दुबळा, बेहिमती व पराक्रमशून्य होता, असें कोणास वाटलें, तर तें त्याचें अनुमान चुकीचें आहे, असें साधारणतः कोणास म्हणतां येणार नाहीं.

**सुदेष्णा** ही राणी असून तिनें सैरंध्रीच्या बाबतींत तिच्या थोरपणास न शोभणारे डावपेंच लढविले व पातिव्रत्याची किंमत कवडी सुद्धां नाहीं, हें तिच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला. तसेंच राजसिंहासनस्थाच्या पट्टमहिषीकडून एका अनाथ अबलेला जें 'अभय' मिळावयास पाहिजे होतें तें मिळालें नाहीं. यावरून तिच्याविषयीं आपला ग्रह अनुकूल होत नाहीं. संकटकालींच थोरां-मोठ्यांच्या मोठेपणाचें खरें स्वरूप कळतें. पण ह्या कसोटीस ती उतरत नाहीं.

**कीचक** हा विराटराजाचा मेहुणा असून सेनापतीही होता. त्याच्या पराक्रमाचा प्रकाश कोठें पडलेला आपणास आढळत नाहीं. सैरंध्रीच्या बाबतींत त्यानें जे गुण उधळले तोच त्याचा पराक्रम! एवंगुणविशिष्ट सेनापतीनें प्रजेवर कशी जुलूमजबरदस्ती केली असेल, ह्यासंबंधीं कल्पना करणेंच बरें. उपकीचकांचा तांडा कांहीं कमी त्रासदायक असेल, असें वाटत नाहीं. त्यांच्या हातीं कांहीं सत्ता नव्हती हें खरें, पण ते राजशालकाचे अनुयायी असल्यामुळें सर्व मत्ता त्यांचीच होती. त्यांचें हें नातें म्हणजे प्रजेवर जुलूमजबरदस्ती करून आपली स्वतःची चैन करून घेण्याचा परवानाच होता, असें वाटतें.

विराटासारखा दुबळा राजा, सुदेष्णेसारखी शीलाचें मोल द्रव्याच्या मापानें मोजणारी राणी आणि कीचकासारखा उन्मार्गगामी व अत्याचारी सेनापति—अशा ह्या त्रिकूटाच्या कारकीर्दींत राज्यांत कशी बेबंदशाही माजली असेल व प्रजेस 'दे माय धरणी ठाय' कसें झालें असेल, ह्यासंबंधीं विचार केल्यास छाती

---

१ मूळ अध्याय १ श्लोक १७–१८ पहा.

धडधडावयास लागते. हें वर्णन काल्पनिक नसून अशी वस्तुस्थिति सध्या देखील कांहीं संस्थानांत आढळते. तेथील असहाय व दीन प्रजेची छळणूक, गांजणूक व पिळणूक कशी पद्धतशीर चाललेली आहे, हें वृत्तपत्रांच्या वाचकांस पूर्णपणें अवगत आहे.

तत्कालीन **युद्धनीति** ही न्याय आणि धर्म यांच्या आधारावर उभारलेली होती. राजपुरुषास ठार मारावयाचें नाहीं, युद्धांत पराभूत होऊन एखादा हातीं लागल्यास त्यास मानसन्मानानें परत पाठवावयाचें व त्याचें राज्यहि त्यास द्यावयाचें, अशी पद्धति असे. साधारणतः प्रत्येक योद्धा आपल्या बरोबरीच्या प्रतिस्पर्ध्याशीं लढत असे व दोन्ही पक्षांची लढाई समोरासमोर होत असे. 'आडून गोळ्या मारण्याची' पद्धति तत्कालीन युद्ध्यमान राष्ट्रांच्या परिचयाची होती, असें दिसत नाहीं. विशेष प्राणहानी होईल अशीं शस्त्रास्त्रें उपयोगांत आणलीं जात नसत. प्रस्तुत पर्वांत फक्त संमोहनास्त्राचाच प्रयोग केलेला आढळतो. मुक्तेश्वरानें 'एक शत तेहतीसाक्षरीं देवता आव्हानिली' ( अध्याय ६।१३६ ) असें म्हटलें आहे. तरी हा संमोहनास्त्र-प्रयोगाचा मंत्र व विधिविधान ह्यांसंबंधीं शोध करणें इष्ट व अवश्य आहे. कदाचित् एखाद्या तंत्रग्रंथांत ही माहिती सांपडेल. पण ती सांपडली तरी तिचा सद्यःस्थितींत आपणांस काय उपयोग आहे ?

## सामाजिक परिस्थिति.

राजघराण्यांतील मुली बऱ्याच मोठ्या होईपर्यंत अविवाहित राहात व त्यांस गायन, नृत्यकला वगैरे शिकविण्याची सोय राजवाड्यांत केलेली असे. तेथें राजकन्यांच्या बरोबर नागरिकांच्या मुलींस त्या कला शिकण्याची संधी मिळत असे. पण सध्या जसे गायनवादन शिकविण्याचे वर्ग गल्लोगल्लीं निघाले आहेत, तशी सार्वत्रिक सोय असल्याचें दिसत नाहीं. गायनादि ललितकलांबरोबर लेखनवाचनादि व्यावहारिक शिक्षणही थोडें फार दिलें जात असावें, असें समजावयास हरकत नाहीं.

लग्नाच्या वयोमर्यादेसंबंधानें निश्चित असें कांहीं सांगतां येत नाहीं, पण विराटानें अर्जुनास उत्तरा देऊं केली, यावरून बाला-जरठविवाह होत असत,

निदान असे विवाह तिरस्करणीय आहेत, असें कोणास वाटत नसावें. साधारणतः राजकीय[1] हेतूच्या सिद्धयर्थ असे विवाह होत असत. याचा अर्थ मुलींना आत्मा नाहीं किंवा त्या घरांतील अडगळ होत, असें समजलें जात असे, हा होय. प्रस्तुत प्रसंगीं विराटराजा 'अर्जुन हा उत्तरेस "उचित" पति आहे,' असें म्हणतो. हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

अर्जुनानें उत्तरेशीं विवाह करण्याचें नाकारून तिला आपली सून करून घेतली. हा त्याचा मोठेपणा होय. त्यानें तिच्याशीं विवाह न करण्याचीं कारणें जीं सांगितलीं तीं—

अन्तःपुरे[2]ऽहमुषितः सदा पश्यन्सुतां तव ।
रहस्यं च प्रकाशं च विश्वस्तां पितृवन्मयि ॥
प्रियो बहुतमश्चाऽऽसं नर्तको गीतकोविदः ।
आचार्यवच्च मां नित्यं मन्यते दुहिता तव. ॥

अगदीं सयुक्तिक आहेत. ही अर्जुनाची वागणूक त्याच्या थोरपणास, जितेन्द्रियत्वास, सच्चारित्र्यास व आत्मसंयमनास साजेशीच आहे. असे धर्मभीरू व जितेंद्रिय पुरुषच सदा विजयी होत असतात.

बहुपतिकत्वाची चाल प्रचारांत होती. द्रौपदीचे पांच पति होते हें प्रसिद्धच आहे. पण तसें दुसरें उदाहरण आढळत नाहीं. सैरंध्रीनें पांच गंधर्व माझे पति आहेत, असें सांगितलें. त्या वेळीं त्या प्रकाराबद्दल कोणास कांहीं विशेष वाटल्याचें दिसत नाहीं. मद्य व मांस यांस प्रतिबंध नसे. अभिमन्यूच्या विवाहस-

---

१. ह्या विषयासंबंधानें आम्ही संपादिलेल्या मोरोपंतकृत आदिपर्वास जोडलेला उपोद्घात पहावा ( पृष्ठें ४७–४८ व ७१–७२ ).

२. तुझ्या अन्तःपुरांत मी राहात असल्यामुळें तुझी कन्या नेहमीं माझ्या दृष्टीपुढें असे; आणि तिनें गुप्तपणें व उघडपणें माझ्यावर पित्याप्रमाणें विश्वास ठेविला. गायनकलेंत निपुण असलेला मी नृत्याचा शिक्षक असल्यामुळें तुझ्या कन्येचें माझ्यावर अतिशय प्रेम होतें व ती मला नेहमीं गुरूप्रमाणें मानिते ( मूळ अध्याय ७२ श्लोक २–३ ). जिज्ञासु वाचकांनीं ह्याच्या पुढील आणखी ७–८ श्लोकही अवश्य वाचावे.

मारंभानिमित्त 'लहान मोठ्या मृगांचा व शेंकडों मेध्य पशूंचा वध झाला. सुरा, मैरेय इत्यादि पेयांची रेलचेल उडाली,' असें वर्णन आढळतें.

द्रौपदीसारख्या साध्वीवर वारंवार संकटें ओढवलेलीं पाहून कोणाचें हृदय विदीर्ण होणार नाहीं? त्या बिचारीनें कीचकाच्या पाशवी वासनेला बळी पडण्याचा प्रसंग टाळण्यासाठीं त्याला आपण अनुकूल असल्याचें भासविलें. हें तिनें भीमाच्या सल्ल्यानें कपटनाटक केलें व अशा रीतीनें ती कीचकाच्या तावडींतून सुटली, याबद्दल तिचें कौतुकच केलें पाहिजे. तिनें केलेल्या कपटनाटकाबद्दल तिला कोणी दोष देतील; पण पुढील व्यासवचनाचें इंगित त्यांच्या लक्षांत आल्यास त्यांना आपली चुकी कळून येईल:—

विवाहकाले रतिसंप्रयोगे सर्वात्यये प्राणधनापहारे ।
विप्रस्य चार्थे अनृतं वदेत पंचानृतान्याहुरपातकानि ॥ (कर्णपर्व).

धर्म आणि अधर्म यांतील सूक्ष्म भेद सामान्य जनतेस आकलन करावयास फार कठिण आहे. 'धर्माची गति अतिसूक्ष्म आहे' असें आपले शास्त्रकार सांगतात. तेव्हां तें गूढ उकलण्याच्या भरीस न पडणें, हेंच उत्तम होय. द्रौपदीकडून कायिक व मानसिक पाप घडलें नसून केवळ वाचिक घडलें आणि तेंही पतीच्या संमतीनें; तेव्हां ती दोषास्पद होऊं शकत नाहीं.

महाभारतकाळीं द्यूत खेळण्याचा प्रघात बराच होता. त्या खेळाची चटक एखाद्याला लागली असतां त्याची दुर्दशा कशी होते ह्याचा कटु अनुभव स्वतः पांडवांस आला असूनही धर्मराज विराटराजाबरोबर द्यूत खेळत असे, याचें आश्चर्य वाटतें. कदाचित् तो आपल्या यजमानाच्या मनोविनोदासाठीं खेळत असे, असें म्हणतां येईल. पण धर्मराजानें स्वामीभक्त सेवक ह्या नात्यानें आपल्या स्वामीस ह्या दुष्ट व्यसनापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करावयास

---

१. मूळ अध्याय ७२ श्लोक २८.

२. ह्या श्लोकाचें मोरोपंतकृत रूपांतरः—लग्न, रति, प्राणक्षय, सर्वस्वविनाश, विप्रकार्य अशा । पांचा ठायीं अनृतहि बोलावें; तें करी न नाश यशा. ॥ (कर्णपर्व–अध्याय ४१ गीति ४१). मुक्तेश्वराचें कर्णपर्व दुर्दैवानें उपलब्ध नसल्यामुळें नाइलाजास्तव मोरोपंताची गीति उतरून घ्यावी लागली! 'जोडे धर्म बरा, तरि अनृतहि बोलोनि धर्म जोडावा' ही पंतोक्ती येथें स्मरणांत ठेवण्यासारखी आहे.

पाहिजे होता, परंतु तसें कांहीं त्यानें केल्याचें दिसून येत नाहीं. स्वतःस अज्ञातवासांत राहावयाचें असल्यामुळें आपल्या स्वतःच्या अनुभवाचा पाढा धर्मराजास वाचून दाखवितां येणें शक्य नव्हतें, हें खरें; पण ( वनपर्वांतील ) नलराजाच्या कथेच्या आधारें ही गोष्ट धर्मराजास सहज करितां आली असती.

महाभारतकाळीं साधारणतः सर्व समाज सुस्थितींत असलेला दिसतो. जिकडे तिकडे संपत्तीची लयलूट आढळते. शस्त्रास्त्रविद्येंतही बरीच प्रगति झालेली होती. परंतु आजकाल युरोपांत व इतर स्वतंत्र राष्ट्रांत प्राणघातक शस्त्रास्त्रविद्येंत इतकी प्रगति झाली आहे, कीं तत्कालीन सेनापति व योद्धे ह्या बाबतींत अगदींच मागासलेले होते, असें ते स्वतः देखील प्रांजलपणें कबूल करितील !

## उपसंहार.

मुक्तेश्वराचें जीवनचरित्र व मूळ विराटपर्व यांसंबंधानें थोडेंफार विवेचन केल्यानंतर आतां त्याची काव्यकृति, भाषाप्रभुत्व, रचनाचातुर्य इत्यादि गोष्टींकडे वळूं. त्यानें 'कवि' ह्या नात्यानें मराठीभाषेंत जें स्थान मिळविलें आहे तें सदैव 'अढळ'च राहील. त्यानें रचिलेलें सर्व महाभारत उपलब्ध नाहीं, हें महाराष्ट्राचें मोठे दुर्दैव होय. तें नष्ट कां झालें असावें, ह्यासंबंधीं चर्चा वर दुसऱ्या परिच्छदांत केलीच आहे. त्याच्या काव्यांत प्रसाद, माधुर्य अर्थगांभीर्य, शब्दसौष्ठव इत्यादि महाकाव्यांत आढळणारे गुण पूर्णपणें वसत आहेत. तसेंच त्यानें सरस दृष्टांत, उपमा, रूपक, अतिशयोक्ति इत्यादि अर्थालंकारांच्या सहाय्यानें आपल्या कविताकन्यकेस भूषविलें आहे. विशेषतः त्यानें तिच्या आंगाखांद्यावर रूपकरूपी जडावाचे अलंकार इतके चढविले आहेत, कीं क्वचित् प्रसंगीं तिला अगदीं गुदमरल्यासारखें होत असेल. त्याची वर्णन करण्याची हातोटी इतकी हळुवार आणि नाजूक आहे, कीं एखादा कुशल चित्रकार वर्ण्य विषयाच्या शब्दचित्रावरून त्या वस्तूचें वा प्रसंगाचें चित्र अगदीं हुबेहूब चितारील. साधारणतः इतर मराठी कवींच्या काव्यांत न आढळणारे असे उज्ज्वल प्रतिभा, विशाळ बुद्धि, सूक्ष्म निरीक्षण, उदात्त कल्पना व व्यापक व्यवहारज्ञान हे गुण प्रामुख्यानें त्याच्या कवितेंत प्रतीत होतात. श्रीसमर्थ राम-

दास यांच्या कवितेंत राष्ट्रीयत्वाची कल्पना चमकते, तशीच ती मुक्तेश्वराच्या काव्यांतही तळपते. त्याच्या हातून कालविपर्यासाचा दोष घडलेला आढळतो. याचें कारण आपण ज्या कालाविषयीं लिहीत आहों त्या कालाचें भान त्याला न राहून तें आपलें लिहिणें सद्यःकालालाही लागू पडत आहे, असें जाणून त्या विषयांत तो तादात्म्य पावतो, हें होय. प्रस्तुत पर्वांत 'विष्णुसहस्रनामस्तोत्रा'चा उल्लेख आहे ( अध्याय ५।११२ ). पण मूळ विराटपर्वाच्या काळीं तें अस्तित्वांत नव्हतें ( पृष्ठ ६८ टीप २३ पहा ). तथापि मुक्तेश्वरकालीन ब्राह्मणांच्या पाठांत तें असे, हें ह्या उल्लेखावरून सिद्ध होतें. तसाच जेथें जेथें हा दोष अन्यत्र घडला आहे, तेथें तेथें तो इतिहाससंशोधकांस फार उपकारक झाला आहे, कारण तेणेंकरून तत्कालीन परिस्थितीसंबंधानें कांहीं तरी ज्ञान आपणांस प्राप्त होतें.

मुक्तेश्वराच्या आंगीं मराठीभाषेविषयीं प्रेम व अभिमान हीं ओतप्रोत आढळतात. आपल्या मातृभाषेचें संवर्धन, विकास व उत्कर्ष यांसाठीं त्याची तळमळ व उत्कट इच्छा हीं ठिकठिकाणीं प्रकट झालेलीं आहेत. मराठीभाषा ही क्षुद्र अशी तत्कालीन पंडितांची भावना असे, पण मुक्तेश्वर आपल्या श्रोत्यांस व वाचकांस—

देशभाषा परी भांडार । साहित्याचें जाणिजे. ॥

( सभापर्व, अध्याय ११।१०० )

असें स्पष्टपणें सांगतो. सध्या आंग्लभाषा व देशी भाषा यांचा 'शिक्षणाचें माध्यम' ह्या दृष्टीनें जो झगडा चालू आहे, तशाच प्रकारचा वाद संस्कृत व मराठी यांमध्यें चालू होता व त्या लढ्यांत तो मराठीचा कट्टा अभिमानी होता. तथापि संस्कृत भाषेविषयीं त्याला अनादर होता असें नाहीं:—

ईश्वररूपीं डोळस । त्यासी वर्णावर्णीं द्वेष ।<br>
नुपजे, जैसा सूर्यप्रकाश । नेणे कदा तमातें. ॥<br>
तेवीं अर्थीं घालितां दृष्टी । न म्हणे संस्कृत मऱ्हाटी ।<br>
रत्नकुंभीं कीं मृत्तिकाघटीं । गंगोदक सारिखें. ॥

( आदिपर्व, अध्याय १।९२-९३ ).

ह्या उद्गारांवरून त्याच्या मनाचा समतोलपणा दिसून येतो.

मुक्तेश्वराचा मावसभाऊ रामदास महाराष्ट्राची राजकीय परिस्थिती कशी सुधारेल ह्या विवंचनेंत होता, तसाच मुक्तेश्वर देखील होता, असें वाटतें. ह्याच्या राजकारणपाटवाचें दिग्दर्शन प्रसंग-विशेषीं होतें, त्याबरोबरच त्याला समाजसुधारणेविषयीं किती कळकळ होती, हेंही आपल्या प्रत्ययास येतें. तो मोठा धोरणी, निस्पृह व सत्याभिमानी होता. त्यानें बुवाबाजीवर झणझणीत कोरडे ओढून बकध्यानी बोकेसंन्याशांचा चांगलाच समाचार घेतला आहे.

आमचा हा लेख वाढतां वाढतां बराच मोठा झाला आहे आणि आमच्या वाचकांच्या सहनशीलतेचा अंत आम्हीं पाहूं लागल्यास, खुद्द मुक्तेश्वराला त्याच्या श्रोत्यांनीं अधीर होऊन—

आतां वक्त्या ! पावलों सर्व । कथा आरंभीं अति अपूर्व. ॥

( आदिपर्व, अध्याय १।९५ )

असें बजाविलें, तसा प्रसंग आमच्यावर येण्याच्या भीतीनें—पण तो येण्याच्या पूर्वींच—'नवरससुधेचा सुधार्णव' ( अध्याय १।४ ) असें हें विराटपर्व, कीं ज्याच्या संबंधानें—

महाराष्ट्रकाव्यांचिये[1] पंक्ती । गुरुत्व गौरव इये ग्रंथीं. ॥

( अध्याय ८।१२४ )

असें स्वतः मुक्तेश्वरच सांगतो, तें वाचण्याकरितां वाचक आतुर झालेले आहेत हें आम्हास माहीत आहे आणि म्हणून आम्ही येथेंच थांबतों. तरी त्यांनीं त्या पर्वाच्या वाचनांत व अभ्यसनांत एकचित्त व्हावें व मुक्तेशाच्या 'सुरुचिर वाणी'चें आकंठ पान करावें, अशी नम्र विनंति करितों.

धनतोली, नागपुर
तारीख ६–१२–१९३८.

दा. के. ओक.

---

१. मुक्तेश्वर आपल्या सभापर्वाविषयीं ( अध्याय १।१८ ) म्हणतोः—

महाराष्ट्रकाव्यांसी गुरु । हा गौरवु इये ग्रंथीं. ॥

# मुक्तेश्वरकृत विराटपर्व

## अनुक्रमणिका.


| अध्याय. | विषय. | ग्रंथसंख्या. | पृष्ठांक. |
|---|---|---|---|
| १ | उपोद्घात—वनवासांतीं पांडवांची विराटनगरीं जाण्याची मसलत—तिकडे जाणें—त्यांचीं रूपांतरें आणि नामांतरें. | १२९ | १–१५ |
| २ | त्यांची वार्ता चोहोंकडे पसरते—पांडवांचा पत्ता काढण्याकरितां कौरव तिकडे मल्ल पाठवितात. भीम कित्येक मल्लांस मारितो—मल्लयुद्धाचें वर्णन—कौरवांना पांडवांच्या निवासस्थानासंबंधीं शंका येते. | १०१ | १६–२८ |
| ३ | विराटस्त्री सुदेष्णेचा बंधु कीचक हा सैरंध्री दासीला (म्हणजे रूप पालटलेल्या द्रौपदीला) पाहून मोहित होतो—ती वश होत नाहीं—तो बलात्कार करूं पाहतो—सूर्यदूत गुप्तरूपें येऊन कीचकास धक्का देऊन पाडितो—तो पुनः आपल्या बहिणीकडून सैरंध्री प्राप्त होण्याची युक्ति योजितो—त्याची मनःस्थिति—परिणाम—भीमाच्या हातून त्याचा मृत्यु. | १६२ | २८–४९. |
| ४ | प्रातःकाळीं सुदेष्णेचा शोक—कीचकाचे बंधु सैरंध्रीला, कीचकासंगतीं दहन करण्यासाठीं, रुद्रभूमीकडे चालवितात—भीमसेन गंधर्वरूपानें त्या सर्व बंधूंचा वध करितो—सुदेष्णा तिला राजवाड्यांतून निघून जाण्या- | | |

| अध्याय. | विषय. | ग्रंथसंख्या. | पृष्ठांक. |
|---|---|---|---|
| | विषयीं आग्रह करिते—पण विराटदुहिता उत्तरा ही बृहन्नडेची( म्हणजे रूपांतर पावलेल्या अर्जुनाची ) शिष्या असल्यामुळें तिच्या सांगण्यावरून आणि आग्रहास्तव तिचें राहणें घडतें. | ५५ | ४९—५४ |
| ५ | कीचकवधाची वार्ता हस्तनापुरीं पोंचते—सर्व कौरव मिळून विचार करितात—विराटगृहीं पांडव असल्याची त्यांची शंका दृढ होते—त्यांना ओळखण्याकरितां काय करावें याचा विचार चालतो—शेवटीं विराटनगरावर दोहोंकडून सैन्य नेऊन तेथील गायींचीं खिल्लारें पळवून आणावीं, म्हणजे तेथें पांडव असल्यास, सहजच ते बाहेर पडतील, असा निश्चय होतो—दक्षिण दिशेकडून कौरव आपलें सैन्य त्रिगर्त देशाचा राजा सुशर्मा याच्या हाताखालीं देऊन पाठवितात-सैन्यवर्णन-भीमादिकांच्या हातून त्रिगर्ताचा पराभव—त्याची पळापळ. | १३६ | ५५—७१ |
| ६ | दुसरें सैन्य घेऊन उत्तरदिशेकडून स्वतः दुर्योधन विराटनगरीवर येतो—त्या सैन्याचें वर्णन—विराटनगरींत गडबड—नगरींत शत्रूशीं युद्ध करण्यास समर्थ असा कोणी वीर नसल्यामुळें विराटपुत्र उत्तर याची धांवाधांव—उत्तरेच्या आग्रहानें बृहन्नडा सारथ्य स्वीकारिते—युद्धार्थ बाहेर निघणें—उत्तर | | |

| अध्याय. | विषय. | ग्रंथसंख्या. | पृष्ठांक. |
|---|---|---|---|
| | भयानें गांगरतो—बृहन्नडा, 'मी अर्जुन आहें, तूं भिऊं नको,' असें सांगून त्याचें भय घालविते, आणि स्वतः युद्ध करून कौरवांचा पराभव करिते—सायंकाळीं विराटाचा आनंद आणि उत्साह—उत्तराच्या पराक्रमाची प्रशंसा—तेथें कंक नामक ब्राह्मणाच्या रूपानें राहणाऱ्या धर्मराजाला ती प्रशंसा मान्य होत नाहीं—विराटराजाचा क्रोध—तो सारीपाट खेळतांना हातांतील फांसे क्रोधानें भुईवर आपटतो, एक फांसा उडतो व तो धर्माच्या कपाळाला लागून रक्तप्रवाह होतो—राजरक्तबिंदु भुईवर पडूं नये, म्हणून सैरंध्री तत्क्षणीं पात्रामध्यें तें रक्त धरिते—सभा उठते. | १८१ | ७२–९० |
| ७ | कौरवांचें हस्तनापुरास गमन—त्यांचा खेद—पण त्यांतच समाधान, कीं पांडवांना आम्ही अज्ञातवासाची मर्यादा संपल्यापूर्वी ओळखिलें, आतां त्यांच्याकडून पुनः बारा वर्षें वनवास करवूं अशी इच्छा—इकडे रात्रौ पांडव एकत्र जमून विचार करितात—सकाळीं मोठ्या पहांटेस स्नानसंध्यादि उरकून विराटाच्या सिंहासनावर धर्मराज बसतो—दोहों बाजूला दुसरे पांडव आणि द्रौपदी असतात, आणि सार्वभौमत्वाचीं सर्व चिन्हें धारण करितात—विराटाला वर्तमान | | |

| अध्याय. | विषय. | ग्रंथसंख्या. | पृष्ठांक. |
|---|---|---|---|
| | समजतें–तो क्रोधानें धांवत येतो–पण उत्तर त्याला सर्व गूढ कळवितो आणि पांडवांना शरण जाण्याविषयीं त्याची प्रार्थना करितो–विराटराजा त्याप्रमाणें करून त्यांना नमस्कार करितो, आणि आपल्या अपराधाची क्षमा करण्याविषयीं त्यांना प्रार्थितो–पांडव हे विराटाचे उपकार स्मरून व वर्णून त्याचें समाधान करितात–सर्वांचा आनंद–अर्जुनपुत्र अभिमन्यु याला विराट आपली कन्या उत्तरा देऊं करितो–विवाहासाठीं येण्याला द्वारकेंत असणाऱ्या श्रीकृष्णाला निमंत्रणपत्रिका पाठविण्याचा निश्चय. | १०४ | ९०–१०१ |
| ८ | निमंत्रणपत्रिका–द्वारकेकडून आलेल्या वऱ्हाडी लोकांचें वर्णन–श्रीकृष्ण, सुभद्रा, अभिमन्यु इत्यादिकांचा प्रवेश–विवाहवर्णन, भोजनसमारंभाचें आणि पक्वान्नांचें विस्तीर्ण वर्णन–आहेर, देणग्या, यांचें वर्णन–उद्योगपर्वप्रस्ताव–उपसंहार. | १२३ | १०१–११५ |
| | एकंदर ग्रंथसंख्या. | ९९१ | |
| | नवीन उपलब्ध झालेली कविता. | ४ | ११६–११८ |

# प्रस्तावना, उपोद्घात, परिशिष्टें वगैरे.


| अनुक्रमांक. | तपशील. | पृष्ठांक. |
|---|---|---|
| | **१. पुस्तकाच्या आरंभीं.** | |
| १ | प्रस्तावना | १–८ |
| २ | उपोद्घात– | |
| | १. मुक्तेश्वरासंबंधीं कांहीं माहिती. | १–५ |
| | २. मुक्तेश्वर संत होते काय? | ६–१० |
| | ३. मुक्तेश्वरानें अठरा पर्वें रचिलीं होतीं काय? | १०–१८ |
| | ४. पांडवांचा अज्ञातवास पूर्ण झाला होता काय? | १८–२६ |
| | ५. विराटपर्व. | २६–३२ |
| | ६. उपसंहार. | ३२–३४ |
| | **२. पुस्तकाच्या शेवटीं.** | |
| १ | विराटपर्वाची एक अप्रसिद्ध प्रतिकृति–मैराळकृत विराटपर्व. | १–१० |
| २ | 'वत्सलाहरणा'चा कर्ता कोण? | ११–२२ |
| ३ | पाठभेद व अधिक पद्यें. | २३–२९ |
| ४ | अधिक टीपा, शुद्धाशुद्ध वगैरे. | ३०–३२ |
| ५ | मुक्तेश्वराची अप्रसिद्ध कविता. | ३३–३४ |

एकूण पृष्ठसंख्या–३४+६+११८+३४=१९२

ॐ

नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ।
देवीं सरस्वतीं चैव ततो जयमुदीरयेत् ॥

# मुक्तेश्वरकृत महाभारत.

## ४. विराटपर्व.

(ओव्या.)

### अध्याय पहिला.

#### उपोद्घात.

[१]जो श्रेष्ठ बोलिजे [२]श्रेष्ठीं । तो बैसोनी मायादेवीच्या पाठीं ।
ब्रह्मा विष्णु महेश पोटीं । जन्मविलीं बाळकें. ॥ १
कवतुकार्थ ठेवुनी नांवें । रंजवी [३]साकारतेच्या भावें ।
[४]अव्यक्तपालखीं स्वभावें । [५]थोपडोनी [६]पहुडवी. ॥ २
तया आदिपुरुषा स्वामी । [७]लीलाविश्वंभर गुरुनामीं ।
नमस्कारोनी [८]मनोधर्मीं । 'सावध' म्हणें श्रोतियां. ॥ ३
आतां चौथें 'विराटपर्व' । [९]नवरससुधेचा सुधार्णव ।
[१०]श्रवणेंद्रियांचें वैभव । [११]अतिअभिनव, वदावें. ॥ ४
[१२]स्तंभ टेंकों न शके गगनीं, । ठाव न काढवे समुद्रजीवनीं,
विश्वंभराचे ग्रंथसदनीं । दूषणश्वान रिघेना. ॥ ५

---

१. जो परमात्मा. २. सत्पुरुषांनीं. ३. मूर्तस्वरूपाच्या. ४. अव्यक्त म्हणजे अव्याकृत (मूळब्रह्मरूपास विकार प्राप्त होण्याच्या पूर्वींची स्थिति). हें अव्याकृत ब्रह्म हीच पालखी (पाळणा.) यामध्यें ब्रह्माविष्णुमहेश हीं बालकें त्यांस थोपटून जें ब्रह्म निजवितें तें. येथें **रूपक** अलंकार आहे. ५. थोपटून, गोंजारून. ६. निजवी. ७. **लीलावि**श्वंभर हीं उभयतां **मु**क्तेश्वराचीं मातापितरें होत. तीं व त्याचे गुरु यांच्या ठायीं त्याची अपरंपार भक्ति होती; म्हणून त्यांस आदिपुरुष असें समजून नमन केलें आहे. ८. मनोभावानें. ९. शृंगार, वीर, करुण, हास्य, रौद्र, भयानक, बीभत्स, अद्भुत व शांत हे नवरस होत. **मु**क्तेश्वराची कविता ही खरोखरच 'सुधेचा सुधार्णव' आहे. १०. कर्णेंद्रियाचें भूषण. रमणीय वस्तु पाहणें हें जसें नयनांचें भूषण आहे, तसेंच नवरस-पूर्ण असें श्रुतिमनोहर कथानक ऐकणें हा कर्णेंद्रियाचा अलंकार (सौभाग्य) होय. **रूपक** अलंकार. ११. अपूर्व कथा आहेत ज्यांत असें विराटपर्व. १२. आकाशाला खांब टेंकविणें अगर समुद्राचा अंत काढणें जसें दुर्घट तद्वत्. **असंभव** अलंकार. शेवटच्या दोन चरणांत **रूपक** आहे.

मूढ [1]अल्पकें बोले वचनें । तें [2]मत्सरें अथवा नेणतपणें; ।
[3]गुणग्राहीक [4]जीवेंप्राणें । प्रेम करिती या ग्रंथा. ॥ ६
प्रयागीं जान्हवीच्या नीरा । [5]कांचकुपिका भरोनि चतुरा ।
कावडी नेती रामेश्वरा । अभिषेकार्थ आवडीं. ॥ ७
तेंवी [6]वेदाब्धी मथुनि, देखा । व्यासें काढिलें [7]अमृतोदका ।
[8]महाराष्ट्रशब्दाच्या कूपिका । भरूनी दिधल्या मज हस्तीं. ॥ ८
प्रसाद पाठविला प्रीतीं । तो स्वीकारुनी संतश्रोतीं ।
[9]कर्णद्वारा परमभक्ती । [10]हृदयलिंगा सिंचणें. ॥ ९

## [11]कथारंभ.

द्वादशवर्षे अरण्यवास । सरल्यानंतरें [12]कुरुनरेश । दीर्घदृष्टी गुणविशेष । [13]विचार विवरी तें ऐका. ॥ १० ॥ चौघे बंधू आणी द्रौपदी, । धौम्य विवेकाचा उदधी । [14]त्यातें म्हणे, 'विशाळबुद्धी ! । बुद्धिप्रद मज होईं. ॥ ११ ॥ [15]नष्टचर्य अज्ञातवासें । कवणे ठायीं क्रमावें कैसें ? । शत्रूंस कळलिया विशेषें । [16]महद्व्यसनीं पाडिती. ॥ १२ ॥ जरी [17]अळुमाळ होईल ठावें । तरी [18]बारा क्रमोनी तेरावें । पुढती लोटतां, स्वभावें । आयुष्य गेलें [19]यांतळीं.' ॥ १३ ॥ धौम्य म्हणे, 'विचारसुमती ! । कायसा भ्रमसी [20]चिंतावृत्ती ? । होणार तें प्रारब्धगती ।

---

१. अल्पत्व दाखविणारीं, दोष काढणारीं. २. मूर्ख दूषणें काढितात तीं (१) दुसऱ्याचा उत्कर्ष सहन होत नाहीं म्हणून मत्सरानें, किंवा (२) कळत नाहीं म्हणून अज्ञानानें काढितात. ३. गुणग्राहक, गुणज्ञ. ४. With heart and soul. ५. कांचेच्या लहान शिशा. चतुरा=सुंदर. हें 'कुपिकां'चें विशेषण समजावें. 'कुपिका' हा शब्द ज्ञानेश्वरींतही आढळतो. ६. वेदरूपी समुद्र. ७. (भारतरूपी) अमृत+उदक=अमर करणारें जल, मर्त्यांस अमर करणारें पाणी. ८. मराठीमध्यें ग्रंथरचना करण्याला लोकमताचा केवढा अडथळा होता हें येथील **उपमा** व **रूपकें** पाहून समजण्यासारखें आहे. ९. कानाच्या वाटेनें. १०. आत्मारूपी लिंगास. ११. मूळ संस्कृत विराटपर्वांत, (१) पांडवप्रवेशपर्व, (२) समयपालनपर्व, (३) कीचकवधपर्व, (४) गोहरणपर्व व (५) वैवाहिकपर्व—अशीं उपपर्वें आहेत. त्यांतील पहिल्या उपपर्वास येथून सुरुवात झाली आहे. (ब) मुक्तेश्वरकवीनें ह्या प्रथमाध्यायांत मूळांतील १२ अध्यायांचा सारांश ग्रथित केला आहे. १२. धर्मराजा. १३. खलबत करण्यास आरंभ करी. १४. धौम्यऋषीतें. १५. आमचें दुर्दैव, (साडेसाती) तिचे दिवस. १६. मोठ्या संकटांत. १७. यत्किंचित्, थोडेंसें. १८. बारा वर्षें. १९. याखालीं; याच फेऱ्यांखालीं सर्व आयुष्य संपलें, असें होईल. २०. येथें 'चिंता-आवर्ती' (चिंतेच्या भोंवऱ्यांत) असा पाठ असता, तर तो अर्थास ज्यास्त पोषक झाला असता.

आपोआप होतसे. ॥ १४ ॥ [1]यक्षाचिये वरविशेषीं । रूपें पालटतीं [2]आपैसीं । नामें पालटावीं कैसीं । तेंही ऐकें नरेंद्रा ! ॥ १५ ॥ [3]कंकनाम ठेविजे धर्मा । [4]बल्लव अभिधान बळिया भीमा, । घेउनी अंगनेची [5]प्रतिमा । [4]बृहन्नडा अर्जुन ! ॥ १६ ॥ [4]ग्रंथिक नाम हें नकुळातें, । [4]तंतिपाळ हें सहदेवातें, । [4]सैरंध्री हें द्रौपदीतें । कृत्रिम नामें [6]पाचारा. ॥ १७ ॥ धर्मराजाचिये घरीं । होतों [7]निजाधिकारीं । ऐसें बोलोनी, विराटघरीं । विराटातें सेविजे. ॥ १८ ॥ लोटलिया [8]अज्ञातसंवत्सर । पुढें करूं [9]आन विचार । राज्यप्राप्तीचा प्रकार । साध्य असाध्य, जाण पां !' ॥ १९ ॥ ऐसें धौम्य [10]अनुवादतां । परम संतोष

---

१. 'तुमची स्वरूपें पालटून तुम्हांला कोणीही ओळखणार नाहीं' असा धर्मराजास यक्षानें वर दिला होता. (मुक्तेश्वरकृत वनपर्व, अध्याय १८ ओवी ११७ पहा). २. आपल्या आपण. ३. मूळ भारतामध्यें धर्मभीमादिकांनीं स्वतःच आपआपलीं नांवें व कर्मे सांगितलीं, असें वर्णन आहे. (मूळ अध्याय १–३ पहा). 'कंक' या शब्दावर पुढील टीका आहे. 'कंकश्छद्मद्विजे ख्यातो लोहपृष्ठकृतांतयोः' (विश्वकोश). स्वस्य कृतांतसूनुत्वेन 'आत्मा वै पुत्रनामासि' इति श्रुतेः । तदनन्यत्वात् तन्नाम्नो धारणे मिथ्यावादित्वं न भविष्यतीति भावः ॥.' सारांश, कंक म्हणजे यम, धर्म यमाचा मुलगा म्हणजे यमच, तेव्हां धर्मानें कंक हें नांव धारण केलें, यांत असत्य कांहीं नाहीं, हें सांगण्याचें तात्पर्य आहे. ४. बल्लव यालाच पौरोगव असा समानार्थक दुसरा शब्द आहे. 'पुरोगुः वायुः तस्य पुत्रः पौरोगवः (भीमः) तस्मात् बल्लवेऽपि वायुसुतार्थवाची.' बल्लव म्हणजे पौरोगव म्हणजे वायुपुत्र. तेव्हां येथेंही मिथ्यावादित्वाचा दोष नाहीं. बृहन्नडा (किंवा बृहन्नला. भारतांत बृहन्नला असा शब्द योजिलेला आहे.) यावर हें भाष्य आहे:—'बृहंश्चासौ नरश्च बृहन्नरः । रलयोर्डलयोश्चाभेदाद् बृहन्नलः (डः वा) नारायणसखो आद्यो नरः । स्त्रीत्वं स्वरूपगोपनार्थम् ॥'. मोठा नर म्हणजे आदिनर (नारायण सखा अर्जुन .) ग्रंथिक शब्दाची उपपत्ति पहा:—'ग्रंथान् आयुर्वेदं आध्वर्यवं च वेत्तीति ग्रंथिकः । अश्विनोः सुतत्वात् .' आयुर्वेद, आध्वर्यव इत्यादि ग्रंथ जाणतो तो ग्रंथिक. नकुल हा अश्विनौ देवांचा पुत्र आणि अश्विनीकुमार हे देवांचे वैद्य व अध्वर्यु म्हणून नकुल आपणास ग्रंथिक असें म्हणवितो. तंतिपाल याची व्याख्या:—'तंतिः वाक् तस्याः पालः वाक्पालः धर्मवचनार्थानुष्ठाता (धर्माची आज्ञा मानून तिच्याप्रमाणें चालणारा). वाणी (लमाण) लोक ज्या दावणीमध्यें बैल बांधतात तिलाही तंति म्हणतात. तेव्हां तंतिपाल म्हणजे गुरांची व्यवस्था पाहणारा (किंवा, धर्मराजाची आज्ञा पाळणारा.) सैरंध्री म्हणजे 'अंतःपुरपरिचारिका राजभार्या वा'. तेव्हां 'सैरंध्री' असें नांव घेतलें तरी तें राजभार्येला लागू पडतें म्हणून अन्वर्थकच होय. ५. रूप. ६. बोलवीत जा, हांका मारा. ७. आपआपल्या कामावर, स्वतंत्रपणें. 'नियोग–अधिकारी' असा अन्य पाठ. ८. आपण कोण आहों, हें इतरांस कळूं न देतां घालविण्याचें वर्ष. 'Incognito' याचा अर्थ हाच आहे. ९. दुसरा, आणखी. १०. बोलल्यावर. मूळचा अर्थ (१) दुसऱ्याचें भाषण आपण सांगणें, (२) दुसऱ्याचे दोष सांगणें, हा आहे. 'बोलणें' येवढाच येथें अर्थ.

कुंतीसुतां । ब्राह्मणां, [1]संगियां, समस्तां । आज्ञा देवोनी पाठविती. ॥ २० ॥ कोणी पांचाळदेशाप्रती, । कोणी [2]सप्तमपुरीं जाती, । कृष्णवसुदेवसंगती । वर्ष एक [3]क्रमावें. ॥ २१ ॥ [4]कोणी धाडिले हस्तिनापुरा, । खेद आल्हाद [5]कौरवेश्वरा । 'अज्ञातवास युधिष्ठिरा । कोठें कैसें जाणावें ?' ॥ २२ ॥ [6]इंद्रसेन रथसहित । सेवक सोयरे परम आप्त । द्वारके धाडिले, कृष्णनाथ । स्नेहभावें [7]पाळितू. ॥ २३ ॥ द्रौपदीच्या [8]परिचारिका । सखिया [9]वेशिया अनेका । [10]धृष्टद्युम्नें घेउनियां सुखा । पावविल्या, [11]सुरवाडें. ॥ २४ ॥ अग्निहोत्र [12]सामग्रीसीं । धौम्य जातां [13]पांचाळदेशीं । नीती सांगे पांडवांसी । विराटसंगीं बसावया. ॥ २५ ॥ 'नाम, रूप, थोरपण । कोणा कळों न द्यावें [14]ज्ञान; । दीनाहूनी परम दीन । ऐसें लोकां दाखवावें. ॥ २६ ॥ दावुनी चातुर्य कुशळते । मूर्खत्व [15]नाणिजे [16]प्रभूतें; । [17]श्रेष्ठ बोलिजे न घडे तें । तेचि शब्दीं प्रतिष्ठा. ॥ २७ ॥ असत्य न बोलिजे सर्वथा, । धरिजे निर्लोभ [18]निर्मळता, । [19]इंद्रियनियमीं नित्य [19]वसंतां । तोचि [20]वल्लभ रायातें. ॥ २८ ॥ [21]राजस्त्रीसंवाद, । राजमित्राशीं विरोध, । राजपुरोहितासीं विनोद, । जाणते पुरुषीं न करावा. ॥ २९ ॥ राजा अचाट

---

१. संगी=सोबती, अनुचर. २. द्वारावती अगर द्वारका नगरीत. ३. घालवावें यासाठीं. ४. कोणांस, कित्येकांस. 'कोणां' असतें तर बरें झालें असतें. ५. युधिष्ठिराला अज्ञातवास प्राप्त झाला, म्हणून दुर्योधनास कांहीं आनंद झाला व 'तो कोठें आहे व त्याला शोधून कसें काढावें.?' अशी कांहीं चिंता उत्पन्न झाल्यामुळें त्यास खेद झाला. ६. धर्मराजाचा सारथी. ७. 'पाळील' या खातरीनें. ८. दासी. ९. वेश्या. मूळांत 'वेश्यावाचक' शब्द नाहीं, व द्रौपदीच्या परिवारांत वेश्या असणेंही संभवत नाहीं. तेव्हां येथें अपपाठ आहे, हें उघड आहे. १०. हा द्रौपदीचा भाऊ. ११. चोखपणानें, सरळ आणि शुद्ध मार्गानें. सुरवाड=(१) सुख, (२) सुकाळ (३) शुद्ध, चोख. १२. सामग्रीसह. १३. द्रुपदाच्या राज्यांत. १४. नामरूपाचें ज्ञान. १५. न आणिजे= आणूं नये. विध्यर्थी प्रयोग 'आण' या धातूचा. (गोडबोलेकृत व्याकरण–पृष्ठ ९३ आवृत्ति दुसरी). १६. राजाहून आपलें शहाणपण जास्त आहे, असें दाखवूं नये. प्रभूवर मूर्खत्वाचा दोष येईल असें करूं नये. १७. थोरामोठ्याच्या तोंडून निघालेल्या शब्दानुसार त्याच्या हातून कार्य न घडल्यास त्याची वाच्यता करूं नये. नुसत्या बोलण्यांतच त्याचा मोठेपणा आहे, असें समजावें, व तो विषय तितकाच सोडून मोकळें व्हावें–असा भाव. (मूळ अध्याय ४ श्लोक ३० पहा.) १८. मनाची शुद्धता. १९. इंद्रियांचें दमन करून जो असतो तो. २०. प्रिय, आवडता. २१. मूळ अध्याय ४ श्लोक १८ पहा.

काम सांगे । न करवे म्हणोनी न येइजे मागें;[१] । स्वभाव वोळखोनि जो वागे । तोचि वल्लभ रायातें. ॥ ३० ॥ मागां सरे अंतःपुरीं, । पुढां ठाके रणचत्वरीं,[२] । दिधली आज्ञा वंदी शिरीं । तोचि वल्लभ रायातें. ॥ ३१ ॥ कीजे सर्वांचें आर्जव । कोठें न दाखवी वैंक्रभाव,[३] । सर्वांपासोनी गौरव[४] । तोचि पावे निर्धारें. ॥ ३२ ॥ करणी[५] करूनियां लपवी, । महिमा दुजियाची वाढवी, । महायशाची[६] तो पदवी । आपेंआप पावतू. ॥ ३३ ॥ रायें नेमिलिये व्यापारीं । सावधान अहोरात्रीं । आळस निद्रा दवडूनि दूरी । तोचि रायातें आवडे. ॥ ३४ ॥ झालिया मानापमान । हर्षविषादीं न घाली मन, । क्षमाशीळ, सुप्रसन्न । तोचि पावे महिमेतें. ॥ ३५ ॥ राजपैशून्य[८] नायके कानीं, । राजनिंदा न बोले वदनीं, । राजमान्यांतें[९] सन्मानी । तोचि मान्य नृपातें. ॥ ३६ ॥ पुसिल्याविणें न करी काज, । संतुष्टकाळीं न मनीं[१०] लाज, । राजगौरवें न चढे माज[११] । तोचि पावे महिमेतें. ॥ ३७ ॥ प्रभूनें बोलविल्या बोलणें, । प्रभू पुसेल तें सांगणें, । न पाचारितां न जाणें । तोचि पावे प्रतिष्ठा. ॥ ३८ ॥ राजासनीं, राजवहनीं, । राजाचिया एकांतसदनीं, । वैसका[१२] न करी तो षड्गुणी[१३] । मान पावे नृपाचा. ॥ ३९ ॥ आपलें प्रगटूं नेदी ज्ञान, । नेणत्यातें न म्हणे जो अज्ञान, । ज्याचिये

---

१. स्वामीनें कोणतीही आज्ञा केली असतां 'माझ्यानें काम होत नाहीं' म्हणून कधींही मागें येऊं नये. कसलें अचाट (मोठें) काम सांगितलें तरी तें करावें–हा भावार्थ. सेवकांनीं ही वृत्ति धारण केली व स्वामी गुणग्राहक असले म्हणजे वाटेल तें काम 'हां हां म्हणतां उठून जातें' यांत काय आश्चर्य आहे ? २. अंतःपुराकडे (स्त्रिया राहतात तिकडे) जाण्याचा प्रसंग आल्यास मागें सरणारा व रणांगणामध्यें पुढें पाऊल टाकणारा. सामान्यतः सुखाचे वेळीं मागें व कामाचे वेळीं पुढें असणारा सेवक असावा. राजाच्या अंतःपुरांत न जाणें हें अर्थातच स्वामीभक्तीचें उत्कृष्ट चिन्ह होय. ३. वांकडेपणा. ४. मोठेपणा मिळवितो. ५. स्वतः सुकर्म करून त्याचें श्रेय दुसऱ्यास देऊन त्याचें महत्व वाढविणाऱ्या नरवरासच 'मोठा कीर्तिमान्' ही पदवी सहज प्राप्त होते. येथें 'परगुणपरमाणून्पर्वतीकृत्य नित्यं निज हृदि विकसन्तः सन्ति सन्तः कियन्तः ।' ह्या भर्तृहरिवचनाचें स्मरण होतें. ६. मोठ्या यशाची. ७. 'जो राहतो' हे शब्द अध्याहृत आहेत. ८. यजमानाचे दोष. ९. राजानें मान दिलेले ते राजमान्य. १०. मनामध्यें. यजमान संतुष्ट असेल तेव्हां त्याच्याजवळ कांहीं मागावयाचें असल्यास लाजूं नये–असा भाव. ११. उन्मत्तपणा. १२. बैठक. १३. धैर्य, बुद्धि, बळ, उद्योग, पराक्रम व साहसकर्म हे सामान्य पुरुषाचे षड्गुण सांगितले आहेत. राजपुरुषाचे अंगीं अवश्य असणारे षड्गुणः–वक्ता, प्रगल्भ, मेधावी, स्मृतिमान्, नयविद् आणि कवि.

मुखीं मधुर वचन । तोचि मान्य विश्वातें. ॥ ४० ॥ असो. तुम्हां जाणत्यांप्रती । काय बोलणें बहुसाळ[2] युक्ती ? । सांगितलें[3] तया रीतीं । अज्ञातवास क्रमावा. ॥ ४१ ॥ हृदयीं धरूनी कृष्णमूर्ती । स्मरणही असावें अहोरात्रीं । त्रयोदश वर्षांचिये अंतीं । शीघ्र भेटीस येतसों.[4]' ॥ ४२ ॥ ऐसें सांगून कुरुनरेशा । धौम्य गेला पांचाळदेशा. । धर्म म्हणे, 'विचार कैसा ? । पुढें करणें बंधु हो ! ॥ ४३ ॥ अज्ञातवास परगृहवस्ती । उदरनिर्वाह कैशा रीती ?' । पांच ही म्हणती, 'ये अर्थी[5] । संकट कांहीं असेना.' ॥ ४४ ॥ धर्म म्हणे, 'वदेन वाचा । सभापंडित मी पांडवांचा, । जाती ब्राह्मण, सद्विद्येचा । संग्रह असे मजपासीं. ॥ ४५ ॥ रत्नपरीक्षे[6] मी कुशळ, । खेळूं जाणें द्यूतखेळ, । बुद्धिबळें[7] पुरुष सबळ । मजसमान असेना. ॥ ४६ ॥ वस्तुपरीक्षा, राजनीती, । समयीं[8] जाणें विचारयुक्ती । सहज, झालिया संगती, । जाणवेल स्वभावें. ॥ ४७ ॥ बोधोनियां नृपाचें मन । बुद्धी[9] क्रमूं काळ कठिण.' । भीम म्हणे सुप्रसन्न[10], । 'मीही करीन मज साजे[11] तें. ॥ ४८ ॥ पाककर्ता बल्लव नामा । धर्माघरीं सूपकर्मा[12] । भक्ष

---

१. येथें सेवकाचीं जीं लक्षणें सांगितलीं आहेत तीं किती योग्य आहेत व तीं कशीं अनुभवप्रणीत आहेत हें आपल्या लोकांस सांगावयास नकोच. जोंपर्यंत सेव्यसेवकधर्म कायम आहे—आणि बुद्धि-वैचित्र्य व प्रसंगवैचित्र्य आहे, तोंपर्यंत हा धर्म कोणत्या तरी रूपानें कायम राहणारच—म्हणून ह्या वर सांगितलेल्या गोष्टीचें परिपालन उत्कृष्ट तऱ्हेनें करणें हें प्रत्येक सेवकाचें कर्तव्य आहे. २. पुष्कळ प्रकारच्या. ३. धौम्यऋषींनीं पांडवांस केलेला उपदेश मूळ अध्याय ४ श्लोक ७–५१ यांत आहे. ४. येत असों, येत आहोंच; येणार आहोंच. भविष्यकाळ वर्तमानकाळाच्या रूपानें दाखविणें ह्या प्रसंगीं फारच समर्पक होय. 'एक वर्ष हां हां म्हणतां निघून जाईल' ह्याचें हें दर्शक आहे. ५. या कामांत. ६. परीक्षे=परीक्षेमध्यें. ७. माझ्या इतकें बुद्धीचें सामर्थ्य आहे असा समर्थ पुरुष. ८. समयाला, कठिण प्रसंगीं, काय करावें याची युक्ति मला सहज सुचते; अगर सहवास झाल्यावर तुम्हास सहज समजेल. ९. बुद्धीनें. बुद्धीच्या जोरावर हे विपत्तीचे दिवस घालवूं. कठिण प्रसंग प्राप्त झाला असतांही बुद्धिकौशल्यानें आनंदपूर्वक व ईश्वरचरणीं निष्ठापूर्वक रहावयाचें व संकटांचें निरसन करून आपलें कर्तव्य करावयाचें हेंच धर्माचें मूल बीज आहे पण यासच आपण या कलियुगांत आंचवलों आहों ! १०. प्रसन्न (आनंदयुक्त) मनानें. ११. योग्य असें तें. 'मज साजे तें' याच्या ऐवजीं 'मच्छातें' असा पाठ आहे. या पाठाप्रमाणें 'मच्छराजास प्रसन्न करीन' असा अर्थ होईल. १२. आचारी, स्वयंपाकी. सूप=आमटी, तोंडीं लावणें. सुखेन पीयते, इति सूपः.

भोज्य अमृतोपमा । निपजवीं स्वहस्तें. ॥ ४९ ॥ भीमासंगीं निर्दोष । शरीरीं केला बळ[1]अभ्यास । तोही दाखवुनी, उल्हास । उपजवीन रायातें. ॥ ५० ॥ ऐसें बोलतां [2]चमत्कार । [3]अंगिकारिल राजेश्वर.' । अर्जुन म्हणे, 'हो ! विचार । आमुचाही परियेसा. ॥ ५१ ॥ वर्ष एक [4]उर्वशीशापू । तो पैं करावया [5]निर्लेपू । अंगीं [6]अवगोनी अंगनावपू । राजयातें भेटणें. ॥ ५२ ॥ [7]नाटकशाळेचिया कुमरी । नाचवूं जाणें कळाकुसरीं । सारथ्यविद्या [8]यापरी । अर्जुनसंगें लाधली. ॥ ५३ ॥ पार्थ करितां शरसंधान । नेमें निश्चयें [9]लक्ष्यभेदन । दृष्टी पाहतां झालें ज्ञान । त्या [10]सद्गुरूप्रसादें. ॥ ५४ ॥ ऐशा वदूनियां गोष्टी । काळ क्रमूं [11]तयानिकटी.' । नकुळ म्हणे, 'माझिया [12]गांठी । [13]शालिहोत्र, धनविद्या. ॥ ५५ ॥ अश्व नाचवणें [14]निर्गुती, । फेरे फिरवणें चक्राकृती, । शीघ्र पळविणें [15]वातगती, । ऐसी कळा दावणें. ॥ ५६ ॥ वारु चालवणें गगनीं, । तरोनि जाणें समुद्र-जीवनीं, । ऐसें [16]चोज [17]दावोनि [18]नयनीं । प्रिय करणें रायाचें.' ॥ ५७ ॥ सहदेव म्हणे, 'म्हैशी-धेनू-। वृषभ-[19]दमनीं अतिसुजाणू, । [20]दोहनीं, [21]मथनीं परमनिपुणू । शिष्य होय कृष्णाचा.' ॥ ५८ ॥ ॥ कृष्णा म्हणे, 'मी सैरंध्री । [22]पांचाळीची [22]शुश्रूषा करीं, । विराटभार्या [23]गुणसुंदरी । आराधीन सुदेष्णा. ॥ ५९ ॥ ऐशिया [24]रचुनियां [24]उपाया । काळ कंठूं धर्मराया !' । मग स्मरोनी [25]श्रीकृष्णपाया ।

---

१. हिंसा ज्यांत नाहीं असा बळ संवर्धनासाठीं अभ्यास, कुस्तीचा (मल्लयुद्धाचा) अभ्यास. २. आश्चर्य उत्पन्न करण्याजोगें; कुतूहलजनक. ३. माझा स्वीकार करील. ४. इंद्रलोकीं असतां अर्जुनानें उर्वशीस झिडकारून आपलें परस्त्रीविषयक पराङ्मुखत्व प्रकट केलें म्हणून त्यास उर्वशीनें शाप दिला होता; त्यामुळें त्यास एक वर्ष क्लीबत्व प्राप्त व्हावयाचें होतें. (मुक्तेश्वरकृत वनपर्व, अध्याय ५ यांत हा कथाभाग आहे.) ५. नाहींसा. ६. घेऊन. ७. अंतःपुरांतील. 'नाटकशाळा' म्हणजे 'उपस्त्रिया' असाही अर्थ इतर ठिकाणीं होतो. ८. याप्रमाणेंच. सर्वकळा आल्या त्यांत सारथ्यविद्याही प्राप्त झाली. ९. लक्ष्यभेदन=बिनचुक निशाण मारणें. १०. सद्गुरु जो अर्जुन त्याच्या कृपेनें. ११. विराटराजाच्या जवळ, त्याच्या आश्रयास. १२. पदरीं, संग्रहीं. १३. अश्वविद्या. १४. नेटानें, निश्चयानें. १५. वायुवेगानें. १६. चमत्कार. १७. दाखवून. १८. प्रत्यक्ष. १९. यांना ताब्यांत ठेवण्यामध्यें. २०. दोहन=दूध काढणें, धार काढणें. २१. मथन=घुसळणें, ताक करणें. २२. द्रौपदीची सेवा. २३. सुंदर गुण आहेत जिचे अगर गुणानें सुंदर आहे ती. २४. अशा प्रकारचे उपाय (युक्त्या) निर्माण करून. २५. भगवत्पादांचें स्मरण करून. 'अहो येतां जातां' हा प्रसिद्ध श्लोक, भगवद्गीता अध्याय ५ श्लोक ८ व ९ हे पहा. तसेंच भगवद्गीतेचा शेवटचा 'यत्र योगेश्वरः कृष्णो' हाही श्लोक पहावा. भगवंताचें स्मरण करून कर्तव्य केलें असतां समाधान होतें, हा सिद्धांत आहे.

साहीजणें [1]चालिलीं. ॥ ६० ॥ पुढें चालतां [2]जगजेठी । विराटनगराचिया [3]पाठीं । [4]स्मशानभूमिकेच्या निकटीं । विशाळ वृक्ष शमीचा. ॥ ६१ ॥ अर्जुन म्हणे, 'शस्त्रास्त्रें । येथें ठेवावीं [5]सुपवित्रें; । अभिमंत्रितां महामंत्रें । [6]दृष्टी कोणा न पडती. ॥ ६२ ॥ [7]खडतर मंत्रबीजाचें रूप । पाहातया दि[8]सती सर्प, । भयें [9]पोहुनियां कंप । स्पर्शो कोणी न शकती. ॥ ६३ ॥ [10]खङ्गवल्ली [11]तूणीरचापें । प्रळयपावकाचीं रूपें । पाहातां सूर्याचिये [12]वोपें । [13]झांकुळती स्वप्रभा. ॥ ६४ ॥ मृगचर्में वेष्टुनियां निगुतीं । नकुळें ठेविलीं वृक्षावरुतीं । जीं कां आणिकांचे हातीं । साध्य न होती [14]सहसा. ॥ ६५ ॥ वृद्धस्त्रियेचें [15]कलिवर । तेथें बांधिलें भयंकर, । दुर्गंधि[16]स्तव नारी नर । समीप कोणी नच येती. ॥ ६६ ॥ नगर-प्रवेशीं [17]नरशार्दूलें । दुर्गाप्रासाद देखिला [18]डोळें, । अंबा भगवती विशाळें । [19]लोटांगणीं वंदिली. ॥ ६७ ॥ धर्मराज करी स्तवन, । 'विश्वमाते! तूज नमन; । तुज वेगळें ब्रह्म आन । [20]हें सर्वथा घडेना. ॥ ६८ ॥ ब्रह्मा, शंकर आणी हरी । बाळकें जन्मलीं तुझे उदरीं, । वर्तती आपुले [21]व्यापारीं । तुझी [22]आज्ञा जननिये! ॥ ६९ ॥ तुझी आज्ञा भंगितां देख । ब्रह्मा झाला [23]चतुर्मुख, । लिंग[24]-पतन त्र्यंबक । [25]कपाळपाणी त्वां केला. ॥ ७० ॥ [26]विष्णू देउनी बहु सोंगें ।

---

१. विराटनगरीकडे. विराटराजा मत्स्यदेशाचा राजा होता. २. जगांतील बलवान पुरुष (पांडव). ३. पाठीमागें. ४. 'श्मशान' हें शुद्ध स्वरूप. श्मन्=शरीर. त्याच्या विश्रांतीची जागा तें 'श्मशान.' 'सशान' असें म्हणण्याची रूढी आहे. 'मसण' हा त्या शब्दाचा अपभ्रंश होय. ५. अत्यंत पवित्र अशीं. ६. दृष्टीस=नजरेस. बोलतांना व लिहितांना कधीं कधीं 'स' चा लोप होतो. ७. तापदायक. 'खरतर' शब्दापासून हा शब्द झाला आहे. ८. शस्त्रें सर्परूपी दिसतील. ९. 'पावुनियां' असा पाठ असता तर त्यानें अर्थपोषकता वाढली असती. १०. असिलता, तरवार. ११. भाता व धनुष्य. १२. ओपें=प्रकाशानें. कोशांत 'ओप' हा शब्द स्त्रीलिंगी दिला आहे. १३. मंदतेज होतात. झांकोळणें=झांकणें, झांकलें जाणें, आच्छादित करणें. १४. कधींही. १५. कलेवर=प्रेत. १६. घाण येत असे म्हणून. १७. नगरप्रवेश करितांना नरश्रेष्ठ धर्मराजानें. १८. डोळ्यांनीं. ही तृतीया लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. प्रासाद=देवालय. १९. साष्टांग नमस्कार घालून. २०. तुझ्या व्यतिरिक्त दुसरें ब्रह्म असणें हें संभवत नाहीं. तूंच ब्रह्म आहेस. २१. उत्पत्ति, स्थिति व लय हे व्यापार. २२. तुझ्या आज्ञेनें. २३. ब्रह्मदेवास पांच मुखें प्रथम होतीं, अशी कथा आहे. २४. लिंगभ्रंश पावला. २५. भिक्षापात्र आहे हातांत ज्याच्या तो, शंकर. २६. विष्णूस द्वितीया विभक्ति समजावी.

फिरविसी तूं स्वयें आंगें, । लागतां [1]वृंदेचिया मागें । स्मशानवासी त्वां केला. ॥ ७१ ॥ [2]शक्राआंगीं पडलीं [3]भगें, । [4]शशांक व्यापला क्षयरोगें, । तो तुझे [4]नी आज्ञाभंगें । [5]अविधीमार्गें वर्ततां. ॥ ७२ ॥ करूं नये तें कर्म करणें, । [6]सृष्टीवर्जित [7]राहाटणें, । तेचि तुझी अवज्ञा जाणे । वेदवचन, यथार्थ. ॥ ७३ ॥ तो आमुतें घडला दोषूं । म्हणोनी भोगूं [8]अरण्यवासू; । आतां उगवोनि कृपादिवसू । [9]निशा नाशीं [10]अवदशा. ॥ ७४ ॥ जें जें व्यक्ता-व्यक्त दिसे, । तें तें तुझें स्वरूपचि असे. । [11]तुझेनीच [12]ऐके [12]अंशें । विश्व सगळें [13]चालिजे. ॥ ७५ ॥ [14]तारा तूंची [15]उक्ता [16]आगमीं । गौरी भगवती [17]शैवधर्मीं, । 'वज्रादेवी' यया नामीं । [18]कौलिकाचारें बोलिजे. ॥ ७६ ॥ जैन म्हणती, 'पद्मा-वती', । 'त्रिपदा गायत्री' [19]देवमती, । [20]सांख्य बोलती तुजप्रती । 'आदिशक्ती' [21]व्यापके ! ॥ ७७ ॥ अवतार धरूनी गोकुळीं । जन्मलीसी नंदकुळीं, । कंस-कुळा करूनी होळी । [22]चैद्य [23]मागध [24]आटिले.' ॥ ७८ ॥ ऐकोनि धर्ममु-

---

१. शंखचूड असुराची स्त्री. हिलाच तुलसी म्हणतात. शंखचूडाचा पराभव होईना म्हणून देवकार्यार्थ विष्णूनें शंखचूडाचें स्वरूप धारण करून तुलसीस पातिव्रत्यभ्रष्ट केलें. त्या तुलसीकृत पातकानें शंखचूड मरण पावला. विष्णूवर तिची प्रीति होती, तरी देवब्राह्मणांच्या साक्षीनें लग्न झालेल्या पतीचा परपुरुषसंगमानें आपण अनादर केला हें पाहून तिनें विष्णूस 'तूं शिला हो' असा शाप दिला. देवीभागवत, स्कंध ९, अध्याय १७–२५ पहा.) इच्छेविरुद्ध लग्न झालें असतांही विधिपूर्वक पाणिग्रहण झालेल्या पतिनिष्ठत्वाचें हें उत्तम उदाहरण आहे. २. ही सर्व मंडळी परयु-वतीच्या अपहरणानें शापबद्ध झालेली आहे. ३. क्षतें, व्रण (मुक्तेश्वरकृत आदिपर्व, पृष्ठ ६३ टीप ३ पहा. 'काव्यसंग्रह–ग्रंथमाला'.) ४. नि=खरोखर. कधी कधी 'नी' चा उपयोग पादपूरणार्थही कवितेंत होतो. ५. शास्त्रविरुद्ध. ६. लोकविरुद्ध; नैसर्गिक नियमांच्या उलट. ७. रहाटणें=वागणें. रहा=रीति या फारसी शब्दापासून 'रहाटणें' शब्द उत्पन्न झाला. ८. कवितेंत अकारान्त पुल्लिंगी नामें कधी कधीं ऊकारान्त किंवा ओकारान्त योजितात, त्या नियमाची उदाहरणें ह्या ओवीत आहेत. ९. अरण्यवास प्राप्त झाला तो आपल्याच अपराधामुळें होय, ही धर्माची समजूत किती उन्नतिप्रद आहे बरें ! १०. दुर्दैवाची रात्र, अवदशेची रात्र. रूपक आहे. ११. तुझ्याच. १२. एका कळेनें. १३. चाललें जातें, चालतें. (कृ० शा० गोडबोलेकृत व्याकरण–पृष्ठ ९२, आवृत्ति दुसरी.) १४. बृहस्पतीची पत्नी. ही उमाच अवतरली होती. १५. सांगितलेली, वर्णिलेली. १६. वेदामध्यें. १७. तीच शिवधर्मामध्यें गौरी. १८. वामपंथानें देवीची आराधना करणारे लोकांचा मार्ग. कौलिक=पाखंडी, शाक्त. १९. देवांच्या मतानें. २०. प्रकृति व पुरुष हीं दोन आदितत्वें आहेत असें म्हणणारे ते सांख्य. २१. सर्व विश्व व्यापणारे देवि ! २२. शिशुपाल. (मुक्तेश्वरकृत सभापर्व, अध्याय ११ पहा.) २३. जरासंध. (मुक्तेश्वरकृत सभापर्व, अध्याय ७ पहा.) २४. आटवून टाकिलेस, शुष्क केलेस, नाहींसे झाले.

खींची स्तुती । [1]प्रत्यक्ष झाली भगवती । मौळ[2] स्पर्शोनियां हातीं । आश्वासीत सुवाचा. ॥ ७९ ॥ 'वर्ष एक वसिजे येथें, । वैरी पावती अपजयातें; । पुढें भोगाल मेदिनीतें । सागरान्त[3] ऐकाज्ञा.[4]' ॥ ८० ॥ अभय देऊनियां हातीं । लोचना अगोचर[5] भगवती. । पुढें राजसभेप्रती । धर्मराज पातला. ॥ ८१ ॥ वदोनियां आशीर्वचन । म्हणे, 'राया ! स्वस्ति ! कल्याण !' । भूप म्हणे, 'कोठील ? कोण ? । किमर्थ येणें या ठाया.[6] ? ॥ ८२ ॥ दिससी सूर्याहून आगळा,[7] । आंगीं ऐश्वर्याची कळा, । पृथ्वीचिया [8]भूपाळा- । श्रेष्ठ, आगळा भाससी.' ॥ ८३ ॥ धर्म अनुवादे[9] हांसोन, । '[10]व्याघ्रपादशाखीं माझें जनन, । अत्रिगोत्री[11] मी ब्राह्मण । होय आश्रित धर्माचा. ॥ ८४ ॥ सभापंडित[12] धर्मानिकट । पांडव झालिया[13] राज्यभ्रष्ट । तूं परम धार्मिक, श्रेष्ठ, । ऐकोन आलों तुजपाशीं. ॥ ८५ ॥ चारी वेद साही शास्त्रें । परिश्रम असे [14]अंगमात्रें । उपासना [15]मंत्रतंत्रें । बुद्धी[16] कुंठित असेना. ॥ ८६ ॥ खेळूं जाणें द्यूतखेळ, । सत्यभाषणीं न पडे चळ[17], । रत्नपरीक्षे[18] मी कुशळ, । कंक नाम पैं माझें. ॥ ८७ ॥ जाणें वस्तूंची[19] परीक्षा । बहु काय बोलूं ? विचारदक्षा !' । राजा म्हणे, 'मज अपेक्षा । संगतीची पैं[20] असे. ॥८८॥ आसन वसन मान धन । विद्येसारिखें निवेदीन.[21] । आतां स्वस्थ करूनियां मन । मजसंगतीं असावें'. ॥ ८९ ॥ अनुवादोनी[22] स्नेहें गोष्टी । बैसविला[23] आसनानिकटी; । पुढती चोज देखे दृष्टी । सभास्थानीं नरेंद्र.

१. प्रकट. २. मस्तक. ३. सागर आहे सीमा जिची अशी पृथ्वी. ४. एकचक्री राज्य आहे जेथें अशा. 'एकाची आज्ञा' असाही अर्थ होईल. ५. अदृश्य झाली. ६. हा 'स्थान' शब्दाचा अपभ्रंश. ७. श्रेष्ठ. ८. पृथ्वीपतीहून श्रेष्ठ. ९. बोलता झाला. १०. व्याघ्र इव पततीति व्याघ्रपाद् यमः तस्य शाखायां कुले. यमाच्या कुलामध्यें. 'व्याघ्रपादगोत्रीं' असें मुळांत आहे. ११. 'अत्रि आणि सर्वांशी मैत्री' अशी म्हण प्रसिद्धच आहे. हें गोत्र अजातशत्रु जो धर्म त्यास अनुरूपच आहे. १२. सभासद. १३. झाल्यामुळें. १४. अंगोपांगांसह, सांग. 'आगममंत्रीं' असाही पाठ आढळतो. १५. मंत्रतंत्रांच्या योगानें, मंत्रतंत्राच्या जोरामुळें. १६. सर्व विषय माझ्या बुद्धीस गोचर आहेत, असें कंक म्हणत आहे. १७. 'चल=अतिक्रमण' या शब्दापासून. सत्यापासून कधीं मी भ्रष्ट होत नाहीं, असा भाव. १८. सप्तमी विभक्ति आहे. 'मध्यें' हा अर्थ. (मागें ओवी ४६ पहा.) १९. रत्नादिक वस्तूंची. २०. खरोखर. पादपूरक किंवा वाक्यालंकारार्थक अव्यय म्हणूनही 'पै'चा उपयोग करण्यांत येतो. २१. अर्पण करीन. 'नैवेद्य' ह्या शब्दाचा अर्थ जगविश्रुत आहेच. २२. मागें ओवी २० वरील टीप पहा. २३. धर्मास राजानें राजासनाजवळ बसविलें.

॥ ९० ॥ [1]कनकमेरूतुल्य सरळा । हातीं [2]कवेळिलें प्रचंड मुसळा । [3]दर्वी खोविली कटिमंडळा । [4]पोळिकायंत्र [5]सुढाळें. ॥ ९१ ॥ [6]जोहारुनी नरेंद्रोत्तमा । म्हणे, '**बल्लव मी** सूपकर्मा, । **धर्माघरीं** उत्तमोत्तमा । भक्षभोज्या निपजवीं. ॥ ९२ ॥ [7]लेह्य, [8]पेय, खाद्य, चोष्यें[9], । अन्नें [10]परमान्नें [11]पायसें, । शाखा[12]कथिकांच्या सुवासें । वेध लावीं [13]वसंता. ॥ ९३ ॥ **भीसेनाचे** संगतीं । बळाभ्यास अहोराती । करितां, मल्लाचिये पंक्ती । मान दीजे [14]बळिष्ठीं. ॥ ९४ ॥ आतां देओनियां [15]पोटा । घेईं पाकक्रियांच्या कष्टा, । आणीकही नरेंद्रश्रेष्ठा ! । करणी दावीन पुढारी.' ॥ ९५ ॥ 'अवश्य' म्हणोनी राजेश्वर । पाकक्रियेचा अधिकार । देऊनि [16]बल्लव-वृकोदर । पाकशाळे स्थापिला. ॥ ९६ ॥ [17]चीर, कंचुकी, करकंकणें, । श्रवणीं [18]तांटक भूषणें, । [19]चारुवेषी, दिव्यांजनें । नेत्रकमळीं शोभती. ॥ ९७ ॥ ऐसें [20]अवगोनी अंगनारूप । [21]सभे [21]पातला **अर्जुनभूप;** । राजा म्हणे, '[22]लावण्य-

---

१. सुवर्णपर्वतासारखें व सरळ. हीं मुसळाचीं विशेषणें. २. कवळणें, पकडणें. कव=मिठी, विळखा. ३. पळी. ४. पोळिपाट. ५. सुरेख रीतीनें. भीमदादा कसे सुरेख बल्लव दिसले असतील? ६. जोहार करून. 'जय हर' यापासून हा शब्द निघाला म्हणतात. 'योद्धार:' हाही 'जोहार'चा मूळ शब्द म्हणून कोशांत दिलेला आहे. राजास जोहारणें म्हणजे 'अहो योद्धार: (शूर महाराज)' असें म्हणणें. 'जोहारा' चा 'रामराम' **रा**मदासस्वामींच्या सांगण्यावरून **शि**वाजीनें केला, हें सर्वविश्रुत आहेच. ७. चाटण, चाटण्याजोगें खाद्य. ८. पेय. खाद्य, पेय, लेह्य, चोष्य हीं चार प्रकारचीं अन्नें आहेत, म्हणून या सर्वांस 'चतुर्विध अन्नें' म्हणतात. ९. चोखण्याचे पदार्थ. १०. पक्वान्नें. ११. क्षीर, खीर. १२. कथिका=कढी. १३. ज्या ऋतूमध्यें सुवासाचा घमघमाट सुटत असतो अशा पसंत वाटणाऱ्या वसंतासही वेध लावील, वेडें करील, असा सुवास मी भाज्या-कोशिंबिरीमध्यें उत्पन्न करून तुला संतुष्ट करीन. **व्यतिरेक** अलंकार आहे. वसंतापेक्षां भाज्यांचा सुवास जास्त आहे असें सांगून भाज्यांचा गौरव केला आहे. भीमपाक व नलपाक हे प्राचीनकाळीं अत्यंत प्रसिद्ध होते. १४. मोठ्या बळवान् पैलवानांनीं मला मान द्यावा, असें सामर्थ्य भीमसंगतीनें मला प्राप्त झालें आहे. १५. 'पोटा दे' ही म्हण प्रचारांतील आहे. १६. बल्लवाचा वेष धारण करणारा भीमसेन. याची भूक शांत होणें लांडग्यासारखें कठिण म्हणून यास 'वृकोदर' नांव होतें. वृकोदर हें नांव रोमचा संस्थापक रॉम्यूलस् यास होतें; पण वृकीनें त्याचें पोषण केलें होतें म्हणून होय. १७. स्त्रियांचें वसन, लुगडें. 'चिरडी' हा शब्द 'चीर' शब्दापासून झाला आहे. १८. तानवडें, ताटंक नामक कर्णभूषणें. १९. सुंदर वेष आहे जिचा अशी. 'चारुवेणी' असाही पाठ आहे. २०. वेऊन. २१. सभेस आला. २२. सौंदर्यप्रकाश.

दीप । कोण कोठील उजळला[1] ? ॥ ९८ ॥ नेणवे पुरुष किंवा नारी, । प्रभा-ने[2] समाये पृथ्वीवरी, । स्त्रीत्व लोपोनी[3], बाहेरी । पुरुषतेज विराजे.' ॥ ९९ ॥ 'राजा धर्माचिये घरीं । नाटकशाळे[4] नाचवीं नारी, । गायनें शिकवीं रागोद्वारीं[5] । गीतप्रबंध सुतालें. ॥ १०० ॥ अर्जुनसंगें बैसतां रथीं । वारू वागविले हातीं । युद्धीं नानागती, ये गती[6] । सारथ्यविद्या लाधली. ॥ १०१ ॥ खांडवदहनादि[7] अर्जुनयुद्धें । दृष्टी[8] देखिलीं म्यां विविधें, । पार्थगुरूच्या प्रसादें । संग्रामकळा जोडली[9]. ॥ १०२ ॥ संगें[10] असतां, समयीं[11] । कळों येईल, सांगणें कायी ?' । राजा संतोषोनी हृदयीं । सर्वस्वदानें वोळला[12]. ॥ १०३ ॥ तोषोनियां अमृतो-त्तरीं[13] । नाटकशाळेचिया नारी । स्वाधीन करूनियां, अधिकारीं । बृहन्नडा ठेविली. ॥ १०४ ॥ प्रतापी[14] चाबुक धरूनी हातीं । नकुळ बोले राजयाप्रती, । 'अश्वविद्याकर[15] तया संगती । राउतविद्ये[16] कुशळरूप. ॥ १०५ ॥ कडोविकडी[17] नाचवणें, । झाला[18], चौपाटा फिरवणें, । पळवणें, टिकवणें, उडवणें, । आवरणें मुखसंज्ञा, ॥ १०६ ॥ वारू चालवणें निराळीं[19], । बैसोनी तरिजे सिंधुजळीं, । सहस्र रथियांची मंडळी । एके रथीं विभांडीं[20]. ॥ १०७ ॥ थोडेंकी[21], यां[22] राज-

---

१. प्रकाशित झाला. उजळणें=स्वच्छ करणें, प्रकाश करणें, दिवा लावणें. 'उज्ज्वल' शब्दाचा अपभ्रंश होऊन 'उजळणें' हें क्रियापद झालें. आपण अभ्यासाची 'उजळणी' करितों म्हणजे 'मलीन' झालेला अभ्यास 'उजळतों.' २. मावत नाहीं. ३. लुप्त होऊन; स्त्रीत्व नाहींसें होऊन. ४. नृत्यगायन शाळेमध्यें. येथें 'न' काराचा **अनुप्रास** आहे. ५. निरनिराळ्या रागांतील. ६. या मार्गानें. 'विगति' असा पाठ अन्यत्र आढळतो. ७. अग्निदेवतेचें अजीर्ण शमन करण्यासाठीं अर्जुनानें खांडववन अग्नीस समर्पण केलें होतें. त्या वेळीं त्यास इंद्रादिक देवांशीं युद्ध करावें लागलें होतें. (मुक्तेश्वरकृत आदिपर्व, अध्याय ४९ पहा.) वसाहत करण्यासाठीं वनें अग्निसात् करण्याची ही पांडवांची युक्ति होती. ८. डोळ्यांनीं. ही तृतीया चिंतनीय आहे. ९. सारथ्यकलेसहित युद्धविद्या जोडिली. १०. आपल्या संगतीस राहिल्यावर. ११. प्रसंग पडला असतां. १२. मागेल तें देण्याइतका प्रसन्न झाला. १३. अमृततुल्य भाषणानें. १४. अत्यंत ताप देणारा, पराक्रम गाजविणारा. ताप=पीडा, दुःख. १५. अश्वविद्येचें स्थान जो नकुल त्याचे संगतीनें. १६. अश्वविद्येमध्यें. राजदूत=रावदूत=राऊत अशी 'राऊत' शब्दाची पीठिका आहे. १७. कौशल्याच्या चालीवर. १८. झाला=उड्या मारणें. चौपाटा=भरधांव. टिकवणें=काबूंत ठेवणें. मुखसंज्ञा=मुखसंज्ञेनें=तोंडाच्या खुणेनें, खुणेचा शब्द उच्चारल्याबरोबर. १९. आकाशमार्गें. २०. चालून जातों व भांडण करितों. २१. हें मीं सांगितलें हें थोडकेंच आहे. 'घोडक्या' असा पाठभेद आहे. २२. याला (मला.)

गुरू[1] । जाणोनी, पाळी युधिष्ठिरू. । तो गेलिया, तव आधारू । धरूनी[2], आलों तुजपाशीं.' ॥ १०८ ॥ हृदयीं कवळुनियां भूपाळें । स्वामित्व दिधलें अश्वशाळे. । सहदेव म्हणे, 'माझिये कैळे[3] । नावेक[4] दृष्टी विलोकीं. ॥ १०९ ॥ धर्माघरीं-चा मी खिल्लारी । अपेट[5] वृपभ सहस्रवरी[6] । एकला [7]अंगवणें आवरीं, । शिक्षा करीं मातलिया[8]. ॥११०॥ धेनू, म्हैशी, करसुरवाडें[9] । दुग्ध स्रवती सरिता-पाडें[10]. । न फळती त्या फळती कोडें, । हस्तस्पर्शें माझिया. ॥ १११ ॥ वंध्या प्रसवती वासुरें । हाचि चमत्कार पाहिजे[11] चतुरें.' । राजा म्हणे, 'लक्ष खिल्लारें[12] । तुज हातीं [13]ओपिलीं.' ॥ ११२ ॥ यावरी[14] द्रौपदी सुंदरी । येतां देखिली नगरनारीं[15]; । म्हणती, 'मूर्तिमंत हे गौरी[16], । नवनागरी[17] सुरकन्या.' ॥ ११३ ॥ सुदेष्णेतें सांगती वचनीं, । 'विचित्रलावण्याची खाणी, । सुकुमार[18], जातीची [19]पद्मिणी । रूप नयनीं न संडे[20]. ॥ ११४ ॥ ऐशी पातलीसे नारी, । कोण ते नेणवे निर्धारीं[21]; । पाचारुनी[22] आपुल्या[23] मंदिरीं । [24]पवित्रसंगीं ठेविजे[25].' ॥ ११५ ॥ धाडोनियां परि-

---

१. 'घोडकियां मी राजगुरू' व 'घोडकी शाळे राजगुरू' असे पाठभेद आहेत. २. आश्रय मिळेल असें मनांत समजून. ३. विचेला. ४. क्षणभर. ५. अंडील, न बडविलेला, अंगांतली रग न मोडलेला. 'अफाट' असें पाठांतर. अफाट=न बांधलेले, मोकळे बैल. अफाट गुरूं=मोकाट जनावर. ६. 'सहस्रभरी' असें पाठांतर. वृपभ=बैल, पोळ. ७. स्वतःच्या बळावर. 'अंगवळण' हा मूळ शब्द. ८. मत्त झालेल्या वृषभाला. ९. हात लावतांच सुखानें (किंवा वैपुल्यानें). सुरवाड=सुख, सुकाळ. १०. नदीसारखें. जणुं काय दुधाच्या नद्याच वाहात होत्या! 'दुग्ध प्रसवती' असाही पाठ आहे. 'सरतां पाडें' असा पाठ आहे, तो स्वीकारल्यास 'वांसरूं दूर झालें तरी.' 'पाडें' हा शब्द 'पाडस' ह्या अर्थी योजिलेला दिसतो. पाडा=गाईच्या वांसरांतील नर, गोऱ्हा. पारडूं=म्हैशीचें वांसरूं, रेडकूं. ११. पाहावा. १२. कळप, टोळ्या. १३. हवालीं केलीं, हातीं दिलीं. १४. 'या उपरि'–असें पाठांतर. १५. नगरस्त्रियांनीं. 'नर–नारीं' असें पाठांतर. १६. पार्वती. १७. नगरांत नवीन आलेली. १८. कोमल, नाजूक. १९. स्त्रियांच्या पद्मिनी, हस्तिनी, चित्रिणी व शंखिनी ह्या चार प्रकारांपैकीं पहिल्या प्रकारची स्त्री. पद्मिनी स्त्रीचें लक्षण:—'भवति कमलनेत्रा नासिकाक्षुद्ररंध्रा अविरलकुचयुग्मा दीर्घकेशी कृशांगी । मृदुवचनसुशीला गीतनृत्यानुरक्ता सकलतनुसुवेशा **पद्मिनी** पद्मगंधा ॥' (रतिमंजरी). २०. न संडे=न संटे=सांठविलें जात नाहीं. 'न सांठवे' असाही पाठ आहे. २१. निश्चयानें. २२. 'आम्हा वाटतें अंतरीं' असाही पाठ आहे. २३. 'आपुलिया घरीं' असा अन्य पाठ. २४. पूज्य स्त्रियांच्या संगतींत. २५. 'वसिजे' व 'ठेवावी' असे पाठभेद आहेत.

चोंरिके । द्रौपदी आणविली जवळिके[2]; । अवलोकितां परम सुखें, । हृदयीं संतुष्ट [3]जाहली. ॥ ११६ ॥ द्रौपदी म्हणे, 'मी सैरंध्री । [4]याज्ञसेनीची [5]शुश्रूषा करीं. । ते गेलियां[6], तुजिया घरीं । काळ कंठूं [7]पातलें.' ॥११७॥ सुदेष्णा म्हणे, '[8]गुणैकराशी ! । माझिये स्वामिणीऐसी[9] दिससी; । मायबहिणीहोनी[10] विशेषी । [11]मजसंगतीं असावें. ११८ ॥ [12]कार्य सांगतां वाटे लाज । दिससी [13]चक्रवर्तीची भाज. । [14]माणिककळेजवळी गुंज । तेंवि मी दिसें पुढारें[15].' ॥ ११९ ॥ द्रौपदी म्हणे, 'न वदें ऐसें, । तुझिये संगती वसणें असे; । [16]सत्य मानुनी मानसें । सेवा घेईं [17]ममहस्तीं. ॥ १२० ॥ उच्छिष्ट अन्नाचें भोजन, । [18]पराचें चरणक्षालन, । [19]दोनी कामें करुनियां भिन्न । दास्य करीन मी तुझें.' ॥१२१॥ सुदेष्णा म्हणे, '[20]सुमध्यमे ! । दोन्ही अयोग्य [21]तुज उत्तमे ! । मान्य माझे [22]नि समागमें । मज समान सुख भोगीं.' ॥ १२२ ॥ [23]येरी म्हणे, 'वो सुंदरी ! । आसन, वसन माझिये [24]सरी । सेवुनी असावें मम मंदिरीं, । संशय न धरीं; पवित्रे !' ॥१२३॥

---

१. सेविका, दासी. २. समीप, जवळ. हा शब्द स्वतः नाम असून येथें त्याचा क्रियाविशेषणासारखा उपयोग केलेला आहे. जवळीक=सान्निध्य, शेजार. ३. 'सुदेष्णा' हा कर्ता. 'हृदय जालें संतुष्ट' असाही पाठ आहे. ४. यज्ञसेन=द्रुपद, तस्य अपत्यं स्त्री=याज्ञसेनी. ५. सेवा, उपासना. ६. गेली म्हणून; किंवा गेल्यावर. ७. 'पातलों' असें पाठांतर. ८. सर्वगुणसंपन्न अशी. ९. सारखी. १०. भगिनीहून जास्त. 'माझिये वहिणीहूनी' असा पाठभेद. ११. 'मजसंगीं' असें पाठांतर. १२. काम, धंदा. १३. सार्वभौम राजाची भार्या. ज्याच्या रथाला कोठेंही अडथळा येत नाहीं (शत्रु नाहीं) तो चक्रवर्ती राजा. १४. माणीक नामक रत्नाच्या तेजासमोर गुंज ठेवावी तद्वत्. [माणिक (माणिक्य) हें नवरत्नांतील एक. नव रत्नें:—माणिक्य, मौक्तिक, प्रवाल, मरकत, पुष्पराज, वज्र, नील, गोमेद आणि वैडुर्य]. सारांश—माणिक रत्नाजवळ जशी गुंज निस्तेज होते, तशी मी तुझ्यापुढें निस्तेज दिसेन. **उपमा** आहे. 'माणिक्य कळिकेजवळी' असाही पाठ आहे. येथें माणिक रत्नास कळिका (फुलाची लहान कळी) असें म्हटलें आहे, ही कल्पना अभिनव आहे. १५. 'तेंवि मी दिसें तुजपुढें' असाही पाठ आहे. १६. मीं सांगितलें आहे तें खरें मानून. ११७ ओवी पहा. १७. माझ्याकडून. 'मजहस्तीं' व 'मम हातीं' असे पाठभेद आहेत. १८. दुसऱ्याचे पाय धुणें. १९. या दोन गोष्टी शिवाय करून. 'भिन्न करणें' यास 'Except=take out' हा इंग्रजी शब्द अगदीं समानार्थक आहे. २०. चांगला आहे मध्य (कटि) जिची. २१. तुझ्यासारखी जी गुणोत्कृष्ट असेल तिला, सारांश तुला. 'उपमे' असा अन्यपाठ आहे. २२. खरोखर. तूं माझ्या सहवासांत असलीस म्हणजे सर्व लोक तुला पूज्य मानतील—असा भाव. २३. सुदेष्णा. २४. सारखें, सदृश. 'असणें, वसणें मज शेजारीं' असाही पाठ आहे.

ऐसें बोलोनी [१]प्रीतीं । द्रौपदी ठेविली [२]स्वसंगतीं, । [३]विषमकाळाची विचित्र गती । चतुर पुरुषीं जाणिजे. ॥ १२४ ॥ [४]सौंही जणें ऐसियापरी । गुप्त [५]ठेलीं विराटनगरीं, । [६]राहटी घडली ते पुढारीं । जगप्रसिद्ध, परियेसा. ॥ १२५ ॥ [७]मार्जारपिलींया ऐसें कांखे । [८]कुंजरबाळ कैसेंनि झांके? । अंधकारीं पळतां [९]अर्कें । [१०]लोकदृष्टी न लोपे. ॥१२६॥ कीं लपवितां कस्तूरीपरिमळ । सर्वत्र प्रगट करी [११]अनिळ, । तेंवी [१२]यांचा गुप्त खेळ । भेरी[१३]नाद [१४]जगश्रवणीं. ॥ १२७ ॥ एशियापरी जन्मेजया ! अज्ञातवासीं वसतां तयां । पुढां वर्तलें तें राया ! । चरित्र पवित्र [१५]परियेसीं. ॥ १२८ ॥ मुक्तेश्वराचीं [१६]गुणसुढाळें । [१७]वचनशुक्तिका-[१८]मुक्ताफळें । सज्जनराजहंस[१९]पाळें । [२०]भाग्यागळें [२१]सेविती. ॥ १२९ ॥

॥ इति श्रीविराटपर्वणि पांडववैराटनगरप्रवेशो नाम प्रथमोऽध्यायः ॥

---

१. प्रीतीनें. २. आपल्या सहवासांत. 'निज संगती' असें पाठांतर. ३. आपत्कालाची. **अर्थांतरन्यास** आहे. Misfortunes bring to us strange bed-fellows! ४. 'सारीजणें' असें पाठांतर. ५. राहिलीं. 'गुप्त ठेविलीं विराटघरी' असाही पाठ आहे. ६. वर्तमान. मूळ अर्थ 'वागणूक, पद्धति' असा आहे. 'राहाटिलीं तें' असा अन्य पाठ. ७. मांजरीच्या पिलांना कांखेंत लपवून नेतां येईल, हत्तीच्या छाव्याला लपवून ठेवतां येणें शक्य कसें आहे ? अर्थात् 'नाहीं' हें उत्तर. ८. हत्तीचा छावा. 'शार्दूलबाळ' असें पाठांतर. ९. सूर्यानें. १०. सूर्य अंधारांतून पळून जाऊं लागला तरी तो लोकांच्या दृष्टीस पडल्याशिवाय राहूं शकणार नाहीं—हा भावार्थ. 'मार्जारपिलियां संगें देख । व्याघ्रबाळ कैसें झांके ? । अंधकारीं लपवितां अर्क । लोकदृष्टी न लोपे. ॥' असाही पाठ आहे. ११. वायु. हे दृष्टांत रमणीय आहेत. १२. पांडवांचा. पांडवांच्या हालचाली जरी गुप्तपणें चालल्या होत्या तरी त्या जगाला जाहीर होत्या, असें सांगण्याचा मतलब. येथें पुष्कळ **अप्रस्तुतप्रशंसा** आहेत. 'तैसा तयांचा' असाही पाठ आहे. १३. नगाऱ्याचा आवाज, मोठी प्रसिद्धी. १४. लोकांच्या कर्णपथावर. येथें मुळांतील १२ वा अध्याय संपतो. पहिल्या बारा अध्यायांस 'पांडवप्रवेशपर्व' असें नांव आहे. मुळांत धर्म, भीम, द्रौपदी, सहदेव, अर्जुन व नकुल अशा क्रमानें विराटाकडे गेल्याचें वर्णन आहे. पण मुक्तेश्वरानें धर्म, भीम, अर्जुन, नकुळ, सहदेव व द्रौपदी ह्या जगप्रसिद्ध क्रमानें त्यांना विराटाकडे पाठविलें आहे. वस्तुतः पांडवांस अज्ञातवासांत राहावयाचें असल्यामुळें त्यांनीं नेहमींच्या क्रमानें विराटाकडे जाणें इष्ट नव्हतें. असें असतां मुक्तेश्वरानें असा फेरबदल कां केला नकळे. 'जगत्त्रयीं' असें पाठांतर. १५. ऐकावेंस. १६. गुणसुंदर. १७. वचनरूपी शिंपल्यांतून उत्पन्न होणारा मुक्ताफळरूपी अर्थ. येथें **रूपक** अलंकार आहे. १८. 'वाक्य-सुकृत मुक्ताफळें' व 'वचनसरिता-मुक्ताफळें' असे पाठभेद आढळतात. १९. सज्जन हेच राजहंस त्यांचा कळप. पाळें=समुदाय, मेळा. राजहंसांस मोतीं प्रिय असतात, असा कविसंकेत आहे. २०. भाग्यश्रेष्ठत्वानें. (क्रियाविशेषण). २१. 'भाग्य आगळें सेविजेती' असा पाठभेद.

# अध्याय दुसरा.[1]

विराटनगरीं [2]सोहीजणें । [3]गुप्त असतां, नेणिजे कवणें. । [4]राजा म्हणे, 'माझिया मनें । संशयातें [5]पाविजे. ॥ १ ॥ दिसती जैसे [6]पंचादित्य. । म्हणविती 'पांडवांचे [7]भृत्य.' । हें तों मातें न वाटे सत्य. । राजे [8]होती [9]निर्धारें. ॥ २ ॥ पांडव अथवा होत कां [10]आन, । एकेकाचे अंगीं ऐश्वर्याचें चिन्ह; । या कंकाचें पाहतां ज्ञान । उणा वाटे [11]सुरगुरु.॥३॥ बल्लवहस्तींचीं दिव्यान्नें । अमृतातें [12]म्हणती उणें. । अवलोकितां [13]अंगवणें । [14]वायुपुत्रासारिखा. ॥४॥ घेउनि कामिनीचें [15]सोंग । बृहन्नडा लोपवी आपुलें [16]आंग, । परि ते पुरुषार्थाची [17]शीग । दिसे अत्यंत वाढती. ॥५॥ नारी, नर, किंवा नपुंसक । [18]तर्कितां निर्धार नव्हे [18]एक. । [19]क्षात्रविद्ये नरनायक । रामचंद्रासारिखा. ॥६॥ ग्रंथिक [20]अश्वारोहणीं । [21]तुळणे न दिसे आन कोणी; ।

---

१. ह्या अध्यायांत मुळांतील 'समयपालन' नामक पोटपर्वांतील कथाभाग आलेला आहे. ह्या पोटपर्वाचा एकच अध्याय (१३ वा) असून त्याचे ४६ श्लोक आहेत. मुक्तेश्वराला विस्तार करण्याची हौस फार आहे, ह्या गोष्टीचें प्रत्यंतर प्रस्तुत अध्यायांत पहावयास सांपडतें. येथें वर्णनविस्तार केला असूनही तें वर्णन पाल्हाळीक आहे, असें कोणीही म्हणणार नाहीं. २. सहाजण. 'जन'शब्दापासून 'जण' झाला. ३. 'राहतां जाण' असा पाठभेद. ४. विराटराजा. ५. माझ्या मनाला ह्यांच्या प्रस्तुतच्या व्यवसायासंबंधी संशय येतो—असा विराटराजाच्या म्हणण्याचा भाव. 'विराटनगरीं साहीजणी । गुप्त असतां नेणिजे जनीं । राजा म्हणे, 'माझिया मनीं । संशयातें पाविजे. ॥' असाही पाठ आहे. ६. पांच सूर्यासारखे. ७. सेवक, चाकर. ८. असतील, आहेत. ९. निश्चयेंकरून, खरोखर, निःसंशय. १०. अन्य, दुसरे कोणी. ११. बृहस्पति. हा मोठा ज्ञानसंपन्न आहे—असा भाव. येथें 'असता जरि भूमिवरी सुरगुरु तरिहि मान वांकविता' ह्या आर्यार्धाचें स्मरण होतें. **प्रतीप** अलंकार आहे. १२. **प्रतीप** अलंकार. 'आणिती उणें' असाही पाठ आहे. १३. शरीरसामर्थ्यानें. अंगवण=अंगबळ. 'याचीं चिन्हें' असाही पाठ आहे. १४. अंगाची धाटणी (अंगलोट) व इभ्रत पाहिल्यास भीमाप्रमाणें. १५. 'स्वांग' शब्दाचा अपभ्रंश. अशिक्षित लोक 'स्वांग' म्हणतात; पण तेंच रूप मूलशब्दस्वरूपाशीं जवळचें आहे. १६. स्वरूप. १७. शीग=शेर, अधोली, पायली इत्यादि मापांत अगदीं वरपर्यंत धान्यादि भरलें असतां जी घनकोनाची आकृति होते ती. येथें 'शीग' शब्दाचा उपयोग भीमाच्या पुरुषदर्शक आंगलोटाचें आधिक्य व प्रकृष्टत्व दर्शविण्यासाठीं केलेला दिसतो. १८. कल्पना करितांना एक निश्चय होत नाहीं. १९. धनुर्विद्येच्या बाबतींत. 'क्षतात्किल त्रायते'=क्षत्रियः, अशी 'क्षत्रिय'शब्दाची मीमांसा कविकुलगुरु कालिदासानें केली आहे. 'क्षात्रविद्या नरनायक । रामचंद्रासारखी' असाही पाठ आहे. २०. अश्वारोह, घोडेस्वार. 'अश्व–आरोहणीं' असाही पाठ आहे. २१. उपमेला.

तंतिपाळ म्हणे, 'प्राणीं । वेसण घालूं[1] नंदीच्या[2] !' ॥ ७ ॥ ऐसियां हातें घेतसें[3] सेवा, । हें अनुचित वाटे माझिया जीवा; । पुढें कुशब्द[4] नलगे नांवा । ऐसें केलें पाहिजे. ॥ ८ ॥ दृष्टी पाहातां हे सैरंध्री । भासे[5] शचीचिये सरी[6] । सुदेष्णेचें दास्य करी । हेंही अयोग्य मज वाटे. ॥ ९ ॥ जो करील[7] इचें अभिलाषण[8] । तो पावेल तत्काळ मरण, । या लागीं कोणी अवलोकन । पापदृष्टी न करावें. ॥१०॥ मागां[9] ऐकों पांचजणी, । तयांमाजी मुखरणी, । ऐसें भासे माझिये मनीं । पवित्रपणें निर्धारें. ॥ ११ ॥ आतां असो हा विकल्पू[10]; । प्रगट होतील आपेंआपू, । सांडून[11] शोधायाचा संकल्पू । कौतुक[12] पाहूं काळाचें.' ॥१२॥ नित्य येउनि चित्रशाळे । पाहे बृहन्नळेचिये[13] कळे, । नृत्य[14] रंभेहूनि आगळें । अभ्यासवी[15] कुमरींतें. ॥ १३ ॥ लोपोनि चित्ररथाचें[16] गाणें । मुखें दावि[17] ती मधुर तानें, । तैसेंचि नारी[18] दाविती वदनें । कळा[19] गमे सुस्वर[20]. ॥ १४ ॥ राजा म्हणे 'बृहन्नळे ! तुझें स्वरूप मातें न कळे, । अंगना[21] म्हणों तरी आगळें । पुरुषतेज तव अंगीं.' ॥ १५ ॥ ते म्हणे, 'ऐक गा ! निर्धारीं । मी नपुंसक[22] धर्मघरीं, । वसोनियां[23] अंतःपुरीं । सेवा करीं स्त्रियांची. ॥ १६ ॥ सर्वांगअभ्यंग[24]-

---

१. 'घालीन' असें पाठांतर. २. नंदी=शंकराचें वाहन, वृषभपति. ३. 'घेतसों' असा अन्य पाठ. ४. वाईट शब्द. आपली अपकीर्ति होणार नाहीं, असें केलें पाहिजे. ५. 'दिसे', 'असी', 'असे' असे पाठभेद आहेत. ६. इंद्रपत्नीतुल्य. सरी=बरोबरीची. ७. 'जो करी ... तो पावे' असाही पाठ आहे. ८. पापदृष्टीनें इच्छा करील. ९. पूर्वीं. हा पांडवांविषयींचा बळकट संशय राजा विराटास येत आहे. 'अहल्या, द्रौपदी, सीता, तारा व मंदोदरी' या पंचकन्या प्रसिद्धच आहेत. सैरंध्रीची पवित्रता केवढी आहे पहा. मुखरीण=मुख्य, प्रमुख. १०. संशय. ११. 'सोडूनि' असें पाठांतर. १२. कालांतरानें काय चमत्कार होतात ते पाहूं. Let me see what is concealed in the womb of time. १३. बृहन्नडेच्या कौशल्याला. १४. रंभा, ऊर्वशी इत्यादि देवांगना नृत्यगीतादि कलांत निपुण असल्याचें वर्णन पुराणग्रंथांत वारंवार आढळतें. 'नृपरंभेहूनि आगळें' असाही पाठ आहे. नृपरंभा=राजाच्या नाटकशाळा. १५. शिकवी, अभ्यास करून घेई. 'अभ्यासवीत कुमारींतें' असाही पाठ आहे. १६. गायनप्रवीण गंधर्वपति जो चित्ररथ त्याचें गाणें लोपवून टाकून. **व्यतिरेक** अलंकार. १७. बृहन्नडा मुखानें तान घेऊन दाखविते. 'दावित' असें पाठांतर. १८. कुमारिका. १९. गायनकला. २०. मधुर. 'सुस्वरी' असाही पाठ आहे. २१. स्त्री. 'पाहतां तरी' असाही पाठ आहे. २२. खोजा. Eunuch. २३. राहून. 'बैसोनियां' असें पाठांतर. २४. सर्वांगाला सुवासिक तेलें वगैरे लावणें, चोळणें, वगैरे. या संवाहनविधीस Shampooing म्हणतात.

मर्दना[1] । हातें नेसवीं वस्त्राभरणां,[2] । धर्मराजाचिया मना । विकल्प[3] कांहीं अ-सेना.' ॥ १७ ॥ विराट म्हणे, 'सगुणार्थिली[4] । उत्तरा माझी दुहिता[5] भली । शिष्यीण[6] करुनी आपुली । नृत्य गायन शिकवावें.' ॥ १८ ॥ उत्तरा वोपितां पार्थाकरीं । कृपेनें हस्त ठेवितां[7] शिरीं, । संगीतकळा तियेतें[8] बरी । शारदेसरी[9] अवगमे.[10] ॥ १९ ॥ भीमें आणून साजूक[11] अन्नें । भोजनें[12] तोषवी पांचही जणें. । तैसाचि सहदेव क्षीरपानें[13] । तृप्त करी समस्तां.[14] ॥ २० ॥ दधि, दुग्ध, साय, लोणी । आणूनि निवेदी[15] प्रतिदिनीं. । निशाकाळीं[16] एकांतसदनीं । संवादती[17] समस्तें.[18] ॥ २१ ॥ अश्वकळे[19] तोषोनि देख । राजा ओपी अपार कनक; । तें ग्रंथिसि[20] बांधोनी ग्रंथिक । धर्महस्तीं निवेदी. ॥ २२ ॥ कृष्णा घेउनी कनक-फणी । घाली सुदेष्णेची वेणी. । तोषवी[21] अभ्यंगमर्दनीं । सुकुमार[22] करें[23] आ-पुलिया. ॥ २३ ॥ चंपक-मालतीचे हार । गुंफून, करवी[24] नित्य शृंगार.[25] । सु-

---

१. '°मर्दनीं । हातीं नेसवी वस्त्राभरणी । धर्मराजाचिया मनीं' असाही पाठ आहे. २. वस्त्रा-लंकार. मी अंत:पुरांतील स्त्रियांना वस्त्रें नेसवितों, त्यांच्या आंगावर दागदागिनेही घालतों—असा भाव. ३. किंतु, शंका, भेदभाव. मी तृतीयाप्रकृति नसतों, तर विराटराजानें हीं कामें मला करूं दिलीं नसतीं, हा बृहन्नडेच्या सांगण्याच्या भाव. ४. सद्गुण आपल्या आंगीं असावे अशी इच्छा करणारी. ५. हा शब्द पूर्वी ऋषिकालांत कन्येकडे काय काम असे तें सुचवितो. दुह्=दुध काढणें, धार काढणें, तें काम करणारी ती 'दुहिता'. ६. 'सुवीण' असाही पाठ आहे. सुवीण=वस्त्राच्या सुंदर विणकरीसारखी (?) प्रवीण कर, असें सांगण्याचा हेतु दिसतो. 'शिष्य करूनि' असा अन्य पाठ. ७. 'ठेविला' असें पाठांतर. ८. 'तीतें वरी' असाही पाठ आहे. ९. सरस्वतीसारखी. चौदा विद्या व चौसष्ट कलांची सरस्वती ही अधिदेवता आहे, हें प्रसिद्धच आहे. १०. ज्ञात होई. अवगम (संस्कृत)=ज्ञान. ११. 'सद्यः' शब्दापासून 'साजुक' हा शब्द झाला. साजूक=नुकतेंच तयार केलेलें अन्न. १२. 'भोजनीं' असें पाठांतर. १३. दूध पाजून. 'क्षिप्रान्नें' असाही पाठ आहे. क्षिप्रा=खीर. १४. 'समस्तांतें' असा अन्य पाठ. १५. अर्पण करी. १६. रात्रीं, रात्र झाल्यावर. १७. संभाषणांत वेळ घालवितात. 'सेवा दे ती समस्तां' असाही पाठ आहे. ती=द्रौपदी. १८. 'समस्त' असाही पाठ आहे. १९. अश्वविद्येला. २०. गांठीशीं. ह्या ओवींत 'देखा', 'कनका' व 'ग्रंथिका' असे शब्द प्रत्येक चरणाच्या शेवटीं एका हस्तलिखित प्रतींत आढळतात. २१. 'तो-षोनि' असा अन्य पाठ. तोषोनि=तोषवून, आनंद देऊन—असा अर्थ. २२. 'सकुमार' असें पाठां-तर. २३. हातानें. 'करी' व 'कळीं' असे अन्य पाठ आहेत. कळीं=कळेनें, विद्येनें. २४. 'करी' असा अन्य पाठ. २५. वस्त्रपात्र, दागिने वगैरे यांनीं शरीरास अलंकृत करणें यास 'शृंगार करणें' म्हणतात.

देष्णा [1]अनुवादे विचार । सैरंध्रीतें एकांतीं. ॥ २४ ॥ '[2]चढता तारुण्याचा भरू । शरीरीं दिसे [3]अनावरू; । काम-भोगइच्छेचा विकारू । [4]तुझ्या ठायीं न देखों. ॥ २५ ॥ [5]तारुण्य, लावण्य, चतुरता, । भाग्य, [6]भोगीं तनु वर्ततां, । निष्कामभावें राहे वनिता । हें अघटित[7] सुजाणे ! ॥ २६ ॥ वर्तत असेल जरी वासना । ते मज सांगें मनकामना. । [8]जैसा [9]रुचे तुझिया मना । तैसा पुरुष [10]लाधसी.' ॥ २७ ॥ कृष्णा म्हणे, 'वो महासती ! । पवित्रस्त्रियांचे [11]संगती । बहु काळ क्रमिला म्हणोनि [12]कुमती । स्पर्श न करी [13]मानसा. ॥ २८ ॥ सत्यभामा श्रीकृष्णप्रिया, । द्रौपदी पांडवांची [14]जाया, । त्यांचे [15]संगतीं आपुली काया । अन्नपानें [16]पाळिली. ॥ २९ ॥ तीहीं दिधलें [17]प्रसादवस्त्र । तेणें आच्छादिलें [18]गात्र, । तुझे सुखच्छाये [19]पवित्र । विश्रामलें ये काळीं. ॥ ३० ॥ करीं [20]सैरंध्रीचें कर्म । परि 'मालनी' असें माझें नाम, । तुझें [21]देखोनी पवित्र धाम । सुख, विश्राम, पावलें. ॥ ३१ ॥ स्वप्नीं [22]नातळें व्यभिचारा, । नेणें निषिद्धा[23]चरणाचा वारा, । [24]रहस्य असे

---

१. सांगे, बोले. २. 'चय=वृद्धिंगत होणें' यापासून 'चढ' झाला. चढता=वाढता. ३. न आवरतां येण्यासारखा. 'अनिवारू' असाही पाठ आहे. ४. तारुण्याचा भर वाढत असतां कामविकार स्वाधीन ठेवणें हें सुदेष्णेस असंभवनीय वाटलें, तसेंच हल्लींच्या विषयाभिनिविष्ट झालेल्या क्षीण लोकांसही वाटत असतें. ५.'तारुण्य, चातुर्य, लावण्यता' असाही पाठ आहे. ६. भोग=सुखोपभोग, भोग्य पदार्थ. ह्या पद्यांत **सार** अलंकार असून **असंभव** अलंकारही आहे. ७. असंभाव्य, लोकोत्तर. कल्पनासादृश्यः—शाल्यन्नं सघृतं पयोदधियुतं भुञ्जन्ति ये मानवास्तेषामिन्द्रियनिग्रहो यदि भवेद्विन्ध्यस्तरेत्सागरम् ॥ (भर्तृहरिकृत शृंगारशतक, श्लोक ९५ उत्तरार्ध). ८. 'जैसी इच्छा तुझिया मना' असाही पाठ आहे. ९. 'रुचेल' असें पाठांतर. १०. प्राप्त होईल. या सुदेष्णेच्या सूचनेवरून द्रौपदीवरील तिचें प्रेम व अनुकंपा व्यक्त होतातच. पण त्याबरोबरच तिचा कोता स्वभाव व निर्मर्याद आचरणशीलता हींही व्यक्त होतात. कदाचित् सैरंध्रीचें मन पाहाण्यासाठीं सुदेष्णेनें असें भाषण केलें असेल. ११. संगतीमध्यें. १२. पापबुद्धि. १३. 'स्पर्श न करीच मानसीं' असाही पाठ आहे. १४. विधिपूर्वक लग्न झालेली स्त्री. 'दारान् अपत्याय' हा पूर्वकालीन लग्नाचा संकेत असे. १५. सहवासांत. 'त्यांचिया संगी' असाही पाठ आहे. १६. वाढविली. 'सत्संगाद्भवति हि साधुता खलानाम्' हें सुभाषित लक्ष्यांत आणावें. १७. कृपेचें पांघरूण. १८. देह, शरीर. १९. 'पवित्र' हें 'सुखच्छाये'चें विशेषण. हें उच्चारितांना द्रौपदीस काय वाटलें असेल ? **व्याजस्तुति** आहे. २०. 'सैरंध्री परवेश्मस्था' इत्यमरः. २१. 'तुझें देवी !' असाही पाठ आहे. २२. स्पर्श करीत नाहीं. 'नाचरें' असाही पाठ आहे. २३. अविहित आचरणाचा. 'निषिद्धतेचा' असा अन्य पाठ. २४. गुप्त गोष्ट. (ओवी ३३ मध्यें सांगितलेलें रहस्य).

तें [1]अंतरा। गुप्त जाणोनी ठेवणें. ॥ ३२ ॥ पंच गंधर्व बळसागरू। असती देहाचे[2] प्राणेश्वरू.। मातें रक्षिती निरंतरू। निशाकाळीं [3]जवळिके. ॥ ३३ ॥ न पडती जनाचिये दृष्टी। प्रगट [4]होती बहुसंकटीं। मजसीं करितां दुष्ट रों-हाटी[5]। शिक्षा करिती [6]कृतांता.' ॥ ३४ ॥ भाव देखोनि निर्मळ। झाली सु-देष्णा स्नेहाळ। अन्नोदकें सर्वकाळ। सांभाळित सुवस्त्रें. ॥ ३५ ॥ [7]चत्वारि मास लोटलियावरी। [8]उत्साहकृत्य विराटघरीं। मांडिलें, ते राजेश्वरीं। वार्ता कर्णीं परिसिली. ॥ ३६ ॥ असंख्य ब्राह्मणांच्या पंक्ती। नट, नर्तक[9] नाना जाती। [10]पातल्या, त्यांतें मत्स्यनृपती। धनें, [11]वसनें, तोषवी. ॥३७॥ विराटराया-प्रती विनोद[12]। आवडे कुंजरमेष[13]युद्ध;। जेठी भिडतां महानंद। हृदयीं उपजे [14]आगळा. ॥ ३८ ॥ मल्लयुद्धाचिये [15]आर्ती। राजा ओपी धन, संपत्ती;। ऐकोनि[16] जेठियांच्या पंक्ती। अपार तेथें पातल्या. ॥ ३९ ॥ बळें नाटोपे कवणासीं। [17]तो [18]भिडवी बल्लवासीं,। भीमें रगडूनी भूमीसी। चूर्ण करुनी सांडिजे[19]. ॥४०॥ कितिएक गेले प्राणें। दुजा न [20]तुळे [21]अंगवणें। हस्तहीने, पादहीने। करुनी भूमी टाकितू. ॥ ४१ ॥ भीमाचीये हातातळीं। मल्ल मारुनी मेळविले [22]धुळी;।

---

१. मनामध्यें. 'रहस्य असेल तें अंतरा। आणोनी गुप्त ठेवणें' असाही पाठ आहे. २. या देहाचे, माझे. ३. जवळ राहून. ४. 'होताती' असें पाठांतर. ५. चाल वर्तन. ६. प्रत्यक्ष यमाला सुद्धां. ७. चार. मूळ अध्याय १३ श्लोक १४ पहा. ८. उत्सवाचें कार्य. शरदृतूमध्यें सर्वत्र धनधान्यादिकांची समृद्धि असल्यानें, हा उत्सव मत्स्यदेशांतील लोक मोठ्या समारंभानें पाळीत. ९. नाचणारा, नाचा. 'नृत्यक' असें पाठांतर. १०. 'पातले, त्यां विराटनृपती' असाही पाठ आहे. ११. वस्त्रें, पोषाख. पोषाख देणें, हें मानाचें कृत्य समजतात. १२. कौतूहल, खेळ. रोमन लोकांमध्यें खिस्ती शकाच्या पूर्वी दुसऱ्या व पहिल्या शतकांत असल्या खेळांचा फार प्रचार होता. सामान्यतः त्या लोकांस हें अनावर व्यसनच लागलें होतें, असें म्हणण्यास हरकत नाहीं. युद्ध करणाऱ्या जेठ्यांस ते Gladiators म्हणत. हत्ती, सिंह वगैरेंचींही युद्धें होत. बडोद्याची 'साठमारी' कोणास माहित नाहीं? इतरांस दुःख देऊन आपण त्यांत मौज करून घेणें हा युद्ध-कालांतील जबरदस्त विकार होय. १३. हत्ती आणि मेंढा यांची झुंज. १४. विशेष. 'अग्र' या शब्दापासून याची उत्पत्ति. १५. या जबरदस्त षोकासाठीं. 'अंतीं' असाही पाठ आहे. १६. धन मिळतें हें ऐकून. १७. इतरांस अजेय्य झालेला जो जेठी तो. 'तो भिडविती' असा अन्य पाठ. १८. हा शब्द 'भेटवी' या शब्दाचा अपभ्रंश असेल काय? भिडू (भिडणारा)=जोडीदार, गडी–हा शब्द सर्वांच्या परिचयाचा आहे. १९. 'सांडिले' असें पाठांतर. २०. बरोबरीला येईना, सामन्यास टिकेना. २१. शरीरसामर्थ्यामध्यें. २२. खालीं पाडले, नाहींसे केले.

ही वार्ता भूमंडळीं । विस्तारली जनमुखें. ॥ ४२ ॥ चार[1] सांगती हस्तनापुरीं, । 'कौतुक विराटाचे नगरीं, । मल्ल झुंजती[2] झुंझारी । त्यांतें राजा तोषवी. ॥४३॥ बल्लव रायाचा[3] रांधवणा[4] । विराटघरीं बळसंपन्ना[5] । त्याचिये तुळणे बळिष्ठ[6] जाणा । पृथ्वीतळीं[7] असेना.' ॥ ४४ ॥ दुर्योधन चित्तीं दुश्चित[8] । बंधुमंत्रियां सावध करित, । 'विराटनगरीं अत्यद्भुत, । दुष्ट वार्ता ऐकिजे[9]. ॥ ४५ ॥ बल्ल-वनामा पाककर्ता । बळें नाटोपे कृतांता, । भीम होईल[10] ऐसा चित्ता । संशय मातें बाधित[11]. ॥ ४६ ॥ वर्ष एक अज्ञातवासू । त्यांत लोटले अर्ध दिवसू[12] । ठाउके न पडती पापपुरुषू । पांडव, वैरी आमुचे. ॥ ४७ ॥ बळिष्ठ [13]जेठी जीमूतीनामा । युक्तीं[14] धाडिजे विराटग्रामा, । तेणें वोळखिल्या भीमा । काज[15] जालें आमचें. ॥ ४८ ॥ नागायुतबळें[16] वरिष्ठ । रगडूं शके भीमाचा कंठ । भिडतां [17]भंगे तरि विराट । धन [18]ओपील अपार. ॥४९॥ करुनी पांडवांच्या प्रतिमा[19] । पायीं बांधोनी, ठेविजे नामा[20]; । ज्या कां देखोनी दृष्टीसि, भीमा ।

---

१. दूत. २. 'युद्ध' शब्दापासून 'झुज' हा शब्द उत्पन्न झाला. झुंझार=युद्ध करणारा, लढ-णारा. ३. विराटराजाचा. ४. रांधपी, स्वयंपाकी. 'रंध्=स्वयंपाक करणें' या शब्दापासून 'रांधणें' हा धातु झाला. ५. यमकासाठीं 'संपन्न' याचें 'संपन्ना' झालें आहे. ६. 'बळिया आन' असा अन्य पाठ. ७. पृथ्वीच्या पाठीवर. ८. दुर्धर काळजी लागलेला, खिन्न. 'दुश्चित चित्त' असाही पाठ आहे. ९. ऐकावी. 'आकर्ण'पासून 'ऐकणें' हा शब्द झाला. 'ऐकिजे' हें कर्मकर्तरि विध्यर्थी रूप. येथें आज्ञार्थही होईल. 'इष्ट वार्ता' असा एका प्रतींत पाठ आहे तो दुर्योधनाच्या दुष्ट बुद्धीला अनुरूपच आहे. १०. असेल. तो भीम आहे, असेंच ठरेल—असा भाव. ११. त्रास देतो, बाधा करितो. 'बांधित' असाही पाठ आहे. आणखी एका पोथींत 'बोधित' असा पाठ आहे. संशय बोधित (बोधितो) म्हणजे संशय सांगतो, संशय येतो. १२. मुळांत चार महिने झाले, असेंच आहे. दुर्योधन मात्र सहा महिने झाले, असें म्हणत आहे. जीमूतमल्लास दुर्योधनानें पाठविलें, असा उल्लेख मूळांत नाहीं. तस्मात् ही कविप्रतिभा होय. प्रसंगही भीमास आवेश आणणारा आहे. १३. पैलवान. १४. युक्तीनें, खुबीनें. 'यत्नें' असा पाठ आहे तोही चांगला आहे. यत्नें=प्रयत्न-पूर्वक, कोणत्याही उपायानें, तो विराटराजाकडे जाण्यास तयार नसल्यास 'येन केन प्रकारेण'—असा भाव. १५. 'आपलें काम झालेंच मग' असा अजूनही म्हणण्याचा प्रघात आहे. १६. दहा हजार हत्तींच्या बळानें श्रेष्ठ. 'नागायुतबळें वलिष्ट । मोडूं शके' असाही पाठ आहे. १७. भीमाचा मोड झाल्यास. १८. बक्षीस देईल. १९. प्रतिमा पायीं बांधणें, चरणीं तोडर मिळविणें—हा शब्दसमूह मुक्तेश्वराच्या काव्यांत ठिकठिकाणीं आढळतोः–(१) आदिपर्व, अध्याय १८।७४, (२) शुकरंभासंवाद, ओवी १६५; (३) हनुमंताख्यान, ओवी ६ व (४) बहिरोबाची, आरती, तिसरें कडवें. ह्या शब्दसमूहाचा अर्थ–शत्रूस दासानुदास बनविणें, पायांनीं तुडविणें, तुच्छ मानणें. प्रतिमा=पुतळे. २०. नांवें घालावीं. 'पायीं बांधिजे रेखोनी मामा । ज्या दृष्टी देखतां भीमा, असाही पाठ आहे.

क्रोध अद्भुत नावरे. ॥ ५० ॥ भिडतां जाणवेल यांतें[१] । वार्ता पावेल आमुतें, । पुढती तेरा वर्षें त्यांतें । अरण्यवासा बोळवूं[२].' ॥ ५१ ॥ ऐसें बोलोनी त्या अवसरा[३] । जीमूती धाडिला विराटनगरा. । भेटोनियां राजेश्वरा । वल्गना करी[४] कुशब्दें. ॥ ५२ ॥ म्हणे[५], 'येथें बल्लवनामा । कोण तो दाखविजे आम्हां, । पायीं असे त्याची प्रतिमा । तो वोळखेल आपुली.' ॥ ५३ ॥ कंक म्हणे, 'रे मूढमती ! । करणी करुनी दाविजे हातीं । मागें[६] न्यून बोलतां, संतीं । शुनकप्राय[७] मानिजे.' ॥ ५४ ॥ 'पराचे[८] दुःखें दुखावलें मन । म्हणोनी कंका ! बोलसी वचन, । बल्लव पावलिया मरण । रूदन करिसी वांटतसे[९].' ॥ ५५ ॥ 'कवणा मरण ? कवणा जय ? । प्राप्त[१०] होतां[११] हाचि समय.' । धर्म बोलतां धनंजय । खुणें[१२] वारी तयातें. ॥ ५६ ॥ 'होईल तेंचि पाहिजे दृष्टीं । व्यर्थ कासया बोलसी गोष्टी ? । कौतुक पाहें, ठेलें[१३] निकटी; । लोकदाटी अत्यंत.' ॥ ५७ ॥ मत्स्यरायें संतुष्ट चित्तें । पाचारिलें बल्लवातें, । पांचहि[१४] पूतळे दावितां त्यातें । क्रोधें कांपे थरथरा. ॥ ५८ ॥ म्हणे 'मी ब्राह्मण बल्लवनामा । तुमचे[१५] संगती सूपकर्मा[१६], । नेणें[१७] जेठियाच्या वर्मा[१७] । कळा[१८] कंठीं लावणें. ॥ ५९ ॥ तथापी तुमचें भक्षिलें

---

१. जीमूताला. २. अरण्यवास स्वीकरण्यासाठीं माघारे आणूं. ही दुर्योधनाची युक्ति कोणा कपटपटूस मानवणार नाही ? 'बोळवूं' हाही उत्तम पाठ आहे. बोळवणें=सत्कारपूर्वक पाठवणी करणें. ३. त्या अवसरा=लागलीच. ४. 'जीमूत' हा अध्याहृत कर्ता. ५. आपण आतां 'ओळखील' असें म्हणूं. 'ओळख' हा शब्द 'उपलक्षण'पासून निघाला. ६. दुसऱ्याच्या परोक्ष. ७. कुत्र्याप्रमाणें. कंकाची ही उक्ति नीतीस अनुसरून नाहीं असें कोण म्हणेल ? 'शून्यकप्राय' (=निरर्थक) व 'श्वानासमान' असे पाठभेद आहेत. ८. 'परदुःखेन दुःखिता विरलाः' हें ध्यानांत ठेऊन जीमूत कंकास टोंचून बोलत आहे. पांडवांचा संशयही त्यास आला आहे. ९. 'करिसी रुदन मज वाटे' असाही पाठ आहे. १०. 'प्राप्त होतांचि हा समय' असाही पाठ आहे. ११. होणारा, होईल असा. (या वेळेस) प्राप्त होणार आहेत, त्यांचा निकाल 'घोडें मैदान जवळच आहे' या न्यायानें लवकरच होईल, हें धर्माच्या बोलण्याचें तात्पर्य आहे. धर्मापेक्षां बृहन्नळेची शांति विशेष प्रशंसनीय आहे. १२. खुणेनें. 'खुणां' असें पाठांतर आहे. १३. येऊन उभें राहिलेलें. 'कौतुक पाहों ठेलों निकटी । लोकदृष्टी–आर्तता.' असाही पाठ आहे. १४. पुतळे पाहिल्याबरोबर भीमास क्रोध आला, यावरून पूर्वी हुबेहुब पुतळे अगर प्रतिमा करीत असत असें मानणें भाग येतें. भीमानें नांवेंही वाचलेलीं दिसत नाहींत. १५. 'तुमचे घरींचा' असा अन्य पाठ. १६. स्वयंपाकी. १७. पाचपेंच मला ठाऊक नाहींत. १८. प्रतिस्पर्ध्याचा गळा दाबून, त्याला कळा लागतील असें करणें–अशा तऱ्हेचे कुस्तीतील पेंच. 'कडोविकडी मी नेणें' असाही पाठ आहे. कडोविकडी=कौशल्य, खुब्या, युक्त्या.

अन्न । यालागीं अंगीकारावें वचन, । आग्रह[1] करितां, महाजन । मूर्ख ऐसें मानिती. ॥ ६० ॥ होतों पांडवांचे सदनीं । त्यांचे पूतळे याचे चरणीं । देखोनी संताप[2] उपजे मनीं । प्रायश्चित्त[3] द्यावया. ॥ ६१ ॥ हेडंब[4], बकासुर, क्रिंमिर[5] । भीमें मारिला[6] जटासुर[7] । त्याचे पंक्ती हा पामर । बैसवीन मी आजी. ॥ ६२ ॥ ईतुकेन[8] पांडवांचें ऋण । कांहीं तरी होईल न्यून[9] । उरलें[10] तुमचे कृपेकरून । तुमचे[11] संगें परिहारूं.[11]' ॥ ६३ ॥ ऐसें बोलोनी महाबळी । मृत्तिका मर्दुनी[12] पाणीयुगळीं[13], । जीमूती धांवे वक्षःस्थळीं । वज्रमुष्टी[14] मारावया. ॥ ६४ ॥ त्याचा टाळुनियां[15] हात । हृदयावरी मारिली लात[16], । पडे, जैसा[17] महापर्वत । शक्रवज्रें[18] ताडितां. ॥ ६५ ॥ तोडोनि पायींचिये माळे[19] । शिरीं खोंविली वंदोनी भाळें[20]. । म्हणे, 'आजी पांचही पुतळे । येचेनि[21] रक्तें अभिषेकूं !

---

१. मी लढत नाहीं—हा हट्टच घेतला तर. २. 'खेद' असाही पाठ आहे. ३. 'प्रायश्चित्त पैं द्यावें' असाही पाठ आहे. ४. 'हेडंब, बक आणि क्रिमिर' असा अन्य पाठ. मुक्तेश्वरकृत आदिपर्व, अध्याय ३७ व ३८ यांत हिडिंब व बकासुर यांच्या कथा आहेत. ५. 'किर्मीर' असा शुद्ध शब्द आहे. ६. 'भीमें मारिलें असुरां । त्यांचे पंक्ती पामरां' असाही पाठ आहे. पामर=नीच. हे पामर म्हणजे जीमूती व त्याचे अनुयायी मल्ल. ७. मुक्तेश्वरकृत वनपर्व, अध्याय २ व १० यांत अनुक्रमें किर्मीर व जटासुर ह्या राक्षसांच्या कथा आहेत. ८. इतुक्यानें, येवढें केलें तर. ही तृतीया थेट संस्कृताप्रमाणें झाली आहे. ९. थोडासा ऋणमुक्त होईन. 'होईन उत्तीर्ण' असाही पाठ आहे. उत्तीर्ण=उतरून पार गेलेला, कार्यांतून पार पडलेला. १०. बाकीचें कर्ज, न फिटलेलें. 'उरल्या' असें पाठांतर. उरल्या=मी जीवंत राहिलों तर. ११. तुमच्याकडे राहून कर्ज खंडूं, कर्जाची फेड करूं. परिहरण=निरसन, खंडन. 'तुमचिये कृपे परिहारूं' असाही पाठ आहे. १२. 'मर्दिली' असा अन्य पाठ. १३. दोन्ही हातांनीं. कुस्तीला आरंभ करितांना हातांना माती लावण्याचा प्रघात आहे. १४. वज्रासारखी मूठ वळून ती उरावर मारण्यास. या खेळास इंग्रजींत Boxing हें नांव आहे. १५. चुकावून. 'ताडुनियां' असें पाठांतर. १६. 'लत्ते'पासून 'लात' हें रूप झालें. हल्लीं आपण 'लाथ' असें म्हणतो. १७. 'पडे मग जैसा पर्वत' असाही पाठ आहे. १८. इंद्राच्या वज्रानें. [पूर्वी पर्वतांना पंख असल्यामुळें ते वारंवार एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जात, यामुळें देव, मुनि व इतर लोक यांस त्यांच्या पतनभयामुळें सदा चिंता वाटत असे व केव्हां केव्हां त्रासही होत असे. म्हणून क्रोधाविष्ट होऊन इंद्रानें त्यांचे आपल्या वज्रानें पंख तोडिले—अशी रामायणांत कथा आहे. (सुंदरकांड, सर्ग १ श्लोक ११५—११७ पहा). १९. पुतळे बांधिलेली माळा. (मागें ओवी ५० पहा). 'पांडवांचे माळे' असाही पाठ आहे. २०. कपाळानें, शिरीं वंदून. 'मग सोडोनी पायींचे पुतळे । मस्तकीं खोंविले वंदुनी भाळें' असाही पाठ आहे. २१. याच्याच. 'येचि रक्तें' असें पाठांतर.

॥६६॥ मुष्टी मारितां परस्परें। दणाणिती दिगंतरें, । प्रचंड [1]लत्तांचीये प्रहारें। दोघे [2]हांवे न टेंळती. ॥ ६७ ॥ [3]मल्लविद्येचिये [4]कडोविकडी । जीमूती दाविता [5]पडेपाडीं । भीम आंगाचिया [6]प्रौढीं । त्याहुनी ताडी [7]आगळें. ॥ ६८ ॥ उचलूं जंव पाहे भीमातें । तंव तो नुचलेचि तयातें. । झुगारुनी [8]अंबरातें । भीम [9]टाकी भूतळीं. ॥ ६९ ॥ [10]सत्तर वेळा टाकिला भूमी । देव कौतुक पाहति [11]व्योमीं, । 'बाप रे भीमा!' म्हणोनि कुसुमीं । वर्षाव करिती [12]विनोदें. ॥ ७० ॥ तीक्ष्ण मारिती कोंपर । जानू, गुढगे अतिकठोर, । दृष्टीं देखोनियां युधिष्ठिर । [13]चोजें मानी मानसें. ॥ ७१ ॥ म्हणे, 'भक्षिलें तुमचें [14]लवण । यालागीं [15]तंडावला [16]अंगवणें । आणीक होता तरी मरण । तत्काळिक पावता. ॥ ७२ ॥ रागें पीळिती [17]कंठनाळें । पादतळें, कटिमंडळें, । कुशी ताडितां [18]अस्थिजाळें । कडकडाटें मोडिती. ॥ ७३ ॥ सन्मुख मारिती [19]हुमणीया । [20]दुर्जनदंतें जाले कणीया; । [21]पर्वतेंमस्तकींच्या पाणीया- । सारिखें [22]अशुद्ध [23]खळबळी. ॥ ७४ ॥ 'कांडणें, कु-टणें, [24]परिघाटणें, । पाटा पसरोनि वरि लाटणें, । [25]पाकक्रियेचीं लक्षणें । तुज [26]दावूं

---

१. लाथांच्या. कर्णसुखासाठीं 'लत्तांचिये' अशी योजना आहे. २. हाव=ईर्षा. ते दोघे एक-मेकांवर उलट सुलट पेंच करण्यांत टाळाटाळी करीत नव्हते—असा भाव. टळणें=चुकणें. 'न सरती' व 'न ढळती' असे पाठभेद आहेत. ३. 'मल्लयुद्धाचिये' असाही पाठ आहे. ४. भयोत्पादक पेंच, कुस्तींतील कौशल्य. (कडोविकडी=कड्यांत कड्या, त्यांपासून झालेली गुंतागुत—असा मूळ अर्थ). ५. मोठ्या युक्तीनें. पडिपाड=सामर्थ्य, पराक्रम. 'पडे, पाडी' असा पाठ आहे तो घेतल्यास चांगलेंच, तथापि मूळांतील स्वारस्य नाहीसें होतें. कुस्तीचे पाचपेंच जीमूतानें दाखविले ते प्राण घेणारेच होते. पण भीमानें आपल्या शारीरिक बळानेंच जीमूताचे पाचपेंच व्यर्थत्वास नेले, असा भाव. ६. प्रौढपणानें, प्रतिष्ठेनें, सामर्थ्यानें. ७. जास्ती. ८. गगनापर्यंत. ९. जीमूतास टाकलें. १०. मुळांत 'शंभर वेळां' असें आहे (अध्याय १३ श्लोक ३६). मुक्तेश्वरानें 'सत्तर वेळा' असें कां म्हटलें नकळे. 'सतरा वेळा' व 'सत्तरी वेळा' अशी पाठांतरें आढळतात. ११. आकाशांत, गगनांत. १२.विशेष आनंदानें, सुखानें, हर्षानें. १३.कौतुक. संस्कृत 'चोद्य'(=आश्चर्य) ह्या शब्दापासून 'चोज' हा शब्द झाला. १४. मीठ. 'अन्न' असाही पाठ आहे. १५. टिकला, पार पडला; जय पावला. तड=तट म्हणजे किनारा. यावरून किनाऱ्यास पोंचणें—असा अर्थ. 'उत्तीर्ण' ह्या शब्दाचाही असाच अर्थ आहे. १६. शारीरिक सामर्थ्यानें. १७. गळे. १८. बरगड्यांचीं हाडें. १९. ढुशा. २०. दुष्टाच्या दांतांच्या कण्या झाल्या. पुढील **उपमा** किती सरस आहे! 'तेणें चांचरी जाऊनियां' असाही पाठ आहे. २१. 'श्रवत(?)मस्तकींच्या' असें पाठांतर. २२. रक्त. २३. 'खळाळी' असें पाठांतर. २४. सभोंवार फिरविणें, ढवळणें, घाटणें. २५. ही भीमोक्ति आहे. पाकनिष्पत्तीकडे हल्लीं योजना असल्यामुळें, स्वारी सूपशास्त्रांतील क्रियेसच प्रारंभ करणार आहे. २६. 'दावणें' असें पाठांतर.

जेठीया !' ॥ ७५ ॥ हस्तघातीं पादघातीं । अ[1]नुकार दावी पाहूनि क्षि[2]ती, । 'ऐसें [3]उचलिजे' म्हणोनि हातीं । देह टाकी [4]पालथें. ॥ ७६ ॥ नचले जेठीयाचें बळ । म्हणे, 'हा होय कुंतीचाबाळ, । [5]गात्रें झालीं सर्व [6]विर्कळ । कोण सांगेल [7]कौरवां ?' ॥ ७७ ॥ मग उचलोनि [8]वाहिला शिरीं । [9]सहस्र फेरे चक्राकारीं । देवोनि, टाकिला धरित्रीवरी[10] । पक्व फळासारिखा ! ॥ ७८ ॥ 'जैसें फोडिजे [11]नारिकेळ । तैसें [12]पायें ताडिलें मौळें[13] । मूर्छा [14]दाटोनि प्रबळ । पंचप्राणा [15]मूकला. ॥ ७९ ॥ पुतळे बांधिले [16]जये पायीं । तो चरण छेदिला हस्तें[17]घायीं, । [18]वृक्षशाखा टाकिजे [19]भुयीं । तैसा [20]खंडोनि टाकिला. ॥ ८० ॥ जीमूती मारिला विराटनगरीं, । मल्ल पळाले दिगंतरीं, । वार्ता पावली हस्तनापुरीं । कौरवसभे [21]जनमुखें. ॥८१॥ जाणविती कौरवां समस्तां, 'देखा । बल्लव भीमाचिये सारिखा, । जीमूती धाडिला परलोका । [22]ठाव तुम्हांतें पाहावया.' ॥ ८२ ॥ कौरव म्हणती, 'कैसें काय ? । बल्लव भीम होय कीं न होय ?' । शकुनी म्हणे, 'नि[23]जनिश्चय ।

---

१. अनुकरण, नक्कल. 'अंधकार दाटी पाडिती क्षिती' व 'अनुकार दाऊनी पाडिती क्षिती' असे पाठभेद आहेत. २. पृथ्वी प्रतिध्वनी करावयास लागली. ३. 'उलथिजे' असाही पाठ आहे. ४. 'ऐसी पोळी उलथिजे हातीं । म्हणोनि टाकी पालथें' असाही पाठ आहे. ५. इंद्रियें व अवयव हीं थकलीं. गात्र=(१) देह, (२) अवयव. ६. 'व्याकुळ' असें पाठांतर. ७. ह्या भाषणास मुळांत आधार नाहीं. (मागें ओवी ४८ व तीवरील टीपा पहा). ८. टोक्यावर घेतला. 'पालथा' असें पाठांतर. ९. 'शंभर वेळां गरगर फिरवून भीमानें जीमूतीस भूमीवर आपटिलें' असें मुळांत आहे (अध्याय १३ श्लोक ३६). मुक्तेश्वरानें भीमाचें बलसामर्थ्य दाखविण्यासाठीं हें अत्युक्तिपूर्ण वर्णन केलें आहे. पराचा कावळा होतो तो असा. १०. 'धरेवरी' व 'पृथ्वीवरी' अशीं पाठांतरें आढळतात. ११. नारळ. 'नारेळ' असें पाठांतर. १२. पायानें. जीमूतीच्या डोक्यावर भीमानें लाथ मारली—असा अर्थ. १३. मस्तक. 'म्हणोनी पायीं ताडिला मौळ' असें पाठांतर. १४. येऊन. 'मूर्च्छा दाटणें' हा प्रयोग ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. दाटून=दाट होऊन. 'दाटली' असें पाठांतर. १५. मूकला=मुकला=मुक्त झाला, मेला. १६. ज्या. (मागें ओव्या ५० व ५३ पहा). 'जिये' असें पाठांतर. १७. 'तोडिला हस्तें दोहीं' असा अन्य पाठ आहे. १८. झाडाची फांदी. येथें **उपमा** आहे. १९. भूमीवर, जमिनीवर. २०. खंडें (भाग) करून. २१. लोकांच्या तोंडून. 'सन्मुख' असें पाठांतर. २२. स्थान, राहण्यास जागा. तुम्हांस राहायाला जागा पाहण्यासाठीं जीमूती पुढें पाठविला—हें सांगण्याचा भाव. २३. स्वतःचा सिद्धांत, माझें ठाम मत.

पांडव जाणा ते ठायीं. ॥ ८३ ॥ पुढां [१]कळों जाईल सहजें, । आतां उतावेळ न होइजे, । [२]पांडवबळाचेनि काजें । ऐसींच पुढां घडतील. ॥ ८४ ॥ [३]दुर्योधन, दुःशासन, । शाल्व, रुक्मिया, कीचक जाण, । मगधराजा, [४]जीमूतवाहन, । बळ [५]समान सातांचें. ॥ ८५ ॥ भीमसेन [६]करूनि भिन्न । जीमूत[७]वाहना मारील कोण ? । [८]आतां स्वस्थ करूनियां मन । [९]बुद्धीनें कार्य साधावें.' ॥८६॥ विदुर म्हणे, 'हे कल्पना । व्यर्थ, [१०]वांउगी विवंचना, । ईश्वरभांडारींचिये [११]रत्ना । गणित कोण्हा न करवे. ॥ ८७ ॥ [१२]अनंत ईश्वराचे वेष, । धरातळीं सिद्ध पुरुष । [१३]सामान्य दिसती, परि प्रकाशें[१४] । लोकत्रयीं [१५]न समाये. ॥ ८८ ॥ बलवंत, प्रतापवंत, । यशवंत, कीर्तिवंत[१६], । ईश्वराचे अवतार मूर्तिमंत । स्थळोस्थळीं वसताती. ॥ ८९ ॥ पायीं बांधोनि [१७]पांडवांतें । [१८]श्लाघ्यता मिरवूं गेला तेथें । [१९]अहंकार न साहे ईश्वरातें । तेणें शिक्षा लाविली. ॥ ९० ॥ स्तंभ [२०]देखोनि अंधकारीं । तस्कर म्हणूनि बोभाट करी ! । तंव [२१]व्यसन घडे, तें पांडवशिरीं । निमित्त तुम्ही ठेवितेंसां[२१]. ॥ ९१ ॥ भीमा ऐसे बळसमर्थू । ईश्वरसृष्टींत असंख्यातू, । देवें

---

१. कळून येईल, कळण्यांत येईल. हा कर्मकर्तरिप्रयोग आहे. २. पांडवांच्या बळाच्या योगानें, अशींच कार्जे (चमत्कार) पुढें होतील. 'पांडव-बळाचीं' असें पाठांतर. ३. 'दुर्योधन दुःशासना । जयद्रथ आणि कर्णा । म्हणे, 'रे ! काय धरूनियां मौना । बसलेती स्वस्थानीं' असाही पाठ आहे. ४. प्रस्तुत कथेचा उपनायक जीमूती. या सातांपैकीं पांचांस भीमानेंच मारिलें. ५. 'बळसंपन्न सातही' असें पाठांतर. ६. एकीकडे काढून, सोडून, वगळून. ७. 'जीमूतीतें' असें पाठांतर. ८. 'आतां धरूनियां मौन' असाही पाठ आहे. ९. बुद्धीच्या बळावर, शहाणपणानें. १०. वावगी, व्यर्थ. 'वाव(वायु)' पासून हा शब्द झाला. 'तव विदुर म्हणे, 'रे अज्ञाना । व्यर्थ वाढवा विवंचना ।' असाही पाठ आहे. ११. 'बहुरत्ना वसुंधरा' या न्यायानें. १२. 'असंख्य ईश्वराचे अंश' असाही पाठ आहे. १३. 'साम्योन' असाही पाठ आहे. साम्य+ऊन=साम्येंकरून उणे. १४. 'समान दिसती, परम प्रकाश' असाही पाठ आहे. १५. मावत नाहीं. १६. 'उदार, धीर, सत्ववंत' असाही पाठ आहे. १७. पांडवांच्या प्रतिमांस. लक्षणेनें 'पांडवांतें' असें म्हटलें आहे. १८. मोठेपणा, ऐट. १९. गर्व, घमेंड. ग्रीक व रोमन लोकांत अशीच कल्पना होती. मनुष्याची अतिशय भरभराट झाली म्हणजे गर्व व्हावयाचा आणि गर्वाचें घर खालीं जावयाचें अशी त्यांची समजूत होती. हा ईश्वरी प्रकोप टाळण्यासाठीं ते लोक आपल्यास मुद्दाम दुखापत करून घेत असत. २०. खांबाला पाहून चोर म्हणून ओरडणें हें जसें मूर्खत्वलक्षण, तसेंच भलत्यांना पांडव म्हणणें हें होय. २१. संकट. जें संकट तुमच्यावर येईल त्याची जबाबदारी तुम्ही निष्कारण पांडवांवर लादीत आहां—असा भाव. 'ठेवितां' असें पाठांतर.

प्रेरूनि [1]अगाधकृत्यू । स्वल्पाहातीं घेतसे[2]. ॥ ९२ ॥ प्रेरूनियां [3]अरण्यचरें । रावण [4]त्रासिला जगदीश्वरें, । एका ब्राह्मणाचेनी [5]कुमरें । [6]कार्तवीर्य दंडिला. ॥ ९३ ॥ [7]एकला एक [8]प्लवंगम । तेणें लंका केली भस्म । ऐसा ईश्वरमहिमा [9]परम । कोण्हा न कळे वीर हो ! ॥ ९४ ॥ घेऊनी बल्लवाचें नाम । जीमूती मारिला हो ! अधम । पांडवांचे अंगीं हा [10]कर्दम । कल्पनेचा न लावणें.' ॥९५॥ यापरी कौरवांचीं चित्तें । [11]पशुसीं वळोनि [12]विचारहस्तें । विदुरें [13]विज्ञानपंडितें । स्वस्थ [14]गोठणीं बैसविलीं. ॥ ९६ ॥ [15]विराट तोषोनी अंतरीं । [16]क्षणोक्षणीं आश्चर्य करी । म्हणे, '[17]पुरूष पृथ्वीवरी । [18]कोण कैसे नेणवे ?' ॥ ९७ ॥ अवलोकोनी भीमसेन । राजा [19]वाढवी बहुत मान, । म्हणे, 'आमुतें सांभाळून । स्वस्थचित्तें असावें.' ॥ ९८ ॥ पुढें कीचकाचें हनन । स्वहस्तें करील भीमसेन । तें अद्भुत [20]निरोपण । अमृतप्राय, परिसावें. ॥ ९९ ॥ मुक्तेश्वरकवीची वाणी । नवरसरसें [21]सुगरणी । तृप्त करी [22]सुखभोजनीं । श्रवणद्वारें संतातें[23]. ॥ १०० ॥

---

१. मोठमोठालीं कृत्यें. 'तृणेन कार्यं भवतीश्वराणाम्' ही कविवर्योक्ति प्रसिद्धच आहे. २. 'करवित' असें पाठांतर. ३. रानांत फिरणारी माकडें. ४. त्रस्त केला. 'त्रासविला' असें प्रयोजकरूप समजावें. ५. परशुरामानें. नि=खरोखरच. ६. ह्याला हजार हात असल्यामुळें ह्याचें सहस्रार्जुन असेंही नांव होतें. परशुरामाचा पिता जमदग्नि याच्याजवळ एक कामधेनु होती. एकदां कार्तवीर्य राजा जमदग्नीच्या आश्रमांत गेला असतां ऋषीनें राजाचा योग्य आदरसत्कार करून त्याचें उत्तम आतिथ्य केलें. परंतु राजानें दांडगाईनें त्याची कामधेनु ओढून नेली. हें वृत्त परशुरामास कळतांच त्यानें सहस्रार्जुनाचे सहस्र हस्त तोडून त्याचा वध केला—अशी कथा आहे. हा सर्व देवांसही भारी झाला होता, यामुळें देवांच्या प्रेरणेनेंच अशी घटना घडून आली—असा विदुराच्या बोलण्याचा मतलब. ७. 'एकुलता एक' असें आपण म्हणतों. 'एकटा' हें अभियुक्त रूप आहे. ८. उड्या मारित चालणारा, वानर (मारुति). ९. अगाध. श्रेष्ठ. 'पूर्ण' असें पाठांतर. १०. मळ. बल्लव हें नांव घेऊन जीमूतीला मारण्याचें अपकृत्य भीमानें केलें असेल, अशी कल्पनाही मनांत येऊं देऊं नका. येथें 'कंदर्प' असा पाठ आहे, पण तो लेखकप्रमाद आहे, हें उघडच आहे. ११. पशूंप्रमाणें. येथील **उपमा** हृदयंगम आहे. 'पशूवें' असें पाठांतर. १२. विचार हाच कोणी हात. येथें **रूपक** आहे. वळून=वठणीस आणून, माणसाळवून. १३. व्यवहारचतुर पंडितानें. १४. गोस्थान (गोशाळा, गोठा) त्यामध्यें. १५. 'येरीकडे विराट अंतरीं' असाही पाठ आहे. १६. 'क्षणक्षणा', 'क्षणक्षणीं' अशीं पाठांतरें. १७. मनुष्यरत्नें. १८. 'कोण कैसा' असें पाठांतर. १९. मान वाढविणें=योग्यतेस चढविणें. २०. कथानक. २१. चतुर, कार्यक्षम. 'सुगृहिणी' पासून 'सुगरण' 'सुग्रण' हे शब्द निघाले. २२. 'सुख—भाजनीं' असें पाठांतर. सुख हेंच भाजन (पात्र). **रूपक** आहे. २३. 'संतोषवी' असें पाठांतर.

[1]इति श्रीविराटपर्व भारत । [2]कथारूपें परमामृत । भूतळीं पातलें, संत । अत्यादरें परिसोत. ॥ १०१ ॥

॥ इति श्रीविराटपर्वणि जीमूतवधो नाम द्वितीयोऽध्यायः ॥

---

## अध्याय तिसरा.[3]

सुदेष्णेचे संनिधानीं । दुःख तें सुख मानूनि मनीं । वर्तत असतां याज्ञसेनी । विपरीत कांहीं [4]वर्तलें. ॥ १ ॥ विराटाचा सेनापती । कीचकनामा पापमूर्ती । सुदेष्णेचा बंधू कुमती । [5]भगिनीगृहा पातला. ॥ २ ॥ कृष्णा अवलोकितां नयनीं । हृदय भेदिलें [6]पंचबाणीं, । म्हणे, 'ऐसी लावण्यखाणी । तुज कोठूनि लाधली ?' ॥ ३ ॥ अयोग्यस्थळीं [7]कल्पलतिका । [8]बदरीनिकट कर्दळिका[9] । देखोनी म्हैसा मारी थडका । माजोनियां ज्यापरी. ॥ ४ ॥ अमृतवल्ली फळली[10] फळीं । वनांत वाढली[11] निराळी[12] । पांथीकें[13] क्षुधेचिया काळीं । काष्टिका[14] तांडिती[15] निर्धारें. ॥ ५ ॥ तेंवी सुंदर[16] सुगुण[16] वनिता । आप्तावेगळी परगृहीं वसतां[17] । कामिकमेळ[18] [19]भोंवे भोंवता । हें आश्चर्य तंव नव्हे. ॥ ६ ॥

---

१. याप्रमाणें. व्याख्यान संपलें म्हणजे 'इति' शब्दाचा उपयोग करितात. 'अथ' याचा प्रारंभीं उपयोग होतो. २. 'कथामृतें परमामृत । भूतळा पातले संत । सज्जनातें निववावया' असाही पाठ आहे. ३. येथून 'कीचकवधपर्व' सुरू होतें. त्याचे अध्याय १४–२४ पर्यंत म्हणजे अकरा आहेत. ४. घडलें. 'मांडिलें' असाही पाठ आहे. त्याचा अर्थ–कांहीं विपरीत (अशुभ, अमंगळ) उत्पन्न होण्यास प्रारंभ झाला. 'मांडिलें' याचा 'दुर्दैवानें' कर्ता घ्यावा, किंवा कर्मकर्तरिप्रयोग समजावा. ५. अज्ञातवासाचे दहा महिने झाल्यावर हा प्रसंग ओढवला. (मूळ अध्याय १४ श्लोक १ पहा). ६. मदनानें, पंचशरानें. 'कंदर्पो दर्पकोऽनंगः कामः पंचशरः स्मृतः' इत्यमरः (अरविंद, अशोक, आम्र, मोगरा, नीलकमल हे पांच बाण मदनाचे आहेत.) 'कामबाणीं' असा पाठभेद. ७. कल्पवल्ली. ८. बोरीच्या झाडाजवळ. 'वृंदारीनिकट' असा पाठभेद आहे. वृंदा=तुळस; वृंदारक=देव, पूज्य. येथें अपपाठ असावा, असें दिसतें. ९. कदलिका, केळ. येथील **दृष्टांत** अत्यंत समर्पक आहेत. १०. 'फळोनि फळीं' असें पाठांतर. ११. 'वाढिन्नली' असें पाठांतर. १२. वेगळी, स्वतंत्र, अलग, एका बाजूस. १३. प्रवासी, वाटसरू. १४. काठीनें. 'यष्टिका' असा अन्य पाठ. यष्टी=काठी, छडी. यष्टिका=लहानशी छडी. १५. 'ताडी भलताचि' असें पाठांतर. १६. गुणांनीं सुंदर. १७. 'असतां' असें पाठांतर. १८. कामी जनांची टोळी. १९. हिंडे.

भगिनीलागीं बोले वचनीं, । ‘ये[1] प्रमदेच्या[2] अवलोकनीं । विरहताप उदेला[3] मनीं । तो जाळील[4] देहातें. ॥ ७ ॥ ईचें जालें अवलोकन । तेणें नेत्रद्वारा मंदिरापान[5] । चढलें, म्हणोनि आठवण । शरीराची विसरलों. ॥ ८ ॥ स्मरें विस्मरणाचे जीवनीं[6] । लज्जा[7], मर्यादा, बुडविल्या[8] दोनी । मृत्युभयाचें वस्त्र झणी[9], । फिटोनी पडलें केंवि तें ? ॥ ९ ॥ अद्भुत माजला विरहज्वर[10] । तोची भासे भूतसंचार । हृदयकाळिजीं खडतर । कंदर्पसर्प[11] झोंबला[12]. ॥ १० ॥ ईचिया अधरामृतपानें । पीनपयोधरआलिंगनें । शरीरभोगाचिया भोजनें । भाउबीज[13] मज करीं.’ ॥ ११ ॥ येरी[14] म्हणे, ‘हे सैरंध्री । सांप्रत असे माझिये घरीं, । भ्रतारवंती सदाचारी । पतिव्रता देखिजे. ॥ १२ ॥ नेमा[15] न चळे माझिया

---

१. ह्या काम उत्पन्न करणाऱ्या स्त्रीचें अवलोकन झाल्याबरोबर. ‘इये’ असें पाठांतर. २. प्रमदा= जिला प्रमद (हर्ष) असतो ती, उत्तम स्त्री. ‘प्रमदः संमदे मत्ते स्त्रियामुत्तमयोषिति’ इति मेदिनी. ३. उदय पावला. नामांस क्रियापदें करण्याची **मु**क्तेश्वर कवीस भारी हौस! ‘उपजला’ असें पाठांतर. ४. ‘जाकळीत’ असा अन्य पाठ. जाकळणें=कळवळणें, मोह पावणें. ५. येथें **अतिशयोक्ति** व **असंगति** अलंकार आहेत. ‘तें नेत्रद्वारें’ असें पाठांतर. ६. पाण्यामध्यें. कीचक मर्यादा विसरला आणि कवीस त्या विस्मरणाची मीमांसा करावी लागली ! काय कामपिशाचाचा भयंकर झपाटा हा ! ७. ‘कामातुराणां न भयं न लज्जा’ हा अनुभवच आहे. ८. ‘बुडाल्या’ असें पाठांतर. ९. पटकन्. ‘नृपभयाचें वस्त्र जीवनीं । फिटोनि पडलें केउतें ! ।’ व ‘मृत्युभावाचें वस्त्र जनीं’ असे पाठभेद आहेत. १०. ‘अविचार’ असा अन्य पाठ. ११. मदनरूपी सर्प. **रूपका**लंकार आहे. १२. चावला; (पक्षीं) आलिंगिता झाला. झोंबणें=तीव्र वेदना होणें; टसणें; मिठी मारणें; तुटून पडणें. झोंबणें=टसणें ह्या अर्थी **मो**रोपंतांनीं ह्या शब्दाचा उपयोग केला आहे:—शर ओढितांचि निद्राभंगें कीं ‘झोंबला’ करीं साप. । (कर्णपर्व, अध्याय ६ गीति ५६.) १३. कार्तिक शुद्ध द्वितीयेला वहीण भावास आपल्या घरी बोलावून त्याचा सन्मान करिते व भाऊ तीस द्रव्यवस्त्रादि ओवाळणी घालितो. येथें कीचक इतका बेताल झालेला दिसतो, कीं ओवाळणी भावानें बहिणीला घालावयाची असते किंवा बहिणीनें भावाला घालायची असते, ह्या गोष्टीचेंही त्याला भान नाहीं ! आपल्या भावाचें भाषण ऐकून सुदेष्णेला त्याच्याविषयीं काय वाटलें असेल ? कदाचित् भाऊरायाचें भाषण तिला बरेंही वाटलें असेल ! (मागें अध्याय २ ओव्या २६–२७ पहा). १४. ही सुदेष्णा. येर, येरू, येरी, येरें—अशीं ह्या शब्दाचीं रूपें आहेत. ह्या शब्दाचे अर्थः— दुसरा, तो एक, उल्लेखित व्यक्ति, अन्य, इतर—असे आहेत. १५. मी सांगितलें तरी ती आपल्या व्रतापासून ढळणार नाहीं, माझ्या सांगण्यावरून ती शीलभ्रष्ट होणार नाहीं—असा भाव. ‘न मानी माजिये वचनें । तुवां बाहिजे धनें दानें’ असाही पाठ आहे.

वचनें,[1] । तुवां बोधिंजे धनदानें, । [2]अंगिकारिलें समाधानें । तरी इच्छा पुरवीं आपुली.' ॥ १३ ॥ राजांगनेच्या [3]निगूढागारीं । पांचाळीतें [4]प्रबोध करी, । म्हणे, 'सुंदरे ! [5]परमंदिरीं । कां भोगिसी [6]अवदसा ? ॥ १४ ॥ पाहातां तुजे अंगिंचिये चिन्ह । [7]चक्रवर्तीचें अंगनारत्न, । तुझिया सौंदर्या सीमा न । [8]शक्ररमणी कुरूपा. ॥१५॥ [9]उर्वशी, [10]सुलोचना, [11]रती, । [12]दमयंती, [13]माधवी, [14]तपती, । यांचें सौंदर्य चातुर्य त्रीजगतीं । वाखाणिती जाणतें.[15] ॥१६॥ अंगना माझीया वरिष्ठ[16] । ऐसें बोलती श्रेष्ठ श्रेष्ठ, । परी त्या [17]दीपिका होती [18]पष्ट । तुज [19]सूर्यप्रभे सन्मुखा. ॥ १७ ॥ [20]तेंवी भूपाळांचिया भाजा । [21]तूतें देखोनी पावती लज्जा, । [22]दैवें संग झालीया माजा । मग उपमाचि असेना. ॥ १८ ॥ आतां विचारूनि स्वार्थ । मातें करीं प्राणनाथ, । हेममंदिरीं [23]भोगभरित । [24]रत्नमंचकीं पहुडें कां. ॥ १९ ॥ [25]महीमौल्यें दिव्य रत्नें । [26]लेववीन बहुभूषणें । [27]मुक्तपल्लवीं [28]तगटी वसनें । परिधान

---

१. समजूत कर. 'द्रव्येण सर्वे वशाः' ह्या न्यायानें प्रयत्न करून पहा–असा भाव. २. अनुमोदन मिळालें तर. कांचनाचा प्रभाव कांतिपेक्षांही मोठा आहे असें सुदेष्णेचेंही मत होतें, हें तिच्या भाषणावरून स्पष्टच होत आहे. ३. गुप्तगृहामध्यें. ४. उपदेश. ५. दुसऱ्याचे घरीं राहून असे हाल कां भोगतेस ? पर=उत्कृष्ट असाही अर्थ होईल. ६. 'अवदशा' ह्या शब्दाचें अपभ्रष्टरूप 'अवदसा'–असें झालें आहे. ७. सार्वभौम राजाची पट्टराणी व्हावयास योग्य असें हें (तूं) स्त्रीरत्न आहेस. ८. शची. येथें **व्यतिरेक** अलंकार आहे. 'तुझीया सौंदर्यासमान । शक्ररमणी असेना' असाही पाठ आहे. ९. अप्सराविशेष. १०. रावणपुत्र इंद्रजिताची पत्नी. ११. मदनाची पत्नी. १२. नलराजाची पत्नी (मुक्तेश्वरकृत वनपर्व, अध्याय ६–८ पहा). १३. रुक्मिणी. १४. तपती ही सूर्यकन्या संवरणनामक राजास दिली होती. १५. 'जाणें तें' असाही पाठ आहे. १६. श्रेष्ठ; रूप, गुण, कुलशीलादि गुणांत श्रेष्ठ. 'ऐसिया अंगना वरिष्ट । सुंदरा वाखाणिती श्रेष्ठ । परि त्या दीपिका होती काष्ठ । सूर्यप्रभे सन्मुख ॥' असाही पाठ आहे. १७. दिवट्या, मशाली. येथें **रूपक** असून **दृष्टांता**चाही भास होतो. १८. पष्ट=स्पष्ट, निश्चयानें. 'कष्ट' व 'भ्रष्ट' असे पाठभेद आहेत. 'पष्ट' व 'पस्ट' हीं रूपें लेखकाच्या अज्ञानाचीं दर्शक आहेत. १९. **अतिशयोक्तिमूलक दृष्टांत** आहे. २०. 'इतर' असें पाठांतर. २१. 'पाहतां' असा अन्य पाठ. २२. माझ्याशीं रत झालीस, तर सुवर्णाचा सुगंधाशीं संयोग होऊन तुझी योग्यता निरुपम होईल. तुला योग्य पति नाहीं म्हणून तुला भूपालभार्या लाजतात इतकेंच. तुझा माझा योग झाला तर आपल्याला भुवनत्रयांत जोडाच राहणार नाहीं. २३. नानाप्रकारच्या उपभोग्य वस्तूंनीं भरलेला. 'भोग करित' असाही पाठ आहे. २४. पहुडणें=निजणें, झोंपणें. २५. पृथ्वीच्या मोलाचीं. २६. अंगावर घालीन. २७. मोत्यांची झालर आहे, पदरास मोतीं आहेत, अशीं तगटें (भरजरी) वस्त्रें. 'मुक्ताफळीं' असाही पाठ आहे २८. भरजरी वस्त्रें. 'मुक्तें पवित्र कटिवसनें' असाही पाठ आहे.

करीं डोळसे[1] ! ॥ २० ॥ घृतपाचित[2] पिशितान्नें[3] । तांबूल[4], आसन, चंदन, सुमनें । चित्रविचित्र सुरतासनें[5] । अंगसंगें सुख भोगीं. ॥ २१ ॥ तुज[6] ऐसिये ऐश्वर्यनिधी[7] । लागली दरिद्रक्षयव्याधी[8] । आतां मत्संग दिव्य औषधी । सेवूनि होईं निर्जरा[9]. ॥ २२ ॥ आतां प्रसन्न करुनियां मन । आवडी[10] देईं आलिंगन, । कीचकजाया हें अभिधान । आजिपासुनी मिरवीं कां. ॥ २३ ॥ माझिया घरींच्या कुळनायका । त्या तुजिया करीन परिचारिका[11] । मी ही आज्ञेच्या[12] सेवकां- । माजी ऐसें मानावें[13].' ॥ २४ ॥ पाय स्पर्शोनीया हस्तें । म्हणे, 'करुणा[14] करीं मातें, । श्रेय[15] घेईं, मरतयातें । वांचविल्या जें[16] असे.' ॥ २५ ॥ ऐकोनी पापिष्टाची वाणी । द्रौपदी बोटें घाली[17] कानीं, । म्हणे, 'त्राहें[18] त्राहें चक्रपाणी ! । संकष्ट[19] हरीं समर्था !' ॥ २६ ॥ मग म्हणे, 'रे ! मंदमती ! । पंच गं-

---

१. मृगनयने ! डोळे काय ते तुलाच, बाकीच्या स्त्रिया जणुं काय नयनहीन होत ! २. तुपांत तळलेलीं. ३. मांसान्नें. पिशित=मांस. 'पीसीतान्नें' असा पाठ आहे, तो स्वीकारिल्यास 'दळलेल्या (धान्यांची) अन्नें' असा अर्थ करावा. पिसणें (हिंदी—पिसना)=दळणें. 'पिसितें अन्नें' असाही पाठ आहे. ४. 'तांबुलसह चंदनें सुमनें' व 'अशन तांबुल सुमन चंदनें' असे पाठभेद आहेत. अशन=खाणें, अन्न; आसन=बैठक, बसण्याची वस्तु. ५. कामशास्त्रविषयक ग्रंथांत वर्णिलेले बंध. सुरताचे उत्तानक, तिर्यग्, उत्थित, स्थित आणि आनतक असे पांच भेद मानिले आहेत, आणि या भेदांचे अनेक प्रभेद आहेत. त्यांसच बंध अथवा आसन असें म्हणतात. नागरबंध, व्योमपादबंध, सैन्यबंध, जृंभितबंध, वीणकबंध असे अनेक बंध आहेत. हे बंध (आसनें) कांहींच्या मताप्रमाणें १६ आहेत व कित्येक तर हे ८४ आहेत, असें म्हणतात. यांचें सविस्तर निरूपण रतिरहस्य, अनंगरंग, रतिमंजरी इत्यादि ग्रंथांत जिज्ञासु वाचकांनीं पहावें. ६. 'ऐसिये तुज ऐश्वर्यनिधी । लागला दारिद्र्यक्षय—व्याधी । आतां मत्संगी दिव्यौषधी । घेऊनि होईं आरोग्य ॥' असाही पाठ आहे. ७. तुझ्यासारखी जी सौंदर्यखाणी, शृंगारसुंदरी, तिला. ८. दारिद्र्यरूपी क्षयरोग. ९. वृद्धावस्था येणार नाहीं अशी. येथील **रूपक** मनोहर आहे. १०. आवडीनें. ११. दासी. १२. 'मी ही असेंचि या सेवकां—' असें पाठांतर. १३. येथपर्यंत कीचकानें द्रौपदीची स्तुति करून तिला भोग्य वस्तूंनीं लालुच दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. १४. 'सनाथ' असें पाठांतर. येथें द्रौपदीच्या करुणाविकाराला जागृत करण्याची कीचकाची खटपट आहे. १५. पुण्याचें साधन (श्रेय). पुण्यांश जोडून घे—असा भाव. १६. 'जेंवि' व 'जय' असे पाठभेद. जय=जयजयकार. 'तुला महत्पुण्य' लाभेल—असा भाव. १७. कानांत बोटें घालणें=आपणास अमान्य असलेली गोष्ट न ऐकणें, तिच्या विषयीं तिरस्कार दाखविणें. १८. रक्षण कर, परमेश्वरा ! रक्षण कर. १९. संकट. (सं+कष्ट=संकष्ट). येथील 'समर्थ' हें विशेषण साभिप्राय आहे म्हणून **परिकर** अलंकार.

धर्वे माझे पती, । तव [1]रक्षा करुनी हातीं । गंगोदकीं टाकितील[2]. ॥ २७ ॥ पं[3]गु झें[4]पावे शशिमंडळा । बाळक इच्छी गगन[5]फळा । तेंवी पवित्राची [6]बाळा । केंवि लाधे[7]ल तव करीं ? ॥ २८ ॥ चालवीं [8]सैरंध्रीचें कर्म । परि तपें शरीर जालें चर्म । ऐसियेचा अभिलाष अ[9]धम । तूं एक धरिसी भोगाव[10]या. ॥२९॥ मणी देखोनी झ[11]गमगितू । व्याळ[12]विवरीं घालितां हातू । वस्तू न मिळे परि [13]मृत्यू । तत्काळिक पाविजे. ॥ ३० ॥ तेंवी मी सिद्ध[14]पुरुषाची वस्तू । स्पर्श करितां पावसी मृत्यू । जेंवी दीप क[15]वळितां घातू । पतंगातें तात्काळीं.' ॥ ३१ ॥ ऐकोनी पांचाळीचें वचन । कीचक झाला [16]हुताशन, । म्हणे, '[17]मातें वारील कोण ? । बळात्कारें भोगितां. ॥ ३२ ॥ पांच [18]गंधर्व सांगसी [19]गोष्टी । ते दाखवीं

१. राख. सुखोपभोग भोगण्याकरितां वांचण्याची इच्छा करणाऱ्या नीच कीचकाला द्रौपदी भेवडावीत आहे. २. 'मेळविती' असें पाठांतर. ३. पांगळा. 'पश्चिमेस पावे' (?) असा पाठ आहे. येथें **प्रतिवस्तूपमा**मूलक **उपमा** आहेत. ४. झेपावणें=उडी घालणें. (२) लुब्ध होणें, भुलणें, मागें लागणें. 'पतंग' 'प्लवंग' व 'पंगुर' असे अन्य पाठ आहेत. ५. सूर्य. ६. स्त्री. 'बाला स्यात्षोडशाब्दा तदुपरि तरुणी त्रिंशतिर्यावदूर्ध्वं प्रौढा स्यात्पंचपंचाशदवधि परतो वृद्धतामेति नारी' (रतिरहस्य). स्त्रियांचे वयपरत्वें बाला, तरुणी, प्रौढा व वृद्धा असे चार भेद आहेत. परंतु येथें बाला=स्त्री–असा अर्थ घेणेंच इष्ट आहे. 'अबला' असा अन्य पाठ. ७. 'लाधे' असें पाठांतर. ८. मी दासीचें काम करितें. पण कायिक, वाचिक व मानसिक तपश्चर्येनें माझें शरीर अस्थिचर्म मात्र उरलें आहे. या माझ्या तपःसामर्थ्याचा प्रभाव येवढा आहे, कीं आज आठ दहा महिन्यांत माझ्याकडे वांकड्या दृष्टीनें कोणीही पाहिलें नाहीं. तूंच एकटा दिवटा निघालास ! 'परि मालिनी असे माझें नाम' असाही पाठ आहे. ९. 'अभिलाषधर्म' असा पाठभेद. १०. 'तूं कां करिसी' व 'तूं एक करिसी' अशी पाठांतरें आढळतात. ११. चकचकीत, झगझगीत. सर्प व आणखी कित्येक प्राणी यांच्या मस्तकांत मणि अथवा मुक्ताफळें असतात, अशी प्राचीन लौकिक समजूत आहे:– करीन्द्रजीमूतवराहशंखमत्स्याहिशुक्त्युद्भववेणुजानि । मुक्ताफलानि प्रथितानि लोके तेषां तु शुक्त्युद्भवमेव भूरि. ॥ (कुमारसंभव, सर्ग १ श्लोक ६ टीका). १२. सापाच्या बिळांत, वारुळांत. 'वाळवीवरी' (वाळविवरीं)–असा अन्य पाठ. वाळ=व्याळ. 'वाळ' हा शब्द लेखकाचें अज्ञान दर्शवितो. कदाचित् हा त्याचा हस्तदोषही असेल. १३. 'घातू' असें पाठांतर. १४. योगानें ज्यास अमानुष शक्ति प्राप्त झाली आहे, अशा पुरुषाची. येथील **दृष्टांत** पहा. १५. कवळणें= कवटाळणें, मिठी मारणें. १६. अग्नीसारखा लाल. लक्षणेनें 'हुताशन' म्हटलें आहे. १७. माझें निवारण करील, मला प्रतिबंध करील. 'मातें वर्जिता कोण ?' असाही पाठ आहे. १८. गंधर्वांच्या. १९. थापा.

माझियें दृष्टी[1] । त्यांचेनि रक्तें पृथ्वीतटीं । संमार्जन[2] मी कर्ता[3]. ॥ ३३ ॥ देव, गं- धर्व अथवा दैत्य । तुजलागीं पातल्या बळसमर्थ । तितुकीयांचा करीन घात । अर्ध क्षण न लगतां. ॥ ३४ ॥ माझीयेनि पाडें अतुर्बळी[4] । दुजा नाहीं भूमं- डळीं, । शक्र पातल्या सर्व दळीं[5] । विभांडीन[6] प्रतापें. ॥ ३५ ॥ विराट माझा स्थापितू[7] । मीच येथील नृपनाथू ; । वारावया मज समर्थू । दुजा नाहीं ब्रह्मांडीं. ॥ ३६ ॥ आतां जाणें[8], निज निर्धारीं । तुज भोगीन बळात्कारीं, । रक्षण करूनी आपुल्या घरीं । भार्या[9] करीन पट्टाची[9].' ॥ ३७ ॥ द्रौपदी म्हणे, 'ऐक वचन, । विसां भुजांचा रावण । करितां परस्त्रीअभिलापण । परिवारेसीं[10] भस्मला[11]. ॥ ३८ ॥ सहस्र भुजांचा कार्तवीर्य[12] । जगीं मिरवी आपुलें शौर्य । अस्त तोही पावला, सूर्य । राहूवदनीं[13] जयापरी. ॥ ३९ ॥ सुंद[14] उपसंद[14] दोघे बंधू । आपुल्या हातें पावले वधू, । अन्यायवर्ती[15] तयां[16] बाधू । ईश्वरचि करी प्र-

---

१. 'दिठी' असें पाठांतर. २. भिजविण्याचें कृत्य, पृथ्वीला स्नान घालण्याचें कृत्य. ३. 'मी करीन' असा अन्य पाठ. ४. अतिशय बळकट. ५. सैन्यासह. ६. युद्ध करून त्याचा पराभव करीन. ७. मीच विराटराजाची स्थापना करणारा, विराटराजाला मीच सिंहासनावर बसविलें आहे. विराटराजा माझ्या हातांतील बाहुलें आहे—असा भाव. मुळांत 'मी या राज्याचा स्वामी आहें, या राज्याचें अस्तित्व मजवर अवलंबून आहे' असें आहे (अध्याय १४ श्लोक ४२). ८. जाण, ठाऊक करून घे, आपल्या मनाशी खूणगांठ घालून ठेव. ९. पट्टराणी. पट्ट=सिंहासन, पीठ. हें भाषण औद्धत्यदर्शक आणि बलात्कारसूचक आहे, तथापि सामदामाची भाषा चालूच आहे ! 'पटाची' व 'पाटाची' असे पाठभेद आहेत. १०. आप्त, इष्ट, मित्र यांसह. ११. भस्म झाला, नाश पावला. 'परिवारेंसीं पावला मरण । तेथें तूं कायसा ?' असाही पाठ आहे. १२. परशुरामानें याचा घात केला. कार्तवीर्यानें जमदग्नीची कामधेनु बलात्कारानें हरण करण्याचा प्रयत्न केला होता. (मागें पृष्ठ २७ टीप ६ पहा). १३. राहू=ज्याचें शिर विष्णूनें धडापासून वेगळें केलें असा एक दैत्य. (मुक्तेश्वरकृत आदिपर्व, अध्याय ४ पहा). सूर्याचा ग्रास राहू करितो, अशी समजूत आहे. राहु=पृथ्वीची छाया असें भास्कराचार्य व आधुनिक ज्योतिषी समजतात. १४. 'हिरण्यकश्यपाचा कुमर । निकुंभ नामा असुरेश्वर । त्याचे दोघे पुत्र महा क्रूर । सुंदोपसुंद या नांवें' ॥ ५२ ॥ (मुक्तेश्वरकृत आदिपर्व, अध्याय ४६). ह्या दोघांचें तिलोत्तमा नामक अप्सरेवर मन गेल्यामुळें त्यांचें आपसांत भांडण होऊन त्यानीं एकमेकांचा वध केला—अशी कथा आहे. १५. अन्यायानें वागणारा. 'प्रयत्नें' हा शब्द सर्वशक्तिमान् परमेश्वराला कां बरें लावला ? तो लीलेनें दुष्टांचा नाश करितो, अशी समजूत आहे. १६. 'अन्याय वर्ततां तया बाधू' असाही पाठ आहे.

यत्नें. ॥ ४० ॥ शुंभ निशुंभ[1] महाबळी । शक्तीहस्तें मिळाले[2] धुळी । तुझा[3] मृत्यू पातला जवळी । म्हणोनि ऐसें[4] उदेलें.[4]' ॥ ४१ ॥ ऐसें बोलतां याज्ञसेनी । कीचक क्षोभला वैहुतागुणीं;[5] । जैसा घृतें शिंचिंतां[6] वन्ही । प्रज्वळे, तैसा धाँविन्नला.[7] ॥ ४२ ॥ कबरी[8] कवळितां पांचाळी । झाडोनि[9] चालिली नि-रोळी,[10] । धांवोनि येतां सभेजवळी । सभालोकीं[11] देखिली. ॥ ४३ ॥ सभे भूपाळ महाजन, । धर्म, पार्थ, भीमसेन, । देखत असतां तो दुर्जन । परम अन्याय रोहाटला.[12] ॥ ४४ ॥ कृष्णा येतां मुक्तकेशी[13] । कीचक धाविन्नला पाठीसी । लात ताडोनियां कुशी । अधोवदनें पाडिली.[14] ॥ ४५ ॥ करूनी पातिव्रत्यें-[15]हानी । कीचक पाइं पाहे व्यसनीं,[16] । हें देखोनी याज्ञसेनी । स्तवन करी सू-र्याचें. ॥ ४६ ॥ म्हणे, 'जी ! अज्ञानतमनाशना[17] ! । आप्तरूपा[18] ! सहस्रकिरणा ! । कीचकाचिया महाव्यसना- । पासोनि मातें सोडवीं.' ॥ ४७ ॥ कृपाभरी[19] दी-नानाथ[20] । प्रेरिता जाला राक्षसदूत, । कीचकें लावितांचि हात । आड जाली[21] तत्काळीं. ॥ ४८ ॥ आड होतां विशाळ मूर्ती, । द्रौपदी निघोनी गेली पैं-[22]

---

१. शुंभ व निशुंभ हे दोन असुर उभयतां भ्राते होते. हे कालिदेवीच्या सौंदर्यावर मोहित झाल्यामुळें तिच्या हातून ह्यांचा युद्धांत वध झाला (देवीभागवत, स्कंध ५ अध्याय २१–३१ पहा). २. धुळीस मिळणें=समूळ नाश होणें. 'शक्तिहातें निमाले दळीं' असाही पाठ आहे. निमाले=शांत झाले, मेले. दळीं=सैन्यांत, सैन्याच्या हातून. ३. 'तूतें' असें पाठांतर. ४. असले ढंग तुला आठवले ! 'म्हणोनि चिन्ह हें उदेलें' असाही पाठ आहे. ५. अनेकपटीनें, फार. ६. 'सिंपिला' व 'शिंपितां' अशीं पाठांतरें. येथील दृष्टांत मोठा सुरेख आहे. ७. धांवता झाला. ८. वेणी, केशपाश. 'करीं' असें पाठांतर. ९. हाताला झटका देऊन. 'सांडोनि' असें पाठांतर. सांडोनि= सुटका करून घेऊन. १०. एकीकडून. ११. सभेंतील लोकांनीं. १२. वर्तला. १३. जिचे केश मोकळे सुटले आहेत अशी. 'मुक्तकेशी' असें पाठांतर. १४. असला अधमपणाचा निंद्य प्रकार राजसभेंत घडला, द्रौपदीस कौरवसभेंत नग्न करण्याचा प्रयत्न झाला, यांवरून व आणखी कांहीं उदाहरणांवरून भारतकालीन लोकांविषयीं आपला काय ग्रह होतो बरें ? १५. पातिव्रत्याला, पतिव्रताला हानी करून; त्याचा घात करून. 'पतिव्रताहानी' असें पाठांतर. १६. संकटांत. १७. अज्ञानरूपी तमाचा नाश करणाऱ्या ! सूर्य सर्वसाक्षी आहे व म्हणून अज्ञान घालविणारा आहे. १८. हित करणाऱ्या. 'आत्मरूपा' असाही पाठ आहे. १९. दयेनें. 'कृपा येतां' असें पाठांतर. २०. दीना+नाथ=अनाथवत्सल, सूर्य. द्रौपदी दीना होती. २१. मध्यें आला. २२. पलीकडे, दूर.

रती । कृपेनें [1]वोळला **ग**भस्ती । महाअरिष्टा वारिलें. ॥ ४९ ॥ [2]पुढेती **की**-चकानें मारिली [3]लात । पुढतीं [4]पातला सूर्यदूत । **की**चक लोटोनियां [5]व्यस्त । पृथ्वीतळीं पाडिला. ॥ ५० ॥ **की**चकभयें सभास्थानीं । शब्द [6]बोलों न शके कोण्ही, । **ध**र्मराज [7]अधोवदनी । **भीमा**र्जुना विलोकी. ॥ ५१ ॥ **द्रौ**पदी म्हणे, '**वि**राटराया ! । वसों [8]आलें तुझिया ठाया, । तुजपुढें [9]अन्यायकर्तया । शिक्षा कैसी न करिसी?' ॥ ५२ ॥ **वि**राट म्हणे, '[10]स्त्रीचरित्र । नकळे प्रकट गुह्य मंत्र, । कैसें एकांतींचें [11]सूत्र । तें नेणवे आमुतें. ॥५३॥ प्रथम मिळोनिया [12]संवादीं । मग प्रवर्ते जरी निपेधीं । तेथें ऐसी होय [13]उपाधी । [14]आणि घडे लौकिकू.' ॥५४॥ वस्त्रें आच्छादून वदन । **द्रौ**पदी करी दीर्घरुदन । हें देखोनी **भी**मसेन । वृक्ष [15]पुढें विलोकी. ॥ ५५ ॥ **कं**क आणी **बृ**हन्नळा । [16]म्हणती, 'स्वस्थ गा ! वीरपाळा !' याचें [17]उसणें स्वल्पकाळा । प्राणनाश पावेल.' ॥ ५६ ॥ **कं**क म्हणे, 'वो ! महासती ! । जाउनी सांगें **सु**देष्णेप्रती. । ते बंधूतें विवेक, नीती, । हितोपदेश बोधील.' ॥ ५७ ॥ परम दुःखें शोक करित । **सु**देष्णेतें जाणवी [18]मात, । ते म्हणे,

---

१. वळला, प्रसन्न झाला. २. मागें ४५ व्या ओवीत लाथ मारली असें असून येथें ही पुनः मारली कीं काय? कांहीं प्रतींत ४५ वी ओवी नाहीं. 'पुढें ते' व 'पुन्हा ते' अशी पाठांतरें. ३. 'कीचकें मारितां लात' असाही पाठ आहे. ४. येऊन पोंचला. 'पावला' असें पाठांतर. ५. उलथा पालथा. 'हस्त' असें पाठांतर. हस्त=हस्तें=हातानें. ६. 'शब्द काढूं शकेना कोणी' असाही पाठ आहे. ७. खालीं मान घालून. धर्मराजाचें वर्तन व्यवहारास अनुसरूनच झालें, पण प्रेम व स्नेह यांस अनुसरून झालें नाहीं. ८. आलें=आल्यें. 'आलों' असा पाठ आहे पण तो प्रस्तुत स्थळीं उचित नाहीं. 'आम्ही सर्वजणें आलों' असें ध्वनित करणें अनिष्टच होतें. ९. अन्याय करणाऱ्याला. १०. 'स्त्रियश्चरित्रं···देवो न जानाति कुतो मनुष्यः' हें स्त्रियांच्या विरुद्ध विराटादि भ्याड पुरुषाभिमान्यांचें शस्त्र आहेच! तुम्ही गुप्त कारस्थानें काय करितां आणि लौकिकांत कसें वागतां हें समजत नाहीं. तुमचें एकांतांत काय ठरलें होतें व भांडण कां झालें ? हेंही समजत नाहीं—असा विराटराजाच्या म्हणण्याचा भाव. ११. व्यवस्था, सूचना. येथें—भांडणाचें कारण. १२. संवाद=(१) जमणें, जुळणें, मेळ; (२) संभाषण, चर्चा. (मूळ अध्याय १६, श्लोक ३५ पहा). संवादीं मिळून=होय म्हणून. १३. संकट, फजीती. 'तेथें तैसीच होय उपाधी' असें पाठांतर. १४. येथें लौकिक=अपकीर्ति—असा अर्थ. 'अंगीं घडे लौकिकी' असें पाठांतर. १५. भीम सुद्धां शस्त्रास्त्रें वधूं लागला, एकदम उठला नाहीं!. १६. 'म्हणेती' असें पाठांतर. पण 'म्हणेती' असें रूप क्वचितच आढळतें. १७. सूड. लवकरच याचें प्रायश्चित्त त्यास मिळेल. १८. वर्तमान. 'वृत्त' असें पाठांतर.

'त्याचा मनोरथ । न होतां, [1]अनर्थ रोकडा. ॥ ५८ ॥ नायकसी त्याचें वचन । तरी तो घेईल तुझा प्राण. । येथें माझें आज्ञावचन । न चले, जाण सुजाणे ! ।' ॥ ५९ ॥ द्रौपदी [3]खोचोनियां चित्तीं । म्हणे, 'बरवी [4]निर्वडिली नीति ! । जे जैसीं कर्मे करिती । तैसे पावती फळभोग.[5]' ॥ ६० ॥ कीचक भगिनीलागीं म्हणे, । 'सैरंध्रीतें त्वां शिकवणें । अंगसंग न देतां, [6]प्राणें । उरों [6]नेदीं सर्वथा.' ॥ ६१ ॥ यानंतरें निशाकाळीं । कृष्णा पातली धर्माजवळी, । हृदय [7]पिटूनी [8]पाणीतळीं । शोक करी आक्रोशें. ॥ ६२ ॥ म्हणे, 'तुमचें पुरुपत्व काय झालें ? । [9]नामरूपातें बुडविलें; । रंकाचेंही [10]रंकत्व आलें । [11]भणग केलें प्रारब्धें. ॥ ६३ ॥ [12]रायाद्रुपदाची आत्मजा । भगिनी होय श्रीकृष्णराजा । पांचा पांडवांची भाजा । श्रेष्ठ स्नुषा [13]पंडूची. ॥ ६४ ॥ सभेंत समस्तां देखत । कीचकें मारिली मातें लात, । आतां तुमचा पुरुपार्थ । कोणा येईल [14]उपयोगा ?॥ ६५॥ [15]खांडववनातें जाळिलें, । [16]निवातकवचांतें वधिलें, । तें अवघेंचि वांयां गेलें ।

१. 'करील अनर्थ रोकडा' असाही पाठ आहे. २. रोखठोक, प्रत्यक्ष, धडधडीत. (संस्कृत–'रोक=प्रकाश, तेज' पासून 'रोकडा' हा शब्द झाला.) ३. भग्नोत्साह होऊन, जणुं काय भोंसकली जाऊन, जखमी होऊन. 'ऐकोनियां' असें पाठांतर. ४. उत्तम उपदेश सांगितलात, बाईसाहेब ! ५. 'जसें करावें तसें भरावें' ही प्रचारांतील म्हण प्रसिद्धच आहे. 'हांसत कर्म करावें भोगावें रडत तेंचि परिणामीं' ही पंतोक्तिहि सर्वांच्या परिचयाची आहे. ६. प्राणानें राहूं देणार नाहीं म्हणजे मी द्रौपदीला जिवंत ठेवणार नाहीं. ७. बडवून घेऊन. पिटणें=पीडन करणें. ८. तळहातांनीं. 'पाणीयुगुळीं' (=दोन्ही हातांनीं)–असाही पाठ आहे. ९. कुलशीलाला बट्टा लाविला. १०. तुम्ही भिकाऱ्यापेक्षांही भिकारी झालेत, रंकाशीं एकरूप झालेत ! 'रंकाचेंही एकत्व आलें' असाही पाठ आहे. रंकाचें एकत्व=रंकाची योग्यता, भणंगाची बरोबरी. ११. भिकारी. १२. द्रौपदीचा हा पुढील शोक वाचून कोणा पुरुषाच्या अंगांत क्रोधाचें वारें शिरणार नाहीं ? आपल्यावर पुनः वनवासाची पाळी येईल या भीतीनें पांडवांचें पुरुपत्व नष्ट झालेलें पाहून कोणाच्या मनाला विषाद वाटणार नाहीं ? त्यांची अतिरेकाला गेलेली सहनशीलता खरोखर गर्हणीय आहे. द्रौपदीचा प्रत्येक शब्द हृदयास घरे पाडणारा आहे. प्रत्येक विशेषण सार्थ आहे. १३. येथें **सार** अलंकार आहे. १४. 'कोण्या उपेगा येतसे ?' असाही पाठ आहे. उपेग=उपयोग, प्रयोजन, फळ. १५. हें भाषण अर्जुनास उद्देशून आहे. खांडववनदाहकथा वाचनीय आहे. ती मुक्तेश्वरकृत आदिपर्वाच्या ४९ व्या अध्यायांत आहे. १६. हे दोघे बंधु प्रऱ्हादाचे पुतणे. इंद्रासही हे अजिंक्य होते. अर्जुनानें यांचा वध केला (मुक्तेश्वरकृत वनपर्व, अध्याय १० पहा).

मज ताडितां **की**चकें ! ॥ ६६ ॥ तुमचें धनुष्य आणि बाणू । वेगीं [१]ब्राह्मणा देइजे दानू, । [२]पुरुषां देखतां कुलांगनू । नीच पुरुषें गांजिली ! ॥ ६७ ॥ [३]दिव्या-स्त्रातें साधिलें, । युद्धीं **शि**वातें तोषविलें, । तें अवघेंचि वायां गेलें । मज ताडितां **की**चकें ! ॥ ६८ ॥ [४]हेडंब–बकातें मारिलें, । **कि**र्मीर–ज[५]टासुरातें वधिलें । तें अवघेंचि वायां गेलें । मज ताडितां **की**चकें ! ॥ ६९ ॥ **पौ**लोम[६], [७]**का**ळयातें वधिलें, । [८]जयद्रथातें विटंबिलें, तें अवघेंचि वायां गेलें । मज ताडितां **की**चकें ! ॥ ७० ॥ [९]स्वयंवरीं जिंकूनियां पण । हरिला **कौ**रवांचा मान, । तें अवघेंचि जालें शून्य । मज ताडितां **की**चकें ! ॥ ७१ ॥ जोडिलें यशाचें [१०]परमान्न, । कोण्ही न [११]सेविती [१२]पवित्रजन, । स्पर्शलें दुष्ट **की**[१३]चक–श्वान । **पां**चाळीतें [१४]म्हे-

१. हा द्रौपदीचा उपदेश धनुर्धारित्वाचें व्यर्थत्व उघड करितो. ब्राह्मणास दान करणें म्हणजे आपण त्यास मुकणें आणि ब्राह्मणाच्या हातूनही त्याचा उपयोग होणार नाहीं, असें पाहणें होय. २. बायका नवऱ्यास 'पुरुष' म्हणतातच ! द्रौपदीनें प्रस्तुत प्रसंगीं पांडवांस कोणत्या अर्थानें 'पुरुष' असें म्हटलें तें तिचें तिलाच ठाऊक व त्यांचें त्यांनाच ठाऊक ! हें पद्य कांहीं प्रतींत पुढें आहे. ३. हें भाषण पाशुपतास्त्रप्राप्तीस उद्देशून आहे. (**मु**क्तेश्वरकृत वनपर्व, अध्याय ४ पहा). ४. द्रौपदी भीमास अनुलक्षून बोलते. हिडिंबासुर व बकासुर यांस भीमानें मारिलें. **मु**क्तेश्वरानें हीं कथानकें आपल्या आदिपर्वाच्या ३७ व ३८ ह्या अध्यायांत वर्णिलीं आहेत. ५. ह्या दोघां राक्षसांस भीमानेंच मारिलें. **मु**क्तेश्वराच्या वनपर्वांत, अध्याय २ मध्यें किर्मीरवध व अध्याय १० मध्यें जटासुराचा वध, हीं कथानकें वर्णिलेलीं आहेत. ६. द्रौपदी पुन्हा अर्जुनास उद्देशून बोलते. पौलोम व कालिकेय ह्या राक्षसांस अर्जुनानें मारिलें (**मु**क्तेश्वरकृत वनपर्व, अध्याय १० पहा). ७. 'कालिकेयातें' असें असावयास पाहिजे. ८. द्रौपदी पुन: भीमास उद्देशून बोलते. जयद्रथ हा धृतराष्ट्रकन्या दु:शला हिचा पति. पांडव वनवासांत असतां ह्यानें द्रौपदीस पळवून नेण्याचा प्रयत्न केला, यामुळें भीमानें, हा आपला भगिनीपति म्हणून ह्यास ठार न मारितां, पांच पाट काढून ह्यास जीवदान दिलें, अशी कथा आहे (**मु**क्तेश्वरकृत वनपर्व, अध्याय १४ पहा). ९. द्रौपदीला अर्जुनानें स्वयंवरांत जिंकिलें. हा कथाभाग वाचकांनीं **मु**क्तेश्वरकृत आदिपर्व, अध्याय ४१, ४२ व ४३ यांत पाहावा. १०. दूध व साखर यांत तांदूळ शिजविले म्हणजे 'परमान्न' नांवाचें पक्वान्न होतें. ही आपली खीरच होय. यशही पांढरें आणि दूध, साखर, व तांदूळ हे सर्व पांढरेच पदार्थ ! तेव्हां यशाची शुभ्रता दाखविण्यास हा समुदाय किती सुंदर आहे ?. ११. 'सिवती' असें पाठांतर. १२. साधुसंत. १३. कीचकाला कुत्रा म्हणून त्याच्याविषयीं तिरस्कार दर्शविला आहे. **मु**क्तेश्वराच्या काळीं कुत्र्याविषयी लोकांच्या मनांत काय भावना असे तें दिसून येतें. (मागें अध्याय १ ओवी ५ पहा). १४. कीचकासारखें श्वान शिवून माझ्या पवित्र यशाचें त्यानें मातेरें केलें म्हणून माझें यश आतां साधुसंत गाणार नाहींत–असा द्रौपदीच्या म्हणण्याच्या भावार्थ.

णोनी. ॥ ७२ ॥ केला [1]राजसूय यज्ञ, । [2]दानीं तोषविलें त्रिभुवन, । तें अवघेंचि जालें [3]शून्य । मज ताडितां **की**चकें !' ॥ ७३ ॥ **धर्म** म्हणे, 'ऐक [4]गुह्यार्थ, । **भी**मसेना जाणवीं मात, । करील दुष्टाचा नि:[5]पात । अर्धक्षण न लगतां. ॥७४॥ चारीमास दिवस [6]गणणें । उरलें, म्हणोनि पडलें [7]साहणें । एरव्हीं जाता **की**चक प्राणें । तेचि काळीं [8]जाण पां ॥ ७५ ॥ आतां [9]स्वस्त करीं मना, । वृत्तांत जाणवीं **भी**मसेना, । करील **की**चकाचिया हनना । हें [10]निर्धारें जाण पां !' ॥ ७६ ॥ ऐसें दोघें संवादती । शयनं[11]सदनाचिये एकांतीं; । तंव तेथेंचि [12]दैवेंगती । **भीम**-सेन पातला. ॥७७॥ **द्रौ**पदी शोकें अतिसंतप्त । नेत्रीं [13]ढळती अश्रुपात, । **भी**म म्हणे, 'वो ! होई [14]स्वस्त । विचारवंते ! सुजाणे ! ॥७८॥ **दु**:शासनें [15]कवळिलें केशा, । [16]सैंधवें [17]दिधलें अपार क्लेशा । [18]तयाचि ऐसें मानूनि, दोषा । आमुच्या अंगीं न लावणें.॥७९॥

---

१. पांडवकृत राजसूययज्ञासंबधीं सविस्तर वर्णन वाचकांनीं **मु**क्तेश्वरकृत सभापर्व, अध्याय ९, १० व ११ यांत अवश्य वाचावें. २. 'तेव्हां तोषविले' असें पाठांतर. ३. सर्व व्यर्थ झालें. द्रौपदी संतप्त झाली आहे, म्हणून तिच्या बोलण्यांत सुसंगतपणा जसा असावयास पाहिजे तसा दिसून येत नाहीं. ४. गुप्त गोष्ट; गुप्त युक्ति. शक्ति नसलेलीं माणसें युक्तींत पटाईत असतात ! ५. नाश. 'घात' असें पाठांतर. ६. 'गणने' हाही पाठ अर्थ सुलभ करितो. अज्ञातवासाच्या गणनेला (दिवसांच्या संख्येला) चार महिने उरले आहेत, असें धर्म सांगत आहे. ७. सोसणें. ८. 'एरव्हीं आतां कीचक प्राणें । जाता, जाण तत्काळीं' असाही पाठ आहे. तत्काळीं=त्याच वेळीं, सत्वर. ९. 'आतां स्वस्त करीं आपुलें मन । वृत्तांत ऐकतां भीमसेन । करील कीचकाचें हनन ।' असाही पाठ आहे. स्वस्त=स्वस्थ. सर्व हस्तलिखितांत 'स्वस्त' असाच शब्द आढळतो. १०. निश्चयानें, खरोखर. 'हा निर्धार' असें पाठांतर. निर्धार=निश्चय, सिद्धांत. ११. Bed-room हा 'शेजघरा'ला समानार्थक शब्द होय. 'शय्यासदनाचे' असें पाठांतर. १२. अकस्मात्. आपल्याला ठाऊक नसणाऱ्या कारणापासून कांहीं कार्य झालें म्हणजे आपण त्यास 'दैवगती' म्हणतों. येथें 'दैवगती' हें तृतीयेचें रूप अगर क्रियाविशेषण आहे. १३. खालीं पडत आहेत. 'ढाळित' असें पाठांतर. १४. काळजीरहित हो. आर्जवाची भाषा आहे ही. १५. द्रौपदीकेशाकर्षण व तदनंतर तिच्यावर आलेला वस्त्रहरणाचा प्रसंग इत्यादि कथाभाग **मु**क्तेश्वरकृत सभापर्व, अध्याय १५ यांत आहे. 'कवळितां' असें पाठांतर. १६. जयद्रथानें. हा सिंधुदेशाचा राजा वृद्धक्षत्र याचा पुत्र. (मागें ओवी ७० पहा). इंद्रप्रस्थाच्या व सौराष्ट्राच्या पश्चिमेस हा देश होता. १७. 'पावविलें' असें पाठांतर. १८. त्याप्रमाणेंच, मागील संकटांप्रमाणेंच हें एक आहे, असें समजून. 'तयाची ऐसी मानुनी दशा । आमुच्या अंगीं लावणें' असाही पाठ आहे. तशीच (पूर्वींच्या संकटांसारखी) ही दशा (सध्याचें संकट) आहे, असें समजा आणि त्याबद्दल मला दोष द्यावयाचा असेल तर द्या—असा भीमाच्या म्हणण्याचा भाव.

असो.[1] जें बोलसी उत्तरीं[2] । तितुकें[3] हीनत्व आमुचे शिरीं । पुढें कृपा करील श्रीहरी । तरी हें संकट परिहारूं.[4]' ॥ ८० ॥ द्रौपदी[5] म्हणे, 'प्रतापरुद्रा ! । भुवनत्रयीं बळसमुद्रा ! । कैवण दोषास्तव[6] नरेंद्रा ! । प्रतापातें ग्रासिलें. ॥ ८१ ॥ कीचक पडला असे डाईं,[7] । तो मज छळील समयोसमयीं[8] । प्राण[9] त्यागूं ? किंवा कांहीं । उपाय असे ? सांग पां. ॥ ८२ ॥ विराट वारूं न शके त्यातें, । सुदेष्णा त्याचिये विचारें वर्ते, । कोठें आश्रयो[10] न दिसे मातें । दुःखें[11] कंठीं झोंबावया. ॥ ८३ ॥ अज्ञातवासाचिये संकटीं । रिघतां[12] नये तुमचे पाठीं, । दुरी राहिला जगजेठी । कृष्ण माझा कुलावतंस.[13] ॥ ८४ ॥ स्थल त्यागुनी आणिके स्थळीं । जातां नये ईयेकाळीं.' । भीम म्हणे, "वो वेल्हाळी[14] ! । चिंता न करीं मानसीं. ॥ ८५ ॥ कीचक करील बळात्कारू । तरी तुवां[15] सांगावा विचारू, । अवलंबोनी कृत्रिमाचारू[16] । मिथ्या शब्दें मोहावा. ॥ ८६ ॥ 'नृत्यशाळे[17] एकांत स्थळीं । तुवां यावें निशाकाळीं,[18] । मीही येवोनियां जवळीं । इच्छा

---

१. 'जें जें बोलसी' असा अन्य पाठ. २. 'उत्तर' याचा नेहमींच 'प्रश्नाचा जबाब' असा अर्थ नसतो. 'बोलणें' असाही अर्थ होतो. भीमाला सुद्धां या वेळी वेदांत सुचला आहे. ३. 'तें तें नष्टचर्य' असें पाठांतर. ४. निवारण करूं. 'तरी सर्वही करील परिहार' असाही पाठ आहे. ५. 'अंगवण असतां कां भेदरा । अप्रतापाचा स्पर्शला' असाही पाठ आहे. अंगवण=सामर्थ्य, पराक्रम. भेदरा=भीति, धास्ती, दहशत. 'भेदरा' हा शब्द मुक्तेश्वरकृत आदिपर्व, अध्याय ६ ओवी ४८ हींत योजिलेला आहे. ६. 'दोष' याचा 'संध्याकाळ' असा अर्थ आहे. सूर्याला संध्याकाळ वज्रच होय ! येथील श्लेष पहावा. 'दोष' व 'प्रताप' हे श्लिष्ट आहेत. 'कोण्या अगस्तीनें नरेंद्रा' असा तृतीय चरणाचा पाठभेद बळसमुद्रास उद्देशून आहे. ७. डाई पडणें=दावा धरणें. ८. वेळोवेळीं, वारंवार, पुनः पुन्हा. 'तो मज छळीत' असें पाठांतर. ९. काय बिचारीवर संकट हें ! १०. ज्या आश्रयाचे गळ्यांत (ज्याच्या स्वाधीन) मला दुःखांतले दिवस कंठतां येतील असा आश्रय मला कोठें दिसत नाहीं–असा भाव. ११. 'दुःखें कंठूं जावया' व 'दुःखें कंठ दाटला' असे पाठभेद आहेत. १२. तुमच्या पाठोपाठ जाण्यांत कांहीं अर्थ नाहीं–असा भाव. १३. कुलशिरोमणी, कुलश्रेष्ठ. अनाथाचें रक्षण करण्यास तातडीनें धांवणारा. 'कैवारी' हा पाठ उत्तमच होय. 'कुवासा' असा दुसरा पाठ आहे, तोही चांगला आहे. कुवासा=कुंवसा=आश्रय. हा शब्द ज्ञानेश्वरींत आढळतो. १४. वेल्हाळ (केलीनागर, चैनी पुरुष) यापासून 'वेल्हाळ' हा शब्द झाला. वेल्हाळी= प्रिये ! कपटप्रयोगाला सुरवात करावयाची म्हणून 'वेल्हाळी' हा शब्द भीमाच्या तोंडी मुक्तेश्वरानें घातला असावा. १५. त्वां. 'त्याला' असें पाठांतर. १६. कपटनाटक. हें नाटक पुढें सांगितलेंच आहे. मानवती व सच्छील द्रौपदीस हें मानलें नसेलच पण 'बखत पडा बांका, तो गद्धेकू कहना पडता काका' असा न्यायच आहे. १७. 'नाटकशाळे' असें पाठांतर. १८. रात्रीच्या वेळीं.

तुझी पुरवीन.' ॥ ८७ ॥ कीचकें तेथें केलिया शयन। मग माझें होईल आगमन,। पुढें होईल जें कथन[1]। तें ऐकाल[2] समस्त." ॥ ८८ ॥ निशा क्रमुनीयां जाणा। भीम गेला पाकसदना[3],। द्रौपदी आली सुदेष्णा। जिये ठायीं[4] उपविष्टु[5]. ॥८९॥ सुदेष्णा म्हणे, 'वो गुणसाजणी[6] !। अत्यंत आवडी[7] माझिये मनीं,। होवोनी माजी बंधुपत्नी[8]। मजेसमान त्वां व्हावें.[9] ॥ ९० ॥ कैंचे गंधर्व[10] ? कैंचे पती ?। असत्य बोलसी महासती[11] !। कीचकाचिये सुखसंगती[12]। संपदा भोगीं मनइच्छा[13].' ॥ ९१ ॥ खेद पावोनी अंतरीं। बाह्य[14] कृत्रिम[15] हास्य करी[16],। सुदेष्णा टाळी[17] पिटी करीं। मिळे विचारीं[18] म्हणोनियां. ॥ ९२ ॥ 'व्यर्थ जातसे तारुण्यकाळ,। न ये वेचितां कनकाचळ[19],। कीचकसंगीं करीं सुफळ। आग्रह सांडीं मानसीं[20]. ॥९३॥ कीचक निपजवूनि अन्ना। सुरा[21] पाठवी मज प्राशना,। तुवां जाऊनियां त्याचिया सदना। निशाकाळीं आणावें.' ॥९४॥ यावरी भगिनीचिया राउळा[22]। कीचक पातला उतावेळा[23],। विरहतापें गोळांगुळा[24]-। सारिखा दिसे विकारी[25].

---

१. कथानक, कथा, गोष्ट. 'महाकथन' असा पाठ आहे. महाकथन=मोठी गोष्ट, महत्वाची घडामोड. २. 'तें ऐकती समस्त' असाही पाठ आहे. ३. स्वयंपाकघरांत. ४. ज्या ठिकाणीं. 'स्थानीं' असें पाठांतर. ५. बसलेली होती. ६. 'सज्जन' पासून 'सजणा' शब्द झाला. काय सुदेष्णेची वाक्यरत्नें हीं ! ७. 'अत्यंत आवडसी माझे मनीं' असाही पाठ आहे. ८. भावजय. 'माझ्या सारखी हो' म्हणजे पट्टराणी हो. ९. 'होइँ माझिये बंधूची पत्नी। मजसमान सुख भोगी' व '······कृतकृत्य होइजे' असे पाठभेद आहेत. १०. व्यावहारिक मनुष्यांस श्रेष्ठ नीतीच्या गोष्टी काय होत?. ११. राजपत्नी सुदेष्णा द्रौपदीला 'महान् पतिव्रता' म्हणून संबोधीत आहे व तिच्या पातिव्रत्यावर घाला घालावयास पाहात आहे, ही नीचपणाची कमाल होय. १२. 'सुसंगती' असें पाठांतर. १३. मनमुराद. १४. बाहेरून. द्रौपदीस कपटवेषाचा हा पहिलाच प्रसंग होता. १५. खोटें. खरें नव्हे तें, कपटानें केलेलें. हें पाहून सुदेष्णा खुलली कशी ती पहा. १६. ह्याचा कर्ता–द्रौपदी. १७. टाळी पिटणें–हें आनंद दर्शविण्याचें एक चिन्ह आहे. आपण सांगितलेली गोष्ट सैरंध्रीस पटली, असें वाटून सुदेष्णेनें टाळी वाजविली. १८. आपल्या बेतास अनुकूल झाली म्हणून. १९. मेरू इतका सुवर्णाचा संचय खर्चिला तरी तारुण्य पुन: परत येत नाहीं, असा सुदेष्णेच्या भाषणाचा भावार्थ. २०. मनामधील. २१. मद्य. 'सदा···मम प्राशना' असा अन्यपाठ. २२. राजगृहास, वाड्यांत. 'रायालय'–पासून 'राऊळ.' देवळासही 'राऊळ' म्हणतात. २३. 'उत्ताम्यत्' पासून 'उतावेळा.' २४. गोळांगुळ=वानर. २५. विकारवश. 'अविचारें' असा अन्य पाठ.

॥ ९५ ॥ मद्यपानें झांकली दृष्टी,[1] । [2]......... । भगिनीसी म्हणे, 'हे गोरटी ।......... ॥ ९६ ॥ प्रबोधोनी नानायुक्ती । अपार वोपीन धन-संपत्ती । अंगना होवोनि काम–रती । पुरवी, ऐसें करीं कां'.[3] ॥ ९७ ॥ ते म्हणे, 'माझिये एकान्त सदनीं । तूंचि बोधीं मधुरवचनीं.' म्हणोनि बैसविलीं दोन्हीं । अंतरगृहीं संवादा. ॥ ९८ ॥ कीचक म्हणे, 'सुकुमार[4] वनिते ! । सभास्थानीं ताडिलें लाते, । सामर्थ्य नव्हेचि कवणातें । वारावया मजलागीं. ॥ ९९ ॥ आतां करीन बलत्कारू । तरी मज कोण शके वारूं ? । पश्चात्ताप पावोनि थोरू । शेखीं[5] मातें वरसील. ॥ १०० ॥ सहस्र निष्क[6] सुवर्ण–रासी । तुज वोपीन प्रतिदिवसीं, । शत शतकं[7] दासदासी । सेवेलागीं देतसें. ॥ १०१ ॥ एकशत कनकरथ, । शतकुंजर मदोन्मत्त, । शतं[8] वाजी साळंकृत । चालवीन तुजपुढें. ॥ १०२ ॥ अमोल्य रत्नांचीयां[9] रासी, । अन्न सेवीं रुचती तैसीं, । पं-[10]रीमळ मर्दुनी अंगासीं । अभ्यंग करीं, डोळसे[11] ! ॥ १०३ ॥ नक्षत्रां[12] ऐसिया रत्न-माळा । आवडीं[13] घालीन तुझीया गळां, । तैसी लेववीन कटीमेखळा[14] । माणीक मणी सुजडीत.[15] ॥ १०४ ॥ गंधर्व[16] पातल्या कैवारा । छेदीन त्यांचिया[17] शिरा, । माझिये बळाचा दरारा । देवां दैत्यां ठाऊका. ॥ १०५ ॥ आतां संशय सां-डोनी मनीं । बैसें माझिया अंकासनीं,[18] । गाढालिंगन-चुंबनीं । ताप शमवीं, व-

---

१. 'दिठी' असें पाठांतर. २. येथील शब्दयोजना मदोन्मत्त वानराची क्रिया दर्शविणारी असून अत्यंत अश्लील आहे. कवीचे ते शब्द गाळिल्याबद्दल समंजस रसिकांनीं आम्हास क्षमा करावी. कवीचे शब्द जसेच्या तसे देणें हें न्याय्य होय. पण त्यांतही मर्यादा आहे. सुज्ञांनीं यांत काय तें समजून घ्यावें, अशी विनंति आहे. ३. 'अंगना होऊनि कामना रती । पुरवी ऐसें करावें' असा अन्य पाठ. ४. एखाद्या स्त्रीला सुकुमार म्हणून तिला लाथ मारणें हें कीचकासच शोभतें ! ५. शेवटी. ६. निष्क= (१) सोन्याची कंठी, पोंची, उरोभूषण इत्यादि; (२) सोळा मासे वजनाचें सोन्याचें नाणें, दीनार. सोनें रूपें तोलण्याचें वजनविशेष. ही पातिव्रत्याची किंमत पहा! ७. दहा हजार. 'शतकें शतक' असें पाठांतर. ८. 'शतभरी' असें पाठांतर. वाजी=घोडा. ९. 'वस्त्रांचिया' असें पाठांतर. १०. सुवासिक द्रव्यें. ११. 'सकुमारे!' असें पाठांतर. १२. 'नक्षत्रसमान' असें पाठांतर. ही **उपमा** किती सुरेख आहे बरें. १३. आवडीनें. १४. कंबरपट्टा. 'जैसी नक्षत्रांमाजी रत्नमाळा । लेववीन तैसी कटिमेखळा । वस्त्राभरणीं अलंकार गळां ।' असाही पाठ आहे. १५. चांगले जडलेले, जडावाचे. १६. गंधर्वभीति नाहींशी करण्याची **ही तोड!** १७. 'पांचाचिया' असें पाठांतर. १८. मांडीवर.

छभे! ॥ १०६ ॥ लागतसें[1] तुझीया पाया, । मातें वोपीं सुंदर काया, । माझी होऊनि[2] वडील[3] जाया । भाग्य भोगीं इंद्राचें.' ॥ १०७ ॥ द्रौपदी म्हणे, 'आतां ऐकें, । मागां[4] उपेक्षिलासी मुखें । तें गंधर्व आणि लोकशंके[5] । शंकोनीयां[6] जाण पां. ॥ १०८ ॥ आतां पुरवूं[7] तुझिया आर्ता[8] । ऐसें पातलें असे चित्ता,[9] । तुवां सांडोनियां चिंता । स्वस्थ मनसें[10] असावें. ॥१०९॥ आणावया भक्ष[11] आणि मदिरा[12] । सुदेष्णा धाडील तव मंदिरा, । ते वेळे सांगेन विचारा । त्या संकेतें वर्तावें.' ॥ ११० ॥ ऐकोनि सैरंध्रीची गोष्टी । कामातुरा आल्हाद[13] पोटीं । 'त्रैलोक्याचे राज्यपटीं[14] । बैसलों[15]' ऐसें मानितू. ॥ १११ ॥ दिवस गेलिया अस्तातें । सुदेष्णा म्हणे सैरंध्रीतें, । 'तृषा लागली असे मातें, । मद्य आणीं प्राशना. ॥ ११२ ॥ जाऊनियां कीचकाचिया घरा । आणीं भक्ष आणी मदिरा, । अप्रीत[16] उपजे त्या प्रकारा । नाचरावें शहाणीये[17]!' ॥११३॥ येरी म्हणे, 'वो! जनस्वामिणी[18]! । परिचारिका[19] पाठवीं कोण्ही, । भक्ष आणि मद्य दोन्ही । क्षणें आणील तव आज्ञे.' ११४ ॥ येरी म्हणे, 'वो शुचिर्मुते[20]! । तूंचि आणीं आपुलिये हातें, । आणिकें आणिलें[21] तें मातें । रुची[22] नेदी सर्वथा.' ॥ ११५ ॥ आग्रह[23]

१. 'लागतों' असें पाठांतर. आतां आर्जव सुरू झालें. हा **परिवृत्ति** अलंकार. २. 'होई वडील भार्या' असाही पाठ आहे. ३. पट्टराणी. 'वृद्धा'चा 'वडील' झाला. ४. पूर्वी मीं तुझा धिक्कार केला. (मागें ओव्या २७–३१ व ३८–४१ पहा). 'मागें उपेक्षिलें म्यां मुखें' असाही पाठ आहे. ५. लोकलज्जेला. 'मागां उपेक्षिलें तें गंधर्वशंके । आणि लोकजनलाजे मुखें' असाही पाठ आहे. ६. भिऊन. ७. पुरवूं या–असा अर्थ. 'पुरवीन' असें पाठांतर. ८. बळकट इच्छा. ९. 'असें उपजलें माझिया चित्ता' असाही पाठ आहे. द्रौपदीला हें बोलतांना काय वाटलें असेल! १०. 'नावेक' असें पाठांतर. नावेक=क्षणभर, थोडें. ११. 'अन्न आणि सुरा' असें पाठांतर. १२. दारू. १३. 'कामातुर आल्हादे पाठी' असाही पाठ आहे. पाठीं=नंतर, मागाहून आल्हादे=आल्हादला, हर्षला. १४. गादीवर. १५. 'बैसविलेंसें मानितू' असें पाठांतर. १६. अप्रीति, असमाधान, द्वेष. १७. 'सुजाणे' असें पाठांतर. १८. द्रौपदीनें 'तुजपाशीं अनेक सेवक आहेत' हें 'जनस्वामिणि' ह्या शब्दानें सुदेष्णेस सुचविलें आहे. **परिकर** अलंकार आहे. १९. दासी, सेविका. २०. निर्मले! पवित्रे! सैरंध्री इतर सर्व दासींपेक्षां जास्त स्वच्छ असल्यामुळें तिला हें विशेषण लाविलें आहे. 'शुचिस्मिते!' (=जिचें स्मित निर्मळ आहे अशी) असाही पाठ आहे. मुळांत पुष्कळ ठिकाणीं द्रौपदीला 'शुचिस्मिते!' असें म्हटलेलें आहे (अध्याय २१।२४ व अध्याय २२।२). २१. आणिलेलें. 'आणिल्या' असें पाठांतर. २२. गोडी, चव. सुदेष्णा काय लाडानें बोलते आहे! २३. 'आग्रह जाणोनि विवंचने । क्षणार्धें गेली उद्वेग मनें । कीचकें देऊनियां मान । म्हणे, बैस आसनीं' असाही पाठ आहे.

जाणोनी[1] वचनें । कृष्णा गेली उद्विग्न मनें, । कीचकें सन्मानुनी मानें ।
म्हणे, 'बैसें आसनीं.'[2] ॥११६॥ अति लगबगां धांवे धरूं, । तंव ते[3] म्हणे, 'केला
[4]अंगिकारू, । स्वस्थ नैवेक धरीं धीरू । [6]गुंज कांहीं बोलतसें. ॥ ११७ ॥ बृह-
न्नळा[7] नृत्यागारीं । दिवसा [8]नाचवी बहुत कुमरी, । रात्रीं आपुलाले घरीं । प्रवे[9]-
शती सकळीका. ॥ ११८ ॥ तो [10]एकान्त असे बरवा, । तो ठाव आणिकां नें[11]
ठांवा, । तेथें नेमिल्यां[12] काळीं तुवां । शीघ्र यावें ममाज्ञा. ॥ ११९ ॥ आजि मातें
उपोषण, । नाहीं तांबूलभक्षण, । केलें नाहीं जळ प्राशन । नेम जाणे सुवृत्ती.[13]
॥ १२० ॥ उदईक होतां सूर्यास्तू । पूर्ण होईल मनोरथू, । हाची दोन्हीचा[14]
संकेतू । नृत्यशाळे मिळूं[15] मिळेणीं. ॥ १२१ ॥ जे कां कुंकुमतांबोळहीना,[16] ।
रुदीत, क्षुधीत, दुर्मुखी, [17]मळिणा । भोगीं [18]वर्जिली अंगना । [19]मन्वादिकीं निर्धारीं.
॥१२२॥ उदईक चारी प्रहर दिवसू । धैर्ये आंवरीं मानसू, । त्यानंतरीं सुखसंतोषू ।
[20]जन्मवरी भोगिसी. ॥ १२३ ॥ [21]गंधर्व अथवा [22]अन्य लोकांतें । प्रगट न करीं
[23]वारियातें, । तरीच येणें [24]घडेल मातें । हें निर्धारें जाण पां. ॥ १२४ ॥ निबीड

---

१. सुदेष्णा बोलली त्यावरून. २. 'कीचक मानोनियां समाधान । म्हणे, बैस वो ! आसनीं' असाही पाठ आहे. ३. द्रौपदी. 'येरी' असें पाठांतर. ४. तुझ्या म्हणण्याचा अंगिकार केला, तुझें बोलणें मला मानवलें. पंतांनीं याच प्रसंगीं म्हटलें आहे:—'त्यारि खरें भासेसें प्रियशिक्षित सस्मित स्वयें वदली । परि कांपली सतीची तनु जैशी मंद मारुतें कदली ॥.' (विराटपर्व, अध्याय १ गीति ११९). पंतांचें पातिव्रत्यावर केवढें निःसीम प्रेम हें ! ५. क्षणभर. ६. गुप्त गोष्ट. 'तुजसी' असें पाठांतर. ७. 'बृहन्नळेच्या नृत्यागारी । दिवसा नाचती सुंदरी' असाही पाठ आहे. ८. नाचावयास शिकविते. 'नाचवीतसे नारी' असें पाठांतर. ९. 'वसती' असें पाठांतर. १०. तें एकांतस्थळ. ११. माहित नाहीं. १२. ठरलेल्या वेळी. १३. ज्याचें सद्वर्तन आहे असा, सच्छील. 'नेम जाण व्रताचा' असा पाठभेद आहे. तसाच 'नेमें जाण सुवृत्तीं' असाही दुसरा पाठ आहे. १४. 'दोघांचा' असा पाठ आहे. १५. एकवट होऊन जाऊं. १६. तांबोल=तांबोळ=तांबूल म्हणजे विडा. १७. घाणेरडी. (पक्षीं) रजस्वला. येथें श्लेष आहे. 'रुदित–वदना क्षुधिता जाणा' असें पाठांतर. १८. निषिद्ध म्हणून सांगितलें. भोगीं=भोगाला, उपभोगाला. 'वर्जिल्या' असें पाठांतर. 'कामेच्छा प्रबळ झाली असतांहि ऋतुमती स्त्रीशीं पहिल्या चार दिवसांत संयोग करूं नये' असें मनुस्मृतींत सांगितलेलें आहे (अध्याय ४ श्लोक ४० पहा). १९. मनु आदि शास्त्रकारांनीं. २०. आजन्म, आयुष्य असे तोंपर्यंत. वरी=पर्यंत. 'वरी' हा शब्द विशेषतः स्त्रियांच्याच तोंडी येतो. २१. सैरंध्रीचे पति पंच गंधर्व. २२. 'आणिकांतें' असें पाठांतर. २३. वाऱ्याला सुद्धां कळवूं नको. हें सगळें बोलणें कविनिर्मितच आहे. २४. तरच माझें येणें होईल, तरच मी येऊं शकेन.

[१]पाडिजे अंधकारू, । [२]ने कीजे शब्द [३]साचारू.' । कीचक म्हणे, 'हा विचारू । मज बहुत मानला.' ॥ १२५ ॥ संतोष मानूनियां हृदयीं । आवडीं हस्त [४]ठेविलें पायीं । [५]आज्ञा देवोनि म्हणे, 'जायीं । शीघ्र येईं [६]नेमातें.' ॥ १२६ ॥ कृष्णा पाहोनि एकान्त । भीमसेना जाणवी मात, । 'उदईक कीचक असे येत । नेम करूनि [७]मजलागीं ॥ १२७ ॥ नृत्यशाळे तो आलिया । तुम्हीं जावें तया ठाया.' । भीम म्हणे, '[८]माझिया कार्या । नलगे मातें [९]सांगणें.' ॥ १२८ ॥ सूर्योदयीं कीचक जाणा । पातला भगिनीच्या दर्शना, । म्हणे, 'आजि माझिया मना । परमानंद [१०]नें संडे. ॥ १२९ ॥ सैरंध्री देऊनियां अनुमोदना । आजी येतसे भोगसदना, । सूर्य [११]नें वंचे अस्तमाना । [१२]लागवेगें [१३]मंदटू. ॥ १३० ॥ [१४]मुहूर्त लोटतां सांज वेळे, । एकटा पातला नृत्यशाळे, । जैसा पाश घालूनि [१५]काळें । मृत्युठाया वोढिजे. ॥ १३१ ॥ [१६]चांदवा वांधिला सूर्यपुट । आडवें दिधलें [१७]वर्खकपाट । [१८]अरळ दाटलें घनदाट । हेममंचकीं स्वहस्तें. ॥ १३२ ॥ कामभोगाचेनि [१९]तवंगें । डोळ्या पातया पातें न लागे, । विरहताप माजला अंगें । [२०]प्रळयेंनळासारिखा. ॥ १३३ ॥ उठे बैसे क्षणक्षणीं, । [२१]सांचुल होतां भावी मनीं, । म्हणे,

---

१. 'पाहिजे' असें पाठांतर. २. 'न कीजे तिजियाचा संचारू' असा एक पाठ आहे, व तो देखील सुबोध आहे. ३. खरोखर, निश्चयेंकरून. 'न कीजे शब्दाचा संचारू' असें पाठांतर. ४. कीचकानें ठेविला. ५. आज्ञा देणारी सैरंध्री. कपटनाटकाला आरंभ तर बरा झाला. ६. संकेताप्रमाणें. ७. माझ्यासाठी. 'नेम केला मज सवें' असाही पाठ आहे. ८. माझ्यावर सोपविलेल्या कामांत. 'इया कार्या' असें पाठांतर. ९. काय भीमाची उतावळी ही! १०. न संडे=ओसंडे. ओसंडणें=बाहेर फेंकणें, टाकणें. मावत नाहीं; मला अति आनंद झाला आहे-असा भाव. ११. जात नाहीं. 'वजे' हाही पाठ आहे. तुकारामाच्या अभंगांत हा शब्द फार वेळ येतो. 'न पवे' असें पाठांतर. १२. लवकर. कीचकाची घाई सहजच आहे. १३. मंद, हळूहळू चालणारा. १४. सायंकाळीं एक दोन घटका झाल्यावर. १५. कामांधाला ही उपमा कशी तंतोतंत लागू पडते. १६. छत. १७. कपाट=दार, कवाड. सर्व कारस्थान गुप्त राहावें म्हणून ही खटपट आहे (ओवी १२४ पहा). 'आड केलें कपटपट' असें पाठांतर. तसेंच 'कपटपट' बद्दल 'अभ्रकपाट' 'शुभ्रपट' अशीं पाठांतरें आढळतात. १८. अरळ=फूल. कीचकानें स्वहस्तानें घनदाट पुष्पशय्या तयार केली-असा अर्थ. १९. तवंग=डोळ्यांत येणारा भुरीचा पापुद्रा, सारा. 'तगबगें' हा पाठही चांगला आहे. तगबग अगर तगमग=चैन न पडणें-हा अर्थ प्रसिद्ध आहे. २०. 'विष:प्रळयासारिखा' असा अन्य पाठ. २१. कांहीं खटखुट होतेंसें वाटतांच, चाहूल ऐकावयाला येतांच.

'पातली कामिनी[1] । नेमकाळीं नेमिष्ठे[2].' ॥ १३४ ॥ यानंतरें अर्धराती । भीम[3] पातला भद्रजाती[4], । कामीक[5] म्हणे, 'परमप्रीती । बैसें मंचकीं वल्लभे[6] !'॥१३५॥ म्हणे[7], 'उशीर लाविला बहुत.' । वक्षस्थळीं टाकिला हात । कठीण लागतां निर्भ्रांत[8] । काममोहें नोळखे. ॥ १३६ ॥ 'वाट पहातां शीणले[9] नयन, । युगासमान वाटला[10] क्षण, । आतां देवोनि[11] आलिंगन । अंगसंगीं निववीं कां.'॥१३७॥ पुढां करूनियां वदना । घेऊं धांवे[12] मुखचुंबना, । भीमें ताडिला चंडकणा[13] । हस्तभारें निष्ठुरें[14]. ॥ १३८ ॥ मग म्हणे, 'कोण रे! धीट[15]?' । येरू[16] म्हणे, 'मी गंधर्वश्रेष्ठ. । द्रौपदीभोगाचा स्वाधिष्ट[17] । स्वाद चाखवूं[18] पातलों.' ॥ १३९ ॥ हस्त धरूनि हासडिला[19], । तंव कीचक झोंबीये मिसळला, । दोघां संग्राम माजला । अत्यद्भुत ते काळीं. ॥ १४० ॥ अंतरें[20] पाहे जंव पांचाळी । तंव दोघे मिसळले केशकवळीं[21], । मुष्टी मारितां वक्षस्थळीं । धरातळीं थरकंपु[22]. ॥१४१॥ घाय घालिती परस्परें, । दणाणती दिगंतरें[23], । महाप्रासादांची[24] शिखरें । खचोनि

---

१. कामातुर स्त्री. 'कामिनी' हा शब्द येथें सहेतुक योजिलेला असावा. 'याज्ञसेनी' असें पाठांतर. २. संकेत पाळणारी. ३. मुळांत भीम आधींच जाऊन दडून बसला होता—असें आहे. (अध्याय २२ श्लोक ३८). ४. हत्ती. हत्तीसारखा बलाढ्य भीम—असा अर्थ. ५. कामातुर, कामुक. वामनपंडितांनीं ह्या प्रसंगाचें केलेलें वर्णन:—ठेवी कीं सुरतप्रसंगचतुरे ! या मंचकीं विग्रहा । नाणीं कांहि मनांत पूर्व करणी टाकीं समग्रा ग्रहा. ॥ (विराटपर्व, अध्याय ३ श्लोक २०८). ६. प्रिये ! प्रस्तुत प्रसंगी कीचकाचे भाषण तीन श्लोकांत (४४ ते ४६) व भीमाचें उत्तर दोन श्लोकांत (४७–४८) मुळांत दिलेले आहे. पण मुक्तेश्वरानें प्रत्येकाच्या तोंडीं प्रसंगास साजेसें फक्त एक एक वाक्य घालून आपल्या आंगचें व्यवहारचातुर्य प्रकट केले आहे. ७. ह्याचा कर्ता—भीम. ८. निर्भ्रांत, निःशंक, निर्भयपणें. कठिण लागलें तरी कीचकाला संशय उत्पन्न झाला नाहीं ! काय भ्रांति ही ! ९. थकले. 'शीण'शब्द 'क्षीण'शब्दापासून झाला. 'शीर्ण'शब्दापासूनही झाला असें कोशकार म्हणतात. १०. 'लोटे' असें पाठांतर. कामातुराच्या मनाची अशी स्थिति होणें साहाजिकच आहे. ११. 'देईं' असें पाठांतर. १२. 'करूं धांवे' असें पाठांतर. १३. चपराक, थप्पड. भीमानें कीचकाच्या थोबाडीत मोठ्यांदां मारिली. १४. 'कठोर' असें पाठांतर. १५. उद्धट. १६. भीम उत्तर देतो. १७. मधुर. १८. तुला चाखूं द्यायाला. १९. जोरानें ओढला. २०. गुप्तपणानें, दूर अंतरावरून. २१. केश ओढण्यामध्यें. २२. 'भूकंपू' असा अन्य पाठ. २३. 'गिरिकंदरें' असा पाठभेद. २४. मोठमोठ्या राजवाड्यांचीं.

पडती धडधडा. ॥ १४२ ॥ [1]लोकं म्हणती, '[2]महामारी । कोठोनि पातली इये नगरीं?' । कोण्ही न निघती बाहेरी । भयें [3]अंतरीं दडाले. ॥ १४३ ॥ उडोनि हृदयीं [4]ताडिती लाता । [5]वज्रमुष्टी मारिती माथां । पृष्ठीं ताडितां [6]निर्घात । दणदणाट माजला. ॥ १४४ ॥ कोपर, [7]हुमणीया, चपेट । ताडितां अस्थि होती [8]कुट; । कीचक म्हणे, 'भरीन [9]घोंट । [10]मैत्रावरुणासारिखा.' ॥ १४५ ॥ भीम म्हणे, 'नृसिंहें [11]तवकें । [12]असुर विदारिला नखें, । तैसें अंग एकून एकें । [13]छिन्नभिन्न करूनि टाकीन.' ॥ १४६ ॥ शत्रू [14]नवनागसहस्रबळी । भीमें कवळितां [15]कंठनाळीं । बळें ताडूनि बाहुबळीं । हस्त उखळोनी [16]टाकिलें. ॥ १४७ ॥ भिडती नक्र आणि [17]गजेंद्र, । [18]शरभपक्षी आणि [19]मृगेंद्र, । [20]वृत्रासुर आणि देवेंद्र, ।

---

१. कांहीं हस्तलिखितांत ही ओवी १५८ वी आढळते. २. पटकी. किंवा, मारिः=मारी= विध्वंस, नाश. महामारी म्हणजे ज्यांत मोठा नाश आहे, ज्यांत शत्रूवर मोठा मारा केला जातो, ज्यांत शत्रूवर मोठा मार पडतो तें युद्ध. मुक्तेश्वरानें जरासंध—भीमयुद्धाच्या प्रसंगीं 'प्रवर्तला महामारी । पतंग जैसा वैश्वानरी' । (सभापर्व, अध्याय ७ ओवी ५१) असें वर्णन केलें आहे. मोरोपंतांनींही एके ठिकाणीं 'युद्ध तें महामारी' असें म्हटलें आहे (कर्णपर्व, अध्याय १२ गीति ११). हा युद्धाचा वणवा कोठून पेटला?—असा भाव. ३. गृहामध्येंच. ४. 'मारिली लात' असें पाठांतर. ५. 'वक्षस्थळीं मुष्टीघात' असाही पाठ आहे. ६. ठोसे, धक्के. ७. हुमणी=बुक्की, ठोंसा. ८. चूर्ण. 'पीठ' असें पाठांतर. ९. घोंट=चूळ. अगस्त्यऋषीनें एका आचमनांत सर्व समुद्र पिऊन टाकला, अशी कथा आहे. १०. पूर्वी किलेक असुर समुद्रामध्यें लपून राहून देव, ऋषी व इतर जन यांस अतिशय पीडा देत असत. यामुळें इंद्रानें अग्नि आणि वायु यांस समुद्र शोषावयास सांगितलें. तें त्यांनीं अमान्य केल्यामुळें त्यानें त्या दोघांसही शाप दिला, कीं तुम्हास मृत्युलोकीं जन्म घडेल. त्याप्रमाणें त्यांस मित्रावरुणांपासून जन्म प्राप्त झाला. मित्रावरुणांनीं आपलें तेज कुंभांत सोडिलें होतें, त्यापासून अगस्त्य व वशिष्ठ उत्पन्न झाले होते, अशी कथा आहे. मित्र व वरुण या ऋषींचे पुत्र ते मैत्रावरुण (अगस्त्य व वशिष्ठ). पण येथें अगस्त्य असें समजावयाचें. ११. क्रोधानें, सामर्थ्यानें. १२. हिरण्यकशिपु. भगवद्भक्त प्रल्हादाचा पिता. १३. 'खंडविखंड' असा अन्य पाठ. १४. नऊ हजार हत्तींचें आहे बळ ज्याला असा. १५. नरडें धरून. (मूळ श्लोक ७६ पहा). १६. 'हस्त उखळे निघातें' असाही पाठ आहे. १७. गजेंद्र हा इंद्रद्युम्न नांवाचा राजा होता. एकदां अगस्त्यऋषी त्याच्या भेटीस गेले असतां त्यानें ऋषीचा योग्य रीतीनें आदरसत्कार न केल्यामुळें त्यांनीं त्यास 'तुला गजयोनी प्राप्त होईल' असा शाप दिला. नक्र हा मुळचा हूहू नामक एक गंधर्व होता. त्यानें देवलऋषी गंगेंत स्नान करीत असतां, थट्टेनें त्यांचा पाय धरून ओढला, यामुळें देवलांनीं त्यास 'नक्र होशील' असा शाप दिला. विशेष माहितीसाठीं मुक्तेश्वरकृत 'गजेंद्रमोक्ष' हें प्रकरण पाहावें (मुक्तेश्वरकृत स्फुट काव्यें, पृष्ठें १७२–१७४). १८. सिंहाहून बलिष्ठ व आठ पायांचा कल्पित प्राणी. १९. सिंह. शरभपक्षी सिंहास मारतो, अशी पौराणिक समजूत आहे.

मूळवैरी[1] झुंजती. ॥१४८॥ महामाया[2] महिषासुर,[3] । शंकर आणि अंधकासुर[4] ।
हनुमंत आणि अखयाकुमर[5] । अशोकवनीं[6] ज्यापरी. ॥ १४९ ॥ पूर्वीं सुग्रीव
आणि वाळी[7] । झुंजिन्नले[8] किष्किंदातळीं[9] । तैसेच कीचक[10] आणि भीम बळी ।
युद्धकंडना[11] मिसळले[12]. ॥ १५० ॥ भीम म्हणे, 'आंगवणें[13] । दाऊनि, शेखीं
जासी प्राणें, । जैसीं व्याघ्राप्रती[14] हरणें । शिंगें[15] पुढां झाडिती. ॥१५१॥ मागें
सरोनी धांवती पुढें । हृदयीं थडका मारिती गाढे[16] । एकमेकां ईडेपाडे[17] । महा-
पर्वत पैं जैसे. ॥ १५२ ॥ यानंतरें भीम जगजेठी । वर्मस्थळीं[18] सहस्र मुष्टी ।

---

२०. 'रत्नासुर' असाही पाठ आहे. ह्या असुराविषयीं कांहीं माहिती आम्हास आढळली नाहीं. वृत्रासुर अमर असल्यामुळें इंद्रानें दधीचि ऋषीच्या अस्थींचें विश्वकर्म्याकडून वज्र करविलें. पुढें वृत्रासुर व इंद्र यांच्या युद्धांत हा सदरहू वज्राच्या योगानें इंद्राच्या हातून मरण पावला.

१. जन्माचे वैरी. 'मूळ वैरें' असें पाठांतर. दृष्टांत खासे आहेत. २. आदिमाया, भवानी. ३. हा रंभ नामक दानवास महिषीपासून झालेला पुत्र. ह्यानें तप करून महादेवापासून 'मला पुरुषव्यक्तीपासून मृत्यु नसावा' असा वर मिळविला होता. हा प्राणीमात्रांस फार पीडा देऊं लागल्यामुळें देवीनें याचा वध केला—अशी कथा आहे. ४. कैलासावर स्वारी करून पार्वतीचें हरण करूं इच्छिणारा राक्षस. ह्या असुरानें पार्वतीच्या लावण्यावर मोहीत होऊन तिचें हरण करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे त्याचें आणि शिवाचें मोठें घोर युद्ध झालें. त्यांत त्याच्या रक्तापासून अनेक अंधकासुर उत्पन्न होऊं लागले. म्हणून त्याचें रक्त शुष्करेवती नामक देवतेकरवी नाहींसें करविलें. तेव्हां तो एकटाच अवशिष्ट राहिला व तो हतवीर्य होऊन महादेवास शरण आला. यामुळें महादेवानें प्रसन्न होऊन त्यास आपले गणत्व दिलें. अंधकासुर हाच भृंगी नामक सेवक होय (सौरपुराण, अध्याय २९). ५. रावणाचा मुलगा. याचें नांव अक्ष. त्याचें मराठीत 'अखया' असें रूप झालें. ६. लंकानगरींतील एक उपवन. येथेंच रावणानें सीतेस ठेविलें होतें. ७. सुग्रीव आणि वाळी हे ऋक्षरजा नामक वानराचे पुत्र. वाळीची स्त्री तारा हिचें सुग्रीवानें हरण केल्यामुळें त्यांचें मोठें युद्ध झालें. त्यांत वाळी मारला गेला—अशी कथा आहे. ८. झुंज करिते झाले. ९. किष्किंधा नगरी ही वाळीची राजधानी होती. तळ=सैन्याची छावणी, गोठ, शिबिर. 'किष्किंधाचळीं' असें पाठांतर. किष्किंद नांवाचा एक पर्वतही होता. १०. 'तैसेच कीचक आणि बळी । भीम भिडती प्रतापें' असाही पाठ आहे. ११. युद्धांतील मारामारीला. १२. 'तैसेच कीचक आणि बळी । भीम भीडती प्रतापें' असाही पाठ आहे. १३. आंगची शक्ती. शेखीं=शेवटीं. १४. 'जैसें व्याधाप्रती······झाडिजे' असा अन्य पाठ. १५. शिंगांनीं पुढें लोटतात—असा भाव. झाडणें=लोटणें, झटकणें, हाकलून लावणें. १६. हे दोघे युद्धपंडित. १७. नेटाने, अर्थात् वीरश्रीनें, इरीरीनें. १८. मर्मस्थळीं, शरीराच्या नाजूक भागीं.

बळें ताडितां, भूतळवटीं[1] । मूर्च्छा दाटोनि[2] पडियेला. ॥ १५३ ॥ पुढती उचलोनियां, शिरीं । भोवंडोनी[3] टाकिला पृथ्वीवरी[4] । सव्य[5] पाय रोवोनि[6] उरीं । हस्त दोनी उपडिले[7]. ॥ १५४ ॥ अंगुष्ठ रोवोनि[8] नाभीस्थानीं । छेदोनि सांडिले[9] चरण दोनी, । शीस[10] पिळोनियां[11] धरणी । भिन्न करोनिया टाकिलें. ॥ १५५ ॥ जैसा किरांत[12] शस्त्रघातें । चारी पाद ग्रीवा[13] हातें[14] । छेदोनियां कुरंगातें[15] । भिन्न करी भक्षावया ॥ १५६ ॥ तैसें[16] निवटूनि[17] अस्थिजाळ । शरीर[18] केलें मांसगोळ[19]. । लोटले[20] रक्ताचे खळाळ । नदीलोटासारिखे. ॥ १५७ ॥ सुरीं[21] गर्जोनि जयजयकारीं । पुष्पें टाकिलीं भीमावरी । म्हणती, 'मारूनि कौरवें[22] वैरी । जगीं होइजे[23] यशस्वी.' ॥ १५८ ॥ समय होतां प्रातःकाळा । भीम प्रवेशला पाकशाळा । पुढील निरूपण भूपाळा ! । जन्मेजया ! परियेसी[24]. ॥ १५९ ॥ यापरी झाला कीचकवधू, । पुढां वधिजेति[25] त्याचे बंधू । तेही कथेचा विनोदू[26] । श्रोतीं सादरें[27] परिसावा. ॥ १६० ॥ इति श्रीविराटपर्व[28] भारत । कथारूपें[29] परमामृत ।

---

१. 'भू–तटीं' असें पाठांतर. २. दाट (बळकट) मूर्च्छना येऊन. (मागें अध्याय २ ओवी ७९, पृष्ठ २५ पहा). 'मूर्च्छा येवोनी' असें पाठांतर. ३. गरगर फिरवून. ४. जमिनीवर. 'दूरी' असें पाठांतर. ५. डावा पाय. ६. 'देवोनि' असाही पाठ आहे. रोवणें=घट्ट बसविणें, दाबून ठेवणें, स्थिर करणें. ७. 'उपटिले' असें पाठांतर. ८. खुपसून, टोंचून. ९. (कापून) सांडले=टाकून दिले. १०. शिर, मस्तक. ११. पिळवटून–असा अर्थ. १२. भिल्ल, म्लेच्छ. १३. मान. १४. हातानें. १५. हरिणाला. 'कूर्मातें' असें पाठांतर. कूर्म=कासव. १६. मूळांत असें आहे:—तं सम्मथितसर्वाङ्गं मांसपिण्डोपमं कृतम् । म्हणजे:—(भीमानें) त्याचें (कीचकाचें) सर्व शरीर घुसळून त्याचा केवळ मांसाचा गोळा केला (अध्याय २२ श्लोक ८३). १७. नाहींसें करून. १८. 'शीर' असें पाठांतर. १९. मांसाचा गोळा. 'गोळांगुळ' असा पाठ आहे. पण तो लेखकाचा हस्तदोष असावा. कदाचित् लेखकाच्या मनांतील मूळ पाठ 'गोल गोल' (=अगदीं वाटोळा गोळा) असा असावा. गोलांगुल=वानर. २०. 'सोडिले' असें पाठांतर. २१. देवांनीं. २२. कौरव हेच वैरी त्यांस मारून. २३. 'होय' असें पाठांतर. २४. येथें मूळांतील जवळ जवळ २२ वा अध्याय संपतो. २५. मारिले जाणार आहेत. २६. मनोरंजक प्रकार. २७. 'सावध' असें पाठांतर. २८. पर्व=पेर, भाग. 'पर्वस्यादुत्सवे ग्रंथौ प्रस्तावे लक्षणान्तरे' इति विश्वः । २९. कथा हेंच परमामृत. 'कथा-रूपें सज्जनचित्त । प्रेमोदकें सोमकांत । पाझरती अमृतोदकीं' असाही पाठ आहे.

सज्जनचि ते सो[1]मकांत । प्रेमोदकें पाझरती. ॥ १६१ ॥ मुक्तेश्वराची सुवाणी । [2]पुष्पलतिका व[3]चन सुमनीं, । लीलाविश्वंभर[4]गुरुचरणीं । अर्पूनि, अ[5]र्पी श्रोतयां. ॥ १६२ ॥

॥ इति श्रीविराटपर्वणि कीचकवधो नाम तृतीयोऽध्यायः ॥

---

## अध्याय चवथा.[6]

प्रातःकाळ होतां प्राप्त । द्रौपदी रायातें जाणवी मा[7]त, । सकळ ऐकवी वृत्तांत । महाअनर्थ रात्रीचा. ॥ १ ॥ 'कीचक का[8]मभावार्थीं । पातला नृत्यशाळेप्रती । पंचगंधर्व माझे पती । तीहीं मारोनि सों[9]डिला. ॥ २ ॥ प्रेत पडलें असे धरणी । तें जाऊनि विलोका नयनीं, । [10]पुंढील कर्तव्य आप्तजनीं । शीघ्र केलें पाहिजे.' ॥ ३ ॥ ऐसी ऐकतांचि गोष्टी । धांवल्या पौरजांच्या था[11]टी, । नारीनरांचिया बहु दाटी । नृत्यशाळे [12]न [12]समती. ॥४॥ ब्राह्मण, क्षत्री, वैश्य, शूद्र, । [13]चौटी, सोनार, शिंपिकार, । कोष्टी, साळी, पटवेकर, । [14]बावन्न [15]वर्ण पातले.॥५॥ पाद[16]पक्षग्रीवाहीन । [17]करूनि सांडिला छिन्नभिन्न. । ऐसियातें वधी[18]लें कोण? । बळसंपन्न कीचकू. ॥ ६ ॥ वृद्ध वृद्ध बोलती वचनीं, । 'न कळे ई[19]श्वराची करणी, । कांहीं वदों नये वचनीं, । चो[20]जें नयनीं देखिजे. ॥७॥ विराट पावला

---

१. चंद्रकांत मणी. २. 'पुष्पकलतिका' असें पाठांतर. लतिका=नाजूक लता. ३. सुवाणी हीच पुष्पलतिका, व वचनें हींच सुमनें (फुलें)-असा भाव. 'कांचन' असें पाठांतर. ४. 'श्रीचरणीं' असें पाठांतर. ५. 'अर्चन' असें पाठांतर. अर्चन=पूजा. ६. ह्या अध्यायांत मूळ २२ व्या अध्यायाच्या शेवटचे ८।९ श्लोक, आणि अध्याय २३ व २४ यांतील कथाभाग आला आहे. ७. वर्तमान. ८. कामेच्छा तृप्त करण्यासाठीं. 'कामाचिये आसक्ती' असा अन्य पाठ. ९. 'टाकिला' असाही पाठ आहे. १०. उत्तरकार्य. 'सकळ' असाही पाठ आढळतो. ११. समुदाय. १२. मावत नाहींत. 'नारीनरांची······न समाय' असें पाठांतर. १३. कोष्ट्यांची एक जात. 'चाटी शिंपी सुवर्णकार' असाही पाठ आहे. १४. मुक्तेश्वराच्या वेळेला बावन्न जाती होत्या कीं काय? ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे चार वर्ण प्रसिद्धच आहेत. १५. 'ताफे' असें पाठांतर. ताफा=घोळका, फड, टोळी. १६. 'पादवक्ष°' असें पाठांतर. वक्ष=ऊर, छाती. १७. 'कुक्कुट सांडिजे करोनि भिन्न' असाही पाठ आहे. १८. 'तैसें यातें वधिलें कोणें?' असा अन्य पाठ. १९. 'ईश्वरमायेची' असें पाठांतर. २०. चमत्कार. 'तुका म्हणे उगी रहावें । जें जें होईल तें तें पहावें. ॥' अशी आपली वागणूक असावी, असा भाव.

पुत्रांसहित[१] । प्रधान सेनेसीं[२] समस्त, । सुदेष्णा आली शोक करित । पाहे प्रेत बंधूचें. ॥८॥ 'प्राण वेंचोनियां निर्फळ[३] । विराट केला हो! निर्बळ, । आतां पृथ्वीचे भूपाळ । राज्य घेतील आमुचें. ॥ ९ ॥ कीचकबळाच्या सामर्थ्यें । राजे धाकती[४] सभोंवते, । आतां[५] पीडिती आमुतें । राज्य घेतील सर्वही[६].' ॥ १० ॥ कीचकाचिया बहुत अंगना । करीत पातल्या शोकरुदना[७], । प्रेत वेष्टूनियां जाणा । हृदय हातें पीटिती. ॥ ११ ॥ पांचा आगळे एकशत[८] । कीचकबंधू बळसमर्थ । त्यांतें विराट आज्ञा करीत । 'प्रेतसंस्कार करावा[९].' ॥१२॥ प्रेत चालविलें स्मशानीं । बंधू प्रवर्तले दीर्घ रूदनीं, । म्हणती, 'राया ! आम्हां लागुनी । आणिक आज्ञा दिधली पाहिजे. ॥१३॥ सैरध्रीयें[१०] घेतला प्राण । तीचें करूं देह दहन, । पावकीं[११] घालूं हे बांधून । जेंवी नारळ[१२] होळिके[१३].' ॥१४॥ राजा म्हणे, 'गंधर्व येती । त्यांतें आवरावया शक्ती । अंगीं असेल, तरी हे रीती । विचारुनी[१४] वर्तावें. ॥१५॥ बंधूचिया संगती जाणा । जाणें न[१५]लगे यमसदना, । ऐसें कीजे[१६] विचक्षणा[१७]! । दीर्घदृष्टी विलोकें[१८].'॥१६॥ ते[१९] म्हणती, 'जी ! नरपार्थिवा ! । गंधर्वांचा कितुला[२०] केवीं[२१]? । युद्धा पातल्या मघवा[२२] । शिक्षा करूं प्रतापें.' ॥ १७ ॥ द्रौपदी कवळूनियां[२३] हस्तकें । चालविली रुद्रभूमिके[२४]. । येरी प्रलापोनि[२५], दुःखें । सर्व लोकां जाणवी[२६]. ॥ १८ ॥

---

१. 'पुत्रेंसहित' असें पाठांतर. २. सेनेसह. ३. फुकट, विनाकारण. हा सुदेष्णेचा शोक आहे. 'केवळ' असें पाठांतर. ४. धाक बाळगतात, भितात. ५. 'आतां मानितील आमुतें । तृणप्राय हलुवट ।' असाही पाठ आहे. हलुवट=क्षुद्र, तुच्छ. ६. हा सगळा शोक स्वार्थपर आहे. 'माझें कसें होईल' हा बहुतेक शोकाचा तात्पर्यार्थ ! ७. 'शंख रुदना' असा अन्य पाठ. ८. एकशें पांच. ९. 'करावया' असें पाठांतर. १०. सैरंध्रीसाठीं हा मरण पावला. ११. अग्नीत, विस्तवांत. १२. 'नारिकेळ'(=नारळ) असें पाठांतर. १३. पंतांनीं हा प्रसंग विशेष खुलविला आहे. विराटपर्व–अ० १ ला पहा. १४. विचार करून, विचारपूर्वक. १५. लागणार नाहीं. १६. 'ऐसी कीजे' असें पाठांतर. १७. हे दूरदृष्टी उपकीचकांनो ! १८. विलोक=अवलोकन, पाहणें. 'विवेकें' असें पाठांतर. १९. उपकीचक. २०. कितीसा, केवढा. (संस्कृत 'कियत्' पासून 'कितुला' हा शब्द झाला). २१. प्रतिष्ठा. २२. इंद्राला. पुष्कळ यज्ञ करून ब्राह्मणांस संतुष्ट करणारा, महासामर्थ्यवान् इंद्र. २३. पकडून, कवटाळून. २४. स्मशानीं. हें शंकराचें स्थान. अंत करण्याचें काम रुद्राचें आहे. २५. शोक करून. २६. खालील वाक्यें लोकांस उद्देशून आहेत, पण धर्ममीमांसा कळवावें हा अंतस्थ हेतु होय.

[1]जय, जयंत, विजयनामा, । जयत्सेन, जयद्बल सुकर्मा, । या पांचांच्याही पराक्रमा । दुजी उपमा असेना. ॥ १९ ॥ पांचही गंधर्व बळसमर्थ । असती [2]या देहाचे प्राणनाथ, । तयांतें जाण[3]वावा वृत्तांत । भार्या तुमची नेली दुरात्मीं. ॥ २० ॥ बांधोनि [4]होमिती पावका । हा अन्याय[5] असावा ठाउका.' । ऐसें जाणवितां लोकां । पांचांतेंही जाणवलें. ॥ २१ ॥ मग भीमसेन राहोनि गुप्त । [6]हांक मारी [7]गगनाआंत, । '[8]यांपासूनि भयाचा [9]वात । तूतें न लागे सर्वथा. ॥ २२ ॥ स्वस्थ होवोनि अंतःकरणीं । होईल तें विलोकीं [10]नयनीं.' । [11]येणें बोलें याज्ञसेनी । स्वस्थ चित्तें राहिली. ॥ २३ ॥ आडमार्गें उडोनि [12]भिंती । भीम पातला गुप्तगती । कोणा न कळतां [13]महामूर्ती । सिद्ध पुरुष [14]पैं जैसा. ॥ २४ ॥ रुद्रभूमिकेचिये तळवटीं । शमीवृक्षांची महादाटी । तेथूनि प्रकटला जगजेठी । [15]गंधर्वरूपा [16]अवगला. ॥ २५ ॥ [17]तालप्रमाण [18]विशालकर । हातीं प्रचंड तरुवर । देखोनि कीचकसहोदर । म्हणती, 'गंधर्व पातला!' ॥ २६ ॥ [19]शंख [19]करिती दोनी हातें । पळों लागले नगरपंथें, । भीमें धांवोनि [20]मागुतें । [21]वळोनि बळें आणिलें. ॥ २७ ॥ [22]बळें ओपितां वृक्षघात । एक एक झाले प्रेत, । पांचा आगळे एकशत । [23]कीचकबंधू मारिले. ॥ २८ ॥ कोणीं न देखतां डोळां ।

---

१. हीं धर्मभीमार्जुननकुळसहदेवांचीही पण नामें होत. गंधर्वांचीही हीं नांवें आहेत. २. 'माझे प्राणनाथ' असा अन्य पाठ. ३. 'तयांहीं जाणावा वृत्तांत' असाही पाठ आहे. ४. अग्नीला अर्पण करितात. ५. 'ऐसें जाणवतां लोकां । द्रौपदी करितांचि शोका' असाही पाठ आहे. ६. 'हांक मारिली अद्भुत । यापासाव भय तूतें । नाहीं जाण सर्वथा.' ॥ असाही पाठ आहे. ७. पाकशाळेंतून ही हाक त्यानें मारिली असावी. ८. या संकटापासून. ९. वारा, स्पर्श. 'वृत्तांत' असें पाठांतर. १०. 'चोज पहावें नयनीं' असाही पाठ आहे. ११. या बोलानें, आश्वासनानें. १२. (नगराचा) तट. १३. भीमाचें विशेषण. 'त्वरिती' व 'महामति' असे पाठभेद. १४. हा 'वै'चा तर अपभ्रंश नव्हे? पैं=खरोखर. १५. गंधर्वाचा वेष. 'रूप अद्भुत' असें पाठांतर. १६. घेतलें. १७. ताडाइतका उंच. १८. महाबाहु, आजानुबाहु. 'विशालदारु' असें पाठांतर. दारु=लांकूड, देवदार. १९. ही शोकसूचक चाल केव्हां पडली असावी? पूर्वी युद्धांत उत्साहस्फूर्तीसाठीं शंख वाजवीत. **भयानक** रस आहे. २०. मागें, (कीचकसहोदरांच्या) पाठोपाठ. २१. वळवून, फिरवून. 'बळें कवळोनि आणिले' असाही पाठ आहे. २२. 'बळें ताडितां वज्रघात' व 'बळें घालितां वृक्षपात' असे पाठभेद आहेत. २३. 'परस्परें' असें पाठांतर.

बल्लव प्रवेशला पाकशाळा, । वृत्तांत जाणवला भूपाळा । 'कीचकबंधू [1]निमाले.' २९
राजा हस्तें [2]पिटोनि भाळा । म्हणे, 'अद्भुत देखिलें डोळां । निरोपोनि मंत्रियां स-
कळां । प्रेतें दहन करविलीं.॥३०॥ [3]षष्ट वरी एकशत । भक्षूनि तोषविला पावक ।
याज्ञसेनी [4]प्रसन्नमुख । राजसदना पातली. ॥ ३१ ॥ सुदेष्णा म्हणे सैरंध्रीतें, ।
'तुझें चरित्र नकळे मातें । काय विचित्र वर्तलें येथें? । तुझेनि योगें कळेना.
॥ ३२ ॥ [5]रौत्रीपासुनी तुझेनि [6]गुणें । नगरीं उठलीं नानाविघ्नें, । [7]कीचका ऐसा
गेला प्राणें । बंधूंसहित [8]तुजलागीं. ॥ ३३ ॥ आतां राहूं नको येथें, ।
जायीं आणिक्या नगरातें.' । येरी हासोनि म्हणे [9]तियेतें, । 'होणार तैसें घडेल.
॥ ३४ ॥ बहुत काळ पैं लोटला, । स्वल्प [10]शेषें कांहीं उरला, । तूतें [11]धीर न धं-
रवे वहिला । तरी मी जायीन तत्काळ.' ॥ ३५ ॥ [12]कृष्णा येऊनि नृत्यशाळे ।
वृत्तांत सांगे [13]बृहन्नळे. । ते म्हणे, 'वो [14]पांचाळबाळे! । [15]चिंता कांहीं न करावी.'
॥ ३६ ॥ बृहन्नळा म्हणे वचनीं, । 'उत्तरे! माझे वरशिष्यिणी! । [16]सैरंध्रीचिये
संरक्षणीं । सादर तुवां असावें. ॥ ३७॥ तुझी जननी [17]उदासवचनीं । बोलोनि
दवडी आणिक्या स्थानीं; । तुवां [18]प्रबोधोनि, तियेच्या मनीं । प्रीती उपजे तें करीं.

---

१. 'प्राणरहित पसरले' असाही पाठ आहे. २. कपाळ पिटणें=नशीबाच्या नांवानें रडणें. ३. 'शतावरी एक शत' असा पाठ आहे पण तो चुकीचा आहे (ओवी २८ पहा). ही ओवी एका पोथींत नाहीं. ४. द्रौपदीस आनंद झालाच असेल, पण तो या प्रसंगीं दाखविणें हें सामान्य जनाप्रमाणें वर्तन झालें. ५. 'काल रात्री°' व 'काळ रात्री°' अशी पाठांतरें. ६. पायगुणानें. ७. कीचकासारखा अतुल प्रतापी. ८. तुझ्यामुळें. हा द्रौपदीवर झाडलेला ताशेरा अन्यायमूलक आहे. 'तूं आमच्याकडे आतां राहूं नको' असें सुदेष्णेला सांगायला विराटानें सांगितलें, असें मुळांत आहे (अध्याय २४ श्लोक ८–९). ९. तिला (सुदेष्णेला). १०. बाकी, शिल्लक. सैरंध्री फक्त तेरा दिवस राहाण्याची परवानगी मागत होती, असें मुळांत आहे. (अध्याय २४ श्लोक ३०). ११. 'धीर न वचे' असें पाठांतर. १२. द्रौपदी. ही द्रुपदराजाची कन्या. हिला पित्याच्या नांवावरून पांचाळी व याज्ञसेनी अशीं आणखी नांवें होतीं. हिची अंगकांति गौरवर्णांत किंचित् श्यामतामिश्रित असल्यामुळें द्रुपदराजानें कौतुकानें हिचें नांव 'कृष्णा' असें ठेविलें होतें. १३. 'बृहन्नळा जवळे' असें पाठांतर. १४. प्रस्तुत प्रसंगीं बृहन्नळा (अर्जुन) व सैरंध्री (द्रौपदी) हीं एकांतांत असल्यामुळें अर्जुनानें द्रौपदीला 'पांचाळबाळे!' अशी हांक मारिली. १५. 'चिंता न करीं मानसीं' असाही पाठ आहे. १६. 'सैरंध्रीतें' असें पाठांतर. १७. विरक्तीच्या बोलण्यानें. 'उदास वचनें तुझी जननी' असाही पाठ आहे. १८. तिची समजूत घालून, तिला समजावून.

॥ ३८ ॥ इतुकी देईं गुरुदक्षणा.' । उत्तरा नमस्कारी चरणा. । म्हणे, 'ये विषयीं मना । उद्विग्नता[1] नाणावी[2]'. ॥ ३९ ॥ उत्तरा म्हणे जननीलागीं, । **'वर्जिल्या[3] वर्ते जो कुमार्गीं । तो प्राणी अविचारसंगीं[4] । नाश पावतो कुकर्मे[5]. ॥ ४० ॥** कीचकें करितां हा अपराधू । कोण्ही न कराचि निषेधू, । पापकर्मे पावला वधू । दुष्ट, कपटी, दुरात्मा. ॥ ४१ ॥ तो अपराध ठेवोनि शिरीं । ईतें घालिती[6] बाहेरी, । तुमच्या विवेकाची[7] कुसरी । वेदीं शास्त्रीं नाढळे.॥४२॥ स्वल्प काळ लोटलिया । सहज जातील आपुल्या ठाया, । तुवां[8] बोलोनियां[9] वांया । अपकीर्ती माथां न घेणें. ॥ ४३ ॥ तीतें वदाल दुष्टवचन । तरी मी त्यजीन आपुला प्राण, । आणीक असे कारण । तें जाणवेल पुढारें[10]. ॥ ४४ ॥ पांचां गंधर्वांची वनितां । हेळसूनी[11] अपमान करितां[12] । तात्काळ पावाल अनर्था । हें निर्धारें जाण पां. ॥४५॥ **पश्चात्तापें हृदय फुटे, । आपुला[13] अन्याय आपणा न वाटे, । ऐसें कर्म विचारनिष्ठें[14] । नाचरावें सर्वथा.'** ॥४६॥ ऐसें सांगोनि सुदेष्णेतें । दुणाविलें[15] प्रीतीभावातें, । सन्मानिलें सैरंध्रीतें । धनें, वसनें, सुशब्दीं[16]. ॥४७॥ बृहन्नळा म्हणे, 'कुमारी ! । बुडविलें[17] उपकारसागरीं.' । येरी[18] म्हणे 'स्तवन न करीं; । मी किंकरी[19] निर्धारें.' ॥ ४८ ॥ संगीत नृत्यें[20] कळाकुसरी । पार्थ सिकवी स्नेहोंदरीं[21] । झाली शारदेचिये सरी[22] । विद्याधरी[23] निपुणत्वें. ॥ ४९ ॥

---

१. काळजी. २. 'न करावी' असें पाठांतर. ३. वर्जिलेल्या, वर्ज्य मानलेल्या, निषिद्ध. 'वर्जितां' असें पाठांतर. ४. अविचार केला म्हणून. ५. 'दुष्टकर्मी' असा अन्य पाठ. ६. 'घालिसी' असें पाठांतर. ७. शहाणपणाची चतुराई. ८. 'तुम्ही' असें पाठांतर. ९. व्यर्थ रागाऊन, बोलून. किंवा रागाऊन व्यर्थ अपकीर्ति करून घेऊं नको. १०. पांडवांबद्दल उत्तरेच्या मनांत कांहीं संशय आला होता, असें दिसतें. हा उत्तरेच्या त्राग्याचा विषय मूळ भारतांत नाहीं. तसेंच पुढील म्हणजे ओवी ५३ पर्यंतचा भाग मुळांत नाहीं. ११. 'हेला' (तिरस्कार करणें) यापासून 'हेळसणें' झाला. 'हेळसांड करणें' हा हलींचा शब्द आहेच. १२. तुम्ही करीत असतां, केलात तर. 'अवमानितां' असें पाठांतर. १३. हें उत्तरेचें बोलणें आपल्या लक्ष्यांत राहील, तर काय होणार नाहीं ? १४. विचारवंतानें. १५. दुप्पट केलें (वाढविलें). १६. गोड शब्दांनीं. १७. उपकारसमुद्रांत नेऊन बुडविलें, अत्यंत उपकार झाले. ही कृतज्ञता व तिचें प्रदर्शन योग्यच होय. १८. उत्तरा. १९. दासी, परिचारिका. २०. 'गीत, नृत्य, वाद्य' असें पाठांतर. २१. प्रीति आणि कळकळ या दोन्हींनीं. 'नाना परी' असें पाठांतर. २२. बरोबरीची. २३. विद्याधर=एक देवयोनी; विद्याधरी= विद्याधर योनींतील एक स्त्री. 'विद्याधराप्सरोयक्षरक्षोगंधर्वकिन्नराः' इत्यमरः. विद्याधरी म्हणजे विदूषी–असा अर्थ केला तरी चालेल.

प्रार्थूनियां मागे वरू, । 'मातें कोण प्राणेश्वरू ?' । 'कृष्णभगिनी-सुभद्राकुमरू । अभिमन्यु तूतें वरील. ॥ ५० ॥ परिक्षिन्नामा जन्मेल पुत्र । [1]विवेकें [1]विचारें सुपवित्र । [2]कळीतें दवडूनि, [3]स्वतंत्र । संरक्षील धर्मातें. ॥ ५१ ॥ विष्णुचरित्र भागवत निकें । वि[4]स्तारील श्रीशुकमुखें । [5]त्याची कीर्ती तुळितां [6]न [6]तुके । [7]पुं-ण्यश्लोकामस्तकीं. ॥ ५२ ॥ [8]येसील [9]आमुचिया संबंधा । अन्यथा नाहीं या शब्दा.' । दोघेंही पावोनि [10]संबंधा । [11]सुखसंवादा वर्तती. ॥५३॥ मुक्तेश्वराचिया कवित्वप्रबंधें । श्रोतयां [12]श्रवणीं निघती [13]दोंदें । लीलाविश्वंभरप्रसादें । [14]मुक्तता होय श्रोतयां. ॥ ५४ ॥ इति श्रीविराटपर्व भारत । कीचकअनुजांचो[15] निःपा[16]ति । जाहल्यानंतर कौरवदूत । पांडव शोधा लागती. ॥ ५५ ॥

**॥ इति श्रीविराटपर्वणि कीचकदेहदहनं नाम चतुर्थोऽध्यायः ॥**

---

१. तारतम्यज्ञान व विचार यांनीं युक्त. सुपवित्र=पुण्यश्लोक. २. पापपुरुषाला. ३. मनानें पवित्र, विकारशून्य असा. किंवा, स्वतंत्रपणें. ४. 'मिरवील श्रीशुकव्यासमुखें' असा पाठभेद. ५. 'सकळांमाजी सुकौतुकें' असाही पाठ आहे. ६. मोजमाप घेतल्यास त्याच्या कीर्तीची दुसऱ्या कोणाच्या कीर्तीशी तुलनाच होऊं शकत नाहीं—असा भाव. ७. पुण्यश्लोक पुरुषांच्या मस्तकावर सुद्धां जन्मेजयाची कीर्ति राहूं शकणार नाहीं, त्याच्या कीर्तीला जोडाच मिळणार नाहीं. निरुपम **उपमा** आहे. प्रसिद्ध व पूज्य पुण्यश्लोकांचें नामसरण:—पुण्यश्लोको नलोराजा पुण्यश्लोको युधिष्टिरः । पुण्यश्लोकाच वैदेही पुण्यश्लोको जनार्दनः ॥ 'पुण्यश्लोकामाझारी' असाही पाठ आहे. ८. 'येतील' असें पाठांतर. येथें मूळ अध्याय २४ संपतो व कीचकवधपर्वही समाप्त होतें. ९. बृहन्नलेचें हें बोलणें फार भोळेपणाचें दिसेल. उत्तरेजवळ परोक्षरीतीनें कां होईना, पण येवढें गुह्य सांगणें अप्रशस्त दिसतें. पण उत्तरेला खरी हकीकत कांहीं तरी समजली होती अशी मुक्तेश्वराची समजूत दिसते. ४४ व ४८ ओव्या पहा. किंवा, बृहन्नला पुनः धर्माच्या सेवेंत पांडव प्रगट झाल्यावर जाणार असें उत्तरेस कळविलें असल्यास अर्थातच संबंध कायमच राहाणार. १०. संबंध=स्नेह, नातें. 'आनंदा' असा दुसरा पाठ आहे. ११. हितगुजाच्या गोष्टीला. '°संवादें' असें पाठांतर. १२. श्रवणामुळें, ऐकिल्यामुळें. १३. श्रोत्यांनीं मुक्तेश्वराचें काव्य श्रवण केल्यामुळें त्यांना दोंदे फुटलीं ! काव्यश्रवण केलें कानांनीं व त्याचें परितोषक मिळालें पोटाला ! हें **असंगति** नामक अलंकाराचें सुरेख उदाहरण आहे. 'श्रवणा निघालीं दोंदें' असाही पाठ आहे. पुष्कळ खाल्ल्यानें जसें पोट मोठें होतें, तसे मुक्तेश्वराची कविता श्रवण करून कानही फुगले, त्यांनाही दोंद फुटलें-असा भाव. दोंद=वाढलेलें पोट. १४. 'सुखवक्ता' व 'शुक वक्ता' हे आणखी पाठ आहेत. १५. कीचकांच्या लहान भावांचा, उपकीचकांचा. १६. नाश. 'कीचकसह अनुजनिष्पात' असा अन्य पाठ.

# अध्याय पांचवा.

विराटनगरीं[1] बळाथिला[2] । पंचगंधर्वीं मारिलें[3] । हें ऐकोनि राजयांला[4] । संतोष आणि संशय. ॥ १ ॥ कीचकबळें मत्स्यनरेश । नित्य साधी[5] नूतन देश । करभार[6] आणवितां त्रास । भूपाळांतें देतसे. ॥ २ ॥ हृदयकंटक उन्मळला,[7] । महाउपद्रव खंडला,[8] । या कारणें संतोषला । राजसमूह बहुदेशीं.[9] ॥ ३ ॥ स्वर्गांचे[10] गंधर्व पातले तेथें । घात केला कीचकातें । हें अघटीत;[11] वसती तेथें[12] । गुप्त पांडववीर तें.[13] ॥ ४ ॥ हस्तनापुरीं कौरवनाथा[14] । वार्तिक[15] जाणविती वार्ता, । 'विराटनगरीं अत्यद्भुता,[16] । कीचक रात्रीं मारिला. ॥ ५ ॥ कोणें वधिला हें नेणवे.'[17] । म्हणती 'मारिलें गंधर्वें;[18] । चतुरीं जाणोनि जावें;[19] । तरीच हें कळेल निश्चयें.' ॥ ६ ॥ कौरव मिळोनि एके ठायीं । चिंताज्वरें व्यापिले हृदयीं । म्हणती, 'आतां करावें कायी?[20] । हें सर्वेही विचारा.[21] ॥ ७ ॥

---

१. येथें मूळांतील गोहरण नामक उपपर्वास आरंभ होतो. मुक्तेश्वरानें ह्या आपल्या पांचव्या अध्यायांत मूळांतील अध्याय २५–३४ यांचा सारांश ग्रथित केला आहे. २. बळानें उन्मत्त झालेला (कीचक). ३. 'कीचक गंधर्वीं मारिला' असें पाठांतर. ४. सर्व राजे लोकांस. 'कौरवांला' व 'राजेश्वरांला' असेही पाठ आहेत. कीचकासारख्या नीच व दुष्ट मनुष्याचा वध झाला म्हणून संतोष व त्याला मारणारा भीमच असावा, असा संशय. ५. संपादन करी. हा मराठेशाहींतला शब्द. 'राज्य साधणें' हा प्रयोग त्यावेळीं सर्वांस अवगत होता. मुक्तेश्वराच्या काव्यांत हा वारवार आढळतो (वनपर्व, अध्याय १।१४ व अध्याय ४।३८ पहा). ६. 'करभार घेऊनि त्रास' असाही पाठ आहे. ७. उपटून बाहेर टाकला. हृदयकंटक=हृदयशल्य. ८. अदृश्य, नष्ट झाला. ९. 'बहुसाल' असाही पाठ आहे. १०. ह्या ओवीचा पाठभेदः—स्वर्गांचे गंधर्व पातले येथ । भूतळीं केला कीचकघात । हें अघटित, वसती गुप्त । पांडव वैरी आमुचे. ॥ ही ओवी एका पोथींत ६ व्या ओवीच्या पुढें आहे. ११. न होण्यासारखें, अद्भुत. १२. विराटनगरींत. अशी विराटराजाला व त्याच्या प्रजेला शंका होती, असें दिसतें. १३. 'नसती कीं?' असाही पाठ आहे. १४. दुर्योधनाला. १५. बातमीदार. १६. 'विराटनगरा आतौता' असाही पाठ आहे. आतौता=आंत. १७. ज्ञात होत नाहीं, कळत नाहीं. १८. 'म्हणती दुसरे नि गंधर्वें' असा अन्य पाठ. १९. चतुरांनीं समजून घ्यावें, स्पष्ट सांगण्याची गरज नाहीं—असा भाव. 'जाणोनि जाणावें' असें पाठांतर. २०. आतां काय करावें?—असा अर्थ. 'आतां करणें कांहीं' असें पाठांतर. आतां आपण ह्या बाबतींत (पांडवांच्या शोध करण्यासंबंधीं) कांहीं तरी खटपट केलीच पाहिजे—असा भाव. २१. विचार करा.

भीष्म, द्रोण, कर्ण, शकुनी, । कृप, बाल्हीक[1], विकर्ण[2], द्रौणी, । दुःशासनादिक बंधु[3]श्रेणी । सभास्थानीं मिळाले[4]. ॥ ८ ॥ 'अज्ञातवास क्रमिला[5] बहुत[6] । कोठें नुमगती[7] पंडुसुत । हाही आमुतें अनर्थ[8] । समीप आला दिसतसे. ॥ ९ ॥ चार[9] प्रेरिले असंख्यात । पृथ्वी शोधांवी[10] समस्त । पांडव कळलिया पुरुषार्थ । चारी[11] आम्हीं साधिले. ॥ १० ॥ छपन्न[12] देश, पुरें, पट्टणें[13] । नानीं[14] पर्वतें[15], नाना वनें, । जेथें वसिजे तपोधनें । तीं तीं स्थानें शोधावीं. ॥११॥ द्वीपें[16], खंडें[17], समुद्रतटें । गंगायमुनावाळवंटें । गुहा, गव्हरें, गिरीकपाटें, । मध्यें[18] बेटें शोधावीं. ॥ १२ ॥ जेथें होती हरिकीर्तनें । हरिहरपुराणश्रवणें । घोष गर्जती विष्णुस्मरणें । तीं तीं स्थानें पहावीं[19]. ॥ १३ ॥ आचारशीळ, धर्मशीळें[20], । जेथें वसती भूतदयाळ[21] । जेथें सत्वनिष्ठांचे[22] मेळ । तें तें स्थळ शोधावें. ॥ १४ ॥

---

१. बाल्हीक देशचा राजा. विकर्ण=दुर्योधनाचा भाऊ. द्रौणी=द्रोणाचार्यपुत्र (अश्वत्थामा). २. हा दुर्योधनाचा भाऊ. धृतराष्ट्राच्या शंभर पुत्रांतील एक. हा महारथी असून मोठा न्यायी होता. हा दुर्योधनादिकांस प्रिय नसून पांडवांस प्रिय होता. ३. बंधुवर्ग. दुर्योधनाला शंभर भाऊ होते. श्रेणी=ओळ, रांग. ४. 'मीनले' असाही पाठ आहे. ५. 'क्रमुनी' असें पाठांतर. ६. बराच भाग क्रमण झाला, अज्ञातवासाची बरीच मुदत संपली, असा भाव. हें दुर्योधनाचें बोलणें आहे. ७. न+उमगती=आढळत नाहींत, शोध लागत नाहीं. 'न कळती' अन्य पाठ. ८. एका पोथींत 'अर्थ' असा पाठ आहे. पण तो लेखकप्रमाद असावा. ९. दूत, हेर. १०. धुंडाळावी, धुंडून शोध करावा. ११. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चार पुरुषार्थ आहेत. १२. हे देश कोणते नकळे. 'छपन्न देशींचे राजकुमर' असा उल्लेख मुक्तेश्वरकृत सभापर्व, अध्याय २ ओवी १०२ यांतही आढळतो. १३. व्यापाराचीं शहरें. १४. 'पुर–पाटणीं' 'वनीं' व 'तपोधनीं' असे पहिल्या तीन चरणांच्या शेवटीं पाठभेद आहेत. १५. नील, निषध, माल्यवान आणि गंधमादन असे चार महापर्वत पृथ्वीवर आहेत, अशी प्राचीन समजूत आहे. १६. सप्त द्वीपें:—जंबू–प्लक्षाह्वौ द्वीपौ शाल्मलीश्चापरो द्विज । कुशः क्रौंचस्तथा शाकः पुष्करश्चैव सप्तमः ॥ (विष्णुपुराण). १७. नव खंड पृथ्वी—भरतखंड, वृतखंड, रम्यखंड, द्रव्यमालखंड, केतुमालखंड, हरीखंड, विधिमालखंड, हर्णखंड व सुवर्णखंड. (हिंदुधर्मशास्त्रांतील संख्यावाचक दुर्बोधशब्दार्थ कोश). 'नऊ खंड पृथ्वी नि दहावें खंड काशी' हें वाक्य आबालवृद्धांस माहित आहे. १८. ही सर्व ठिकाणें धुंडाळीत असतां, मधून मधून जीं बेटें आढळतील तेथेंही पांडवांचा शोध करावा–असा भाव. 'मध्यबेटें' असें पाठांतर. १९. 'शोधावीं' असें पाठांतर. २०. 'दानशीळ' असा पाठभेद. २१. अनाथांचें कैवारी. २२. सात्विकवृत्तीच्या लोकांचे; साधुपुरुषांचे. दुर्योधनाची ही शिफारस पाहून पांडवांनीं आपल्यास कां धन्य मानून घेऊं नये? मेळ=समुदाय.

पतिव्रतांचिये मेळीं । संतजनाचिये मंडळीं । शोधोनि पाहावी पांचाळी । तेथें वास्तव्य धर्माचें. ॥ १५ ॥ चहूं वेदांचीं पारायणें । जेथें वेदशास्त्रांचीं श्रवणें । उ-[1]पनिषदांचीं व्याख्यानें । तें तें स्थान[2] धर्माचें[3]. ॥ १६ ॥ जेथें वसती दयावंत । सत्यवादी धर्मी निरंत[4] । ते ते ठाईं सावधचित्त[5] । पंडुसुत शोधावे[6]. ॥ १७ ॥ पंचाशत[7] कोटी विस्तीर्ण मही । शोधूनि चार[8] पातले पाहीं । म्हणती, 'पांडवांची कांहीं । वार्ता तेही[9] लाधेना.' ॥ १८ ॥ दुर्योधन, दुःशासन । म्हणती, 'पांडव पावले निधन[10], । यया बोलीं[11] नाहीं आन[11] । संशयीं मन न घोलावें[12].॥१९॥ जरी ते जीवें[13] जितें[13] असते । तरी कोठेंही चोजवते[14] । अद्भुतकरणीस्तव पावते । प्रसिद्धता[15] लौकिकीं.' ॥ २० ॥ भीष्म[16] म्हणे, 'ऐका खुण, । जेथें वसती[17] पवित्र

---

१. उपनिषदांत ज्ञानाची मीमांसा आहे. उपनिषद् हा शब्द ब्राह्मणकालाच्या शेवटीं उत्पन्न झाला. त्याचा अर्थ 'गुरूच्या जवळ खालीं बसणें'. पुढें 'गुरूजवळ शिष्य जें काय शिके' त्याचा वाचक तो शब्द झाला. तदनंतर त्याचा अर्थ 'गूढ ज्ञान' असा झाला. २. 'तें आवडतें स्थान धर्माचें' असाही पाठ आहे. ३. येथें धर्मशब्दावर श्लेष आहे, असें वाटतें. धर्म=पांच पांडवांतील वडील भाऊ; (पक्षी) पुण्यकर्म, शास्त्रोक्त आचार. 'धर्मोऽस्त्री पुण्य आचारे स्वभावोपमयोः क्रतौ । अहिंसोपनिषन्याये ना धनुर्यम सोमपे'. ॥ इति सुधा. मोरोपंतांनीं देखील 'धर्म' शब्दावर श्लेष योजिला आहे. (कर्णपर्व, अध्याय ३५ गीति ६२ व अध्याय ४९ गीति १६ पद्य). ४. 'धर्मरत' असें पाठांतर. ५. स्वस्थ मनानें. 'सावचित्त' असें पाठांतर. ६. या सगळ्या आज्ञा गुप्त हेरांस दिलेल्या होत्या व त्याच कौरवराज पुनः सभेमध्यें सांगत आहे. ७. अर्वाचीन शोधान्वयें पृथ्वीचा व्यास ८००० मैल, परीघ २५००० मैल, व क्षेत्रफळ २०,००,००,००० मैल आहे. ह्या तपशिलावरून पृथ्वीच्या विस्ताराची कल्पना करितां येण्यासारखी आहे. मही=पृथ्वी. पंचाशत=पन्नास. 'पंचशत' असें पाठांतर. ८. हेर. ९. सुद्धां. 'तेही नाढळे' असें पाठांतर. १०. मरण. (मूळ अध्याय २७ श्लोक १७–१८). ११. दुसरें बोलणें नाहीं, संशय नाहीं. १२. 'संशय जाण न धरावा' आसाही पाठ आहे. १३. जिवंत, जीवासह. १४. कळले असते. चोजविणें=जाणवणें, कळून येणें, समजणें. हा शब्द या अर्थी ज्ञानेश्वरांनीं योजिलेला आढळतो. (ज्ञानेश्वरी, अध्याय ६ ओवी ५). हल्ली 'कौतुक करणें, आश्चर्य करणें' असा अर्थ झाला आहे. 'चोद्य' (आश्चर्य) या शब्दापासून हा झाला. १५. 'जरी जीवें ते असते । कोठें तरी चोजवते । अद्भुत करणी विस्तार पावते । प्रसिद्ध होते लौकिकीं. ॥' असाही पाठ आहे. १६. मुळांत द्रोणाचार्यांचें भाषण अध्याय २७ मध्यें आहे व अध्याय २८ मध्यें भीष्माचें भाषण आहे. पण मुक्तेश्वरानें उलटापालट केली आहे. असें त्यानें कां केलें हें समजणें कठिण आहे. १७. तुकाराम महाराज म्हणतातः—पवित्र तें कुळ पावन तो देश । जेथें हरिचे दास जन्म घेती. ॥

जन । तो देशचि पुण्यपावन, । दुःख दुर्भिंन्ह[१] असेना. ॥ २१ ॥ मेघ वर्षती इच्छिले[२] काळीं, । पत्रीं[३] पुष्पीं सदा फळीं । औषधी प्रसवती भूतळीं; । पशु-पक्षी सुखरूप[४]. ॥२२॥ सर्व धान्यें सर्व शाखा[५], । वोहट[६] नव्हे[७] नद्योदकां[८] । धेनू-महिषी-अजादिका[९] । क्षीरवृद्धी[१०] आगळी. ॥२३॥ असंख्य ब्राह्मणांची भोजनें । जेथें[११] संतोष पावती दीनें[१२] । तेथें[१३] पांडवांचें वसणें । ऐसें शहाणे बोलती[१४]. ॥२४॥ संतसज्जनाचे संगतीं ॥ पांडव राहती करूनि वस्ती । ते ते स्थळीं[१५] बुद्धिवंतीं । शोधूनियां पाहावें.' ॥ २५ ॥ ऐकोनि[१६] बोले आचार्य द्रोण, । 'जेथें हरिहरनामस्मरण, । जेथें वासुदेवाचें भजन[१७] । तेथें विघ्न असेना. ॥२६॥ व्योमकेश[१८], हृषीकेश[१९], । स्मरतां नाहीं ज्या अवकाश[२०] । मरण न शिवे त्याचा देश । सुख संतोष त्या ठाईं. ॥ २७ ॥ पांडव पावले नाहींत मरण । असती[२१] तेथें सुखसंपन्न, । दिवसमर्यादा[२२] होतां पूर्ण । प्रगट[२३] होती स्वभावें.' ॥ २८ ॥ कर्ण म्हणे[२४], 'ऐसें नव्हे, । अपूर्णदिवसांमाजी[२५] शोधावे, । नेमीं गोऊनि[२६] सोडावे ।

---

१. 'विघ्न' असें पाठांतर. २. ज्या वेळी पाहिजे त्या वेळीं, जरूर असेल तेव्हां. आपल्या देशांत मेघांचें माहात्म्य फार आहे. पाऊस योग्य वेळी पडला तर आमच्यासारखे भाग्यवान् कोणीच नाहींत. ३. वृक्ष नेहमीं पानें, फुलें व फळें यांनीं संपन्न असतात. (मूळ अध्याय २८ श्लोक १९–२० पहा). ४. 'पशुपक्षियां सुखवसती' असाही पाठ आहे. ५. भाज्या. ६. सुकती. 'ओहट' हा मूळ शब्द. 'अवअटन' (खालीं जाणें) हा संस्कृत शब्द होय. ७. 'न होय' असें पाठांतर. ८. नद्यांच्या पाण्याला. ९. गाई, म्हैशी, बकऱ्या इत्यादि. 'अजा–अविका' असें पाठांतर. अजा=बकरी. अविका=मेंढी. १०. दुधाचा सुकाळ. 'गावश्च बहुलास्तत्र न कृशा न च दुर्बलाः । पयांसि दधिसर्पींषि रसवन्ति हितानि च' ॥ (मूळ अध्याय २८ श्लोक २२). ११. 'येथें' असें पाठांतर. १२. 'जनें' व 'मनें' असे पाठ आहेत. १३. संतांच्या समागमाचा महिमा भीष्मानीं योग्य सांगितला आहे. १४. 'जाणती' असें पाठांतर. १५. 'तीं तीं स्थळें बुद्धिवंतीं । आधीं शोधूनि पहावीं' असाही पाठ आहे. १६. 'निर्धारूनि बोले द्रोण' असाही पाठ आहे. १७. 'चिंतन' असें पाठांतर. १८. आकाशाच्या रंगाचे (निळे) आहेत केश ज्यांचे असे शंकर. १९. हृषीक (इंद्रिय) +ईश= इंद्रियांचा स्वामी (विष्णु). २०. स्मरण केल्यावांचून रिकामा वेळ जात नाहीं. २१. जेथें असतील तेथें सुखांत असतील. काय भीष्मद्रोणांचें पांडवांवर प्रेम हें! ते 'मेले असतील' असें म्हणणें त्यांस खपलें नाहीं! २२. अज्ञातवासाच्या दिवसांची. २३. 'प्रगट' किंवा 'प्रकट' हें मूळचें रूप. २४. मूळांत कर्णाचें भाषण अध्याय ३० मध्यें असून कृपाचार्यांचें अध्याय २९ मध्यें आहे. मुक्तेश्वरानें असा फेरफार कां केला नकळे. २५. वरील दिवस संपले नाहींत तोंच. २६. ठरविलेल्या अटींत पुनः गुंतवून.

अरण्यवासा मागुतीं. ॥ २९ ॥ [1]उडगण चढों जाय भिंती, । [2]तृणें लोटितां पडे [3]क्षिती, । [4]पंडुपुत्र ऐसिया युक्ती । [5]दुःखार्णवीं लोटावे.' ॥ ३० ॥ [6]गौतमी बोले, । 'ऐका सकळ, । [7]संकल्प करां तितुका निर्फळ, । ईश्वरइच्छेचा विचित्र खेळ । [8]मौन्यें दृष्टीं पहावा. ॥ ३१ ॥ इच्छावें तें सहसा न घडे, । न [9]घडावें तें अंगा [10]जडे, । [11]कर्मभोगाचें [12]कुवाडें । कोणा [13]नुगवे सर्वथा.' ॥ ३२ ॥ [14]अश्वत्थामा म्हणे, '[15]निरुतें । गुप्तदिवस लोटतां पुरते । [16]शब्द न लागे आपणातें । ऐसे पांडव वर्तती. ॥ ३३ ॥ प्रकट झालिया [17]सुनेमीं । [18]मैत्री अथवा विरोध धर्मी । आवडे

---

१. उडगण=गोगल गाय-असा अर्थ महाराष्ट्रशब्दकोशांत दिलेला आहे. परंतु हा शब्द ह्या अर्थी अन्यत्र योजिलेला आमच्या पहाण्यांत आलेला नाही. 'उडीणी', 'उडणी', 'उटंगण' व 'उडु-गण' असे पाठ आढळतात. उटंगण=उटंगर=उटंगळे असणारा प्राणी. 'उडुगण' हा पाठ हस्तदोष-मूलक आहे, हें स्पष्टच आहे. कारण उडुगण म्हणजे नक्षत्रें. कदाचित् 'उडद-गण' असाही पाठ असेल. उडद=उडदाच्या दाण्यासारखा कीटक, उडदा. उडीणी, उडणी म्हणजे उडणारे प्राणी असा अर्थ-असावा. मुक्तेश्वराच्या काव्यांत अशा प्रकारचा दृष्टांत अन्यत्र आढळतोः-वारंवार पडतां क्षिती । शेवटी कीटक चढे भिंती । खणत खणत पर्वती । खचोनी जाय एकदा. ॥ (आदिपर्व, अध्याय ४५ ओवी २९). कल्पनासादृश्यः-दूर चढोनि पडावे ते गोमय गोलकार कीटकसे । अस्खलित उच्चपदवीप्रति लंघूं पाहतात नीट कसे ? ॥ (मोरोपंतकृत-विराटपर्व, अध्याय २ गीति १०). २. गवतानें, गवताच्या काडीनें. ३. पृथ्वीवर, जमिनीवर. 'पुढती' व 'मागुतीं' अशीं पाठांतरें. ४. 'तेवी पांडव ऐसिया रीती' असाही पाठ आहे. ५. दुःखाच्या सागरांत. ६. गौतम-कुलोत्पन्न कृपाचार्य. ७. 'मनसा चिंतितं कार्यं दैवमन्यत्तु चिंतयेत्.' Man proposes and God disposes ! मुक्तेश्वरानें असेच उद्गार आपल्या सभापर्वांत काढिले आहेतः-आपण करूं जावें एक । प्रारब्ध घडवी आणिक । ईश्वरी मायेचें कौतुक । ब्रह्मादिकां न कळे. ॥ ८. गप्प बसून काय काय घडेल तें पहावें. 'तुका म्हणे उगी राहावें । जें जें होइल तें तें पाहावें' असा इत्यर्थ. 'मौन्यदृष्टीं पाहिजे' असा अन्य पाठ. ९. जी गोष्ट घडावी अशी आपली उत्कट इच्छा असते ती हटकून घडत नाहीं, असा बहुधा सर्वांनांच अनुभव येतो. It is the unexpected that always happens ! १०. 'घडावें तें अंगा घडे' असाही पाठ आहे. ११. 'कर्मयोगाचें' असें पाठांतर. १२. कोडें, चमत्कार. 'कुवेडें' हा शब्द बायकांच्या भाषणांत विशेष आढळतो. 'कोडें' हा मूळचा शब्द. 'सुरवाडें' असें पाठांतर. सुरवाड=सुख, सुकाळ. १३. उमगत नाहीं, कळत नाहीं, सुटत नाहीं. १४. मुळांत अश्वत्थाम्याचें भाषण नाहीं. मुक्तेश्व-रानें कृपाचार्यांच्या भाषणाचा कांहीं भाग अश्वत्थाम्याच्या तोंडीं घातला आहे (मूळ अध्याय २९ श्लोक ६-८ पहा). १५. खरोखर. (संस्कृत-नि+ऋत=खरें). १६. दोष, निंदा. 'शब्द लागे आपणातें । ऐसें पांडव न करिती' असाही पाठ आहे. १७. योग्य वेळीं. नेम=मुदत, अवधी. १८. मैत्रीधर्म=Religion of amity. विरोधधर्म=Religion of enmity.

तैसें[1] वर्ता तुम्हीं । प्रस्तुत विचार कायसा?' ॥ ३४ ॥ सुशर्मा[2] त्रिगर्ताधिपती । म्हणे, 'न[3] मने[3] येकही युक्ती[4], । पांडव विराटपुरीं वसती[5] । संशय यदर्थी असेना. ॥ ३५ ॥ जीमूती जेठियांचा[6] रगडा[6], । मारिला कीचक बळिष्ठ गाढा[7], । पांडवांवीण हा पवाडा[8] । कोण कर्ता भूतळीं? ॥ ३६ ॥ कैंचा बल्लव? कैंचा कंक? । कैंचा तंतिपाळ? नामा[9] ग्रंथिक? । नामें पालटूनियां देख । अज्ञातवास लोटिती[10]. ॥ ३७ ॥ जे कां बोलती सैरंध्री । राजांगनेची[11] सेवा करी । ते होय द्रुपदाची कुमरी । याज्ञसेनी[12] जाणिजे[13] ॥ ३८ ॥ द्विभाग[14] करूनियां [14]सेने । व्यापिजे उत्तर आणि दक्षिणे, । विराटरायाचीं गोधनें । बळात्कारें हरावीं. ॥ ३९ ॥ तेथें सहज मातेल कळी[15] । जाणोनि येतील[16] महाबळी, । तुमची संकल्प-वल्ली सुफळीं[17] । फळे ऐसें करावें. ॥ ४० ॥ गाई ब्राह्मण[18] पीडितां वेगें । पांडव सहसा न राहती उगे,। अवघियां पुढें[19] लगवेगें[20] । संग्रामातें मिसळती.' ॥ ४१ ॥ हें ऐकोनि आल्हाद दुर्योधना । शकुनि, कर्ण, दुःशासना, । सैनिकांतें देवोनि[21]

---

१. 'तैसें वर्ततां' असें पाठांतर. २. संशप्तक राजा. (मूळ अध्याय ३० पहा). ३. मान्य होत नाहीं, पटत नाहीं. 'न मानें ह्या युक्ती' असाही पाठ आहे. ४. विचार. ५. वसतात, राहातात. 'असती' असें पाठांतर. ६. मल्लांस जिंकणारा. ७. बलाढ्य. 'होडा' असाही पाठ आहे. होड= पैज, प्रतिज्ञा. होडा=प्रतिज्ञेवर, निःसंशय. 'होंडा' हा पाठही चांगला आहे. होंडा=हुंडा=सशृंग पशु, एडका. हा शब्द मुक्तेश्वरानें आपल्या ग्रंथांत अन्यत्र योजिला आहे. (सभापर्व, अध्याय १५ ओवी १४८). कीचकाला माजलेल्या एडक्याची उपमा देणें योग्यच आहे. 'होडा' हा शब्द 'हुडा' (बुरुज) या पासून झाला. ८. स्तुतीस योग्य असें कृत्य. पोंवाडा, पंवाडा हे शब्द 'पांवा' (बांसरी, मुरली) ह्या शब्दापासून निघाले. कोणी म्हणतात संस्कृत 'प्रवाद' ह्या शब्दापासून 'पवाडा' झाला. ९. नांवाचा, ग्रंथिक ह्या नांवानें वावरणारा. १०. 'पांडव' हा कर्ता. ११. इतर प्रतींत हा चरण तिसरा आहे. 'भासे शचीचिया परि' असा दुसरा चरण आहे, येथील तिसरा चरण नसून चवथ्यांत 'ते द्रौपदी जाणावी' असा पाठ आहे. १२. द्रुपदराजाचें यज्ञसेन हें नामांतर. यज्ञसेनकन्या=याज्ञसेनी, द्रौपदी. १३. 'बोलिजे' असें पाठांतर. १४. सेनेचे दोन विभाग करून. १५. भांडण, लढाई. १६. 'तेव्हां जाणवतील' असें पाठांतर. १७. संकल्प= कल्पना. संकल्परूप लता उत्तम फळांनीं युक्त होतील, असें करावें. 'संकल्प विकल्प फळीं । फळेल ऐसें मग करा' असा अन्य पाठ. १८. गोब्राह्मण–संरक्षकांस ही शिफारस काय लहान आहे? १९. बिनीवर. हा सुशर्मा त्या चांडाळ चौकडीमध्यें शहाणा दिसतो. शकुनिमामा गप्प कां बसले कोण जाणे? २०. झटपट. २१. 'करोनि' असें पाठांतर.

आज्ञा । [1]प्रस्थानभेरी ठोकिल्या. ॥ ४२ ॥ वि[2]चित्ररंगी [3]वस्त्रागारें । उभविलीं [4]देवगंगेचिया तीरें, । आपुलेनि [5]दळभारें । महावीर निघाले. ॥ ४३ ॥ [6]हस्ती, घोडे, रथ, [7]पदाती, । अनेक शस्त्रें धरिलीं हातीं । सुवर्णकवचाचिया दीप्ती । [8]भानुकिरणें लोपती. ॥ ४४ ॥ [9]शूळधर खड्गधर, । फरश-पट्टीश-तोमरधर, । [10]तुळवे [11]लहुडी [12]चक्रधर । शत[13]सहस्र निघाले. ॥ ४५ ॥ [14]तडकयंत्रें [15]बाण [15]बाणे । [16]कटारे [17]दुधारे [18]झणाणें । [19]दशघ्नी [20]शतघ्नी [21]सत्राणें । [22]करसाधनें दाविती. ॥ ४६ ॥ दुर्योधन [23]आज्ञा करित, । 'सुशर्मिया ! तुवां [24]त्रिगर्तांसें हित । दक्षिण [25]दिशे [26]असंख्यात । विराटगायी वळाव्या. ॥ ४७ ॥ [27]झुंझा [27]गोविजे विराट-राजु । तंव आम्हीं येतसों उत्तरे [28]उजु, । युद्धं जालिया [29]निस्तेजु, । शरण येईल आमुतें. ॥ ४८ ॥ हेम, रत्नें, कुंजर, धेनू । [30]हिरूनी करूं पामर दीनू, ।

---

१. निघण्याचा टंका वाजविला. २. 'चित्रविचित्र वसनागारें' असा अन्य पाठ. ३. तंबु, कापडघरें. ४. भागिरथी?. ५. सैन्याची पथकें. ६. ही चतुरंग सेना. ७. पायदळ शिपाई. ८. 'भानुकिरण लोपले' असाही पाठ आहे. **व्यतिरेक** अलंकार आहे. ९. शूळ=भाला, भाल्या-सारखें अणकुचीदार शस्त्र. खड्ग=तलवार. फरश=परशु, कुऱ्हाड. पट्टीश=पट्टा, लांब दुधारी तलवार. हिला कोपरापावेतों हाताचें संरक्षण करणारी मूठ असते. तोमर=घुसळण्याच्या रवीसारखें एक शस्त्र. १०. तुळवे (?) तुळव=तुळई, तुळवट. लढाईत एकमेकांवर तुळया फेकीत असत कीं काय? ११. लोखंडाचें अग्र बसविलेली काठी, (संस्कृत–लोहांगी). १२. चक्र=शस्त्रविशेष. (चतु-र्भुज विष्णूच्या एका हातांत सुदर्शन चक्र असतें, हें प्रसिद्धच आहे). 'वज्रधर' असें पाठांतर. १३. शंभर हजार, लाखों–असा इत्यर्थ. १४. मोठा आवाज करणारी यंत्रें. तडक=मोठा आवाज, विजेचा कडकडाट. १५. धनुष्यानें मारण्याचा तीर, शर. बाणा=एक प्रकारचा दारूचा बाण. १६. कट्यार. पोटांत खुपसण्याचें एक हत्यार. हें कमरेला खोवतात. १७. दोन धारांचें हत्यार. १८. झणझण असा ज्यांचा आवाज होतो अशीं वाद्यें. 'झेपाणें' असें पाठांतर. झेपाणें=गोफण(?). 'सणाणें' असेंही पाठांतर आहे. १९. दहा माणसें मारणारी. २०. लोखंडी कांटे असलेली काठी. २१. जोरानें. २२. हस्तकौशल्याचे प्रकार. २३. दुर्योधनानें दुःशासनास आज्ञा केली, असें मुळांत आहे (अध्याय ३० श्लोक १९–२०). २४. सुशर्मा हा त्रिगर्तदेशाचा राजा. त्यानें आपल्या सैनिकांसह हल्ला करावा–असा अर्थ. २५. 'दक्षिणेमाजील' असें पाठांतर. २६. 'असतां ख्यात' असें पाठांतर. २७. युद्धाकरितां गुंतीव. २८. सरळ, दडक. २९. तजोहीन, पराक्रमशून्य. ३०. हरण करून. विराटराजाला दीन आणि अनाथ करूं. पामर=क्षुद्र.

जैसी प्रभा लोपी भानू । [1]घनमंडळ उदेलिया. ॥४९॥ वृक्षांसहित श्वापदमेळु । काननीं भस्म करील [2]अनळु, । तैसीं विराट आणि कुंतीबाळु । निवडूनि सांडूं[3] संग्रामीं. ॥ ५० ॥ जैसा पारधी येके जाळीं । असंख्य मीन एकला [4]कवळी । [5]सपुत्र विराट पांडवबळी । नाहींच करूं एकदा.' ॥ ५१ ॥ कौरवरायाचिये आज्ञे । त्रिगर्त पातला दक्षिणे, । [6]काठीकर [7]राऊत राणे । धाविन्नले [8]चौफेरीं. ॥ ५२ ॥ सुशर्मा त्रिगर्ताचा [9]अधिपू । लक्षसंख्या धेनूकळपू । वळोनियां जाणवी प्रतापू । [10]भेरीनादें [11]आगळा. ॥ ५३ ॥ गायी वळोनियां [12]निगुती । [13]कुंजरपुराचिये पंथीं । सहस्र राजदूतांचिये हातीं । चालविल्या [14]निजबळें. ॥ ५४ ॥ कामधेनूची संतती । नाना वर्ण [15]चित्राकृती । कर्पूर केतकीची [16]दीप्ती । घमघमिती[17] परिमळें. ॥ ५५ ॥ पुच्छें शोभती जैसीं [18]चामरें । माथां वाहिलीं मनोहरें, । वोहिं[19] दाटलिया [20]पयोधरें । मार्ग [21]सैरा शिंपिती. ॥ ५६ ॥ धेनु [22]वळोनि पुरुषार्थी । वाद्यें वाजविलीं त्रिगर्ती, । असंख्य गोपाळांचिया पंक्ती । [23]करबंधनीं क-

---

१. ढगांचे समुदाय, अभ्रजाल. अभ्रें आलीं असतां सूर्य आपलें तेज लपवितो (कायमचें अदृश्य करीत नाहीं) त्याप्रमाणें विराटराजाचें तेज कौरवांच्या हल्यानंतर पुन्हा पूर्ववत् दृष्टोत्पत्तीस येईल, असें ह्या दृष्टांतावरून ध्वनित होतें. 'घनमंडळें व्यापिल्या' असाही पाठ आहे. २. अग्नी. ३. सांपडणार नाहींत असे करूं. नाहींसे करूं–असा भाव. (ओवी ५१ पहा). ४. धरी, पकडी. मीन=मासा. ५. पुत्रांसह. विराटराजाला शंख, श्वेत आणि उत्तर असे तीन पुत्र होते. ६. काठीकर=हातांत सोन्यारुप्याची काठी घेतलेला राजाचा चोपदार; किंवा–काठी=निशाण; काठीकर=हातांत निशाण घेतलेला शिपाई. ७. घोडेस्वार. राणा=नायक, मुख्य. ८. चारी बाजूंनीं, चौगर्द, चहूंकडून. 'चौमेळीं' असें पाठांतर. चौमेळीं=चार टोळ्या करून. ९. त्रिगर्तदेशाचा राजा. १०. नगारा वाजवून. ११. मोठा. हें प्रतापाचें विशेषण. १२. दक्षतेनें, नेटानें. 'हातीं' असें पाठांतर. १३. हस्तिनापुराच्या. १४. 'पुढाऱ्या' असें पाठांतर. १५. 'विचित्राकृती' असें पाठांतर. १६. तेज, सौंदर्य. त्या गाई कर्पूरगौर असून त्यांच्या अंगाला केतकीच्या सुवासिक पत्रासारखा वास येत असे–असा भाव. १७. 'मघमघिती' असें पाठांतर. १८. चवऱ्या. १९. गाय, म्हैस इत्यादिकांची कास. 'दोहा' व 'वोहे' अशीं पाठांतरें. २०. दुधानें भरलेल्या स्तनांनीं युक्त. हें गायींचें वर्णन मुक्तेश्वरानें स्वतःच्या प्रतिभेनें निर्माण केलेलें आहे. मुळांतील 'श्रीमन्ति' (सुंदर) व 'गुणवन्ति' (गुणी) ह्या दोन शब्दांच्या आधारावर मुक्तेश्वरानें दोन सुंदर ओव्या रचिल्या आहेत (अध्याय ३० श्लोक २४ पहा). २१. सैरावैरा, अफाट, मोकाट. 'सारा' असें पाठांतर. २२. वळवून–असा अभिप्रेत अर्थ आहे. 'धेनु…पुरुषार्थें ।… त्रिगर्तें । असंख्य गोवळांचीं शतें । करबंधनीं कर्षिलीं ॥' असाही पाठ आहे. २३. गोपाळांचे हात बांधून त्यांना चतुर्भुज केलें–असा भाव.

षिल्या. ॥ ५७ ॥ काळी[1] कांबळी रहितवस्त्रीं । पृष्ठीं[2] ताडिल्या काष्ठिकायंत्रीं,[3] । पळतां[4] पांचजन्यमंत्रीं[5] । विराटनगरीं पातले. ॥ ५८ ॥ म्हणती,[6] 'येउनी परदळ । गायी वळविल्या सकळ, । कौरवपुरीचा भूपाळ । ऐसें श्रवणीं ऐकिलें.' ॥ ५९ ॥ गोरक्षकांच्या[7] दीर्घ स्वरीं[8] । हाक वाजली विराटनगरीं । राजा[9] क्षोभला, जुंझारीं[10] । वीर-भारीं सज्जला.[10] ॥ ६० ॥ सेनापती प्रधान मंत्री । सोइरे सेवक महाक्षत्री । सिद्ध झाले शस्त्रास्त्रीं । रणचत्वरीं[11] भिडावया. ॥ ६१ ॥ आमुचिया खड्गाचियां[12] मुष्टीं । मर्दूं कौरवांचिया थाटी[13] । त्रिगर्तातें[14] भूतळवटीं[15] । पाताळगर्ता[14] दाखवूं. ॥ ६२ ॥ आठ सहस्र रहंवर[16] । साठी सहस्र अश्वस्वार[17] । एक लक्ष नर जुंझार[18] । वीर वांटीव[19] पाईचे. ॥ ६३ ॥ शांव्यायन[20] भद्रजाती[21] । पांच सहस्र पर्वताकृती । पांच पांच महावंतीं[22] । पताका-दंड कवळिले.

---

१. 'जाडी' असा अन्य पाठ आहे. २. पाठीवर. ३. काठ्यांनीं. यंत्र=साधन, हत्यार—इतकाच अर्थ येथें समजावयाचा. ४. 'पळती' असें पाठांतर. ५. शंखध्वनि करीत, ओरडत. 'पांचजण मैत्री' असा अन्य पाठ. ६. 'म्हणती, पातलें जी! परदळ । गायी वळवुनिया सकळ' असाही पाठ आहे. ७. 'गोरक्षकांच्या दुर्धर स्वरी । हाक वाजिन्नली विराटपुरी । राजा क्षोभला झुंजारी । वीरभार सज्जिले' असाही पाठ आहे. ८. 'वैखरी' असें पाठांतर. ९. विराटराजा. १०. लढवय्ये वीरांची पथकें घेऊन लढाईसाठीं सज्ज झाला—असा भाव. ११. रणभूमीवर. चत्वर=चौक. १२. 'खर्गांचिया' असें पाठांतर. खर्ग=खड्ग मुष्टी=मुठीनें. १३. जमाव. 'पुष्टी' असें पाठांतर. पुष्टी=पाठबळ, पाठपुरावा. कौरवांच्या पाठीराख्यांचाही धुव्वा उडवूं—असा भाव. १४. येथें 'गर्त' शब्दावर श्लेष आहे. गर्त=उच्च पीठ, सिंहासन, (पक्षीं) खळगा, विवर. त्रिगर्तराजाला त्याच्या सिंहासनावरून ओढून पातालविवरांत (अधोलोकांत) नेऊन पोंचवूं—असा ध्वन्यर्थ. १५. पृथ्वीच्या पाठीवर. १६. रथ. १७. 'अश्वभार' व 'असिवार' अशीं पाठांतरें. असिवार=घोडेस्वार, राऊत. १८. योद्धे. 'नर-कुंजर' असा अन्य पाठ. १९. पराक्रमी. 'अपार' असें पाठांतर. २०. साठ वर्षांच्या वयाचे, पूर्ण वाढ झालेले. मुळांतील वर्णन:—'भीमाश्च मत्तमातङ्गाः प्रभिन्नकरटामुखाः । क्षरन्तश्चैव नागेन्द्राः सुदन्ताः षष्टिहायनाः ॥ ३१ ॥ स्वारूढा युद्धकुशलैः शिक्षिता हस्तिसादिभिः । राजानमन्वयुः पश्चाचलन्त इव पर्वताः ॥ ३२ ॥ (अध्याय ३१) ह्याचा अर्थ:—ज्यांच्या गंडस्थळांतून मदाचा स्राव होत आहे व ज्यांचे सुळे दांत मोठे मोठे आहेत असे, युद्ध-विशारद माहुतांनीं उत्तम शिक्षण दिलेले, साठ वर्षें वयाचे, चालणाऱ्या पर्वतांसारखे भयंकर मत्त गजेंद्र राजाचे पाठीमागून चालले. 'काट्यायन' (?) असें पाठांतर. २१. 'भद्र' नामक जातीचा हत्ती. 'भद्रो रुद्रे वृषे रामचरे मेरुकदंबके । हस्तिजात्यन्तरे भद्रो वाच्यवत् श्रेष्ठसाधुनोः' ॥ इति विश्वः. २२. माहुतांनीं.

॥ ६४ ॥ पुढें कुंजरांचे[1] थाट,[2] । पाठीसी तुरंगम घनदाट, । रहंवरांचे[3] घडघडाट । वीर[4] उद्भट[5] पायांचे. ॥ ६५ ॥ लागलिया[6] निशाण-भेरी,[7] । शृंगें[8] काहळ रण-मोहरी,[9] । दुंदुभीच्या[10] महागजरीं[11] । नाद अंबरीं[12] न समाये[13]. ॥ ६६ ॥ कंक बोले महींद्रातें, । 'रहंवर एक ओपिजे मातें, । बल्लव आणि तंतीपाळातें । ग्रंथिकातें रथ एकु. ॥६७॥ तुझें भक्षिलें असे अन्न, । तें व्हावयालागीं उत्तीर्ण । इच्छा करी आमुचें मन । तें आजि दृष्टी दाखवूं.[14]' ॥ ६८ ॥ रायें तोषोनि अंतरीं[15] । आरूढ केले रहंवरीं, । धनुष्यबाण वोपिले करीं । वर्में[16] चर्में[17] सु-ढाळें. ॥ ६९ ॥ विराटरायाचे पाठीं । चौघे चालिले जगजेठी. । म्हणती, 'राया ! स्वस्थ राहें पोटीं[18] । धैर्य धरीं बळिष्ठा ! ॥७०॥ विजय कवळूनियां मुष्टीं,[19] । आम्हीं बांधिला[20] तुझीये पाठी,[21] । काळिमा लावूनियां ललाटीं । कौरव जाती स्वस्थळा.' ॥ ७१ ॥ विराटसेना सिंधोदक[22] । अत्यद्भुत लोटतां[23] देख, । त्रिगर्त पातला सन्मुख । घोर संग्राम माजला. ॥ ७२ नृत्यशाळेसी बृहन्नळा । म्हणे, 'कौतुक पाहों डोळां.[24]' । उत्तरकुमर स्त्रियांजवळां । अंतःपुरीं राहिला. ॥७३॥ असो. दोन्ही[25] भिन्न करूनि तेथें । सकळही गेले संग्रामातें, । मच्छदळीं[26] त्रिगर्तातें । युद्ध दारुण मांडिलें.[27] ॥ ७४ ॥ उभयदळीं बाणवृष्टी; । परस्परें

---

१. हत्तीचे. २. व्यवस्थेशीर मांडणी; जमाव, समुदाय. ३. रहंवर=रथवर, उत्तम रथ. ४. पायदळ. 'निघाले' असें पाठांतर. ५. दांडगे, धाडसी, प्रख्यात. 'उद्धट' असें पाठांतर. ६. नौबत झडूं लागल्यावर, नगारा वाजूं लागल्यावर. ७. नौबत, डंका, रणभेरी. ८. झांज. ९. युद्धांतील वाद्यविशेष. मोहरी=तोंडानें वाजवावयाचें एक वाद्य, पुंगी ( मुक्तेश्वरकृत आदिपर्व, अध्याय २३।११९ पहा ). १०. मोठा नगारा. ११. 'महास्वरी' असें पाठांतर. १२. आकाशांत. १३. न मावे. १४. 'तें दृष्टी विलोका' असाही पाठ आहे. १५. अंतः-करणांत, मनांत. 'उत्तरी' असें पाठांतर. १६. कवचें. १७. ढाली. 'वर्म कूर्म' असें पाठांतर. कूर्म=कांसव. कांसवाच्या पाठीच्या ढाली करितात. १८. मनांत. 'नेटी' असें पाठांतर. नेटीं=हिमतीनें, नेटानें. १९. मुठीत. ह्या युद्धांतील यश आम्हीं आपल्या मुठीत सांठवून ठेविलें आहे. केवढा दांडगा आत्मविश्वास हा पांडवांचा ! २०. राजा ! विजयाचें गांठोडें तुझ्या पाठीवर आम्ही बांधून ठेविलें आहे, असें समज—हा भाव. २१. 'गांठी' असें पाठांतर. २२. समुद्रप्रवाह. २३. 'लोटला' असें पाठांतर. २४. 'कौतुक पडेल डोळां' असें पाठांतर. २५. राजकुमार उत्तर व बृहन्नळा या दोघांखेरीज. २६. 'मच्छदळीं त्रिगर्तें' असें पाठांतर. २७. जुंपलें.

भिडती करटी[1] । राउत राउता पडे गांठी । शस्त्रमुष्टी[2] ताडिती. ॥ ७५ ॥ रथारूढ विराटनृपती, । सहस्र छत्रें उभविलीं वरुतीं । पताका[3] पल्लवें[4] वारिती । परदळातें फडफडां. ॥ ७६ ॥ 'गुप्त असती तेथें पांडव, । वैरियांतें[5] होईल पराभव,' । ऐसिया संकेताचा[6] भाव । त्रिगर्तातें नेणवे. ॥ ७७ ॥ शूलधरांसीं शूलधर, । खड्गधरांसीं खड्गधर, । घाय[7] हाणिती परस्पर । वाहती रुधिरें भडभडां. ॥ ७८ ॥ हस्त पाद तुटती घायीं, । शिरें तुटोनी पडती भुयी,[8] । उदरें विदारूनि ठायीं ठायीं । प्रेतें मही[9] पसरलीं. ॥ ७९ ॥ विराटाचे सेनापती । पांचही[10] आरुढोनी रथीं । बाणवृष्टी करितां हातीं । त्रिगर्तावरी उठावले.[11] ॥ ८० ॥ शतकुंजर[12] सहस्र वारू । महारथी[13] यांचा देखोनि मारू । सुशर्मा कोपला, वैश्वानरू[14] । धडके जैसा प्रळयांतीं.[15] ॥ ८१ ॥ लक्ष लावूनियां नयनीं । पांचही विंधिले विसां बाणीं । अश्व सारथी मारूनि धरणी । पांचहीजण पा-

---

१. हत्ती. 'किरीटी' व 'जगजेठी' असे अन्य पाठ. किरीटी=किरीट घातलेले योद्धे. जगजेठी=जगांतील बलवान पुरुष, मल्ल, योद्धे. २. शस्त्रपाणी, शस्त्रधारी. 'शस्त्रें मुष्टी ताडिती' असाही पाठ आहे. ३. पताका सुद्धां आपल्या पदरानें शत्रुसैन्याचें निवारण करूं लागल्या, त्यांच्यामध्येंही वीरश्रीचा संचार झाला! येथें अचेतन पदार्थानें सचेतनाप्रमाणें कार्य केलें, असें वर्णिलें आहे. म्हणून येथें **चेतनधर्मारोपोक्ति** ( Personification ) नामक अलंकार आहे. ४. 'पल्लव' शब्दावर **श्लेष** आहे. पल्लव=पदर; ( पक्षी ) अस्वस्थता, चांचल्य. ५. ( विराटराजाच्या ) शत्रूंचा. ६. संकेत=इशारा, खूण. भाव=कल्पना. पांडव विराटराजाकडे असतील व त्यांच्यामुळें त्याच्या शत्रूंचा पराजय होईल, अशी त्रिगर्तराजाला अंधुक देखील कल्पना झाली नाहीं—असा भाव. 'ऐसा संशयाचा भाव' असाही पाठ आहे. ७. घाव, आघात. 'एकमेकां ताडिती परस्पर' असाही पाठ आहे. ८. भुईवर. 'मही' असें पाठांतर. ९. पृथ्वीवर. १०. शतानीक, विशालाक्ष, सूर्यदत्त व मदिराक्ष—अशीं चारच नांवें मूळ भारतांत आढळतात (अध्याय ३२ श्लोक १९–२१ पहा). ११. उद्युक्त झाले, हल्ला करण्यासाठीं मोठ्या आवेशानें चालून गेले. १२. शंभर हत्ती. १३. तंजावर प्रांतांतील रामदासपंथीय कवि माधवस्वामी यांच्या उद्योगपर्वांतील पुढील उतारा वाचकांस मान्य होईल, अशी आशा आहे:—'**रथी** कोणासी म्हणावें । **अतिरथी** कोणासी बोलावें । **महारथी** कोणासी समजावें । हेंचि बरवें निरोपितों आधीं. ॥ ७९ ॥ येकलाचि शतांतें मारी । तो रथी जाणा चराचरीं । आणि सहस्रांतें संहारी । तो निर्धारीं अतिरथी. ॥ ८० ॥ दश सहस्राचा करी घात । त्यासि महारथी म्हणिजेत । त्याच्या दशगुणें निर्दाळित । यूथप नाम सत्य तया. ॥८१॥ (अध्याय ८१). माधवस्वामींच्या महाभारताचीं सर्वच पर्वें अद्याप अप्रसिद्ध आहेत. १४. अग्नी, विस्तव. १५. 'महावातें' व 'चंड वातें' असेही पाठ आहेत.

डिले. ॥ ८२ ॥ हें देखोनि विराटराजू । धाविन्नला सुशर्मा-उजू[1]; । जैसा कीं उन्मत्त गजू । कर्दळीवनीं माजला. ॥ ८३ ॥ विराटाचे बंधू दक्ष । सेनानी आणि मदिराक्ष । घेऊनि महावीरांचें[2] लक्ष । युद्धकंदना मिसळले. ॥ ८४ ॥ बाणीं त्रासिलें[3] कौरवदळ[4], । कुंजर खिळूनि[5] केले अचळें, । महारथी मारूनि विकळ । अश्व बाणीं खोंचिले[6]. ॥ ८५ ॥ सुशर्मा प्रचंड धनुर्धारी । विराट विंधिला एकशत शरीं[7], । अश्व सारथी मारूनि शिरीं । ध्वजस्तंभ छेदिला. ॥ ८६ ॥ अक्ष[8] छेदूनि कडकडां । चक्रें उडविलीं दोहींकडा. । विराट म्हणे, 'न दिसे पुढां । उपाय कांहीं वांचावया.' ॥ ८७ ॥ सायक[9] विंधोनि घनदाट । विकळ[10] पाडिला विराट, । अंगें धांवूनियां बळिष्ठ । दोहीं बाहीं[11] कवळिलें[12]. ॥८८॥ आणोनि घातला आपुले रथीं । चालिले हस्तनापुराप्रती, । दळें भयाभीतें पळती । विराटाचीं दशदिशा. ॥ ८९ ॥ पृष्ठभागीं बांधिले हस्त, । मोकळे केशीं विराटनाथ, । नेतां देखोनि अत्यद्भुत । हाहाःकार माजला. ॥ ९० ॥ ते वेळीं बोलिलें[13] धर्मराज, । 'भीमा! आतां[14] दावीं चोज । 

---

१. थेट सुशर्म्याच्या आंगावर. 'संगियासी संग्राम उजू। धांवे जैसा उन्मत्त गजू। कर्दळीवन देखोनी' ॥ असाही पाठ आहे. २. एक लाख महावीरांचा समुदाय. ३. त्रस्त केलें, त्रासवून सोडलें. ४. 'पायदळ' असें पाठांतर. ५. खिळणें=डांबणें, जखडून टाकणें. हत्तींना जागच्या जागीं खिळून टाकून, त्यांना, जणुं काय, पर्वतच बनविलें—असा भाव. **उत्प्रेक्षा** अलंकार. अचळ =न हालणारे, पर्वत. ६. खोंचणें=खुपसणें, टोंचणें, भोसकणें. बाणीं (बाणांमुळें, बाण लागल्यामुळें) अश्व (घोडे) जखमी झाले—असा भाव. ७. बाणांनीं. 'शरस्तु तेजने बाणे दध्यग्रे ना शरं जले' इति विश्वमेदिन्यौ. ८. आंस, गाडीचा कणा. 'आक' असें पाठांतर. आक=आंख, रथाचे चाकांतील कणा. 'अश्व' असाही पाठ आहे पण तो हस्तदोषमूलक असावा. ९. बाण. १०. कळाहीन, दीनवाणा, गळाठलेला. ११. दोन्ही हातांनीं. 'हस्त मागें बांधिले' असाही पाठ आहे. १२. पकडला, कवटाळला; (पक्षीं) आलिंगिला. ह्याचा कर्त्ता—सुशर्मा. येथें मूळ भारतांत वर्णन आहे तें पहा:—तमुन्मथ्य सुशर्माऽथ युवतीमिव कामुकः । स्यन्दनं स्वं समारोप्य प्रययौ शीघ्रवाहनः ॥ ९ ॥ (अध्याय ३३) ह्याचा अर्थः—नंतर सुशर्म्यानें जसा एखादा कामुक तरुणीस उचलतो, त्याप्रमाणें विराटास उचलून आपल्या रथांत घातलें; आणि तो सत्वर घोडे दवडीत निघाला. १३. 'बोले' असें पाठांतर. १४. 'दाखवीं आपुलें चोज' असाही पाठ आहे. चोज= चमत्कार, करामत. 'तेज' असें पाठांतर.

विराट सोडवोनि, पैज । जिंकोनि येई[1]; बळिष्ठा !' ॥ ९१ ॥ नकुळसहदेवांतें म्हणे, । 'वेगीं करावें धांवणें । विराट सोडवोनी, प्राणें । वांचविला पाहिजे. ॥ ९२ ॥ ईश्वरें दिधली बळशक्ती, । आश्रयीं होतों येचिये[2] संगती । त्याचें फळ ये आकांतीं[3] । विराट आम्हीं रक्षावा[4]. ॥ ९३ ॥ आम्हां देखतां अनुचित । होऊं नये गा! सत्य सत्य, । आळस केलिया पुरुषार्थ । व्यर्थ गेला[5] वीर हो! ॥ ९४ ॥ उठा वहिले[6] धांवा वेगें । दूरी गेलिया कष्टाल[7] अंगें, । हस्तनापुरापर्यंत मागें । पाठिलाग करावा. ॥ ९५ ॥ सोडवुनी नाणितां[8] विराटराया । मागील जोडिलें गेलें वायां, । अपकीर्तिवंताची काया । प्रेतप्राय जाणावी.' ॥ ९६ ॥ सहदेव म्हणे, 'झुंजतां रणीं । वोळखी पडेल तत्क्षणीं, । वैरी पाडितीले[9] व्यसनीं । तेरा वर्षें मागुतीं.' ॥९७॥ धर्म म्हणे, 'गा! पुढारें । घडेल तें निवंडूं[10] विचारें. । आतां उठा धांवा त्वरें । विराट वेगीं सोडवा.' ॥ ९८ ॥ धर्मआज्ञेनें उतावीळ । तिघेही पवनापरीस[11] चपळ । धाविन्नले जैसे काळ । ग्रासावया जगातें. ॥ ९९ ॥ म्हणती, 'सुशर्म्या! राहें, राहें । मागें परतोनियां पाहें, । व्याघ्र पाठी लागला आहे । मेषा[12]! पळसी केउता[13]?' ॥ १०० ॥ पुढें धाविन्नले[14] जगजेठी, । मागें[15] धर्म येतसे पाठीं, । म्हणे, 'सुशर्मा दुष्ट कपटी । जितें[16] हातीं धरावा. ॥ १०१ ॥ सहसा न कीजे प्राणवधू, । प्रतिपाळावा

---

१. 'जिंकोनि जायें' असा पाठभेद आढळतो. २. याच्या (विराटराजाच्या) सहवासांत. 'आश्रयीं आहों' असें पाठांतर. ३. आकांत=मोठा अनर्थ, आक्रोश. ४. मूळ अध्याय ३३ श्लोक १२–१३ पहा. ५. 'केला' असें पाठांतर. आतां जर तुम्हीं कांहीं पराक्रम न कराल, तर मागें केलेला सर्व पराक्रम फुकट गेला, असें समजा. (ओवी ९६ पहा). ६. त्वरित, झटपट. ह्या ओवीच्या पहिल्या तीन चरणांच्या शेवटीं 'वेगीं', 'अंगी' व 'मार्गी' असे पाठ आहेत. मार्गी=मार्गांत, वाटेंत. ७. दुःख पावाल. ८. 'न सोडवितां विराटराया' असाही पाठ आहे. ९. 'पीडीतील' असें पाठांतर. व्यसनीं=संकटांत. १०. निवाडा करूं. बऱ्यावाइटाचा विचार करूं. 'निवारूं' असें पाठांतर. निवारणें=दूर करणें, टाळणें. ११. वाऱ्यापेक्षां. १२. मेंढ्या! मेंढ्याच्या पाठीस वाघ लागला तर त्याची कशी दशा होत असेल, हें कल्पनेनेंच जाणणें बरें. १३. कोठें? १४. 'मीनले' असें पाठांतर. १५. 'धर्म बोले अनुवाद गोष्टी' असाही पाठ आहे. १६. जीवंत. त्याला ठार मारूं नये–असा भाव.

माझा शब्दू, । जित धरूनियां विनोदू । विराटातें दाखवूं[1].' ॥ १०२ ॥ ठाकिलें[2] त्रिगर्तांचें दळ । पारधीं सूदलें बाणजाळ[3] । पुढां धांवोनियां नकुळें । गायी मागें फिरविल्या. ॥ १०३ ॥ ऐकूनि नकुळाची गर्जना । कौरवदूतीं सोडिलें[4] प्राणा, । म्हणती, 'पंडूचिया नंदना- । ऐसा भासे कोण हा?' ॥ १०४ ॥ भयें पळालिया, दूतीं[5] । घेनू विराट[6]पुरपंथीं । लावूनियां, पातला पुढती । त्रिगर्तातें दाटित[7]. ॥ १०५ ॥ गदा घेऊनि वृकोदरू[8] । ताडूं लागला मत्त-कुंजरू । किंकाळिया मारूनियां[9], गिरिवरू । कोसळे, तैसे कोसळती[10]. ॥१०६॥ अंग टाकितांचि[11] क्षिती । दंत उपडिले दोहीं हातीं, । घाव[12] घालितां महावंतीं । स्वर्गलोकीं[12] ठाकिले. ॥ १०७ ॥ पुच्छ[13] गुंडाळूनि हाता । गदा वोपी राउत-माथां । मकर[14]तोंडीं ताडितां लाता । रथ भंगोनि सांडितू[15]. ॥ १०८ ॥ गदा[16] वो-पितां सत्वर । पडती पांयांचे[17] मोगर[17], । एकचि वेळा शतसहस्र । प्रेतदशा पावती[18]. ॥ १०९ ॥ सुशर्मा बोढोनियां[19] चाप । बाण सोडी अतिअमूप, । सहदेव खंडी जैसे सर्प । गरुड मुखें तडतडां. ॥ ११० ॥ सुशर्म्याचें शरसंधान । जेंवी वांकुडी[20] घाली घन । पांडवबाण प्रळयपवन । उडवोनि[21] सांडी क्षणार्धें. ॥१११॥ कोटि पापाचे विशाळ द्रुम । कुठार[22] विष्णुसहस्रनाम[23] । तैसा तो पांडवो-

१. 'दावणें' असें पाठांतर. २. उभे राहिलें. ३. पारध्यांनीं जाळें घातल्याप्रमाणें [नकुळानें] सभोंवतीं बाणांचें जाळें पसरलें. ४. 'सांडिलें प्राणां' असाही पाठ आहे. ५. दूतांबरोबर, जासुदांबरोबर. ६. विराटनगराच्या मार्गाला. '°पुराप्रती' असें पाठांतर. ७. दाटीत, दाबीत, चेपाचेप करीत. भीमानें त्रिगर्तराजाच्या सैन्याशीं लगट केली–असा भाव. 'ताडित' असें पाठां-तर. 'दाटिलें' असाही पाठ आहे. ८. भीम. ९. 'देऊनिया' असें पाठांतर. १०. 'रिचवती' असें पाठांतर. ११. 'अंगा घालितांचि क्षिती' असाही पाठ आहे. १२. 'घाव हाणितां महावंतीं । स्वर्गलोक ठाकिजे' असाहि पाठ आहे. ठाकणें=जाऊन पोंचणें, दाराशीं उभें राहाणें, गांठणें. १३. (हत्तीचें) शेंपूट. 'पुढें फिरवोनी हाता । गदा ओपी राऊतमाथां । मकर तोडोनियां लाता । रथघोडे मारिले' असाही पाठ आहे. १४. मकरतुंड=मकरतोंड=मगराच्या तोंडासारखा केलेला रथाचा अग्रभाग, रथाची दांडी. १५. 'सांडिजे' असें पाठांतर. १६. 'गदा टाकितां सत्वर । पाडीत पायींचे मोगर' असाही पाठ आहे. १७. पायदळ. मोगर=मुख्य. संस्कृत–'मुखर' शब्दापासून 'मोगर' झाला. १८. 'पावले' असें पाठांतर. १९. 'वाहोनियां' असें पाठांतर. २०. पावसाची झड, मेघाच्छादन. २१. 'तेणें उडवूनि सांडिजे' असाही पाठ आहे. २२ कुऱ्हाड. 'छेदी विष्णूचें सहस्रनाम' असें पाठांतर. २३. श्रीमन्महाभारताच्या अनुशासनपर्वांतील १४९ व्या अध्यायामध्यें हें प्रख्यात स्तोत्र आलेलें आहे.···महाभारतांतील शांतिपर्व आणि

त्तम । [1]शत्रुशस्त्रें विखंडी. ॥ ११२ ॥ दरिद्रकाळींच्या कोटी आपदा । नासूनि सांडी येक धनसंपदा । तेंवी शत्रूची [2]शरबाधा । माद्रीसुतें खंडिली. ॥ ११३ ॥ निशाकाळींचीं [3]उडुगणें । लो[4]पती येतां सूर्यकिरणें, । तेंवी पंडूचिया नंदनें । शत्रु[5]बाणांतें खंडिलें. ॥ ११४ ॥ अप्रीतिकाळींचे कुशब्दु । नाशिती स्नेहा[6]चे सुशब्दु. । सुशर्म्यांचीं शस्त्रें विविधु । [7]नकुळानुजें छेदिलीं. ॥ ११५ ॥ स्मशानीं भूतांचिया कोटी । रात्रीं भ्यासुर भासती दृष्टी; । [8]नृसिंहमंत्र जपतां ओंठीं । जेंवि पळती दशदिशा. ॥ ११६ ॥ नानाविधा भूताकृती । नाहींच करिती [9]ब्रह्मसंयुति । तेंवि शत्रुशस्त्रांचिया पं[10]क्ती । शून्य केल्या सहदेवें.

---

अनुशासनपर्व या दोन पर्वांतील भीष्मयुधिष्ठिरसंवादामध्यें युधिष्ठिरानें कोणत्याही विषयाबद्दल प्रश्न विचारावा आणि भीष्मानें त्याबद्दल समग्र आणि सविस्तर माहिती सांगावी, हा जो त्या पर्वांतील प्रचलित क्रम आहे, त्याच क्रमाच्या अनुरोधानें १४९ व्या अध्यायामध्यें…युधिष्ठिरानें प्रश्न विचारला आणि त्या प्रश्नाला उत्तर देतांना भीष्मानें……विष्णुसहस्रनामस्तोत्र एकंदर १०७ श्लोकांमध्यें सांगितलें आहे……हें विष्णुसहस्रनामाचें स्तोत्र ज्या महाभारतामध्यें हल्लीं ग्रथित केलें गेलेलें आहे, त्या महाभारताच्या पूर्व काली झालेले असे कितीतरी धार्मिक ग्रंथ आपल्या आर्य लोकांच्या वाङ्मयामध्यें प्रसिद्ध आहेत. वेद, ब्राह्मण, उपनिषदें इत्यादि ग्रंथ हे ह्या वर्गांत मोडतात या ग्रंथांतून ज्या कांहीं एका प्रकारच्या कल्पना परिपक्वतेला पावत होत्या, त्या या विष्णुसहस्रनामासारख्या स्तोत्रामध्यें संकलित करण्यांत आलेल्या आहेत.……महाभारतामध्यें विष्णुसहस्रनामाप्रमाणें शिवसहस्रनामही आलेले आहे……एकाद्या अरण्यामध्यें सुंदर आणि सुवासिक फुलें ज्याप्रमाणें चोहोकडे विखुरलेलीं असावीं, आणि तीं कोणीतरी एकाद्या रसिक आणि मार्मिक अशा मालाकारानें एकत्र गोळा करून त्यांचा हार गुंफावा, त्याप्रमाणें ऋग्वेदापासून तों थेट स्मृतिग्रंथांपर्यंतच्या विस्तीर्ण वाङ्मयामध्यें पसरलेलीं भगवंताचीं नांवें एकत्र करून त्यांचें हें 'विष्णुसहस्रनाम' नामक स्तोत्र भगवान् व्यासांनीं निर्माण केले आहे." (प्रो० शि. म. परांजपे–साहित्य–संग्रह, भाग १ व २ यांतील 'विष्णुसहस्रनाम' हा लेख जिज्ञासु वाचकांनीं अवश्य पहावा).

१. 'शत्रुशस्त्रां खंडित' असाही पाठ आहे. २. बाणांपासून होणारी पीडा. 'तेंवी शत्रुशस्त्रांची बाधा' असाही पाठ आहे. ३. नक्षत्रें. ४. 'नाशिती' (?) असें पाठांतर. ५. 'शत्रुनाराचें खंडिली' असाही पाठ आहे. नाराच=लोखंडी बाण. 'नाराच' हा शब्द संस्कृतांत पुल्लिंगी आहे. ६. 'स्नेहकाचे' व 'स्नेहकाळींचे' अशी पाठांतरें. ७. सहदेवानें. ८. नारसिंहाचें स्मरण केलें असतां भूतें ( पिशाचें ) भिऊन पळतात, व त्या दैवताच्या सेवेनें भूतबाधेचा परिहार होतो व नृसिंहमंत्राचा जप करणाऱ्यांस पिशाचबाधा होत नाहीं, अशी समजूत आहे. 'नृसिंहकवच' असाही पाठ आहे. ९. ब्रह्मज्ञानाचा योग. 'ब्रह्मस्फूर्ति' असाही पाठ आहे. १०. 'तेंवि शत्रुशस्त्रांची संपत्ती । शून्य केली सहदेवें' असाही पाठ आहे.

॥ ११७ ॥ यावरी [1]चत्वारि शरीं । चारी [2]वारू भेदिले उरीं, । [3]सारथीशिर उडवोनि वरी । नक्षत्र[4]गणने धाडिलें. ॥ ११८ ॥ [5]लात ओपोनि हृदयकमळीं । सुशर्मा पाडिला पृथ्वीतळीं, । केश कवळूनियां करतळीं । हस्त मागें बांधिले. ॥११९॥ भीमें उचलितां गदाघातू । नकुळें धांवूनि धरिला त्याचा हातू, । 'धर्मरायाचा आज्ञासेतू[6] । भंगूं नये सर्वथा.' ॥ १२० ॥ मुक्त करूनि विराटनृपती । आरूढ केला कनक[7]रथीं । किरीट कुंडलें आपुले हातीं । लेवविलीं सन्मानें. १२१ ॥ [8]लेववोनी वस्त्राभरणा । म्हणती, 'आम्ही किंकर[9] जाणा । आतां कंकाचियें[10] दर्शना । परतोनि मागां [11]चालिजे.' ॥ १२२ ॥ सुशर्मा कवळुनियां केशीं । वेगीं आणिला धर्मापासीं । म्हणती, '[12]घांव्र घालूं [13]शिशीं, । किंवा सोडूं? सांग पां.' ॥ १२३ ॥ भीम म्हणे, 'रे पापखाणी ! । 'दास' ऐसें न [14]म्हणतां वदनीं । रक्तकुंकुमें सुवासिनी । मंगळ[15]-माता [16]चर्चणें'. ॥ १२४ ॥ धर्म म्हणे, 'पावलें सकळ, । टाकून जा हें [17]आपुलें स्थळ, । वदों नये तें गुह्य सकळ । प्रकट गोष्टी न बोलें. ॥ १२५ ॥ जें जें तुवां दृष्टी देखिलें । मनें असेल कांहीं कल्पिलें । तें तें मुखें न[18] बोलिजे बोलें । काळें प्रकट हो[19]तसों.' ॥१२६॥

---

१. चार बाणांनीं. 'यानंतरें चाऱ्ही शरीं' असाही पाठ आहे. २. घोडे. ३. 'सारथी छेदुनीयां शस्त्रीं । नक्षत्रलोका धाडिला' व 'सारथीगणा उडवोनी पृथ्वीवरी । नक्षत्रगणा भेटविले' असे पाठभेद आहेत. ४. (जणुं काय) आकाशांतील नक्षत्रांची मोजदाद करण्यासाठीं. ही सुरेख उत्प्रेक्षा आहे. ५. 'सात' (=सात बाण) असें पाठांतर. ६. आज्ञारूपी मर्यादा. (मागें ओव्या १०१ व १०२ पहाव्या ). ७. 'उत्तम रथीं' असाही पाठ आहे. ८. 'वोपोनी' असें पाठांतर. ९. सेवक. 'किं करोमि कुर्याम् वा इति स्वामिनं पृच्छति' इति किंकरः । म्हणजे— 'काय करूं महाराज?' असें विचारणारा जो सेवादक्ष सेवक तो 'किंकर'. १०. 'धर्माचिया' असा पाठ आहे. पण 'कंकाचिया' हा पाठ ज्यास्त चांगला. ११. 'चालिले' असें पाठांतर. १२. 'शस्त्र' असें पाठांतर. १३. मस्तकावर. १४. 'मी तुमचा दास आहें', असें न म्हणशील, तर गदाघात करून तुझें मस्तक रक्तानें व्याप्त करीन—असा भाव. मुळांत असें आहे:—'दासोऽस्मीति त्वया वाच्यं संसत्सु च सभासु च' (अध्याय ३३ श्लोक ६०). १५. गदा हीच मंगलमाता. १६. 'पुजीन' असें पाठांतर. १७. 'टाकोनि जावो आपुलें दळ । वदों नको गुह्य सकळ । प्रकट कोठें न बोलें' असाही पाठ आहे. १८. आपण सर्व पांडव विराटराजाच्या आश्रयास आहों, हें सुशर्म्यानें कोणास सांगूं नये, म्हणून ही त्यास ताकीद दिली जात आहे. 'मनें असेल संकल्पिलें । तें तें मुखें न बोलिजे बोलें' असाही पाठ आहे. १९. आतां इतक्यांतच आम्ही प्रगट होणार. मागें अध्याय १ ओवी ४२ मधील 'येतसों' हें रूप पाहावें.

सुशर्मा सोडिलियावरी । **विराट** पातला दळ[1]भारीं । वाद्यें लागलीं महागजरीं । नानापरी सुस्वरें. ॥ १२७ ॥ अवघीं केला जयजयकार । विजयी जाला **रा-जेश्वर.** । नेणते म्हणती 'प्रताप थोर'; । [2]जाणते म्हणती '[3]परधर्में'. ॥१२८॥ **विराट** विचारी अंतरीं, । 'प्राण रक्षिला चौघां वीरीं । बुडालों उपकारसागरीं । मैनाचळीं[4]सारिखा.' ॥ १२९ ॥ [5]पृथ्वीवरी फांकली मात । **विराटरायाचे** वि-[6]क्रीत भृत्य । हे आजी नसते तरी घात । **कौरव** करिते निर्धारें. ॥ १३० ॥ '[7]**पां**डव अथवा आँन कोण । [8]तत्वता नेणे माझें मन । यांचे तुळणे बळसं-पन्न । लोकत्रयीं न देखों. ॥ १३१ ॥ लटिकें यश पातलें माथां । संतोष न वाटे माझिया चित्ता । कृत्रिमवेशें 'राजा' म्हणतां । दरिद्र [9]न [9]वंचे अंगींचें.' ॥ १३२ ॥ उत्तम वाजी आणि कुंजर । वसनें, धनें, अलंकार । नानारत्नांचे सं-भार । [10]सांडविले [11]परांचे. ॥ १३३ ॥ संपदा घालूनियां [12]रथीं । रणभूमिके केली [13]वस्ती । पुढां वर्तलें तें [14]भूपती ! । **जन्मे**[14]**जया !** परिसीजे[15]. ॥ १३४ ॥ **दक्षिणगो-ग्रहणा**ची कथा । तुवां आणिली श्रवणपथा । **उत्तरगोग्रहण**अमृता । प्राशवीनें[16] सुश्रवणें. ॥ १३५ ॥ **मुक्तेश्वरा**चें बोलणें । परिसतां, संत निवती [17]श्रवणें । **वि-**[18]श्वंभरीं अर्पून मनें । [19]परमानंदें [20]डुलती. ॥ १३६ ॥[21]

**॥ इति श्रीविराटपर्वणि दक्षिणगोग्रहणो नाम पंचमोध्यायः ॥**

---

१. आपल्या सैन्यांत. २. ज्यांना अंतस्थ सर्व गोष्टी माहीत होत्या ते. ३. दुसऱ्याच्या पुण्याईनें. (मागें ओवी १६ वरील टीपा पाहाव्या) ४. मैनाचळ समुद्रांत बुडाला तसा मी देखील उपकारसागरांत बुडून गेलों आहें—असा भाव. मैनाचळ ( मैनाक पर्वत ) हा हिमवान् पर्वतास मेनेपासून झालेल्या दोन पुत्रांतील ज्येष्ठ. पूर्वी इंद्रानें पर्वतांचे पंख छेदिले, ( मागें पृष्ठ २३ टीप १८ पहा). तेव्हां हा आश्रयासाठीं समुद्रांत घुसला व त्यास समुद्रानें आश्रयही दिला— अशी कथा आहे. ५. 'युगायुगीं' असें पाठांतर. ६. विकत घेतलेले सेवक ( पराचा कावळा कसा होतो, त्याचें हें उदाहरण आहे). ७. 'पांडव किंवा आन कोण्ही । तत्वता नेणवे माझे मनीं । यांचे तुळणे बळिष्टपणीं । भुवनत्रयीं न देखो' ॥ असाही पाठ आहे. ८. खरोखर, निःसंशय. नेणे=न जाणे, जाणत नाहीं. ९. न वंचे=न जाय. 'न फिटे' असें पाठांतर. १०. हिरावून घेतले, सोडावयास लाविले. ११. शत्रूंचे. १२. 'हस्ती' असें पाठांतर. हस्ती= हत्तीच्या पाठीवर. १३. 'राहिले वस्ती' असें पाठांतर. १४. राजा जन्मेजया ! १५. 'परियेसीं' असें पाठांतर. १६. 'ग्रासवीन' असें पाठांतर. १७. 'संत निवांत श्रवणें' असें पाठांतर. १८. 'विश्वंभरा' असें पाठांतर. १९. 'परमानंदीं पहुडावें' व 'प्रेमामृतें पहुडणें' असे पाठभेद आहेत. पहुडणें=विश्रांति घेण्यासाठीं कलंडणें, अंग टाकणें, निजणें. २०. डोलतात, संतोष प्रदर्शित करितात. २१. येथें मुळांतील अध्याय ३४ संपतो.

## अध्याय सहावा.[1]

येरीकडे कौरवदळ । खवळलें जैसें वडवानळें[3] । विराटसेनासमुद्रजळ । प्राशावया चालिलें. ॥ १ ॥ ना ते सेना समुद्रजळ,[5] । विराट तोचि सैंधवा[6]चळ । विरवावैयालागीं[7] प्रबळ । वीरश्रीये माजला. ॥ २ ॥ कीं कृतायुगींचे धर्म निर्मळ । नाशावया लागीं कळीकाळ । घेऊनि दुष्टगुणाचा मेळ । उठावला[8] ज्यापरी. ॥ ३ ॥ गंगातनय[9] भारद्वाज[10] । शकुनी सैंधव[11] सूर्यात्मज[12] । दुर्योधन कौरवराज । एकशत बंधुसीं, ॥ ४ ॥ आरूढ झाले कनकरथीं, । ध्वज शोभले नानाकृती, । छत्र-कळसांचिया दीप्ती[13] । भानुतेज लोपलें. ॥ ५ ॥ ढळती[14] कनकदंड चामरें । भाळीं कस्तुरी नव केशरें । अंगीं वेष्टिलीं[15] दिव्यांबरें । मुक्ताफळीं[16] सुजडित. ॥६॥ शाख्यायन भद्रजाती[17] । पुढां[18] जोडिले मत्तहस्ती । सेंदूर कुंभे[19]-

---

१. ह्या अध्यायांत मुक्तेश्वरानें मूळ भारतांतील अध्याय ३५–६९ यांचा सारांश ग्रथित केला आहे. २. 'माजलें जैसा' असें पाठांतर. ३. समुद्रांत राहून त्याचें जल शोषण करणारा अग्नि. याची कथा अशी:—और्व नामक एक मोठा भार्गववंशोत्पन्न मुनि होता, त्यास असें कळलें, कीं कार्तवीर्यकुलोत्पन्न राजांनीं भार्गवसंततीचा उच्छेद करून त्यांच्या कुलांतील स्त्रियांस द्रव्यानिमित्त बहुत पीडा दिली. तेव्हां यानें त्यांच्या नाशासाठी तपःप्रभावानें भयंकर अग्नि उत्पन्न केला. त्यामुळें क्षत्रियांस फार त्रास झाला. तेव्हां ते सर्व और्वमुनीस शरण गेले व त्यानें आपला कोपानल समुद्रांत टाकिला. यासच 'वडवाग्नि' किंवा 'वडवानळ' असें म्हणतात. कारण याचें मुख वडवे-(घोडी) सारखें आहे, अशी समजूत आहे. ४. 'क्षोभलें' असें पाठांतर. ५. ती सेना नव्हती, तर, तें समुद्रजळ होतें—अर्थात् सैन्य इतकें अफाट होतें, असा भाव. अपन्हुति नामक अलंकार आहे. ६. मिठाचा पर्वत. ७. विरघळवून टाकण्यासाठीं. 'वीरगर्जनेचिया प्रबळा । वीरश्रिया माजला' असाही पाठ आहे. ८. उठावणें=हल्ला करणें, छापा घालणें, युद्धार्थ चालून जाण्यासाठीं उठणें. ९. गांगेय=भीष्म. १०. द्रोणाचार्य. हा भरद्वाजमुनींचा पुत्र. द्रोण (द्रोणाचार्य) हा द्रोणी संज्ञक यज्ञपात्रांत भरद्वाजरेतापासून उत्पन्न झाला. घृताची नामक अप्सरेला पाहतांच भरद्वाजमुनीचें अमोघ रेत कामविकारानें पतन पावलें व त्यापासून द्रोणाचार्य झाले—अशी कथा आहे. ११. सिंधुदेशाचा राजा जयद्रथ. पांडव वनवासांत असतां जयद्रथानें द्रौपदीस पळवून नेण्याचा प्रयत्न केला होता. पण तो पांडवांच्या पराक्रमामुळें फसला. (मागें पृष्ठ ३७ टीप ८ पहा). १२. सूर्यपुत्र (कर्ण). १३. दीप्तीमुळें, तेजामुळें. १४. ढळणें=उडणें, (चामरें) वारलीं जाणें. 'पुढती' असें पाठांतर. १५. 'माथां मुकुट मनोहरें' असाही पाठ आहे. १६. मुक्ताफळीं सुजडित [अशीं] दिव्यांबरें अंगीं वेष्टिलीं—असा अन्वय. १७. मागें अध्याय ५ ओंवी ६४ पहा. १८. 'लोटिले' असें पाठांतर. १९. गंडस्थळावर. 'सेंदूरें······रंगासारिखे' असें पाठांतर.

स्थळावरुती । अरुण[1]रंगासारिखा. ॥ ७ ॥ दंतीं जेडिले[2] स्वर्णबंधें[3] । रत्नें झळकती नानाविध । अंदू[4]-नेपुरांचा नाद । घंटा[5]नादीं मिसळला. ॥ ८ ॥ पताकांवरी सुवर्णतगटें[6] । पृष्ठी[7] मिरवती सूर्यपुटें[8] । महावंत[9] बैसले नेटें । शूळ[10] हातें झेलिती[11]. ॥ ९ ॥ काळें अंजनगिरीचें[12] बाळ । तेंवी कुंजर महाविशाळ । शुंडा[13] उचलोनियां सरळ[14] । ऐरावता[15] 'ये' म्हणती. ॥१०॥ पैजा जिंकिती पवनवेगा[16] । तैसी चपळता महातुरगां, । आभरणें बाणलीं अंगा. । वरी राऊत वळघले[17]. ॥ ११ ॥ सेनासागरींच्या नौका । तैसे रहंवर धांवती देखा । वस्तू भरलीया अमोलिका । शस्त्रें अस्त्रें सुतेजें. ॥ १२ ॥ ब्रिदें[18] खोवोनि भुजादंडीं । साधनां[19] दाविती कडोविकडी, । पायींचे वीर चालिले प्रौढी । शत्रुसेना विभांडूं. ॥१३॥ कुंजरभेरी चंडानना । गर्जेती[20], म्हणती, 'राहें घना ! । वोसरोनि जाशी, कृपणा[21] ! । घोष न करीं[22] वाउगा.' ॥ १४ ॥ निशाणें दुंदुभी रणतुरें । तडकें[23]

---

१. अरुण=पहाटेचा तांबुस प्रकाश. 'अरुणमंडळें स्थापिलीं' असें पाठांतर. २. 'जोडिले' असें पाठांतर. ३. सोन्याचे पट्टे. हत्तींच्या दांतांवर सोन्याचे पट्टे बसविलेले होते—असा भाव. ४. अंदू=हत्तीच्या पायास बांधावयाची सांखळी. नेपुर=नूपुर, घागऱ्यांचा वाळा, पैंजण. ५. हत्तीच्या गळ्यांत घंटा असतात, त्यांच्या नादांत. ६. सोन्याचा वर्ख, कलाबतू. ७. पाठीमागें. 'पृष्टीवरी' असें पाठांतर. ८. अबदागीर. ९. माहूत. १०. भाला, भाल्यासारखें टोंक असलेलें शस्त्र. ११. 'झेलिती' असें पाठांतर. १२. अंजन+गिरी=काजळाचा पर्वत. तो हत्ती नव्हे तर तो कज्जलगिरीचा बच्चा होय, अशी ही सुरेख **अपन्हुति** आहे. १३. (हत्तींच्या) सोंडा. १४. 'सबळा' असें पाठांतर. १५. ऐरावत हा इंद्राचा हत्ती. त्याला सुद्धां युद्धाचें आव्हान देणारे, ऐरावताला न डरणारे, मोठे पराक्रमी. [इरा आपः तद्वान् इरावान् समुद्रः तस्मादुत्पन्नः । इरा उदकानि सन्त्यस्मिन् इरावान् इरावत्यब्धौ भवः ऐरावतः । समुद्रांत उत्पन्न झालेला जो तो ऐरावत, असा ऐरावत शब्दाचा मूलार्थ आहे. देवदैत्यांनीं समुद्राचें मंथन केलें तेव्हां त्यांतून जीं चौदा रत्नें निघालीं त्यांतील ऐरावत हें एक होय]. १६. पैजेनें वायुवेगाला जिंकतील, वाऱ्यापेक्षांही चपळ असे घोडे. १७. चढले, बसले. वरी=पूर्वी वर्णन केलेल्या घोड्यांवर. १८. ब्रीद=बाणा, प्रतिज्ञा. (२) बाण्याचें दर्शक चिन्ह (कडें, पदक, बिल्ला वगैरे). 'बिरुदें देखोनी' असाही पाठ आहे. १९.साधनें, उपकरणें, सामग्री. २०. 'गर्जतां म्हणती' असें पाठांतर. २१. कृपण=कंजूष, अनाथ, दुबळा. हें नगाऱ्याच्या तोंडीं मुक्तेश्वरानें घातलेलें भाषण चमत्कृतिजनक आहे. त्यास मुळांत आधार नाहीं. ही **चेतनधर्मारोपोक्ति** होय. २२. 'घोष करिसी व्यर्थ कां ?' असाही पाठ आहे. २३. विजेच्या कडकडाटामुळें, मोठ्या आवाजामुळें. 'नादें तडकती गिरीशिखरें' असाही पाठ आहे. बुजालीं=दचकलीं, घाबरलीं.

बुजालीं खेचरें । यंत्र[1]बाण एकसरें । गगनमार्गें उसळती.[2] ॥ १५ ॥ पातले विराटपुरानिकटी, । वळल्या गोधनांच्या[3] थाटी । रक्षकांच्या पिटोनि पाठी । हाक नगरीं[4] धाडिली. ॥ १६ ॥ उत्तरें सांगती उत्तरा, । 'धाडी[5] पातली राजकुमरा! । गोधनें हरिलीं सर्व, नगरा । नागविती निर्धारें.[6] ॥ १७ ॥ राजा गुंतला संग्रामीं, । युद्धा गेलें पाहिजे तुम्हीं । स्त्रिया बंदीं[7] पडतां, ग्रामीं । महा आक्रांत माजेल.'[8] ॥ १८ ॥ 'पुरुषमात्र गेले रणा' । हेळसोनी[9] बोलती अंगना । 'पुरुष[10] होईं, कां भूपणां । स्त्रियांचिया स्वीकारीं.'[11] ॥ १९ ॥ उत्तर बोले पुरुषार्थें, । 'पराभवितों[12] परचक्रातें;[13] । परी सारथी नाहीं मातें, । एकल्या युद्ध घडेना. ॥ २० ॥ सारथी मिळे हो! अभंगें[14] । तरी खंडितों परदळाचें डंग.[15] । आतां जातसें, तुमचा भोगें[16] । होणार तैसा होतसे. ॥ २१ ॥ मी करीतसें पलायन, । तुम्हीं प्रारब्धा जावें शरण.' । स्त्रिया म्हणती, 'धन्य! धन्य! । मत्स्यकुळीं कुळपुत्रा! ॥ २२ ॥ पुत्र प्रसवावे कौंतियें[17] । इतर ते जितचि प्रेतकाया । नपुंसकलिंगें लोंबती[18] वांया । कीं फळें आलीं[19] अंकीं[20]तें. ॥२३॥ **शेळीये गळींचे गळस्तन,[21] । तेंवी पुरुष करणीहीन, । सशानींचें भग्नभांजन[22] । जळो जिणें तयाचें.'** ॥ २४ ॥ येरु[23] म्हणे 'गेलिया प्राण । स्त्रियां-

---

१. 'यंत्रें बाण' असें पाठांतर. २. 'गर्जती' असें पाठांतर. ३. गाईंचीं खिल्लारें. ४. 'नगरा' असें पाठांतर. 'नगर' म्हणजे 'नागरिक' असा अर्थ. ५. धाडी=धाड, हल्ला, परचक्र. 'धाड' मुक्तेश्वरकालीन लोकांच्या परिचयाचीच झाली होती. ६. 'सद्या' असें पाठांतर. सद्यः=तत्क्षणीं, आतांच. ७. बंदिवासांत, कैदेंत. ८. 'महा अनर्थ उपजेल' असाही पाठ आहे. ९. हिणवून. १०. तूं पुरुषासारखा युद्ध करावयास जातोस? कीं बायकांसारख्या हातांत बांगड्या भरतोस?–असा भाव. 'पुरुष होय' असें पाठांतर. ११. 'अंगीकारीं' असा अन्य पाठ. १२. पराभव केला असता. 'पराभवीन' असें पाठांतर. १३. शत्रूच्या सैन्यास. १४. ज्याचा पराजय होणार नाहीं असा, अखंड. भंग=पराजय, नाश, विघ्न. 'मिळे जरी अभंग' असें पाठांतर. १५. रान. 'दांग'(=रान) असाही पाठ आहे. १६. सुखदुःखादि अनुभवाचें फळ, प्रारब्ध. १७. कुंतीनें. १८. 'बोलती वांया' असें पाठांतर. १९. 'फळें जैसीं' असा अन्य पाठ. २०. रुईच्या झाडाला. २१. शेळीच्या गळ्याजवळचा मांसल अवयव. हा निरुपयोगी असतो. म्हणून एखाद्या कर्तृत्वहीन मनुष्यास 'अजागलस्तना'ची उपमा देतात. पुढील सुभाषित लक्षांत ठेवण्यासारखें आहे:—धर्मार्थकाममोक्षाणां यस्यैकोऽपि न विद्यते । अजागलस्तनस्येव तस्य जन्म निरर्थकम्. ॥ २२. फुटकें भांडें. 'भक्ष–भोजन' असा अन्य पाठ. २३. राजपुत्र उत्तर.

लागीं पुसे कोण? । कैंचे पुत्र? कैंचें धन? । कैंचें सदन कवणाचें?[1]' ॥२५॥ सैरंध्री म्हणे, 'गा नृपाळा! । प्रार्थूनि पाहें बृहन्नळा, । पार्थासंगती[2] सारथ्यकळा । साधिली असे नेटकी. ॥ २६ ॥ अंगिकारील मनोभावें, । तरी सारथ्य करील बरवें, । संग्रामीं जिंकोनि कौरवें[3] । कीर्तिभाजा[4] पर्णिसी[5]'. ॥२७॥ उत्तर म्हणे, 'बो! बृहन्नळे! । परचक्र पातलें महाप्रबळें. । युद्धा इच्छीं परि न मिळे । रथीं[6] सारथी मजजोगा.' ॥ २८ ॥ हांसोनि बोले बृहन्नळा, । 'म्यां रक्षावी नृत्यशाळा । तथापी ऐसियाँ[7] संकटकाळा । सारथ्य करीन मी तुझें. ॥ २९ ॥ विलंब न करीं, ऊठीं वेगीं, । सत्वर रथातें संजोगीं[8].' । रहंवरीं जोडलिया तुरगी[9] । बृहन्नळें स्वहस्तें[10]. ॥ ३० ॥ अंगीं लेववूनि त्रांण[11], । हातीं दीधले धनुष्यबाण, । पाठीसीं[12] घालूनि, आपण । पुढां धुरेसी बैसला. ॥ ३१ ॥ चढवुनी कंचुकीचिया पदरा । झाडोनि बांधिलें कबरीभारा[13], । हृदयावरुनी वस्त्रपदरा । नाभिस्थानीं खोविलें. ॥ ३२ ॥ नारी करिती अक्षवाणें[14], । ब्राह्मण देती आशीर्वचनें, । भगिनी[15] म्हणे, 'वस्त्राभरणें । अपार आम्हां आणावीं'. ॥ ३३ ॥ प्रतोद[16] घेवोनियां हातीं । रथ लोटिला सत्वरगती, । विमानयानीं अमरपंक्ती[17] । म्हणती, 'अद्भुत मांडिलें.' ॥ ३४ ॥ वामें उजू[18] गेले तांस[19], । सव्य[20] गेले वायस, । पुढें भेटले पूर्णकलश । आणि गोरस–घृतपात्रें. ॥ ३५ ॥ कुंकुमयुक्त सुवासिनी । फळें

---

१. येथें पुढील सुभाषिताचें स्मरण होतें:–आत्मानं सततं रक्षेद्दारैरपि धनैरपि । पुनर्दाराः पुनर्वित्तं न शरीरं पुनः पुनः ॥ २. मागें अध्याय १ ओव्या ५३–५४ पहाव्या. ३. हा नपुंसकलिंगी प्रयोग कौरव हे किती निंद्य व तिरस्कारार्ह आहेत, हें दर्शवितो. 'संग्राम जिंकोनी गौरवें' असाही पाठ आहे. ४. कीर्तिरूप स्त्री. ५. वरिशील. ६. 'सार सारथी' असा अन्य पाठ. सार=मुख्य, अस्सल. ७. 'इया' असें पाठांतर. ८. रथाला घोडे जुंप. 'रहंवर जोडिला तुरंगीं' असाही पाठ आहे. ९. तुरगी=घोडी. घोड्यापेक्षां घोडी ज्यास्त चपळ असते. 'रहंवर जोडिला तुरंगी' असाही पाठ आहे. १०. 'सुहस्तें' असें पाठांतर. ११. कवच, चिलखत. १२. उत्तराला आपल्या पाठीमागें बसवून–असा भाव. 'पाठीसी भरूनियां भरणें' असाही पाठ आहे. भरणें=भरताड, बारदान. १३. वेणी, बुचडा. १४. आरत्या. अक्षवाण=मंगल प्रसंगीं पुष्कळ वाती लावलेला दीप (घरचा यजमान किंवा देवता यांच्या भोवतीं) ओवाळतात तें, औक्षण. अरिष्ट टाळण्याचा आणि दीर्घायुष्य चिंतण्याचा यांत हेतु असतो. (संस्कृत–आयुष्यवान् ह्या शब्दापासून 'औक्षण' हा शब्द झाला). १५. बहीण (उत्तरा). 'बहिणी म्हणती' असें पाठांतर. १६. चाबूक. १७. देवांचे समुदाय. 'अमरपती । म्हणे' असा अन्य पाठ. १८. सरळ डावीकडून. 'वाम भुजें' असें पाठांतर. १९. चापपक्षी. २०. उजव्या बाजूकडून.

अर्पिती पंच ब्राह्मणी,[1] । मयूर आणि शिखंडिणी[2] । तांडवनृत्यें नाचती. ॥३६॥ मुखीं मुक्ताफळांचे घोंस । सन्मुख पातले राजहंस, । कर्दळीफळें सहित मांस । विक्रयकार भेटले. ॥ ३७ ॥ स्मरोनियां श्रीकृष्णचरण, । पाठी विराटनृपनंदन,[3] । अंगनावेशें[4] तो अर्जुन । रणभूमिके पातला. ॥ ३८ ॥ देखोनियां कौरवांचे भार । उचलिले[5] जैसे गिरिवर, । पर्वतमाथां जेंवी तरुवर । तेंवी दिसती[6] गजपृष्ठीं. ॥ ३९ ॥ किंकाळिया मारिती गजघंटे,[7] । वारू हिंसती उद्भट, । सैरां[8] रथाचे घडघडाट । सिंहनाद वीरांचे. ॥ ४० ॥ सहस्र छत्रें भीष्मावरी,[9] । सहस्रार्ध द्रोणावरी, । तीन शतें चंद्राकारी । कर्णमाथां मिरवती. ॥ ४१ ॥ जडीत किरीट नीलरत्नीं[10] । गरुडपांचूचीं[11] कुंडलें श्रवणीं । पदकमाळा करकंकणीं[12] । पांचूरत्नें[13] जडियेलीं. ॥ ४२ ॥ वेढियेलीं पट्टकूळवस्त्रें[14] । नीळवर्ण सहस्र छत्रें । नीळरथीं राजेपुत्रें[15] । दुर्योधनें मिरविजे.[15] ॥ ४३ ॥ युद्धा येईल विराटदळ । म्हणोनि योद्धे उदित[16] सकळ, । एक म्हणती, 'तो निर्बळ । भग्न होईल झुंजतां.' ॥ ४४ ॥ येतां देखोनी एक रथ । अवघे म्हणती, 'हें अत्यद्भुत.' । सकळिकांचे चक्षू तेथ । एके ठायीं मीनले.[17] ॥ ४५ ॥ 'आठ अक्षौहिणी सेना, । एके रथेसीं पातला रणा । तोही दिसे हो! अंगना– । पाठीं बाळक नेणतें[18]! ॥ ४६ ॥ एक विनोदें उपहासिती,[19] । एक देखोनी साशंक चित्तीं, । एक म्हणती, 'इये क्षिती । युद्ध दारुण दिसताहे. ॥ ४७ ॥ असंख्य दळावरी एकला । युद्धालागीं जो पातला, । होईल अवतारपुरुष भला । भार्गवरामासारिखा[20]'. ॥ ४८ ॥

---

१. ब्राह्मणस्त्रिया. २. लांडोर. शिखंडी=मोर. ३. विराटराजाचा पुत्र (उत्तर). ४. स्त्रीवेषानें. ५. उचलणें=उठावणें, इरेस चढणें. ६. 'पताका' असें पाठांतर. ७. गजघंट=गजघटा, हत्तींचा समुदाय. ८. झपाट्यानें चालणारे. 'सैघ' असें पाठांतर. ९. 'भीष्माशिरीं' असें पाठांतर. १०. 'नव रत्नीं' असें पाठांतर. ११. गरूड पाच (पाचू)=पाच नांवाचें रत्न, राजनीळ, ( संस्कृत ) गारुत्मतमणि. 'गरूडपाचिचिये किणीं' असाही पाठ आहे. १२. 'कौस्तुभमणी' असा अन्य पाठ. १३. 'पंच रत्नें' असें पाठांतर. १४. रेशमी वस्त्रांनीं. 'पट्टकुळें नीळ वस्त्रें' असा अन्य पाठ. १५. 'पुत्रासह दुर्योधन मिरवितो' असा अर्थ. १६. उठलेले, सिद्ध. 'म्हणोनि चंड योद्धे सकळ' असाही पाठ आहे. १७. जडले. १८. अजाण, अज्ञान. १९. थट्टा करितात. २०. परशुरामासारखा. परशुरामानें एकवीस वेळां पृथ्वी निःक्षत्रिय करण्याचा प्रयत्न केला, अशी कथा आहे.

भीष्म पाहे स्तब्धदृष्टी, । द्रोण विस्मयो मानी हृत्पुटीं,[2] । दुर्योधनाचिये पोटीं[1] । कंप कांहीं संचरला. ॥ ४९ ॥ कर्ण म्हणे, 'अवचिन्ह[3] गाढें । ईश्वरमायेचें कुंवाडें,[4] । सर्षप[5] भाविला, परि पुढें । महापर्वत[6] ओढवला'. ॥ ५० ॥ शकुनी म्हणे, 'फिरा मागें । हस्तनापुरा ठाका वेगें.' । पिंगळा[7] पक्षिणीतें[8] सांगे, । 'अपेश-हाणी[9] कौरवां.' ॥ ५१ ॥ असो,[10] देखोनी कौरवभारा । भय सुटलें विराट-कुमरा । गात्रें कांपती थरथरां । भोंवंडी[11] नेत्रां दाटली. ॥ ५२ ॥ म्हणे, 'व्याकुळ माझें मन, । कासावीस होतसे प्राण, । नपुंसकाचे[12] बुद्धी मरण । तत्काळिक पावलों. ॥ ५३ ॥ कैचें युद्ध? कैचें नांव? । आपण[13] वांचल्या पावलें[14] सर्व, । प्रळयानळा देतां खेंव[15] । पतंग वांचे केउता? ॥ ५४ ॥ असंख्यात रणकर्कश[16] करूं । पाहती[17] ब्रह्मांडग्रास, । एकें रथेंसीं क्लीब पुरुष । मरून मारीलें[18] मजलागीं.' ॥ ५५ ॥ उडी घालोनी तळवटीं[19] । पळों लागला नगरवाटी,[20] । पार्थें धावूनियां पाठीं । केश मुष्टीं कवळिले. ॥ ५६ ॥ कौरववीर पाहाती दृष्टी । नाना कुतर्क[21] करिती पोटीं, । टाळिया पिटोनि करतटीं । हास्य करीती विनोदें. ॥ ५७ ॥ पृष्ठिभागीं गौरवर्णी[22] । धांवतां हाले विशाळ वेणी[23] । चालतां वोळखोनिया चिन्हीं । द्रोण पाहे भीष्मांकडे.[24] ॥ ५८ ॥ नंदीजा[25] करी भ्रू-

१. अंतःकरणांत. 'पोटी' असें पाठांतर. २. 'हृदयपुटीं' असें पाठांतर. ३. दुश्चिन्ह, अपशकुन. ४. कोडें, गूढ. ५. मोहरीसारखा अल्प पदार्थ.'परि संशय भावाचा पुढें' असाही पाठ आहे. ६. 'मारुनी मारिती' असें पाठांतर. ७. अंगावर लहान ठिपके असलेलें एक जातीचें घुबड. ८. 'पक्षियांतें' असें पाठांतर. ९. अपयश ( पराजय ) व हानी. प्रस्तुत प्रसंगीं झालेले उत्पात व अपशकुन यांच्या वर्णनास मुक्तेश्वरानें फांटा दिला आहे. १०. 'तैसेंचि' असाही पाठ आहे. ११. भोंवळ, भ्रम, घेरी. 'नेत्रीं दाटली' असें पाठांतर. १२. या नपुंसकाच्या म्हणजे बृहन्नळेच्या बुद्धीला (नादाला) लागून. १३. मागें ओवी २५ पहा. 'प्राण' असें पाठांतर. १४. 'पावेल' असें पाठांतर. असा संकुचित वृत्तीचा व आपल्यापुरतें पाहाणारा राजपुत्र असणें, हें विराटदेशाच्या प्रजेचें दुर्दैव होय! १५. आलिंगन. १६. युद्धामध्यें कठोर पुरुष. १७. 'भाविती' असें पाठांतर. १८. 'मारून मारिती मजलागीं' असें पाठांतर. १९. तळीं, भुईवर. २०. नगराची वाट धरून. (मूळ अध्याय ३८ श्लोक ४० पहा). २१. 'कौतुक' व 'तर्क' अशीं पाठांतरें. २२. गौरवर्ण अशी बृहन्नडा. २३. हें बृहन्नळेचें वर्णन आहे. २४. 'भीष्मातें' असें पाठांतर. २५. भीष्माला.

संकेत, । 'हा [1]लंकेशवनारिकेत । जाणोनियां मनोगत[2] । गूढ गुह्यार्थ रक्षावा. ॥ ५९ ॥ जयातें [3]नगाचें अभिधान, । [4]नगारीचा प्रियनंदन, । अंगनावेषें हा अर्जुन । वोळखिला[5], वोळखीं तूं. ॥६०॥ रणीं जिंकोनि हा आमुतें । गायी नेईल हो! निश्चितें, । यालागीं तुम्हीं पुरुषार्थें । आजी कौरव रक्षावे.' ॥ ६१ ॥ [6]झोंटीं धरूनि वि[7]राटसुता । आणोनि बांधिला रथावरुता. । [8]म्हणे, 'मी येथें संग्राम करितां । भय सर्वथा तुज नाहीं. ॥ ६२ ॥ माझिया दृष्टी जैसीं तृणें । उडवोनि सांडीन अर्धक्षणें, । तुवां [9]निमेक स्वस्थ मनें । मजपाठीसीं [10]बैसावें.' ॥६३॥ वि[11]भूती चर्चूनियां [12]भाळीं । वरदहस्त स्पर्शिला[13] मौळीं[14] । ते वेळीं भयाची का[15]जळी । फिटोनि गेली तत्काळ. ॥६४॥ म्हणे, 'होऊनी निर्भय दक्ष, । स्मशानभूमिके शमीचा वृक्ष । तेथें जाऊनि प्रत्यक्ष । शस्त्रें माझीं विलोकीं. ॥६५॥ माझिया दश[16]नामाचा जप । करीं, धरूनि शुद्ध संकल्प, । [17]तेणें लोपोनियां सर्प । शस्त्रें दृष्टीं दे[18]खसील. ॥ ६६ ॥ ताल[19]प्रमाण गांडीव चाप. । ज्यावरी सूर्यतेजाची ओप । सुवर्णवर्ण इंद्रगोप[20] । मागां पुढां रेखिले[21]. ॥ ६७ ॥ [22]रत्नमुष्टी [23]कांचनकोश ।

---

१. लंकापति जो रावण त्याच्या वनाचा शत्रु जो मारुति तो ध्वजावर आहे ज्याच्या तो म्हणजे अर्जुन. ही ओवी रचण्याच्या वेळीं मुक्तेश्वरापुढें मुळांतील अध्याय ३९ श्लोक १० हा प्रसिद्ध कूट श्लोक होता असें दिसतें. 'नदीज लंकेशवनारिकेतुः······' असा खरा पदच्छेद असतां वाचणाऱ्यानें चुकी केली तर 'नदीजलं केशव नारिकेतुः······' अशीं पदें पडून अर्थनिष्पत्ति कांहीं न होतां निष्कारण त्याच्या मनाचा घोटाळा मात्र होईल. असे कूट श्लोक व्यासांनीं आपला लेखक जो गणपति त्यानें ग्रंथरचनेच्या कामीं आपल्यास फार घाई करूं नये. म्हणून मधून मधून महाभारतांत घातले आहेत. पर्यायोक्तालंकार. २. इंगित, मर्म. 'मनांत' असें पाठांतर. ३. 'अर्जुन' असें वृक्षाचें नांव. ४. इंद्राचा. ५. ह्याचा कर्त्ता–मीं म्हणजे भीष्म. ६. शेंडीनें धरून. झोंट, झोंटी=झिपरी, झुलूप, बट. ७. उत्तराला. ८. हें बृहन्नळेचें भाषण आहे. ९. क्षणभर. १०. 'असावें' असें पाठांतर. ११. रक्षा, अंगारा, भस्म. १२. कपाळीं. १३. बृहन्नळेनें आपला हस्त उत्तराच्या मस्तकीं ठेविला–असा भाव. 'हस्तें स्पर्शिलें वदन–मौळीं' असाही पाठ आहे. १४. मस्तकाला. १५. डोळ्यांपुढें येणारी अंधारी, मूर्च्छा. 'काळजी' असें पाठांतर. १६. माझ्या दहा नांवांचा ( पुढें ओवी ७५ पहा ). १७. 'ते वेळीं' असें पाठांतर. १८. 'शस्त्रें दृष्टी दीसती' असाही पाठ आहे. १९. ताडाच्या झाडासारखें उंच (लांबलचक). २०. सोनेरी रंगाचे इंद्रगोप नांवाचे किडे. ह्या किड्यांच्या आंगावर असणाऱ्या ठिपक्यांसारख्या ठिपक्यांनीं चित्रित केलेलें धनुष्य धर्मराजाचें होतें (मूळ अध्याय ४३ श्लोक १०). '०तेजाचें ओप । सुवर्ण वर्णें···' असें पाठांतर. २१. 'वर्ण असे तयांचा' असाही पाठ आहे. २२. रत्नाच्या मुठी. २३. सोन्याचें म्यान (मेण).

तोंडीं झळके रविप्रकाश । धारेपासूनि तीव्र हुताश । स्फुल्[1]लिंग झोडी सुतेज. ॥ ६८ ॥ ऐसी माझी खड्गलतिका । व्याघ्रचर्मे वेष्टिली देखा । ते सोडोनि नर-नायका ! । परमयत्नें आणावी. ॥ ६९ ॥ [3]क्षीरार्णव भरला र[4]त्नीं, । निधी[5] न वत्ने[5] सुवर्णी । अक्षयी भाता भरला बाणीं । सुवर्णकवचें वेष्टिला. ॥ ७० ॥ हेम-गोफीं गुंफिले [6]मणी । झळकती बाळार्काच्या किरणीं । बि[7]रडां गोविले माणि-क्यमणी । वोळखोनी आणावी. ॥ ७१ ॥ जें [8]उजळिलें [9]चंद्रओपें । चारी [10]खंगें, चत्वारि चापें । मत्स्यकूर्मवराहरूपें । [11]कनकोदकें ज्यावरी. ॥ ७२ ॥ [12]रत्नरागें अतिसोज्वळ । रेखिले सिंह आणि शार्दूळ । गरुडहनुमंतरूपें कुशळ । हेमपत्रीं शोभती. ॥ ७३ ॥ चारी बांधोनियां वरुती । माझीं आणावीं [13]अति-निगुती.' । विराटपुत्र करी विनंती, । 'नामें कैसीं म[14]र्जे सांगा.' ॥७४॥ 'अर्जुन फाल्गुन आणि जिष्णु, । किरीटी, पांचवें श्वेतवाहनु, । बीभत्सु, विजयी, [15]आं-ठवें कृष्णु । सव्यसाची धनंजय. ॥ ७५ ॥ [16]दाही नामें जपतां ओठीं । विघ्नें पळती बारावाटीं, । विजयलक्ष्मी बैसे पाठीं, । दरिद्र दृष्टी दिसेना.' ॥ ७६ ॥ पुढती पुसे प्रार्थून, । 'नामें पडावया काय कारण ? । दाही नामांचें व्याख्[17]यान । सांगोपांग मज बोधीं. ॥ ७७ ॥ [18]जिंकोनि भूपाळांचीं धनें । यज्ञीं देव, ब्राह्मण, दीनें । तो[19]षवीं, म्हणोनि व्यासवचनें । धनंजय हें नांव. ॥ ७८ ॥ देव, दैत्य, [20]मानव-राजा । जिंकूनि वरिली कीर्ति[21]भाजा । यालागीं विजयी महाराजा । नाम

---

१. ठिणग्या. २. 'सांडी' असें पाठांतर. ३. क्षीरसमुद्र. ४. रत्नांनीं. म्हणूनच समुद्राला 'रत्नाकर' असें म्हणतात. ५. कितीही सुवर्ण काढिलें तरी रिकामा न होणारा ठेवा. 'न सरे वेचितां समरांगणीं' असाही पाठ आहे. ६. 'हेममणी गुंफिले गुणीं' असाही पाठ आहे. गुण=दोरा, सूत. ७. ज्याला माणिकमण्याचें बिरडें लाविलें आहे. ८. 'जें उजळलिया चंद्र लोपे । प्रत्यक्ष अग्नीच जें रूपें । तेजें फांकती अमूपें । कनकोदकें ज्यापरी' असा ह्या ओवीचा अन्य पाठ आहे. ९. चंद्रप्रकाशानें. १०. खड्ग, तलवारी. ११. सोन्याचें पाणी, मुलामा. १२. रत्नांच्या रंगांनीं. 'रत्नरंगीं' असें पाठांतर. १३. उत्तम रीतीनें. १४. 'नामें कैसीं सांग पां' असाही पाठ आहे. १५. 'आठवा' असें पाठांतर. १६. 'यीयें नामें' असें पाठांतर. १७. स्पष्टीकरण. 'आख्यान' असें पाठांतर. आख्यान=जुन्या गोष्टींचा उल्लेख, दंतकथा. १८. 'जिंतोनी' असें पाठांतर. १९. 'तोषविलीं' असें पाठांतर. २०. 'मनुजा' असा अन्य पाठ. २१. कीर्तिरूप स्त्री.

साजे तयातें. ॥ ७९ ॥ रजताचळातुल्य[1] धवळें । झुंजतां बळ चढे आगळें । यालागीं बोलिलें देवेंपाळें[2] । श्वेतवाहन हें नांव. ॥ ८० ॥ पूर्वा[3]उत्तराफाल्गुनी-मध्यकाळीं । हिमाचळगिरीच्या मौळीं । जन्मला म्हणोनि सुरीं[4] सकळीं । फाल्गुन ऐसें बोलती[5]. ॥ ८१ ॥ नि[6]वातकवच मारिले रणीं । किरीट लेववी वज्रपाणी[7] । यालागीं किरीटी ऐसें जनीं । नाम ठेविलें[8] तयाचें. ॥ ८२ ॥ कल्पांतभैरवतुल्य[9] रणीं । देवां दैत्यां भासे नयनीं । यालागीं बीभत्सु व्यासमुनी[10] । नाम ठेवी तयाचें. ॥ ८३ ॥ वामदक्षिण दोन्ही करीं । गांडीव[11] आकर्षी रणचत्वरीं[12] । यालागीं बोलिजे सुरासुरीं । सव्यसाची[13] हें नांव. ॥ ८४ ॥ काया, वाचा आणि मनें । कर्में निपजती सत्वगुणें । सत्वाचेनि सितवर्णें[14] । अर्जुन नाम त्या साजे. ॥ ८५ ॥ अर्जुनवृक्षाऐसा धवळ । कर्में सत्वगुणी[15] सकळ । निपजती म्हणोनि निर्मळें[16] । अर्जुन ऐसें बोलिजे[17]. ॥ ८६ ॥ अं[18]तरीं साही[19] शत्रूंचें दमन, । बाह्यें[20] दैत्यदानवां कदन- । कर्ता म्हणोनि श्रेष्ठजन । जिष्णु[21] ऐसें बोलती. ॥ ८७ ॥ कृष्णदर्शनीं आवडी गहन, । कृष्णीं[22] वेधलें तनु मन, । यालागीं स्थापी[23] स्नेहसंपन्न । कृष्णनाम आवडी. ॥ ८८ ॥ ऐसीं

---

१. रुप्याच्या पर्वतासारखें शुभ्र. २. इंद्रानें. ३. 'उत्तराभ्यां फल्गुनीभ्यां नक्षत्राभ्यामहं दिवा । जातो हिमवतः पृष्ठे तेन मां फाल्गुनं विदुः' ॥ असें मुळांत आहे, (अध्याय ४४ श्लोक १६). 'पूर्व—उत्तर महीस्थळीं' असाही पाठ आहे. ४. देवांनीं. 'सुर सकळीं' असें पाठांतर. ५. 'म्हणिजे' असें पाठांतर. ६. प्रल्हादभ्राता संन्हाद याचे पुत्र. हे समुद्रतीरीं राहून इंद्रास उपद्रव देत असत. त्यांचा अर्जुनानें वध केला. ७. इंद्र. ८. 'पडिलें' असा अन्य पाठ. ९. कल्पांत करणाऱ्या सारखा भयंकर पुरुष. '० भैरवाकार' असें पाठांतर. १०. 'व्यासवाणी' असा अन्य पाठ. ११. अर्जुनाच्या धनुष्याचें नांव. १२. रणांगणावर. चत्वर=अंगण. १३. डाव्या हातानेंही बाण जोडणारा. १४. शुभ्रवर्णामुळें. 'पृथिव्यां चतुरन्तायां वर्णो मे दुर्लभः समः । करोमि कर्म शुक्लं च तस्मान्मामर्जुनं विदुः' ॥ (अध्याय ४४ श्लोक २०) असें मुळांत आहे. अर्जुन=पांढरा—असाही अर्थ आहे. १५. सत्वगुण शुभ्रवर्णी मानिला आहे. निर्मळ यशही शुभ्रवर्ण मानिलें आहे. १६. 'यश निर्मळ' असें पाठांतर. १७. 'बोलती' असा अन्य पाठ. १८. मनांत. १९. काम, क्रोध, लोभ, मोह, मद व मत्सर हे सहा शत्रु. २०. उघडपणें. २१. 'जिष्णु' म्हणजे जिंकणारा असा अर्थ आहे. २२. 'कृष्णीं बोधला जीवप्राण। यालागीं श्रीपति स्नेहसंपन्न । कृष्णनामें आळवी' असाही पाठ आहे. २३ 'कृष्ण' असें अर्जुनाचें नांव त्याचा पिता स्थापी—असा भाव. 'कृष्ण इत्येव दशमं नाम चक्रे पिता मम । कृष्णावदातस्य सतः प्रियत्वाद्बालकस्य वै.' ॥ म्हणजे—कृष्ण हें दहावें नांव माझ्या पित्यानें बालपणीं माझा वर्ण कृष्णभास्वर (काळा पण तेजस्वी) असल्यामुळें ठेविलें (मूळ अध्याय ४४ श्लोक २२).

पवित्र दाहा नामें । तुज म्यां सांगितलीं अतिउत्तमें, । ज्यांचीं[1] तो मनोधर्में । अर्जुन ऐसें वोळखें.' ॥८९॥ 'नामें सांगा हीं कवणाचीं?' । पार्थ म्हणे, 'अर्जुनाचीं, । ज्याचें नाम सव्यसाची । हरी सारथी जयाचा.' ॥ ९० ॥ पुढतीं विनवी जोडूनि पाणी, । 'अर्जुन असे कवणे स्थानीं?' । पार्थ म्हणे, 'वोळखें नयनीं । अर्जुन तो मी बृहन्नळा. ॥९१॥ कंक तो धर्मराज जाण, । बल्लव तो भीमसेन, । ग्रंथीक माद्रीचा नंदन, । नकुळ ऐसें जाण पां. ॥ ९२ ॥ तंतिपाळ सहदेव गुणी, । सैरंध्री[2] ते याज्ञसेनी.' । हें ऐकोनी मस्तक[3] चरणीं । विराटपुत्रें ठेविला. ॥ ९३ ॥ म्हणे, 'स्वामी नरेंद्रपाळा! । आतां न भियें मी कळिकाळा. । सारथ्य करूनि पृथ्वीपाळा । तोषवीन संग्रामीं.' ॥ ९४ ॥ नमस्कारोनि पार्थगुरू । येऊनि वंदिला शमीचा तरू । मुखें करितां नामोच्चारू । शस्त्रें दृष्टीं देखिलीं. ॥ ९५ ॥ निवडोनि अर्जुनाचीं शस्त्रें । येरें[4] वृक्षीं बांधिलीं करें । खांदीं वाहूनि सुखनिर्भरें[5] । पार्थानिकटीं पातला. ॥ ९६ ॥ हृदयीं स्मरण करितां पार्थ । मही उतरला विजयी रथ, । श्वेतवाजी,[6] वानरकेत, । रत्नें चाकीं झळकती. ॥ ९७ ॥ आस्फुरितां[7] देवदत्त[8] । नाद भरला ब्रह्मांडांत, । कौरव म्हणती, 'आला[9] मृत्यु । किंवा पार्थ प्रगटला.' ॥ ९८ ॥ उत्तर करूनियां सारथी । अर्जुन आरूढला[10] रथीं । संतोषोनि अमरपती[11] । दिव्यसुमनीं[12] वर्षला. ॥ ९९ ॥ भालीविना[13] तीन बाण । आपुंख[14] सुवर्णवर्ण । सोडोनियां श्रेष्ठचरण[15] । स्पर्शलासे[16] सद्भावें. ॥१००॥ 'भीष्मद्रोणकृपाचार्या,' । म्हणे, 'नमन तुमच्या पायां, । तुमच्या आशिर्वादें जया । मी पावेन संग्रामीं'. ॥ १०१ ॥ रथ लोटितां क्षत्रियपाळें । थरारिलीं सप्तपाताळें[17] । कौरवसैन्य[18] खळबळिलें । तडागोदर ज्यापरी.

---

१. 'ज्या चिंतोनी' असाही पाठ आहे. २. द्रौपदी. ३. 'मस्तक' हा शब्द संस्कृतांत पुल्लिंगी व नपुंसकलिंगी आहे. ४. इतर शस्त्रें पुनः वृक्षावर बांधिलीं. ५. अत्यंत आनंदानें. निर्भर=अतिशय, गाढ. ६. 'श्वेतवारू धवधवित । रत्न-झळकें झळकती' असाही पाठ आहे. ७. फुंकितां. ८. अर्जुनाच्या शंखाचें नांव. ९. 'काळ, मृत्यु' असा अन्य पाठ. काळ=यम. १०. चढला. ११. इंद्र. १२. पुष्पांनीं. १३. पात्यांशिवाय, टोंकाशिवाय. संस्कृत—भल्ल—भल्ली—भलं=बाणाचें पातें, शल्य. १४. मुठीपर्यंत. 'माथां गुल्म सुवर्ण वर्णे' असाही पाठ आहे. गुल्म=बाणांचा समुदाय. १५. गुरूंचे चरण. १६. 'स्पर्शविले' असा अन्य पाठ आहे. १७. अतल, वितल, सुतल, महातल, रसातल, तलातल, आणि पाताल—ही सप्त पाताळें. १८. 'कौरवसेना खळबळी, अनिळें तडागोदरें ज्यापरी' असाही पाठ आहे. अनिळ=वायु.

॥ १०२ ॥ लोटोनियां सरितापुरीं[1] । पोत[2] पावे कां पैलपारा । तेथूनियां कर्णधारा[3] । ऐलतीरा धात्रवी. ॥ १०३ ॥ त्यापरी लोटितां स्यंदना । द्विभाग[4] आतली शत्रुसेना । तेथूनि करीतचि गर्जना । पूर्वठाया पातला.[5] ॥ १०४ ॥ पूर्वपश्चिम एक वाट, । उत्तर-दक्षण उजू नीट, । धांवतां सेनांचे संघाटें[6] । चारी भाग आतले. ॥ १०५ ॥ पुढती कौरवपुरामार्गें । धांवूनियां पाठिलागें । गाँयी[7] परतोउनियां मागें । अंगबळें आणिल्या. ॥ १०६ ॥ घाल्लूनियां नगरद्वारीं । आपण मिसळला कौरवभारीं, । ते वेळीं वीर हाहाःकारीं । 'घ्यां घ्या' म्हणती आंवेशें. ॥ १०७ ॥ अश्वत्थामा, शकुनी, कर्ण, । सैंधव, दुःशासनादि, विकर्ण, । धृतराष्ट्राचे शतनंदन । महायुद्ध मांडिलें.[8] ॥ १०८ ॥ धनुष्य वोढुनियां[9] दारुण, । सोडिते झाले तीक्ष्ण बाण, । जैसी वांकडी[10] घाँली घन । तैसें निबिड[11] माजलें. ॥ १०९ ॥ अंकुशें डवचुनी कुंजर । पुढें लोटले शतसहस्र । खड्गें उचलूनि अंश्वस्वार,[12] । म्हणती, 'वेढुनी मारा कीं'. ॥ ११० ॥ फरश, पट्टीशें,[13] गदा, मुसळ । घेऊनि उठिलें पायेंदळ,[14] । म्हणती, 'तोषवूं पंक्षिकुळ[15] । खंडविखंड करूनियां'. ॥ १११ ॥ दृष्टी लक्षूनियां किरीटी[16] । यंत्रबाणांचिया कोटी । गगनीं उसळती कडकडाटीं । महानाद माजला. ॥ ११२ ॥ असंख्यात तडागोदरें[17] । तडक फुटती एकसरें, । भयें बुजालीं[18] कुंजरें । चक्राकारें भोंवती.[19] ॥ ११३ ॥ अर्जुन म्हणे, 'कारण

---

१. नदीच्या पुरामध्यें. 'भेदुनियां सरितापुरा । पोत पावे कां परपारा । तेथुनि मागुती कर्णधारा । ऐलतीरा धांवली' असाही पाठ आहे. २. नौका. 'पोत पालवी' असें पाठांतर. पालविणें=पदरानें किंवा हातानें बोलाविणें. ३. नावाडी, सुकाणूं धरणारा. ४. 'द्विधा' असें पाठांतर. ५. झाली. ६. संघात, समुदाय. ७. 'गाई परतोनियां मागें' असा अन्य पाठ. ८. 'महायोद्धे उठावले' असाही पाठ आहे. ९. 'लावूनियां' असें पाठांतर. 'वोढुनिया' असा पाठ असता, तर बरें झालें असतें. १०. झड लावी. ११. अंधकार. 'तैसी वृष्टी माजली' असाही पाठ आहे. १२. 'तीक्ष्ण शरांचा जळधर । पार्थावरी वर्षले' असाही पाठ आहे. शर=(१) पाणी, (२) बाण. १३. पट्टा, लांब दुधारी तलवार. 'परिघ······शूळ' असें पाठांतर. १४. 'घेऊनियां पदातिदळ' असाही पाठ आहे. १५. गृध्रादि पक्षी. १६. अर्जुनाला. १७. तडाग=तलाव, तळें. युद्धाच्या धूमधडाक्यामुळें तलाव फुटले—असा भाव. १८. भ्यालीं, घाबरलीं. 'कुंजर' हा शब्द संस्कृतांत पुल्लिंगी आहे, असें असतां 'कुंजरें' असें रूप केवळ यमकासाठीं मुक्तेश्वरास करावें लागलें, असें वाटतें. १९. भोंवणें=वाटोळें फिरणें, भ्रमण करणें, गिरगिरणें.

पुढा । प्रस्तुत काय निवेदूं मूढां ? । काळिमा लावूनियां तोंडा । हस्तनापुरा बोळवूं[1]. ॥११४॥ कर्दळीपर्णे हरिद्रापर्णे[2] । अर्जुनसायकांचीं[3] वदनें । जयावरुतीं सूर्यकिरणें । राहुभयें[3] वसिन्नलीं. ॥ ११५ ॥ कुंभस्थळें भेदुनि बाणीं । मुक्ताफळें[4] सांडिती धरणी, । अशुद्धें[5] मेघधारासिंचनी । कीं गारावृष्टी ज्यापरी ॥ ११६॥ अश्व [7]खोंचती हृदयीं, । उभे राहाती मागले पायीं, । राऊत पडोन भुई, । वरुती अश्व कोसळती[8]. ॥ ११७ ॥ पिसारें[9] पावले त्रास । पवनें उडविजे धान्यतुंस[10], । तेंवी पायदळाचें भूस । दाही दिशा उधळिलें. ॥ ११८॥ सायक[11] लागतां सतेज, । एकसरें[12] तुटले ध्वज; । जेंवी सुटल्या[13] महागज । कर्दळीवना विखंडी[14]. ॥ ११९ ॥ रथ लोटोनियां आवेशें, । धनुष्य[15] झाडी घंटाघोषें, । पांचशत सायक एकरोषें । कर्ण[16] वीर क्षोभला. ॥ १२० ॥ पार्थें एक शतबाणें । छेदूनि सांडिले तत्क्षणें, । जैसीं कुतर्कियांचीं[17] वचनें[18] । वेदांतियां[19] विखंडी. ॥१२१॥ चारी वारू[20] सारथी केतू[21] । [22]खंड विखंड केला रथू, । ते वेळीं लगबगें सूर्यसुतू[23] ।

---

१. बोळवण करूं, निरोप देऊं. २. 'कर्दळीपत्रांप्रमाणें हरिद्रापर्णे' असाही पाठ आहे. ३. अर्जुनाच्या बाणांचीं मुखें. बाणांच्या वृष्टीमुळें अंधकार पडूं लागतांच राहूच्या शंकेनें सूर्यकिरणें अर्जुनाच्या बाणांचा आश्रय करूं लागलीं. 'राहुमुखी वसिन्नलीं' असाही पाठ आहे. ४. मोतीं. हत्तीच्या गंडस्थळांत मोत्यें असतात, अशी समजूत आहे. मोत्यांचीं उत्पत्तिस्थानें आठ आहेत:—करीन्द्रजीमूतवराहशंखमत्स्याहि शुक्त्युद्भव वेणुजानि । मुक्ताफलानि प्रथितानि लोके तेषां तु शुक्त्युद्भवमेव भूरि ॥ याचा भावार्थ:—करींद्र (गजश्रेष्ठ), जीमूत (मेघ), वराह, शंख, मत्स्य, अहि (सर्प), शुक्ति (शिंपा) आणि वेणु (वेळू)—यांपासून उत्पन्न होणारीं मोत्यें लोकांत प्रसिद्ध आहेत. त्यांत शुक्तिजात मुक्ताफळें पुष्कळ उत्पन्न होतात. ५. रक्तानें. सिंचनी=वर्षाव. ७. दचकतात. ८. 'गरगरां फिरोनियां मही । वरते राऊत कोसळती' असाही पाठ आहे. ९. पिसारा=बाणाच्या शेवटीं लाविलेलीं पिसें. १०. कोंडा. 'भूस' असें पाठांतर. ११. बाण. १२. एकदम. १३. सुटला असतां. १४. 'विभांडी' असें पाठांतर. १५. 'धनुष्य झाडिलें गजघोषें' असाही पाठ आहे. १६. '०एकदोषें । कर्ण विंधू क्षोभला' असें पाठांतर. १७. चार्वाकासारख्या कुतर्कवाद्यांचें म्हणणें. १८. 'तंव पार्थें सहस्रएक बाणें । छेदूनि सांडिले ततक्षणें । जैसीं पाखांडियाची वचनें । वेदान्तवचन विखंडी' असाही पाठ आहे. १९. वेदांतमत-वादी. सकल प्रपंच मिथ्या असून सर्व कांहीं चैतन्यरूपी ब्रह्म आहे असें जो समजतो तो वेदांती. विखंडी=खोडून काढितो. २०. अश्व. २१. ध्वज, निशाण. २२. 'खंडूनी छेदिला रथू' असा अन्य पाठ. २३. सूर्यपुत्र, कर्ण. 'तरणीसुतू' असें पाठांतर.

[1]आणिके रथीं [2]आरूढे. ॥ १२२ ॥ धनुष्या [3]लावूनि सोडितां शरा, । पार्थे तोडिल्या बाणधारा, । [4]संधीसंधी खोचला बरा, । मूर्च्छा दाटे आगळी. ॥१२३॥ विकळ पडतां [5]रहंवरयानीं, । अति सत्वर धांवला [6]द्रौणी, । वज्रातुल्य सहस्रबाणीं । धनंजयो [7]ताडिलीं. ॥ १२४ ॥ द्रौणिशराच्या [8]द्विगुणितें । बाण सोडिले कुंती-सुतें, । वक्षस्थळा भेदूनि निरुते । हृदयवर्मी [9]खडतरले. ॥ १२५ ॥ लावकप-क्षिया झडपी [10]श्येनें, । तैसे अर्जुनाचे बाण । [11]शत्रुशरांतें छेदून । सर्वगात्रीं भेदिले. ॥ १२६ ॥ [12]चिरंजीविया [13]निर्जीवी । दृष्टी देखतां [14]मानवीं देवीं । शकुनी म्हणे, 'यशपदवी । मी भोगीन आजि संग्रामीं.' ॥ १२७ ॥ सन्मुख येतां [15]लागवेगें । सहस्र[16]बाणीं सारिला मागें, । जेंवि कां [17]नामस्मरणें भंगे । ब्रह्महत्या तात्काळीं. ॥१२८॥ म्हणे, '[18]हा सहदेवाचा [18]भाग । कलहा मूळ, अपवित्र मार्ग. । याचें पापरूप आंग । बाण माझे न [19]शिवती. ॥ १२९ ॥ धृतराष्ट्राचिया एक-[20]शतपुत्रीं । घेउनि [21]पंचें पंचक [22]पत्री । पार्थ लक्षुनियां नेत्रीं । [23]ईडेपाडे विंधिला. ॥ १३० ॥ त्याचें निवारूनि शरसंधान । लक्षूनिया नृपाचे नंदन । पंच पंच बाण तीक्ष्ण । [25]भाळपटळीं विंधिले. ॥१३१॥ दुर्योधनें वाहूनि [26]मेढीं, । सायक सोडितां [27]धडधडां, । अर्जुन म्हणे, '[28]निमित्तें मूढा ! । व्यर्थ मातें कां देसी ? ॥१३२॥

---

१. दुसऱ्या. २. 'आरूढला' असें पाठांतर. ३. 'वाहोनी' असें पाठांतर. ४. शरीराचा प्रत्येक सांधा. 'सांदोसांदी खोंचिला पुरा' असाही पाठ आहे. ५. रथरूप वाहनांत. ६. द्रोणपुत्र अश्वत्थामा. ७. 'धनंजयातें ताडिलें' असाही पाठ आहे. ८. 'द्विगुणत्वें' असा अन्य पाठ. ९. घुसले, जोरानें शिरले. १०. ससाणापक्षी. ११. 'शत्रुशरघातें छेदून । सर्व गात्रें भेदिलीं' असाही पाठ आहे. १२. चिरंजीवी अश्वत्थामा. 'अश्वत्थामा बलिर्व्यासो हनूमांश्च युधिष्ठिरः । कृपः परशुरामश्च सप्तैते चिरजीविनः' ह्या उक्त्यन्वयें अश्वत्थामा चिरंजीव आहे. हे सात महात्मे कीर्तिरूपानें अमर आहेत, हें उघडच आहे. १३. निर्जीव, मूर्च्छित. १४. मानवांनीं आणि देवांनीं. १५. मोठ्या वेगानें. १६. 'धनुष्यबाणीं' असें पाठांतर. १७. ईश्वरनामस्मरणानें. 'रामस्मरणें' असें पाठांतर. १८. हा शकुनी सहदेवाच्या वांट्याचा. सहदेवानें त्याचा वध करावा, अशी योजना होती. १९. शकुनीविषयीं अर्जुनाचा केवढा हा तिरस्कार ! अर्जुनाचे बाण सुद्धां शकुनीला शिवायला तयार नाहींत ! २०. '०शतपुत्रां । पंच पंचक सोडुनी कंकपत्रा । पार्थें लक्षुनिया गात्रा' । असाही पाठ आहे. कंकपत्र=बाण. २१. पांच पंचकड्या (पंचवीस). २२. बाण. २३. त्वरेनें, नेटानें. २४. 'पंच पंच बाणेंकरून' असें पाठांतर. २५. कपाळावर. 'भाळपट्टीं' असें पाठांतर. २६. धनुष्य. २७. 'घडघडां' व 'दडदडां' असे अन्य पाठ. २८. 'निमित्त मारें मूढा ! । व्यर्थ कासया आणिसी ?' असाही पाठ आहे.

तुजला वधिता असे आन[1], । समय पाहें[2] धरुनी मौन, । आतां रक्षूनियां[3] प्राण । होई परता निर्लज्जा !' ॥ १३३ ॥ रक्षावया[4] नृपाचें मन । आलस्यें[5] वाहून धनुष्यबाण । कृपाचार्य भीष्म द्रोण । अर्जुना उर्जू[6] धांवती. ॥ १३४ ॥ तिघांजणीं तीन शतें । शर टाकिले पार्थावरुते[7] । शतसायँक लक्षुनि निरुते । पुष्पप्राय उडविले. ॥ १३५ ॥ यावरी पार्थें मौनास्त्रमंत्रीं[8] । एकशत[9] तेहतीसाक्षरीं । काळरात्रीं[10] कान्हेश्वरी[11] । आव्हानिली[12] देवता. ॥१३६॥ मौनास्त्रविद्येमाजी देखा । देवदत्तमहाशंखा[13] । आस्फुरितां[14] कौरवकटका[15] । निचेष्टता[16] पातली. ॥१३७॥ अलकापुरनिवासिनी[17] । संसारबंधविच्छेदिनी । इच्छितफळप्रदायिनी । प्रगट झाली चिंतितां. ॥ १३८ ॥ सकळांमुखीं मौनमुद्रा[18], । नेत्रीं दाटली

---

१. अन्य ( भीम. ) २. वाट पहा. ३. 'रक्षूनी आपला प्राण' असा अन्य पाठ. ४. दुर्योधनाचें मन मोडावयाचें नाहीं म्हणून, मनापासून नव्हे. ५. सावकाशपणें, सौम्यपणानें. 'आळसें' असें पाठांतर. ६. अर्जुनासमोर. ७. 'पार्थें लक्षुनियां वरुतें' असाही पाठ आहे. ८. अर्जुनाला रुद्रापासून रौद्रास्त्र, वरुणापासून वरुणास्त्र, अग्नीपासून आग्नेयास्त्र, वायुपासून वायव्यास्त्र आणि इंद्रापासून वज्रादि अनेक अस्त्रें प्राप्त झाली होती (मूळ अध्याय ६१ श्लोक ३१). 'पवनास्त्रीं' असें पाठांतर. ९. हा १३३ अक्षरी मंत्र कोणता तो माहीत नाहीं. १०. (जणुं काय) प्रळयकाळची रात्रच अशा भयंकर वेळीं. ११. श्रीकृष्ण. कान्हा–कान्हाईच्या पुढचें कान्हेश्वरी हें रूप. आराध्यदेवतेला स्त्रीरूप कल्पून भक्तजन असें लडिवाळपणानें म्हणतात. 'काळेश्वरी' असें पाठांतर. १२. आव्हान केलें, मंत्रेंकरून बोलाविली. १३. देवदत्त नामक मोठा शंख. देवानें दिलेला तो देवदत्त. प्रस्तुत स्थळीं 'देव' ह्या शब्दानें इंद्रदेवाचें ग्रहण केलें पाहिजे. अर्जुनानें एका प्रसंगीं दानवयुद्धांत इंद्रास साहाय्य केलें होतें, तेव्हां इंद्रानें प्रसन्न होऊन हा शंख अर्जुनास दिला–अशी कथा आहे. १४. फुंकितां. १५. कौरवसैन्याला. १६. स्तब्धता; कौरवसैन्याची हालचाल बंद झाली–असा भाव. 'शेवटीं अर्जुनानें संमोहन नामक अनिवार्य अस्त्राचा प्रयोग केला' असें मुळांत वर्णन आहे (अध्याय ६६ श्लोक ८). ह्या संमोहनास्त्रालाच मुक्तेश्वरानें मौनास्त्र असें म्हटलें आहे, असें दिसतें. संमोहनास्त्र=संमोहन करणारें अस्त्र, मूर्च्छा आणणारें अस्त्र. ह्या अस्त्राचा प्रभाव असा आहे, कीं शत्रूचा वध न करितां ह्या शस्त्रापासून जयप्राप्ति होते, कारण हें ज्यावर टाकावें त्याला तें केवळ मोहित (मूर्च्छित) करितें, त्याचा प्राण घेत नाहीं. १७. अलका, अलकापुर किंवा अलकापुरी–ही हिमालयाच्या उत्तरेकडील एक नगरी असून ती कुबेराची राजधानी आहे, अशी समजूत आहे. [ज्ञानेश्वराची समाधी आळंदीस आहे. तिलाही अलकापुरी असें म्हणण्याचा प्रघात आहे]. १८. मौनरूपी छाप (शिक्का). 'मौन्यमुद्रा' असें पाठांतर. मुद्रा=मौन–असा ह्या शब्दाचा प्रयोग संस्कृतकाव्यांतही आढळतो. 'त्यागीन जी ! प्राणदयासमुद्रा ! । म्हणे, पडे तों वदनासि मुद्रा' (वामनपंडितकृत राधाविलास, श्लोक ५९).

घोर निद्रा, । हृदयाकाशीं मनचंद्रा[1] । भ्रमराहुनें ग्रासिलें. ॥ १३९ ॥ प्रेतप्राय जाले सकळ, । इंद्रियीं[2] सांडिली चळवळ, । कृत्रिमलेपें[3] जैसे अचळ । तैसे दृष्टी भासती. ॥ १४० ॥ बाण सोडूनि अर्धचंद्र । अर्धखाडें[4] अर्धश्मश्रू[5] । अर्धमस्तकीं केशभारू । मुंडण करूनि टाकिले.॥ १४१ ॥ कृप, भीष्म, द्रौणी[6], द्रोण । हे चौघे करून भिन्न, । इतर समस्तांचीं जाण । मुखमस्तकें मुंडिलीं. ॥ १४२ ॥ उत्तरा निरोपी अर्जुन, । '[7]भीष्मद्रोण करूनी भिन्न । वस्त्राभरणें फेडून । सर्वांचींही आणावीं.' ॥ १४३ ॥ 'तुंजिये भगिनीचा निरोप । वस्त्राभरणें अति अमूप । आणावीं, वरि हा आक्षेप[8] । तुज माजिये आज्ञेचा.' ॥ १४४ ॥ उत्तर धाविन्नला[9] सत्वरें । [10]चीरें भूषणें अपारें । कौरवरथीं पर्वताकारें । आपुले हस्तीं भरियेलीं. ॥ १४५ ॥ उष्ट्रीं आणि बहु कुंजरीं । भरूनि दिधलीं सेवें[11]-कांकरीं, । विराटपुत्र सुखनिर्भरीं । पार्थानिकटीं पातला. ॥ १४६ ॥ रणभूमी सोडूनि[12] सुपवित्रा, । आकर्षिलें मौनास्त्रमंत्रा. । कौरव[13] अवलोकिती गात्रा । तंव सर्व सेना नागवी. ॥ १४७ ॥ [14]लोंधलीं तैसीं वेढिलीं[15] वस्त्रें, । लज्जाकाजळें लेपिलीं वक्त्रें[16], । [17]अपकीर्तीचीं भंगिलीं पात्रें. । केंवि मिरवणें लोकिकीं ? ॥ १४८ ॥ खेद पावोनी अंतरीं । [18]जातां लाजती हस्तिनापुरीं[19], । वृंद्ध[20] म्हणे, 'हो! सुवि-

---

१. येथील **रूपक** बहारीचें आहे. २. इंद्रियांनीं. ३. काढलेलीं चित्रें. 'निश्चळवृत्ति जैसे अचळ' असाही पाठ आहे. अचळ=पर्वत. ४. अर्धी दाढी.खाड=खांड=दाढी व कल्ले. ५. अर्धी मिशी. ६. द्रोणपुत्र—अश्वत्थामा. ७. हें अर्जुनाचें भाषण आहे. ८. आग्रह, सूचना, दाव. 'साक्षेप' असें पाठांतर. साक्षेप=अगत्य, आस्था. ९. धांवला. [धाविन्नला, हासिन्नला इत्यादि रूपें धातूंस दुबार भूतकालवाचक ( न+ला ) प्रत्यय लागून सिद्ध झालीं आहेत]. १०. वस्त्रें. ११. सेवकांच्या हातीं. 'सेवकांशिरीं असा अन्य पाठ. १२. 'सांडुनी' असें पाठांतर. 'सुपवित्रा' हें रणभूमीचें विशेषण. १३. 'कौरवी अवलोकितां गात्रा' असाही पाठ आहे. १४. 'वेढिलीं अपवित्रें वस्त्रें' असाही पाठ आहे. १५. गुंडाळिलीं. १६. तोंडें. कौरवसैन्याच्या तोंडास काळोखी लागली, कौरवांची नाचक्की झाली—असा भाव. १७. 'अभिमानाचीं' असें पाठांतर. १८. 'दुःख मानिलें कौरववीरीं । श्रेष्ठ म्हणती अंतरीं । शोक करणें वाउगें' असाही पाठ आहे. १९. हस्तिनापुरास. हें शहर पुरुकुलोत्पन्न हस्तिराजानें वसविलें म्हणून यास हस्तिनापुर' असें नांव पडलें. दुसरें असेंही आढळतें, कीं, अत्रिपुत्र सोम अरण्यांत फिरत असतां, एका हस्तीला एका विहंगमानें उचलून नेलें, असें त्यानें पाहिले. तेव्हां त्या जागीं त्यानें एक शहर वसवून त्याला या चमत्काराच्या स्मरणार्थ 'हस्तिनापुर' असें नांव दिलें. हें शहर विद्यमान मीरत शहराच्या पूर्वेस गंगाकांठीं होतें, असें विद्वानांचें अनुमान आहे. २०. भीष्म.

चांरीं । धरूं नये शोकातें.' ॥१४९॥ उत्तरा सांगे अर्जुन गुणी, । "जे त्वां दृष्टी देखिली करणी । कोणा न बोलावी वचनीं । जनाकर्णीं[3] न बोलिजे. ॥१५०॥ 'म्यांच पराभविलें वीरां । कौरव पळविले[4] हस्तनापुरा,' । ऐसी विराटनृपवरा[5] । मात[6] मुखें अनुवादें[7]. ॥ १५१ ॥ झणीं[8] घेशील माझें नांव." । उत्तर म्हणे, 'कळला भाव. । कृत्रिमभाग्याचा[9] गौरव । खेद करी मानसा.' ॥ १५२ ॥ ऐसें बोलोनी तये काळीं । उत्तर पातला विराटाजवळी, । वार्ता ऐकोनी गंदारोळीं[10] । विराट नाचे[11] संतोषें. ॥ १५३ ॥ लोकमुखें ऐकिला घोष; । 'उत्तर झुंजोनी पावला यश.' । विराट म्हणे, 'माझा वंश । सुपुत्रसूर्यें उजळलों[12]. ॥१५४॥ क्षत्रियांमाजीं हा जगजेठी । रत्न निपजलें जननीपोटीं[13], । यातें तुळितां उपमे सृष्टी[14] । दुजा दृष्टी दिसेना. ॥ १५५ ॥ दशरथ, वसुदेव, पंडू नृपती । जमदग्नी[15] आणि प्रभंजनमूर्ती[16] । या पुत्रवंतांचिया पंक्ती । मी श्लाध्यता[17] पावलों. ॥१५६॥ श्रीराम, कृष्ण, गांडीवधर[18] । भार्गव आणि हनुमंत वीर । यांचिये तुळणे हा

---

१. जे चांगला विचार करणारे आहेत त्यांनीं, विचारवंतांनीं. २. उत्तराला. ३. लोकांच्या कानांत, अगदीं विश्वासानें कोणाला देखील. 'जना कानीं न सांगिजे' व '°न लाविजे' अशीं पाठांतरें. ४. पळवून लाविले. 'धाडिले' असें पाठांतर. ५. विराटराजाला. 'ऐसेंचि विराटनृपवरा । आपुले मुखें अनुवादें' असाही पाठ आहे. ६. गोष्ट. ७. सांग. ८. कदाचित्, न जाणों. ९. लटक्या भाग्याचा मोठेपणा. स्वतः पराक्रम न करितां, आपली लटकी बढाई मिरविणें. '° भाग्याचें' असें पाठांतर. १०. मोठी गर्जना करून. गदारोळी=लढाईतील वीरांच्या आरोळ्या, लढाईतील धुमश्चक्री. ११. नाचणें=अतिशय आनंदित होणें, हुरळून जाणें. १२. प्रकाशित झाला. १३. 'माझिये पोटीं' असें पाठांतर. १४. पृथ्वीच्या पाठीवर, सर्व जगांत. 'पुत्र व्हावा ऐसा गुंडा । ज्याचा तिहीं लोकीं झेंडा' असेंच तुकाराममहाराजही म्हणतात. १५. परशुरामाचा पिता. १६. पंचमहाभूतांतील एक महद्भूताची देवता. प्रभंजन=वायु. भीम हा वायूच्या मंत्रप्रभावापासून कुंतीच्या पोटीं जन्मला होता म्हणून यास वायुपुत्र असें म्हणतात. १७. कीर्ति, मोठेपणा. १८. गांडीव (धनुष्य विशेष) धारण करणारा (अर्जुन). ज्याच्या आंगावर गांठी जिकडे तिकडे असतात तो गंडी (गेंडा). गंडीच्या अवयवाचें बनविलेलें जें तें गांडीव. असें दिसतें, कीं अर्जुनाला गेंड्याच्या फासळीचें धनुष्य फार आवडे. तें इतकें कीं, त्याच्या धनुष्यावरून त्याला गांडीविन् हें उपनांव पडलें. हें विशिष्ट उपनांव पडण्याचें आवड हें एक तर कारण स्पष्टच आहे, परंतु दुसरेंही एक कारण असावें. तें हें कीं, अर्जुन मूळ ज्या देशांतून हिंदुस्थानांत आला त्या देशाच्या अरण्यांत गेंडे सांपडत. हिंदुस्थानच्या लगत्यास असा प्रांत म्हटला म्हणजे हिमालयाची तराई. ह्या तराईच्या दिशेनें अर्जुन व त्याचें कुल हिंदुस्थानांत उतरलें, असा तर्क 'गांडीव' ह्या शब्दावरून करतां येतो. (जिज्ञासु वाचकांनीं कै. वि. का. राजवाडे यांचा 'गांडीव' हा लेख पहावा. लेखसंग्रह, भाग ३, पृष्ठें २५५-५७).

उत्तर । पुत्र माझा प्रतापी. ॥ १५७॥ **कौसल्या, देवकी** आणि **कुंती** । **अंजनी**[1] आणि **रेणुका**[2] सती, । ययांतुल्य पुत्रवती । **उत्तरें** केली **सुधेष्णा.'** ॥ १५८ ॥ **कंक** म्हणे, '[3]धरित्रीपाळा ! । संगीं असतां **बृहन्नळा** । **कौरव**[4]जयाचा [5]आगळा । [6]प्रताप वांया बोलसी.' ॥ १५९ ॥ **विराट** म्हणे, 'एकलें बाळ । तेणें भंगिलें **कौरव**दळ.' । [7]येरू म्हणे, 'अमृत फळ । हातीं असतां अक्षई, ॥ १६० ॥ कायसी मरणभयाची वार्ता ? । तेंवी **बृहन्नळा** संगीं असतां, । **कौरव**जयाची हे कथा । [8]बाळखेळासारिखी. ॥ १६१ ॥ वन्ही [9]व्यापितां लोहगोळा, । [10]तेणें जाळिजे अरण्य सकळा, । [11]विचारितां संगें अनळा । दाहक कार्य तयाचें. ॥१६२॥ तेंवी **बृहन्नळा** [12]पाठी । असतां, [13]कृतांत तोही [14]दृष्टी । [15]तृणतुल्य, हे सत्य गोष्टी । राया ! [16]पोटीं जाण पां.' ॥ १६३ ॥ **विराट** म्हणे, 'न [17]मानें मनें, । **उत्तर** [18]अरिगजपंचानन, । त्यातें [19]जंबूकप्राय दीन । [20]क्लीब साह्य तें केउतें ?' ॥१६४॥ **कंक** म्हणे, '[21]यथार्थ वचन, । [22]मोहें व्यापिलें तुझें मन. । [23]परी तूं बोलसी तें वचन । निष्फळ पुढां जाणवेल. ॥ १६५ ॥ जैसें झुंजोनी [24]संग्रामीं । **सुशर्मा** पराभविला तुम्हीं, । तैसेंचि **उत्तरें** पराक्रमीं । **कौरव**दळ भंगिलें.' ॥ १६६ ॥ शब्दें [25]खोंचला **विराट** । क्रोध नावरे [26]अचाट, । खेळत असतां [27]सारिपाट । फांसे भूमी [28]आफळिले. ॥ १६७ ॥ [29]अक्ष ताडितां भूतळीं । उसळोनी लागला **धर्म**-

---

१ मारुतीची माता. २. भार्गवरामाची माता. ३. पृथ्वीपाळा. ४. कौरवांना जिंकल्याचा. ५. मोठा. ६. पराक्रम. ७. इतर, तो (कंक). ८. पोरखेळासारखी. ९. लोखंडाच्या गोळयास. 'व्यापोनी लोहगोळा' असें पाठांतर. १०. लोहगोळयानें. ११. विचार करून पाहतां. १२. मागें, धैर्याला. १३. यम. १४. दृष्टीला. १५. गवतासमान, क्षुद्र. १६. मनामध्यें. १७. मनाची समजूत होत नाहीं. 'न मनी' असें पाठांतर. १८. शत्रुरूप हत्तीला मारणारा सिंह. **रूपका**लंकार. १९. कोल्ह्यासारिखा. २०. नपुंसक (अर्जुन). 'क्लीब साह्य केउता ?' असें पाठांतर. २१. खरें. माझें भाषण सत्य आहे. २२. भ्रांतीनें, वेडेपणानें. २३. 'परंतु' असें पाठांतर. २४. दक्षिणगोग्रहणांतील युद्धामध्यें. (मागें अध्याय ५, ओव्या १२८–१३२, पृष्ट ७१ पहा). २५. वरमला, संकोचित झाला. २६. बेसुमार, फाजील, अनिर्बद्ध. 'अफाट' असें पाठांतर. २७. सारंगपाट. सारी=सोंगट्या. २७. आदळले, जमिनीवर आपटले. 'पीटिले' असें पाठांतर. २९. फांसे.

भाळीं[1] । अशुद्ध[2] स्रवतां[3] पांचाळी[4] । पात्र[5] करी पुढारां. ॥ १६८ ॥ चक्रवर्तीचें शोणित[6] तेथें । पडों नये भूमीवरुतें. । उदक आणोनि आपुले हातें । भाळ वेगीं प्रक्षाळी[7]. ॥ १६९ ॥ उत्तर कुमार पातला भेटी । रायासी[8] आल्हाद नावरे पोटीं, । कंक म्हणे, 'माझिये दृष्टी[9] । बृहन्नळा नाणावी. ॥ १७० ॥ तिणें रक्त देखतां दृष्टी । प्रळय[10] होईल[11] सर्वसृष्टी.' । विराट म्हणे, 'हाही[12] पोटीं । भाव[13] मातें नेणवे.' ॥ १७१ ॥ पितया[14] संकेत करी नयनें[14], । 'माझें स्तवन न करीं वदनें. । याचा अभिप्राय निजमनें[15] । जाणों येईल[16] पुढारां. ॥ १७२ ॥ कंकादेखतां स्तुती करितां, । मूर्खत्व येईल[17] तुझिया माथां. । स्वल्पकाळें पुढें आतां । कौतुक कांहीं देखशी.' ॥ १७३ ॥ सुवर्णताटीं अक्षवाण[18] । उत्तरा करिती सुवासिनी[19], । वोवाळुनी सांडिती सांडणी[20] । सुवर्णपुष्पें अपार. ॥ १७४ ॥ गौरवोनी उत्तरा बहिणी । श्रृंगारिली वस्त्राभरणीं, । सुधेष्णेसी जनकामिनी[21] । हेमरत्नें पूजिती. ॥ १७५ ॥ राजा प्रवेशतां नगरीं । गगन गर्जे मंगळतुरीं[22]. । साखरा वांटिती परस्परीं । नारी नर संतोषें. ॥ १७६ ॥ 'उत्तर-गोग्रहण' भारतीं । निरोपिलें ऐसिया रिती, । कौरव प्रणुनी[23] अपकीर्ती । जाते झाले स्व-

---

१. कपाळाला. २. रक्त. (मूळांतील अध्याय ६८—श्लोक ४६–४९ पहावे). ३. वाहतां. ४. येथील वर्णन मुळांतील वर्णनाशीं जुळत नाहीं. 'तो फांसा जोरानें लागल्यामुळें विराटराजाच्या नाकांतून रक्ताची धार वाहूं लागली. परंतु तें रक्त जमिनीवर पडण्यापूर्वीच युधिष्ठिरानें आपल्या ओंजळींत धरलें, आणि पाठीमागें उभ्या असलेल्या द्रौपदीकडे पाहिलें. तेव्हां भर्त्याचा अभिप्राय जाणणाऱ्या द्रौपदीनें, पाण्यानें भरलेलें सुवर्णपात्र हातीं घेऊन त्यांत तें नाकपुडींतून वाहणारें रक्त धरिलें' असें मुळांत आहे (अध्याय ६८ श्लोक ४७–४९). विराटराजानें फांसा धृतराष्ट्राच्या तोंडावर मारिला असें मुळांत आहे (अध्याय ६८ श्लोक ४६). ५. भांडें. (वरच्यावर रक्त धरण्यासाठीं.) ६. रक्त. ७. धुवी. ८. विराटराजाला. 'रायातें परमाल्हाद पोटीं' असा अन्य पाठ. ९. डोळ्यांपुढें. 'भेटी' व 'दिठी' अशीं पाठांतरें. १०. सर्व सृष्टीचा संहार होईल; मोठें रण माजेल. ११. 'प्रळय करील' असें पाठांतर. १२.'गुप्त प्रकट खेळ दृष्टी' असें पाठांतर आहे. १३. या भाषणाचाही अभिप्राय मला कळत नाहीं. १४. विराटाला उत्तरानें डोळ्यांनीं खूण केली. १५. 'आन' असें पाठांतर. १६. 'जाणवेल पुढारां' असाही पाठ आहे. १७. 'मूर्खत्व बैसेल तुमचिया माथां' असाही पाठ आहे. १८. आरती. १९. 'बहु कामिनी' असा अन्य पाठ. २०. सांडोवा, कुरवंडी (ओवाळून टाकावयाची वस्तु). २१. 'सुदेष्णेसहित बहुत कामिनी । हेमाभरणीं पूजिल्या' असाही पाठ आहे. २२. मंगल वाद्यांनीं. २३. परिणोनी, स्वीकारून. परिणय म्हणजे विवाह, स्त्रीस्वीकार, हा मूळचा अर्थ. त्यावरून अपकीर्तीशीं विवाह करून, अपकीर्ति मिळवून.

स्थळा. ॥ १७७ ॥ भारत [1]ईक्षुदंड सुरस, । [2]मूळावाढियां सारिखा रस, । अठरा कांडोरीं गुणविशेष । [3]गोडी याची आगळी. ॥१७८॥ त्यामाजीं हें [4]चतुर्थ कांडोरें, । [5]हस्तघाणां मुक्तेश्वरें । रस काढोनी श्रवणद्वारें । प्राशविला श्रोतेयां. ॥ १७९ ॥ तो सुस्वाद चाखितां मनें । प्रेम [6]उपजे जीवें प्राणें, । [7]नूतनपद्मिणी-अंगने । [8]कामिक [9]लुब्धे ज्यापरी. ॥ १८० ॥ [10]इति श्रीउत्तरगोग्रहण[11]समाप्ती, । पुढें अभिमन्युविवाहस्थिती । ते कृपेकरूनि श्रोतीं । श्रवण कीजे आदरें. ॥१८१॥

**॥ इति श्रीविराटपर्वणि उत्तरगोग्रहण-कौरवपराभवो नाम षष्ठमोऽध्यायः ॥**

---

## अध्याय [12]सातवा.

[13]भग्न होवोनियां कौरव । हस्तनापुरा चालिले सर्व, । हाव [14]धांव [15]वाटीव गर्व । भग्न झाला संग्रामीं. ॥ १ ॥ [16]संगीं अवमान आणि खेदु, । शोक, संताप आणि

---

१. ऊंस. २. मुळांतील कांडें आणि शेवटचें वाढें यांतील रसाची गोडी सारखीच आहे—असा भाव. 'मुळा वाढियाहुनी आगळा रस । विचारितां प्रतिपर्वीं विशेष । गोडी याची आगळी' । असाही पाठ आहे. मुक्तेश्वरानें आदिपर्वांत हाच भाव दर्शविला आहे (अध्याय २ ओवी ५७ पहा.) ३. 'गोडियेचा आगळा' व 'गोडी याची चांगली' असे पाठभेद आहेत. कांडोरें=कांडें. ४. चवथें कांडें, विराटपर्व. ५. हातघाण्यामध्यें, चरकामध्यें. ६. 'प्रेमा उचंबळे' असा अन्य पाठ. ७. पद्मिनीनामक जातीच्या तरुण स्त्रीला. (मागें पृष्ठ १३ टीप १९ पहा). पद्मिनीचें लक्षण:—प्रांतारक्तकुरंगशावनयना पूर्णेन्दुतुल्यानना पीनोत्तुंगकुचा शिरीषमृदुला स्वल्पाशना दक्षिणा । फुल्लांभोजसुगंधिकामसलिला लज्जावती मानिनी श्यामा कापि सुवर्णपंकजनिभा देवादिपूजारता. ॥ ८ ॥ उन्निद्रांबुजकोशतुल्यमदनछत्रा मरालस्वना तन्वी हंसवधूगतिः सुललितं वेपं सदा बिभ्रती । मध्यं चापि वलित्रयांकितमसौ शुक्लांबराकांक्षिणी सुग्रीवा शुभनासिकेति गदिता नार्युत्तमा **पद्मिनी**. ॥ ९ ॥ (अनंगरंग, अध्याय १). ८. कामी मनुष्य. ९. लुब्ध होतो. 'लोभे' व 'लाधे' अशीं पाठांतरें. लोभे=लोभ धरितो. लाधे=लाभतो, मिळतो. १०. 'इति श्रीविराटपर्व भारती । उत्तरगोग्रहणसमाप्ती । पुढें अभिमन्यु—विवाहा संतीं । श्रवण केलें पाहिजे.' । असाही पाठ आहे. ११. येथें मूळांतील ६९ वा अध्याय संपतो व गोहरण नामक उपपर्वही संपतें. १२. येथें मुळांतील वैवाहिकपर्वास आरंभ होतो. ह्या अध्यायांत मूळ अध्याय ७०–७१ व ७२ व्या अध्यायाचे पहिले १०।१२ श्लोक यांतील कथाभाग वर्णिला असून त्यांत मुक्तेश्वरानें आपल्या प्रतिभेच्या बळावर पुष्कळच भर घातली आहे. १३. पराजित होऊन. 'भंग पावोनी' असें पाठांतर. १४. संकल्पाची परमावधी, उडी, महत्वाकांक्षा. 'हावभाव गर्व वाटीव । भग्न जालीं संगरीं' असाही पाठ आहे. १५. पराक्रम. १६. त्याच्या संगतीला, पराजयाच्या जोडीला.

विषादु[1], । पश्चात्तापें[2] सकळ बांधु[3] । येया[4] अवसरीं पावले. ॥ २ ॥ नेत्रीं ढळती[5] अश्रुपात । दुःखें कपाळ पिटी हातें, । दुर्योधन भीष्माप्रती । हृदयअवस्था निरोपी[6]. ॥ ३ ॥ म्हणे, 'स्वामी तातताता[7]! । हस्तनापुरा न जाईं[8] आतां, । प्राण त्यागून तत्वता । मी स्वर्गलोका जातसें. ॥ ४ ॥ पांडवहस्तीं[9] गेला मान, । सर्व सेना केली नग्न[10], । याही परतें मातें मरणें[11] । कोणतें सांग विशेष ? ॥५॥ पांडव मारुनी जीविजे[12] प्राणें । पांडव देखतां जाईजे[13] मरणें[13], । पांडव जिते असतां जिणें[14] । अवमानाचें जळो तें.'॥६॥ भीष्म म्हणे, 'विचारश्रेष्ठा[15]! । यश अपेश शूराचा वांटा, । नें[16] कळे ते पात्र होती कष्टा । दुरभिमानी तुजऐसे. ॥ ७ ॥ ईश्वरइच्छेनें घडे सकळ, । वाउगी मनाची तळमळ, । अज्ञानाचें हेंचि फळ । नें सुखदुःखें प्रलपिजे[17]. ॥ ८ ॥ द्यूतयुद्ध[18] खेळतां बळें । जयापजय दोन्ही फळें, । कृषी[19] वाणिज्य[20] करितां न टळे । लाभ[21] हानी दोंमाजी. ॥ ९ ॥ कर्मदेह[22] धरिला जेणें । तो आवंतिला[23] जन्ममरणें, । चिंताधीन[24] त्या दंडणें । शोक-मोह-सुबद्ध[25]. ॥ १० ॥ देह धरूनी क्षत्रवर्णीं[26] । आपणा लाभ पराव्या[27] हाणी, । इच्छुनी प्रवर्तल्या येत्नीं[28] । एक[29] लाधे

---

१. विषाद=निराशा, खेद. २. पश्चात्तापासहित. ३. बाधु=बाध=अडथळा, विरोध, दोष. 'संगीं अवमान, विषादु । शोक, संताप आणि परम खेदु । पश्चात्तापें म्हणे बंधु । ये अवसरीं पावलों ।' असाही पाठ आहे. ४. ह्या समयीं. ५. ढळणें=स्रवणें, गळणें, घसरणें. ६. निरूपण करी, सांगे. 'निवेदी' असें पाठांतर. ७. आजोबा. ८. 'न वचोनी आतां' असा अन्य पाठ. ९. पांडवांच्या हातून. १०. मागें अध्याय ६ ओंव्या १४३ व १४७ पहा. ११. 'संभावितस्य चाकीर्तिर्मरणादतिरिच्यते' हें भगवंतांचें वचन प्रसिद्धच आहे (भगवद्गीता, अध्याय ३ श्लोक ३४). १२. जिवंत राहावें. १३. मरून जावें. १४. 'प्राणें' असें पाठांतर. १५. 'विचार-भ्रष्टा!' असा पाठ आहे तो चांगला आहे, पण असें म्हणण्याचें धाडस भीष्मानें केलें असेल, हें संभवनीय नाहीं. १६. ज्यांना कळत नाहीं ते, अज्ञान. 'न कळत पात्र होती कष्टा' असाही पाठ आहे. न कळत=न जाणतां, अज्ञानामुळें. १७. बडबड करणें. १८. द्यूत आणि युद्ध. १९. शेती. २०. व्यापारधंदा. २१. 'होणार तें होतसे' असाही पाठ आहे. २२. कर्में आचरणारा देह, म्हणजे हा रक्तमांसाचा देह. लिंगदेहाहून वेगळा. २३. त्याला जन्म आणि मरण यांनीं आमंत्रण केलें आहे. २४. जो काळजीच्या स्वाधीन. २५. अगदीं बद्ध झालेला, शोक आणि मोह यांनीं ज्याला अगदीं बांधून ठेविलें आहे असा. 'सुशब्द' असें पाठांतर. २६. क्षत्रिय जातीमध्यें. २७. पराला, शत्रूला. २८. 'प्रयत्नीं' असें पाठांतर. २९. लाभ आणि हानि या दोहोंतून एक. 'यश लाभ प्रारब्धें' असा अन्य पाठ.

प्रारब्धें. ॥ ११ ॥ काळाकाळ[1] अपेश यश । घडती जावळियां[2] फळां ऐसें, । नसतें प्राणिया भासे पिसें[3] । सुखदुखें पाविजे[4]. ॥ १२ ॥ वेष्टुनि पांचभौतिक[5] चर्में, । जीव कोंडिला त्रिविधकर्में[6], । त्यासी देह ऐसिया नामें । देहाभिमानी मानिती. ॥१३॥ कृमि, मृत्तिका[7] अथवा राख । शेखीं[8] होउनी जाती देख, । त्यातें[9] देहाभिमानी मूर्ख । 'मी' 'माझें' एसें भाविती[10]. ॥ १४ ॥ ईश्वरप्रभूचिये घरीं । प्रारब्ध नेमिलें लेखाकरीं[11], । काळ-कृषीवळ[12] निर्धारीं[13] । देववील तयातें. ॥१५॥ येथें आपुला उपाय यत्न । सहसा करूं न शके आन[14], । हरिहरदेवांच्याही क्षीण । शक्ती येथें भासती. ॥ १६ ॥ **जें जें घडे जियेकाळीं । तें तें मानें घेईजे मौळीं[15], । भोगविते तिघे बळी । काळ[16], कर्म, ईश्वरु. ॥ १७ ॥** जरी परिहार असता कर्मा । तरी कष्ट न[17] होते नैषधरामा[18], । आतां पावोनी उपशमा[19] । चित्त राखें सुविचारीं.' ॥ १८ ॥ यापरी बोधोनी राजकुमरा[20] । घेउनी पातला हस्तनापुरा । नमस्कारिलें राजेश्वरा[21] । प्रज्ञाचक्षूजनकातें[22]. ॥१९॥ पहिले[23], विदुराचेनि मुखें । वृत्तांत पुशिला कुरुनायकें[24] । तो हृदयीं रक्षूनि विवेकें । आत्मजाशीं[25] बोलतू.

---

१. अनुकूळ काळ व प्रतिकूळ काळ. 'काळाकाळीं' असें पाठांतर. २. जुळ्या फळाप्रमाणें. ३. वेड, भ्रम. 'नसतें प्राणियातें पिसें' असाही पाठ आहे. ४. 'पीडिजे' असें पाठांतर. दुःख किंवा सुख ही केवळ भ्रांति आहे–असा भाव. ५. पंचभूतांचीं बनलेलीं. पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश हीं पंच महाभूतें. ६. सत्व, रज, तम, या तीन गुणांनीं युक्त अशा कर्मांनीं. ७. 'विष्टा' असें पाठांतर. ८. शेवटीं, अखेरीस. ९. त्या देहाला. १०. मानितात. '–'मी मी' ऐसें मानिती' असा अन्य पाठ. ११. लेखकानें. 'प्रारब्ध नेमुनि लेखन करी' असाही पाठ आहे. १२. काळरूपी शेतकरी. एथें 'काळाकाळीं' असाही पाठ आहे. काळ=योग्य काळ. १३. 'यथावसरी' असा अन्य पाठ. १४. अन्य, वेगळें. प्रारब्धाशिवाय दुसरी एखादी शक्ती–असा भाव. १५. मस्तकीं. तें मान्य करावें, असा भाव. १६. कोणतीहि गोष्ट यशस्वी होण्यास काळ, कर्म व ईश्वर ह्या तीन घटकांची अनुकूलता असावी लागते–असा भाव. काळ=अनुकूळ काळ, काळाची अनुकूलता. कर्म=पूर्वकर्म, दैव. ईश्वर=परमेश्वर, सर्वांवर सत्ता चालविणारा. १७. 'नव्हते' असें पाठांतर. १८. निषधदेशाधिपति नळ व अयोध्याधिपति श्रीरामचंद्र यांना. मुक्तेश्वरानें पुण्यश्लोक नळ व राम यांच्या कथा आपल्या वनपर्वांत वर्णिल्या आहेत. (नलकथा अध्याय ६ ते ८ व रामकथा अध्याय १५ यांत आहे). १९. मनाची शांतता. २०. दुर्योधनाला. २१. महाराजाला (धृतराष्ट्राला.) २२. प्रज्ञा म्ह० बुद्धि हेच चक्षु म्ह० नेत्र ज्याचे; अर्थात् अंध. प्रज्ञाचक्षु असून पिता, त्याला. २३. प्रथमतः. २४. धृतराष्ट्रानें. ५. पुत्राजवळ.

॥२०॥ धृतराष्ट्र म्हणे, 'दुर्योधना ! । घडलें कांहीं नाठवीं मना. । **विचित्र प्रारब्धाची रचना । कोणा नवचे लोटलिया. ॥ २१ ॥ कुबुद्धी देउनी** [1]**करवी पापें, । करवुनि जाळी पश्चात्तापें, । जाणतयाचाही** [2]**हारपे । सर्व विवेक ते काळीं. ॥ २२ ॥ विवेक आणि गा ! सुविचारू । ईश्वरें नेमुनी दिधले गुरू, । त्यांचिया बुद्धी वर्ततां नरू । [3]आघातातें [4]नपविजे.** ॥ २३ ॥ [5]यांची केलिया [6]अवज्ञा । [7]दुःख भोगाल माझी [8]आज्ञा । जाणते जाणती हे [9]संज्ञा । दुराग्रही नेणती. ॥ २४ ॥ **आबालवृद्धांचें वचन पाळी, । नीती न सांडी [10]आपत्काळीं, । विजयलक्ष्मी त्यातें कवळी । कल्पांतींही सोडीना.** ॥ २५ ॥ हरिगुरुसज्जनाची करी निंदा, । आग्रह विपाद [11]न संडी कदा, । त्यातें [12]पद्मनाभाची [13]प्रमदा । त्यागूनि जाय तत्काळीं. ॥२६॥ कोणा [14]नकळतां जें करणें, । श्रेष्ठीं [15]वर्जितांही [16]राहाटणें, । त्याचें फळ हें ऐसें जाणें । जें पातलें [17]प्रचीती. ॥२७॥ आतां असो ते बहुसाल युक्ती. । [18]पुढें बोधिलें धरीं का चित्तीं. । भीष्मद्रोणविदुर सुमती । सांगती तैसें वर्तावें.' ॥ २८ ॥ दुर्योधन म्हणे, 'झाली [19]कार्यसिद्धी, । आम्ही गेलों [20]पांडवशुद्धी, । [21]नव्हतां [22]नष्टचर्याची अवधी । [23]गोचर झाले आमुतें. ॥२९॥ अपूर्ण दिवसीं झाले प्रगट, । नेमा चुकले स्वधर्मभ्रष्ट, । आतां [24]विभाग मागतां कष्ट । पावतील [25]अपाडें. ॥३०॥ ज्यालागीं आम्हीं केलें गमन, ।

---

१. 'प्रारब्ध'हा कर्ता. २. नाहींसा होतो. ३. पीडेला, धक्याला. ४. न पावावें, पावत नाहीं. 'न पावे' असें पाठांतर. ५. विवेक आणि सुविचार यांची. ६. आज्ञा न मानणें. ७. 'दुःख भोगाल महाप्राज्ञा' असाही पाठ आहे. ८. वर सांगितल्याप्रमाणें तुम्ही न वागल्यास तुम्हाला दुःख भोगावें लागेल, हें मी तुम्हाला स्पष्टपणें बजावितों—असा भाव. ९. सूचना, इशारा (ह्या ओवीच्या पहिल्या दोन चरणांत केलेली सूचना). १०. संकटाचे प्रसंगीं. 'अपत्य काळीं' असा पाठ आहे, पण तो लेखकाचें अज्ञान दर्शवितो. ११. न सांडी. १२. विष्णूची. १३. स्त्री (लक्ष्मी.) १४. न विचारितां. १५. श्रेष्ठांनीं 'नको' म्हटले असतां देखील. १६. वागणें. १७. अनुभवास आलें. 'त्याचें फळ ऐसें शहाणे । जाणती तें आलें प्रतीती' असाही पाठ आहे. १८. 'पुढें बोधिलें तें धरीं बा चित्तीं' असाही पाठ आहे. १९. 'झाली हो! सिद्धी' असा अन्य पाठ. २०. पांडवांच्या शोधास्तव. २१. न होतां, झाली नाहीं तरी देखील. २२. बारा वर्षें वनवास, आणि एक वर्ष अज्ञातवास, याप्रमाणें तेरा वर्षेंपर्यंत दुःस्थितींत वागणें, त्याची सीमा. २३. ज्ञात, अनुभूत. २४. राज्याचा अर्धा वांटा. २५. अतिशय, फार.

तें साधिलें[1] निज कारण; । स्वल्प कांहीं घडलें व्यसन[2] । तें सहज कर्म क्षत्रियां. ॥३१॥ आतां प्रज्ञावंत[3] सुमती । दूत धाडिजे विराटाप्रती, । त्याचेनि साक्षी[4] मागुती । अरण्यवासा दवडावे. ॥ ३२ ॥ लोटली अष्टमासांची सीमा, । चत्वार[5] मास उरले नेमा, । यालागीं तेरा वर्षे आम्हां । अवकाश[6] जाला मागुतीं.' ॥ ३३ ॥ ऐसे कौरव विचारीं पडले । तंव विराटनगरीं काय जालें, । पांडवचरित्र जें वर्तलें । तें तूं परिसें कुरुवर्या[7]! ॥ ३४ ॥ युद्ध करूनि आलिये राती । पांचही बैसले एकांतीं । निकट द्रौपदी महासती । संवादती[8] तें ऐका. ॥ ३५ ॥ अर्जुन म्हणे, 'झुंजतां समरीं । वैरियां वोळखी जाली पुरी, । पांडव असती विराटनगरीं[9] । जाणवलें समस्तां. ॥ ३६ ॥ चारी[10] मास असती उणे । तें छिद्रें[11] पाहोनि दुर्योधनें । "नेमा चुकले" म्हणोनि वचनें । रूढवील[12] लौकिकीं. ॥ ३७ ॥ विराटापासीं धाडील दूत । धर्म येथें बंधूंसहित । ते वेळीं प्रगट होईल मात । जाणवेल समस्तां. ॥ ३८ ॥ यालागीं आम्ही प्रकटदृष्टी[13] । जावें विराटाचिये भेटी । त्याचेनि संवादें मग राहटी[14] । घडे[15], तैसें करीतसों. ॥३९॥ 'प्रगट जाले अष्टमासां[16]' । शब्द गांजवितील[17] ऐसा । त्यातें प्रत्योत्तर[18] नरेशा[19]! । असे तें आम्ही जाणतसों. ॥४०॥ द्वादशवर्षीं चारी मास । अधिक वाढती हो! विशेष । अष्टमास मिळोनि वर्ष । नष्टचर्य लोटलें. ॥ ४१ ॥ आतां, 'अर्ध राज्य देणें, । न देतां सर्वही जाल प्राणें,' । ऐसें सांगोनी पाठवणें । दुर्योधना-कर्णातें. ॥ ४२ ॥ अंधासी पाठवावी विनंती, । 'पुत्र वांचवावयाचे आर्ती[20] ।

---

१. विराटराजाच्या गाई पळवून नेण्यांत पांडवांचा शोध लागावा हाच कौरवांचा हेतु होता. (मागें अध्याय ५ ओवी ४१ पहा). 'तें सिद्ध केलें राजकारण' असाही पाठ आहे. २. संकट, विपत्ति, अपाय. ३. बुद्धिमंत. 'ज्ञानवसुमती' असें पाठांतर. ४. 'त्याचे साक्षीनें मागुती' असें पाठांतर. ५. चार. ६. अवधी, मुदत. पांडवांना राज्य न देण्याकरितां आणखी तेरा वर्षांची मुदत मिळाली—असा भाव. ७. जनमेजया. वैशंपायन जनमेजयाला सांगतो. ८. संवाद करितात. ९. 'विराटघरीं' असें पाठांतर. १०. कांहीं हस्तलिखितांमध्यें ही ओवी नाहीं. कित्येकांमध्यें ही आणि पुढील अशा दोन्ही ओव्या नाहींत. ११. व्यंग, दोष. 'क्षुद्र' असें पाठांतर. १२. प्रसिद्ध करील, जाहीर करील. 'शब्द रूढविले' असें पाठांतर. १३. प्रसिद्धपणें, उघडपणें. १४. प्रसंगानुसार, प्रसंगास साजेल त्याप्रमाणें. १५. 'तैसी' असें पाठांतर. १६. आठ महिन्यांतच. १७. 'जाणवितील' असें पाठांतर. १८. प्रत्युत्तर, उलट उत्तर. १९. नरश्रेष्ठा! धर्मराजा! २०. आतुरता, उत्कट इच्छा, तळमळ.

तरी उपदेशुनी बऱ्या रीती, । राज्यभाग देववणें.' ॥ ४३ ॥ प्रातःकाळीं क-रूनी स्नानें, । गंधाक्षता [1]धौत वसनें, । [2]राजभद्रीं येउनी मानें । [3]आरूढले निःशंक. ॥ ४४ ॥ [4]राज्यासनीं धर्मराज । पुढें उभे चौघे [5]अनुज । पाठीसीं उभी ठेली [6]भाज । [7]याज्ञसेनी सुपवित्रा. ॥ ४५ ॥ राज्यासनीं देखोनी धर्मराजु, । सेवक म्हणती, 'राजाधिराजु । राज्यासन सोडोनी उजु । [8]यथाक्रमें बैसिजे ?' ॥ ४६ ॥ ऐकोनि तें [9]दूतवचन । भीम म्हणे, 'धरा [10]मौन्य, । कैसें होईल वर्तमान । [11]चोज नावेक विलोका.' ॥ ४७ ॥ दूत सांगती राजयातें, । 'कंकादिक निर्भयचित्तें । भद्रपीठीं बैसले त्यांतें । [12]वारितां ते नायकती. ॥ ४८ ॥ [13]निग्रह करावा केवळ । तरी अद्भुत बल्लवाचें बळ । ग्रंथिक आणि तंतिपाळ । सिद्ध असती सन्मुख. ॥ ४९ ॥ अंगनावेषाची [14]गवसणी । फेडून, तेजें [15]प्रतापतरणी । तैसा क्षत्रियांमाजी [16]शिरोमणी । बृहन्नळा जवळिके. ॥ ५० ॥ अवलोकिती [17]सिंहदृष्टी । आम्हां नकरवे त्यांसी गोष्टी, । राज्य घेतील ऐसी पोटीं । शंका वाटे [18]आमुन्या.' ॥ ५१ ॥ राजा म्हणे, 'धरा मौन्या । मीचि येतसें सभास्थाना.' । उत्तर म्हणे, 'राया ! [19]सज्ञाना ! । अजून तरी जाण पां. ॥ ५२ ॥ युद्धीं पार्थे [20]वारिलें मातें, । म्हणोनी [21]रहस्य चोरिलें [22]तूतें. । कंक तो धर्मराज [23]निरुतें । वोळखें आतां [24]सुजाणा ! ॥ ५३ ॥ बल्लव तोची भीमसेन, । बृहन्नळा तोची अर्जुन, । ग्रंथिक तोची नकुळ जाण, । तंतिपाळ सहदेव, ॥ ५४ ॥ सैरंध्री ते याज्ञसेनी, । द्रुपदरा-

---

१. धुतलेली वस्त्रें. २. सिंहासनीं. ३. चढून बसले. मूळ अध्याय ७० श्लोक ३ पहा. ४. 'धर्मराज रायासन्निधू' असाही पाठ आहे. ५. लहान भाऊ. 'बंधू' असें पाठांतर. ६. बायको, द्रौपदी. 'वधू' असें पाठांतर. ७. द्रौपदी. ८. नेहमींच्या पद्धतीस अनुसरून, अनुक्रमानें. क्रम=चाल, रीति, पद्धत. ९. 'सेवक म्हणती, 'राज्यासन । सोडुनी बैसावें आपण.' । भीम 'म्हणे, 'धरा मौन । चोज नावेक विलोका.'–असाही पाठ आहे. १० 'मौन' असा संस्कृत शब्द आहे. ११. आश्चर्य, कौतुक. १२. 'निवारितां नायकती' असें पाठांतर. १३. बंदी. १४. वेष्टण, बुरखा. १५. तेजाचा सूर्य, सूर्यासारखा तेजस्वी. १६. मस्तकावरील रत्न, श्रेष्ठ. १७. सिंहासारखे तीव्रदृष्टीनें. १८. 'आमुते' असें पाठांतर. १९. शहाण्या· 'संज्ञा'(=खूण) असें पाठांतर. (मागें अध्याय ६ ओवी १७२ पहा). २०. निवारिलें. २१. गुह्यगोष्ट. २२. गुप्त गोष्ट तुझ्यापासून चोरून ठेविली–असा भाव. २३. सत्यत्वें, खरोखर. २४. सुज्ञा.

याची नंदिनी,[1] । आतां साष्टांगें[2] लोटांगणीं । शरण जाई पांडवां. ॥ ५५ ॥ घडलिया अनुचितकर्मा[3] । नमस्कारें करविजे क्षमा, । 'करुणाकरा![4] राया धर्मा ! । अपराध काहीं नाठवीं.[5]' ॥ ५६ ॥ आंगें जिंकोनी संग्राम । मिथ्या रूढविलें[6] माझें नाम । तुवां स्तवन करितां परम । मरणातुल्य मज वाटे.' ॥ ५७ ॥ ऐकोनियां पुत्रवचना । अति विस्मयो रायाचिये मना, । सत्वर उठिला, सभास्थाना । पावता झाला तत्काळीं. ॥ ५८ ॥ वस्त्राभरणें सुवर्णपात्रीं । सहवर्तमान सुहृदमंत्री । पांडव अवलोकोनी नेत्रीं । लोटांगण[7] घातलें. ॥ ५९ ॥ मस्तक ठेवूनी धर्माचे चरणीं । म्हणे, 'मी अपराधांची खाणी, । दयासमुद्रा[8] ! कृपा करूनी । क्षमा करीं मज दीना. ॥६०॥ नकळतां प्राणी आचरे दोष । ते क्षमा करी जैसा ईश,[9] । तेंवी मी दासानुदास[10] । उपसाहिजे[11] स्वामिया ! ॥ ६१ ॥ सेवकवृत्ती घेतली सेवा, । हें[12] अभाग्यामाजी अभाग्य देवा ! । कल्पतरू पातलिया खेंवां,[13] । जेंवी हातें लोटिजे. ॥ ६२ ॥ पायें स्पर्शिलें ज्योतिर्लिंग,[14] । कामधेनुतें ताडिलें डांग,[15] । गरुड पातल्या मानुनी कांग[16] । पाषाणघातें[17] दवडिला. ॥ ६३ ॥ चिंतामणीची[18] पायरी कीजे । परिस[19] नेणतां

---

१. कन्या. २. साष्टांग नमस्कार घालावा–असा भाव साष्टांग नमस्काराचें लक्षणः—जानुभ्यां च तथा पद्भ्यां पाणिभ्यामुरसा धिया । शिरसा वचसा दृष्ट्या प्रणामोऽष्टाङ्ग ईरितः ॥ लोटांगण= ईश्वरादि प्रीत्यर्थ आडवें पडून चक्राकार लोटत जाणें–हा मूळचा अर्थ. (लोटणें+अंगण). ३. त्यांना सेवकांप्रमाणें आपण वागविलें, या अयोग्य कृत्यास्तव. ४. 'करुणा करीं' असें पाठांतर. ५. असें म्हणून क्षमा माग, असें उत्तर विराटराजास सांगत आहे. ६. अर्जुनानें स्वतः युद्ध जिंकून माझें नांव खोटेंच प्रसिद्ध केलें; म्हणजे म्यां युद्धांत जय मिळविला, असें लोकांना खोटेंच कळविलें. ७. 'लोटांगणें घातलीं' असें पाठांतर. राजा व त्याचे मंत्री या सर्वांनीं लोटांगणें घातलीं असावीं–असा भाव. ८. 'कृपासमुद्रा कृपेकरूनी' असें पाठांतर. ९. परमेश्वर. इंग्रजींतील To err is human and to forgive is divine ह्या वचनासारखाच येथील भाव आहे. १०. 'दासाचाही दास' असें पाठांतर. ११. सहन करावें. १२. दुर्दैवांतील दुर्दैव, मोठें दुर्दैव. 'हे अनुचित माझिया जिवा' व 'हे अभाग्यताचि भाग्यें देवा!' असे पाठभेद आहेत. १३. आलिंगनाला. १४. शंकराचें देवस्थान, महादेवाचें लिंग. १५. लांब काठी, दंडा. (हा शब्द मुक्तेश्वरकृत आदिपर्व, अध्याय ३१ ओवी ६० यांतही योजिलेला आहे). १६. कावळा. १७. दगड मारून. 'पाषाणहस्तें उडविला' असाही पाठ आहे. १८. चिंतित पदार्थ देणारा मणी. १९. स्पर्शानें लोखंडाचें सोनें करणारा पाषाण.

गोफणीजे,[1] । मूर्खपणें[2] ऐसीं कार्जें[3] । अपार घडती प्राणिया. ॥ ६४ ॥ कीचकें करितां दुष्ट करणी । वर्जिलें नाहीं त्यालागोनी, । पांचाळीतें उदास[4] वचनीं । कांहीं वदली सुधेष्णा. ॥ ६५ ॥ ऐशिया अपराधांचिया कोटी । समुद्र होवोनी सांठवीं पोटीं, । बाळक मानुनी कृपादृष्टी । मातें आतां विलोकीं.' ॥ ६६ ॥ धर्में करूनि प्रत्युत्थान[5] । आवडी दिधलें आलिंगन.[6] । म्हणे,[7] 'तूं मातें परम मान्य । भीष्मविदुरासारिखा.[8] ॥ ६७ ॥ नष्टचर्य ग्रीष्म[9] काळ । तुझिये छाये सुशीतळ । क्रमिला आणि बहुसांभाळ । क्षणक्षणां तुवां केला. ॥ ६८ ॥ अन्नें वसनें, धनें, मानें । संरक्षिलें जीवें प्राणें, । तुझे उपकार विसरिजे मनें । हें या जन्मीं घडेना. ॥ ६९ ॥ जन्मोनि जेणें प्रतिपाळिला, । दिव्यमंत्रें उपदेशिला, । शिरच्छेदनीं सोडविला, । आणी वांचविला दुर्भिक्षीं. ॥७०॥ नौका बुडतां[10] लावी कासे,[11] । जळतां रक्षी हुताशें,[12] । हे साही पितया[13] ऐसे । मन्वादिक[14] बोलती. ॥७१॥ यांतें विसरे जो पातकी । तो कोटीकुळेंशीं बुडे नरकीं.' । विराटें ऐकोनी

---

१. गोफणीनें फेकणें. २. 'मूर्खपणीं' असें पाठांतर. कल्पनासादृश्यः—अजारक्षका अविचारा । हातीं पडलिया हिरा । तेणें रक्षावया तया क्षेत्रा । यमनियमीं गोफणिलें ॥ १७७ ॥ (मुक्तेश्वरकृत शुकरंभासंवाद); (२) दांडगियाम चिंतामणी । सांपडला तो घालोनी गोफणीं । शेत संरक्षी, तसा मी चक्रपाणी । प्राकृत सखा मानिला. ॥ (वामनपंडितकृत यथार्थदीपिका, अध्याय ११ ओवी ७६७). ३. कार्यें. ४. औदासीन्ययुक्त, उदासीन, सहानुभूतिशून्य. ५. उत्थापन देऊन, सन्मानार्थ उभें राहून. ६.'धर्मा करून प्रार्थन । अवघियां दीधलीं आलिंगन' असाही पाठ आहे. ७. ह्याचा कर्ता—धर्म. ८. 'भीष्मद्रोणासारिखा' असाही पाठ आहे. ९. उन्हाळा. 'नष्टचर्य भीष्म काळ । तुझिये ठायीं सुशीतळ' असाही पाठ आहे भीष्म=भयंकर. १०. 'जळीं बुडतां लाविला कासे । जळतां पालविला हुताशें । हीं साही पितयातुल्य ऐसें । मन्वादिकीं बोलिजे.' असाही पाठ आहे. ११. कांठास पोंचवी. कासेस लावणें=आश्रय देणें, आधार देणें. १२. अग्नीनें. १३. बापासमान. पिता=पाति (रक्षति) इति पिता=जो रक्षण करितो तो पिता. १४. मनु आदि प्राचीन शास्त्रकर्ते. 'पिता' ह्या पदवीला कोण पात्र होतात त्यांचा निर्देश भारतांत आणि इतर ग्रंथांत आढळतो, तो असाः—शरीरकृत् प्राणदाता यस्य चान्नानि भुञ्जते । क्रमेणैते त्रयोऽप्युक्ताः पितरो धर्मशासने. ॥ १ ॥ कन्यादातान्नदाता च ज्ञानदाताऽभयप्रदः । जन्मदो मंत्रदो ज्येष्ठभ्राता च पितरः स्मृताः ॥२॥. मनुस्मृतींत 'पिता भवति मन्त्रदः' म्हणजे—जो मन्त्रात्मक वेदग्रहण करवितो तो पिता—असें वचन आहे (अध्याय २ श्लोक १५३). तसेंच मैराळकृत विराटपर्वांतील पुढील ओवीः—आपत्काळीं करी पालन । तोही मानावा पित्यासमान । अग्नीमाजी करितां रक्षण । तोही पित्यासमान मानावा. ॥ (अध्याय १२ ओवी १०). हें विराटपर्व अद्याप अप्रसिद्धच आहे.

मस्तकीं । [1]द्वादश चरण वंदिले. ॥ ७२ ॥ स्वहस्तें [2]प्रक्षाळुनि चरणा । भाळीं चर्चिलें हरिचंदनां,[3] । [4]कुंकुम कस्तूरी सुगंध चूर्णा । [5]परिमळद्रव्यें अर्पिलीं. ॥७३॥ चंपक मालती तुळसीमाळा । धूप दीप सुगंध [6]वाळा । पीतांबर [7]मुक्ताफळा- । पल्लवांकित नेसविले. ॥ ७४ ॥ किरीट कुंडलें पदकमाळा । [8]करमुद्रिका [9]कटिमेखळा । अर्पोनी पांचही नृपाळा । [10]मत्स्यरायें पूजिलें. ॥ ७५ ॥ [11]परिधान करोनी पीतांबर । [12]द्वादश आंगीं अळंकार । लेववूनी नमस्कार । सुधेष्णा करी [13]कृष्णेतें. ॥७६॥ पंक्ती [14]सारोनी सुखभोजनें । त्रयोदश[15]गुणी [16]तांबूल अर्पुन । अश्व पताका [17]रहंवर यानें । एक शत एकातें. ॥ ७७ ॥ विशाळ कुंजर मदोन्मत्त । [18]कंठाभरणें घंटायुक्त । पांचांजणा पांचशत । चारी सेवकें[19] एकएका. ॥ ७८॥ [20]जंवें आगळीं बळसंपन्नें । पांचशत अश्वरत्नें । [21]आभरणेंसीं उत्साहमनें । पांडवांतें अर्पिलीं. ॥ ७९ ॥ सहस्र धेनू सहस्र महिषी । सहस्र सेवक सहस्र दासी । [22]नियुतसंख्या द्रव्यराशी । पादपूजा एकएका. ॥ ८० ॥ अर्पूनियां सहस्र [23]ग्रामें ।

---

१. पांच पांडव आणि सहावी द्रौपदी यांचे. 'चरणद्वय स्पर्शिले' असाही पाठ आहे. २. धुवून. 'प्रक्षाळुनि चरण ।......चर्चिला हरिचंदन । ......सुगंध चर्चुन ।' असाही पाठ आहे. ३. एक प्रकारचा मलयदेशांत होणारा चंदन. यालाच 'गोशीर्ष' असें म्हणतात. 'हरिचंदनमस्त्री स्यात्रिदशानां महीरुहे । नपुंसकं तु गोशीर्षे ज्योत्स्नाकुंकुमयोरपि.' ॥ इति मेदिनी. ४ केशर, केशराची उटी. ५. सुगंध द्रव्यें. ६. एक सुगंधी मुळ्यांचें गवत, खस. 'सुवर्ण कमळा' असें पाठांतर. ७. मोत्यांच्या पदरांनीं युक्त. ८. हाताच्या आंगठ्या. 'शरमुद्रिका' असाही पाठ आहे.'शर' ह्या शब्दानें 'पांच' ही संख्या दर्शविली जाते. म्हणून, 'पांच आंगठ्या'– असा अर्थ. ९. कंबरपट्टा. १०. विराटराजानें. ११. नेसून. १२. ह्या द्वादश अंगाचा तपशील मुक्तेश्वरानें दिला आहे तो असाः—पादाग्र, गुल्फ, नळिका, कटी । बोटें, मनगटें, बाहुवटी । कंठ, नासिक, श्रवणपुटी । भाळ, मस्तकीं वेणिका. ॥ (सभापर्व, अध्याय १० ओवी ८) 'द्वादश अंगें' असा उल्लेख ठिकठिकाणीं आढळतो (मुक्तेश्वरकृत शुकरंभासंवाद, ओवी २०१). १३. द्रौपदीला. १४. 'सारिलीं' असें पाठांतर. १५. त्रयोदशगुणी विडा म्हणजे ज्यांत पुढील पदार्थ असतात तोः–सुपारी, नागवेलीचीं पानें, चुना, कात, जायफळ, जायपत्री, वेलची, केशर, कंकोळ, कर्पूर, लवंगा, बदाम, पिस्ते किंवा खोबरें. १६. 'तांबुलपर्णें' असें पाठांतर. १७. रथ. १८. 'वस्त्राभरणीं' असें पाठांतर. १९. 'शावक' असें पाठांतर. शावक=छावा, बच्चा. २०. वेगाच्या बाबतींत. 'जीं' असा अन्य पाठ. २१. अलंकारांसहित. घोडे त्यांच्या आंगांवरील साजांसह दिले–असा भाव. २२. दहा हजार. २३. '०ग्राम ।... ओपिलें विशाळ धाम ।...... ०विश्राम ।' असें पाठांतर.

वस्तीं ओपिलीं विशाळ धामें, । एके गृहीं सुखविश्रामें । भिन्न भिन्न पांचांतें. ॥८१॥ भरोनी सर्वही संपत्ती । द्रौपदीसहित करविली वस्ती, । उत्तर आणी नृपती । क्षणक्षण वोळेगती. ॥ ८२ ॥ लोटलिया अवदशेची सीमा । सन्मुख भेटूं येतसे पद्मा । तियेकाळींचे सुखसंभ्रमा । भाग्यभोक्ते जाणती. ॥ ८३ ॥ विराट बोले सुहृदाचारी, । 'आतां कौरव आमुचे वैरी । धार्तराष्ट्रा सहपरिवारीं । निर्दाळीन प्रतापें. ॥८४॥ धृतराष्ट्राचिया उत्तरकार्या । उरों नेदीं एकही तनया, । तेंही कर्म धर्मराया । करणें घडेल तें करूं. ॥ ८५ ॥ स्वामीनीं स्वामित्व भोगोनी असणें, । सेवकाहातीं सेवा घेणें, । शत्रु निवटूनी संस्थापणें । राज्यासनीं धर्मातें. ॥ ८६ ॥ जळो भीष्माचें वडिलपण । समेशीं करितां वस्त्रहरण । वर्जूं न शके, प्राणहीन । यालागीं प्रेत सहजचि तो. ॥ ८७ ॥ द्रोण तो केवळ पर्णद्रोण । आयुष्यआज्यें माखला पूर्ण, । परि हातें स्पर्शतां धृष्टद्युम्नें । रणीं पडेल पालथा. ॥ ८८ ॥ खंडिल्यां कर्णेशिं विकर्ण । कौरवसेना अवलक्षण, । प्राणें

---

१. 'विराटराजा जोडलिया हस्ती, । क्षणक्षणा वोळगे' असाही पाठ आहे. २. सेवेसाठीं सिद्ध असती. ३. आनंदामुळें होणारी मनाची धांदल, अत्यानंद. ४. मित्रत्वानें वागणारा. ५. 'आतां कौरवां मीच मारी' असाही पाठ आहे. ६. समूळ नाश करीन. ७. मरणोत्तर करावयाचे धार्मिक विधी. 'हेंही' असें पाठांतर. ८. येथें सभापर्वांतील द्रौपदीवर ओढवलेल्या वस्त्रहरणाच्या प्रसंगास उद्देशून हें विराटराजाचें भाषण आहे. ९. 'यावरी द्रोण तो पर्णद्रोण' असा अन्य पाठ. १०. पानांचा द्रोण. ११. आयुष्यरूप तुपानें पूर्ण माखला आहे म्हणजे त्याचें वय पुष्कळ आहे,-अर्थात् द्रोणाचार्य हा फाटक्या तुटक्या द्रोणासारखा आहे-असा भाव. रूपकालंकार. १२. द्रुपदराजाचा पुत्र आणि द्रौपदीचा भ्राता. 'धृष्टद्युम्न' ह्या शब्दाचा अर्थ:-धृष्ट=प्रगल्भ आणि द्युम्न=वित्त (राजाचें बलरूप वित्त). बल, शत्रूत्कर्षासहिष्णुत्व, कवचकुंडलादिकांसह जन्म, शस्त्रास्त्रशौर्य इत्यादि गुणांनीं संपन्न असल्यामुळें द्रुपदानें या कुमारास धृष्टद्युम्न असें नांव ठेविलें (आदिपर्व, अध्याय १६७, श्लोक ५३). ह्याच्या हातून द्रोणाचार्यांचा वध व्हावयाचा होता (मुक्तेश्वरकृत आदिपर्व, अध्याय ३९ ओवी ६६ पहा). १३. 'पालथा' ह्या शब्दावर 'श्लेष' आहे. पालथा होणें=(पानांचा द्रोण) उपडा होणें, उलटणें; (द्रोणाचार्य-पक्षीं) पराजित होणें, लोळविला जाणें. १४. कान तोडल्यामुळें. विकर्णाचे कान तोडण्यांत आले, तर तो कौरवांच्या सैन्याला अपशकुन होईल-असा भाव. १५. येथें श्लेष आहे. विकर्ण=धृतराष्ट्रपुत्र; (पक्षीं) अंकुशाकार अग्राचा बाण. १६. अशुभ चिन्ह, दुश्चिन्ह.

गेलिया दुर्योधन । मग विरूप[1] अपवित्रा. ॥ ८९ ॥ कोढूं[2] शल्याचें[3] सालडें, ।
शकुनी उडवूं[4] शकुनीपाडें, । दुःशासनादि[5] माकडें[6] । स्वर्गझाडां वळंघवूं[7]. ॥९०॥
पांडव म्हणती, 'सुरपादपा[8] ! । सर्वेही घडेल तुजिया कृपा, । ईश्वर वोळलिया[9]
संकल्पा । निर्फलता मग कैंची[10] ?' ॥९१॥ विराट करितसे विज्ञापना, । 'बहुकाळ
उरलीसे वासना । ते त्वां कृपा करूनी दीनां[11] । अंगीकारिली पाहिजे. ॥ ९२ ॥
उत्तरा द्यावी अर्जुनातें । हा संकल्प बहुसाल मातें, । तें त्वां आपुलेनि हातें ।
सिद्धी पावविलें[12] पाहिजे.' ॥ ९३ ॥ अर्जुन म्हणे, 'यथार्थ ऐक, । एक न घडोनि[13]
आणिक एक । विशेष दुणावे सोयरिक । ऐसें करीं निर्धारें. ॥९४॥ उत्तरा माझी
शिष्यिणी खरी, । विद्या शिकविली ते कुमरी, । भार्या न करूनि सुंदरी । स्नुषा[14]
करीन आवडी. ॥ ९५ ॥ कृष्णभगिनीसुभद्राकुमरू[15] । क्षात्रविद्यावधूचा[16] वरू ।
धनुर्धरां दीक्षागुरू । पुत्र माझा अभिमन्यू. ॥९६॥ त्याची करीन[17] हे अंगना ।
जेंवी कां रती योग्य मदना.' । विराट म्हणे, 'माजिया मना । बहुप्रकारें मानलें.
॥९७॥ पलाणुनी[18] रथ कुंजर । द्वारके धाडावे सत्वर, । सुभद्रेशीं[19] यादवेश्वर । शीघ्र
येथें आणावा. ॥ ९८ ॥ पत्रीं विनवा श्रीपती, । 'खंडली[20] अज्ञातवास-राती ।

---

१. विरूप=विद्रूप. दुर्योधन युद्धांत पडल्यास, त्याची सेना [पति मृत झाल्यामुळें] विधवा होणार–असा भाव. 'मग तो विरूप अपवित्र' असाही पाठ आहे. २. 'काढा' असें पाठांतर. ३. हा मद्रदेशाचा राजा. भारती युद्धांत हा कर्णाचा सारथी झाला होता. ह्यास धर्मराजानें मारिलें. ४. पक्ष्यासारिखा. शकुनि=पक्षी. ५. 'दुःशासनासहित' असें पाठांतर. ६. सर्व सैनिकांचें क्षुद्रत्व दर्शविण्यासाठी त्यांस 'माकडें' असें येथें म्हटलें असावें. ७. चढवूं, आरूढ करूं. दुःशासनादि सर्व सैनिकांस स्वर्गलोकीं पाठवूं–असा भाव. ८. हे कल्पवृक्षा! ९. वळल्यास, प्रसन्न झाल्यास. 'ईश्वरकृपे मनसंकल्पा' असाही पाठ आहे. १०. 'ते कैंची' असें पाठांतर. ११. 'दीना' हें वासनेचें विशेषण. १२. 'सिद्धी पावे ऐसें कीजे' असाही पाठ आहे. १३. अर्जुन म्हणतो:–तुम्ही जी गोष्ट करावयास सांगता ती न करितां दुसरी अशी एक गोष्ट घडवून आणीन कीं जिच्यामुळें आपला स्नेहसंबंध ज्यास्त दृढ होईल. (मूळ अध्याय ७१ श्लोक ३३ पहा). 'न घडोनि हें आणिक' असें पाठांतर. १४. सून. 'स्नुषा वडील करीन' असा अन्य पाठ. १५. कृष्णाची बहीण सुभद्रा, तिचा पुत्र. १६. 'क्षात्रविद्ये परम शूरू' असाही पाठ आहे. १७. 'त्याची करीतसें' असाही पाठ आहे. १८. खोगीर चढवून, सिद्ध करून. पल्याण=खोगीर. 'यालागीं रथ कुंजर' असाही पाठ आहे. १९. सुभद्रेसह. २०. 'सरली' असें पाठांतर.

तुझिया कृपेचा [1]गभस्ती । उदया आला स्वभावें. ॥ ९९ ॥ [2]कौरव कुविद्येचा अग्नी । पेटवोनी जाळिता[3] आम्हालागोनी, । त्यासी वारिता तूं चक्रपाणी ! । स्वामी असती आमुतें. ॥ १०० ॥ आतां विराटें आपली दुहिता । उत्तरा नेमिली सुभद्रासुता । यालागीं घेउनी समस्तां । शीघ्र आलें पाहिजे.' ॥१०१॥ आतां अभिमन्युविवाहो । वैशंपायन वदेल पाहा हो ! । जैसा [4]गौतमीप्रवाहो । क्षेत्र लंघीत चा[5]मके ॥ १०२ ॥ व्यास सद्गुरू पुढारा । पाठीं चाले मुक्तेश्वरा, । पाय पडतां आडमो[6]हरा । संत सुपथें लाविती. ॥१०३॥ इति श्रीविराटपर्व भारत । पुढां परिसिजे[7] सावचित्त । लग्ना येईल कृष्णनाथ । तें श्रवणनयनीं[8] विलोका. ॥ १०४ ॥

॥ इति श्रीविराटपर्वणि अभिमन्युविवाहनिश्चयो नाम सप्तमोध्यायः ॥

---

## अध्याय आंठवा.[9]

'अभिमन्यू झालिया जामात । सोयरा जोडला कृष्णनाथ', । विराट म्हणे, 'अत्यद्भुत । भाग्य माझें त्रिलोकीं.'[10] ॥ १ ॥ सहस्रसंख्या कनकरथ । ध्वज पताका सुशोभित । सहस्र करी[11] मदोन्मत्त । चंवरडोल[12] त्यांपृष्ठीं[13]. ॥ २ ॥ सह-

---

१. सूर्य. २. 'कौरव अविद्येचा धूम । पेटवूनी म्हणती आहे तम । त्यासी वारिता पुरुषोत्तम । स्वामी आहे आमुतें. ॥' असाही पाठ आहे. ३. जाळणारा. किंवा–जाळिलें असतें तर. ४. गोदावरीनदीचा प्रवाह (ओघ). ही ओवी लिहितांना मुक्तेश्वराच्या दृष्टीसमोर पैठण येथील गोदावरीनदीचा ओघ असावा, असें वाटतें. ५. चामके=जाई, चाले. 'चामकणें' क्रियापद मुक्तेश्वराच्या काव्यांत वारंवार आढळतें. मुक्तेश्वरानंतरच्या कवींचें देखील तें आवडतें होतें, असें दिसतें:–(१) चर्चा 'चामकती' प्रियकर । अध्याय १।४०; (२) पुढां 'चामके' कैसी कथा । अध्याय २।१२१ (माधवस्वामी रामदासीकृत उद्योगपर्व). 'चालिला' असें पाठांतर. ६. वांकडातिकडा, एका बाजूस. 'अनमोहरा' असें पाठांतर. ७. 'पुढें परिसावें' असें पाठांतर. ८. कर्णरूप नयनांनीं (डोळ्यांनीं). ९. ह्या अध्यायांत मुळांतील ७२ व्या अध्यायाच्या श्लोक १२ पासून पुढील कथाभाग मुक्तेश्वरानें वर्णिला आहे. तथापि जवळजवळ सर्वच अध्यायावर मुक्तेश्वराची मालकी आहे. १०. 'उदेलें' असें पाठांतर. ११. हत्ती. 'करिणी' (=हत्तीण) व 'करेणु' (=हत्ती) असे पाठभेद. १२. (हत्तीवरील) अंबारी. १३. 'त्यांवरी' असें पाठांतर.

स्त्र[1]संख्या शिबिका[2]यानें । सहस्र छत्रें चंद्रवर्णें । दोनी सहस्र अश्वरत्नें । हेमा[3]-भरणें शोभती. ॥ ३ ॥ पांचसहस्र पायिंचे[4] वीरें । सहस्र ब्राह्मण थोर थोर । आदरें विराट राजेश्वर । मूळ[5] धाडी[6] द्वारके. ॥ ४ ॥ कुंजरभेरींची[7] गर्जना । करित पातले हरिपाटणा[8]. । दूत करिती विचारणा, । 'कोण? कोठील? कवणाचे?' ॥ ५ ॥ 'अभिमन्यूच्या विवाहकार्या । मूळ पातलों श्रीकृष्णराया, । विराटें लागोनियां पायां । विज्ञापना पाठविली. ॥ ६ ॥ अज्ञातवासाचा विटाळ । क्षाळूनियां[9] कुंतीचे बाळ । कृष्णदर्शना उतावीळ । परमें[10] आर्ती बैसले.' ॥७॥ वार्ता जाणवितां दूतीं । आनंदला[11] आनंदमूर्ती[12], । मानें[13] पाचारुनी वस्ती । चित्र-शाळे दीधली. ॥ ८ ॥ सर्वही येऊनि सन्मुखी[14] । जयजयकार करिती मुखीं । भूमी स्पर्शोनी मस्तकीं । लोटांगणें घातलीं. ॥ ९ ॥ पुढें होऊनि पुरोहितीं[15] । कुंकुममंडित अक्षरपंक्ती । पत्रिका निवेदिली हातीं । विश्वजनक[16]जनकाचे. ॥१०॥ पत्रीं चित्रिलें[17] चक्रपाणी, । विराटें मस्तक ठेविला चरणीं । प्रार्थना करी बद्धपाणी[18] । 'लग्ना यावें' म्हणोनियां. ॥ ११ ॥ धर्मादिक[19] पंच मूर्ती । पुढें रेखिल्यां[20] जोडिल्या हस्तीं । तें देखोनी लक्ष्मीपती । हास्य करी विनोदें. ॥१२॥ तळीं[21] अभिप्राय सकळ । अक्षरीं गुंफिला अर्थ विमळ[22] । जैसें पुष्प आणी

---

१. 'सहस्र उत्तम' असें पाठांतर. २. पालख्या. ३. सुवर्णालंकारांनीं. ४. पायदळ. ५. आमंत्रण. ६. 'पाठवी' असा अन्य पाठ. ७. हत्तीवरील नगाऱ्यांची ८. द्वारकेला. ९. 'क्षाळुनी पांचही कुंतीबाळ' असा अन्य पाठ. १०. मोठ्या उत्कंठेनें, आतुरतेनें. 'परमार्थी' (=सत्यत्वेंकरून, खरोखर) असें पाठांतर. ११. 'आनंदली' असें पाठांतर. १२. श्रीकृष्ण. १३. सन्मानपूर्वक कुशलप्रश्न विचारून व आदरातिथ्य करून. १४. सामोरे. १५. पुरोहितांनीं, उपाध्यायांनीं. पुरोहित=कुटुंबांतील सर्व धर्मकृत्यें चालविणारा शास्त्रज्ञ पुरुष. प्रत्येक मनुष्याला कोणी तरी मार्गदर्शक असणें अवश्य आहे व तो मोठा विद्वान व व्यवहारचतुर असला पाहिजे, हें उघडच आहे. पुरोहित कसा असावा, हें पुढील पद्यांत सांगितलेलें आहेः— त्रय्यां च दण्डनीत्यां च कुशलः स्यात्पुरोहितः । अथर्वविहितं कुर्यान्नित्यं शांतिकपौष्टिकम्. ॥ (इति कामंदकः). १६. ब्रह्मदेवाच्या पित्याच्या ( कृष्णाच्या ) हातीं. १७. चित्र काढिलें. आजकाल विवाहसमारंभाच्या निमंत्रणपत्रिकांवर देव व देवता यांचींच फक्त चित्रें असतात. सचित्र निमंत्रणपत्रिकेची कल्पना मुक्तेश्वराचीच आहे. मूळांत 'निमंत्रणासाठीं श्रीकृष्ण व आप्तसुहृद यांच्याकडे दूत पाठविले' असें सांगितलेलें आहे (अध्याय ७२ श्लोक १३). १८. हात बांधून, अर्थात् हात जोडून. १९. 'धर्मादि पांचही मूर्ती' असें पाठांतर. २०. 'रेखिले' असा अन्य पाठ. २१. चित्रांच्या खालीं. २२. स्पष्ट, स्वच्छ. 'विवळ' असें पाठांतर. विवळ=स्पष्ट, सुगम. हा शब्द ज्ञानेश्वरींत आढळतो. (अध्याय ५।१६४).

परिमळ। द्वैत[1]भाव नेणती. ॥१३॥ 'विश्वंभरा ! विश्वेश्वरा ! । विश्वोदरा ! विश्वोद्धारा[2]!।
विश्वविग्रहा ! साकारा[3] ! । विश्वोद्भवा[4] ! श्रीकृष्णा ! ॥१४॥ तुवां[5] प्रेरलिया बीजें ।
चराचरा पातलें सहजें, । तुज वेगळें आन दुजें । नाहीं नाहीं त्रिलोकीं. ॥१५॥
उत्तरा विराटाची कुमरी । अभिमन्यातें नेमिली नोवरी । ते तूं येउनी आपले
करीं । संकल्पसिद्धी करावी[6]. ॥ १६ ॥ प्रार्थूनियां बळिभद्रातें[7] । मानें आणिलें
पाहिजे येथें । गद[8] सारण[8] चक्रदेवातें[9] । समागमें आणिजे. ॥ १७ ॥
सात्यकी[10] कृतवर्मा[11] अक्रूर[12] । प्रद्युम्न[13] सांबादिक[14] कुमर । उद्धव[15] भक्तराज थोर ।
प्रार्थूनियां आणावे. ॥ १८ ॥ वैदर्भकन्या[16] सत्राजिती[17] । वृंदा[18] भद्रा[19] नाग्नजिती[20] ।
लक्ष्मणा[21] कालिंदी[22] जांबवती[23] । शिबिकारूढ[24] आणाव्या. ॥ १९ ॥ सुभद्रेतें
मानोंदरू[25] । करावया तुजचि अधिकारू । गजस्कंधीं अभिमन्युवरू[26] । शृंगारुनी आणावा. ॥ २० ॥ अज्ञातवासाचें मळीन वास[27] । त्यागून शुभकाळसुवास[28] । वेढूनि पांडव पंच पुरुष । तव दर्शना भुकेले[29]. ॥ २१ ॥ आपुलेनि

---

१. 'एक कीं दोनी नेणवे' असाही पाठ आहे. २. 'विश्वाधारा' असें पाठांतर. ३. 'साचारा' असा अन्य पाठ. ४. 'विश्वसारा' असा पाठभेद. ५. सर्व चराचरांचा उत्पन्नकर्ता तूं आहेस, असा भाव. 'तुवां एके केलिया बीजें' असाही पाठ आहे. ६. 'पावणें' असा अन्य पाठ. ७. कृष्णाचा ज्येष्ठ बंधु. ह्यास बलराम, संकर्षण, हलधर इत्यादि नांवें होतीं. ८. वसुदेवास रोहिणीपासून झालेल्या पुत्रांची नांवें. ९. हा कोणी यादव असावा. १०. युयुधान. ह्यानें धनुर्विद्या अर्जुनापासून संपादिली होती. ११. नहुषवंशांतील हार्दिक नामक राजा. भारती युद्धांत एक अक्षौहिणी सैन्यासह यास बळिरामानें दुर्योधनाकडे साह्यास दिलें होतें. १२. कृष्ण व बळराम यांस गोकुळांतून मथुरेस आणण्यासाठी यासच कंसानें पाठविलें होतें. १३. कृष्णास रुक्मिणीपासून झालेला प्रथम पुत्र. हा महारथी होता. १४. सांब—कृष्णास जांबुवंतीपासून झालेला पुत्र. हा महारथी होता. १५. हा परमबुद्धिवान व नीतिमान होता. हा सर्वकाल कृष्णाबरोबर राही. याचें व कृष्णाचें परस्पर अत्यंत प्रेम असे. १६. रुक्मिणी. विदर्भदेशाधिपति भीष्मकराजाची कन्या. 'वैदर्भिका' असें पाठांतर. १७. सत्राजितकन्या, सत्यभामा. १८. मित्रविंदा. ही अवंतिनृप जयसेन याची कन्या. १९. केकयदेशाधिपति धृष्टकेतूची कन्या. २०. नग्नजित् राजाची कन्या. २१. मद्रदेशीय एका राजाची कन्या. २२. कृष्णाच्या अष्ट नायिकांतील सातवी. २३. जांबवानाची कन्या. ह्या ओवींत कृष्णाच्या अष्टनायिकांची नांवें आहेत:—भैमी जांबुवंती भामा सत्या भद्राच लक्ष्मणा । कालिंदी मित्रविदा चेत्यष्टौ पट्टमहास्त्रियः । २४. पालखींत बसवून, पालखींतून. २५. 'मान थोरू' असें पाठांतर. २६. वर= नवरा मुलगा. '°वीरू' असें पाठांतर. २७. वस्त्र. २८. मंगलकालरूप उत्तम वस्त्र. २९. 'वांछिती' असें पाठांतर.

दर्शनामृतें । तृप्त केलें पाहिजे त्यांतें.' । पत्रिका वाचितां श्रीकृष्णचित्त । उ-
तावेळ [1]प्रयाणा. ॥ २२ ॥ [2]दारुकातें आज्ञा करी, । 'रथ संजोगीं[3] झडकरीं' ।
एक अक्षौहिणीदळभारीं । [4]कृतवर्मा सिद्ध जाला. ॥२३॥ घेउनी अक्षौहिणीदळ, ।
[5]सात्यकी सिद्ध जाला प्रबळ, । [6]इंद्रसेनादि आप्त सकळ । रथारूढ निघाले. ॥२४॥
वंदून [7]वसुदेव [8]उग्रसेना । म्हणे,'रक्षावें निज [9]पट्टणा.' । इतर [10]यादवांशीं श्रीकृष्णराणा ।
[11]विराटपुरा पातले. ॥ २५ ॥ [12]काशिराजे [13]शल्य नृपती । अक्षौहिणीदळसंपत्ती ।
घेउनी श्रीकृष्णासंगतीं । विराटपुरा चालिले. ॥ २६ ॥ भूतलीं पसरे सिं-
धुजळ । तेंवी दोन अक्षौहिणीदळ, । श्वेत चामरें, छत्रें धवळ । जेंवी [14]कल्लोळ
लहरींचे. ॥ २७ ॥ द्रौपदीचे पंच [15]कुमर, । [16]शिखंडी [17]धृष्टद्युम्न वीर । घेउनी
[18]पांचालराजेश्वर । विवाह[19]कार्या चालिले. ॥ २८ ॥ सुवर्णरत्नाचिया कोटी । व-
स्त्राभरणें [20]कुंजरपृष्ठीं । घेऊनि, पांडवाचिये भेटी । [21]श्वशुर स्नेहें [22]पातलें. ॥२९॥
दासी, दास, रथ, कुंजर । अमूल्य [23]वारु साळंकार । धेनू, महिषी, वृषभ थोर ।
धर्मालागीं आणिले. ॥३०॥ [24]वसुदेव [25]हलायुध । [26]प्रद्युम्न, सांब, सारण, गद । कृ-

---

१. जाण्याकरितां. २. दारुक हा कृष्णसारथी, त्यातें. ३. सिद्ध कर. ४. बलरामाचा सेनाध्यक्ष. ५. एक शूर यादव. ६. हा धर्मराजाचा सारथी. ७. कृष्णपिता. ८. कंसपिता उग्रसेन, मथुरेचा राजा. ९. पुर, नगर. 'पाटण' असें पाठांतर. १०. यादवांसह. ११. 'विराटनगरा चालिले' असाही पाठ आहे. १२. अंबा, अंबिका व अंबालिका यांचा पिता. १३. मद्रदेशाचा राजा. पांडुराजाची पत्नी जी माद्री तिचा भाऊ. १४. मोठी लाट. 'जेंवी कल्लोळ अग्नीचे' असाही पाठ आहे. कल्लोळ=आगीचा डोंब, लोळ, झोत. १५. ह्यांचीं नांवें:-धर्मापासाव प्रतिविंध्यनामा । भीमापासाव सुतसोमा । अर्जुनपुत्र तो श्रुतकर्मा । शतानीक नकुळाचा. ॥ सहदेवाचा श्रुतसेन । एकेका वर्षानंतरें जाण । जन्म पावले पांचहीजण । द्रौपदेय ते जाणावे. ॥ (मुक्तेश्वरकृत आदिपर्व, अध्याय ४८ ओव्या ५८–५९). १६. हा द्रुपदराजाचापुत्र. हा प्रथमतः कन्यारूप असून त्याला पित्यानें पुत्रवेषानें वाढविलें होतें. पुढें हिरण्यवर्मा नामक राजाच्या कन्येशीं त्याचा विवाह झाला. गुह्य गोष्ट प्रकट झाल्यामुळें, तिच्या पित्यानें युद्धार्थ आगमन केलें. तेव्हां वनामध्यें पळून जाऊन त्यानें एका यक्षाला प्रसन्न करून घेतलें, आणि त्याचें पुरुषत्व उसनें घेऊन त्याला आपलें स्त्रीत्व दिलें. पुढें आपल्या देशीं परत येऊन त्यानें स्त्रीचा स्वीकार केला. तथापि मूळचा स्त्रीरूप असल्यामुळें भारतीयुद्धामध्यें भीष्माचार्य त्याच्याशीं लढला नाहीं. यामुळें भीष्माचा पाडाव झाला. १७. मागें पृष्ठ ९९ टीप १२ पहा. १८. द्रुपदराजा. १९. 'विराटनगरा चालिले' असाही पाठ आहे. २०. हत्तींच्या पाठीवर. २१. हा पांडवांचा श्वशुर (द्रुपदराजा) स्नेहास्तव आला. २२. 'निघाला' असें पाठांतर. २३. घोडा, अश्व. २४. कृष्णाचा पिता. २५. हल (नांगर) आहे आयुध ज्याचें तो, बलराम. २६. कृष्णपुत्र. (ओवी १७ व १८ वरील टीपा पहा).

तवर्मादिक प्रसिद्ध । सात्यकी श्रेष्ठ यदुकुळीं. ॥ ३१ ॥ सुभद्रा देवी शिबिका-
यानीं । गजस्कंधीं अभिमन्यू गुणी । इंद्रसेन उद्धव ज्ञानी । अक्रूर भक्त त्या[१]-
जवळी. ॥३२॥ दहासहस्र मत्त कुंजर । शत अयुतें[२] अश्वस्वार । अर्बुदसंख्या
रहंवर । निखर्वसंख्या पदाती. ॥ ३३ ॥ घेउनी आपुलालें दळ । कृष्णापाठीं
चालिले सकळ, । मेघीं लोपिजे आभाळ । तेंवी भूतळ महावीरीं. ॥ ३४ ॥
गगनीं गर्जती जळधर[३] । तेंवी महावाद्यांचे[४] गजर, । शस्त्रें झौडिती[५] महावीर । जेंवीं
विद्युल्लता[६] तळपती. ॥ ३५ ॥ युयुधान[७] आणि धृष्ट[८] । वृष्णि[९] अंधक[१०] भोजक[११]
निवटे[१२] । घेऊनि सेनेचे संघाट[१३] । कृष्णापाठीं चालती[१४]. ॥ ३६ ॥ श्रीकृष्ण
पातला विराटपुरा, । मत्स्य[१५] धाविन्नला सामोरा, । सन्मानुनी[१६] सर्वेश्वरा[१७] । जानवसा[१८]
आणिलें. ॥ ३७ ॥ अरुणरंगीं रंगलें गगन । तेंवी मंडप एक योजन, । चंद्रा-
भंवतीं[१९] नक्षत्रगण । तेंवी मुक्तें झळकती. ॥ ३८ ॥ तळीं[२०] टेंकीले सुवर्णस्तंभ ।
जेंवी कनकमेरुचे कोंभ[२१], । बैसकी[२२] देखोनीया दंभ । इंद्रभुवनें सांडिला. ॥३९॥
आसनीं बैसवोनी सकळ । अर्पिलें चंदन तांबूल, । दिव्यसुमनाचा परिमळ ।
वेध लावी वसंता[२३]. ॥ ४० ॥ तंव बंधुसहित पातला धर्म । आवडी कवळिला

---

१. अभिमन्यु जवळ. 'जवळिके' असें पाठांतर. २. 'शत प्रयुतें' असें पाठांतर. अयुत=१०,०००. प्रयुत=१०,००,०००. ३. मेघ. ४. 'यादवांचे' असें पाठांतर. ५. झाडणें=झटक्यानें हलविणें, परजणें. ६. विजा. 'लता' किंवा 'वल्ली' हें पद भ्रू, विद्युत्, भुज, खड्ग, चाप या शब्दांशी अन्वित होऊन त्याचा अर्थ सौंदर्य, सौकुमार्य, सूक्ष्मता, तनुता असा होतो:—भ्रूलता, विद्युल्लता, भुजलता इत्यादि. ७. सात्यकी. ८. धृष्टकेतु. चेदिदेशाचा राजा जो शिशुपाळ त्याचा पुत्र. यानें आपली भगिनी करेणुमती नकुलास दिली होती. ९. यदुकुलोत्पन्न एक राजा. १०. नहुषकुलोत्पन्न एक राजा. ह्या अंधकाचें कुल यदुवंशांत मोठें प्रसिद्ध होतें. ११. यदुकुलोत्पन्न शूर नामक राजाचा मित्र. १२. निवडक, शेलके. (नि+वटणें=सरकी काढणें). १३. समुदाय. १४. 'चालिले' असें पाठांतर. १५. विराटराजा. १६. 'महासन्मानें' असा अन्य पाठ. १७. कृष्णाला. १८. जानोसा, पाहुण्यांना राहावयास दिलेलें स्थळ. १९. भोंवतीं, वाटोळे. 'चंद्रपुटीं' व 'सूर्यपुटीं' असे पाठभेद. २०. 'तळी लाविले' असा पाठभेद. २१. कोंब, अंकुर. ते सुवर्णस्तंभ नव्हते, तर जणुं काय ते सुवर्णपर्वताचे कोंब होते. ही उत्प्रेक्षा मोठी बहारीची आहे. २२. बैठका, आसनें. दंभ=गर्व. तेथील बिच्छाइतीचें सौंदर्य पाहून इंद्रभुवनास देखील मान खालीं घालावी लागली! ह्याचें श्रेय विराटराजाच्या व्यवस्थापकांना द्यावें कीं मुक्तेश्वराच्या प्रतिभेला द्यावें? २३. तेथील दरवळणाऱ्या सुगंधामुळें प्रत्यक्ष वसंत ऋतु देखील घमघमाटांत गुंग होऊन गेला—असा भाव. वसंत ऋतूंत झाडांस पालवी फुटते व फुलें फुलतात. त्यामुळें सुवास फार सुटतो—हें प्रसिद्धच आहे. 'वसंताला वेध लावणें'

पुरुषोत्तम, । पंचवोघांचा[1] संगम । क्षीरार्णवीं ज्यापरी. ॥ ४१ ॥ श्रीकृष्ण अक्षयसुखाचा निधी । पांचही मीनले[2] सुखसंवादीं । तें सुख अनुवादतां[3] शब्दीं । अवाच्य[4] जाण सर्वथा. ॥ ४२ ॥ अवलोकितां श्रीकृष्णमुख । अज्ञातवासाचें निरसिलें दुःख, । जेंवि उगवतांची अर्क । तम नासी ब्रह्मांडीं. ॥ ४३ ॥ द्रौपदी लागतां चरणीं । ब्रह्मानंद कोंदला मनीं । श्रीकृष्णें स्पर्शतांचि मूर्ध्नी[5] । देहभाव[6] विसरली. ॥ ४४ ॥ वरनोवरीये क्षालन[7] । सुमुहूर्तें हरिद्रालेपन । देवक[8]प्रतिष्ठाविधान । उभयमंडपीं संभ्रमें. ॥ ४५ ॥ चहूं वेदींचे ऋषी ब्राह्मण । श्रेष्ठ वसिष्ठासमान,[9] । उभयमंडपीं यजमान । श्रीकृष्णदेव समर्थ. ॥ ४६ ॥ फळें सेवंती[10] रुखवत, । वर्धावा[11] गेला विराटसुत,[12] । नोवरा आणिला मिरवत । लग्नमंडपा अभिमन्यु. ॥ ४७ ॥ पूजा मधुपर्क[13]विधान । दिव्य पीतांबरपरिधान, । रत्नाभरणें सुमनें[14] चंदन । कन्यादानीं आणिलीं[15]. ॥ ४८ ॥ वस्त्रें झांकोनियां हस्त[16] । मोल

---

ह्या शब्दसमूह मुक्तेश्वराच्या काव्यांत वारंवार आढळतो. (विराटपर्व, अध्याय १।९३, अध्याय ८।४० व ५८; तसेंच शुकरंभासंवाद, ओंवी ५७ पहा). असाच प्रयोग मैराळकवीच्या विराटपर्वांत आढळतोः—शाखा सुंदर परिकर । सुवासें वसंतासी वेध लावणार ॥ ( अध्याय ३ ओंवी १६ ). भीमाच्या हातच्या स्वयंपाकासंबंधी 'पांडवप्रतापां'त श्रीधरस्वामी देखील असेंच वर्णन करितातः—'लाळ घोंटिती देवगण । वसंत भुलोन जातसे. ॥ ( अध्याय ३२ ओंवी २४ ).

१. वोघ=ओघ, प्रवाह. 'पंच नद्यांचा' असा पाठभेद. २. मिळाले, दृढ झाले. ३. पुनः उच्चारितां. ४. वाचेनें न सांगतां येण्यासारखें. 'अनिर्वाच्य' असा अन्य पाठ. ५. मस्तकीं, मस्तकाला. ६. कृष्णरूपीं तद्रूप झाली. ७. स्नान. ८. देवतास्थापन. ९. 'श्रेष्ठ कनिष्ठा समान मान' असाही पाठ आहे. १०. सेवती=सीमान्तपूजन, लग्नापूर्वीचें नवरदेवाचें पूजन. ११. वर्धावा=वरधावा, नवऱ्या मुलास लग्नासाठीं घेऊन येण्याकरितां वाजत गाजत निघालेला मुलीचा भाऊ किंवा इतर मंडळी. १२. उत्तर. १३. विवाहसमयीं वर वधूच्या द्वारीं आला असतां पादप्रक्षालनादि करून मध, तूप व दहीं मिश्रित करून त्याला देतात आणि गंधवस्त्रादिकांनीं त्याची पूजा करितात. ह्या विधीला 'मधुपर्क' असें म्हणतात. ह्या संबंधीं मनुस्मृतींत पुढील वचन आहेः—राजर्त्विक्स्नातकगुरून्प्रियश्वशुरमातुलान् । अर्हयेन्मधुपर्केण परिसंवत्सरात्पुनः ॥ (अध्याय ३ श्लोक ११९). ह्याचा भावार्थः—राजा, ऋत्विज, स्नातक (वेदाध्ययन करून गुरुगृहाहून आलेला वेदाभ्यासी विद्यार्थी), गुरु, जांवई, सासरा आणि मामा हे सात घरीं आले असतां त्यांची मधुपर्कद्वारा पूजा करावी. एक वर्ष लोटल्यावर ते पुन्हा आले तर त्यांची मधुपर्क पूजा पुन्हा केली साहिजे. १४. पुष्पें. १५. 'अर्पिली' असें पाठांतर. १६. व्यापारी लोक, भाव ठरवितांना, हातांवर उपरणें किंवा कांहीं वस्त्र टाकून, परस्परांच्या हातांवर आंकडे लिहून गुप्तपणें भाव ठरवितात, ह्या प्रघातास उद्देशून हें वर्णन आहे.

नेमुनी[1] देती वस्तु । तेंवी अंतःपट[2] शोभितु । नांदीयुक्त[3] जवळिके. ॥ ४९ ॥
चतुर्विधा[4] मंगळाष्टकें । उभयेंबाहीं[5] गर्जती मुखें । 'ॐपुर्ण्या'[6] होतां येकें । प्रकृति
पुरुषा सुलग्नीं, ॥ ५० ॥ जेंवी रमेशीं[7] रमारमण, । पार्वतीसीं[8] त्रिनयन, । सा-
वित्रीसीं कमळासन[9] । तेंवी अभिमन्यू उत्तरे, ॥ ५१ ॥ लोपामुद्रेसीं अगस्ती ।
वसिष्ठासी अरुंधती । प्रद्युम्न आणी देवी रती । तेंवी अभिमन्यू उत्तरे, ॥ ५२॥
चंद्रमा आणी रोहिणी, । छायाभगवती देव तरणी,[10] । तेंवी अभिमन्यू उत्तरा
दोन्ही[11] । यथायोग्य शोभती. ॥ ५३ ॥ होमीं तोषविला हुताशन,[12] अभिषिं-
चनीं[13] गौरीरमण[14] । जयजयकारें अमरगण[15] । पुष्पांजळी वर्षती. ॥ ५४ ॥ जया
मंडपीं लक्ष्मीपती,[16] । ऋद्धि[17] सिद्धी[18] वोळगती । तेथील शोभा काय, किती? ।
वर्णू न शके शारदा.[19] ॥ ५५ ॥ हळदीउटणें येरे[20] दिवशीं । आमंत्रणें सोइरे
यांशीं । सवेंच ऋषी राजयांशी; । याचकाशीं बहुधनें.[21] ॥ ५६ ॥ कनकतारें[22]
एकपंक्ती । रत्नवाटिया ओपे[23] देती । हेमठाणवियांवरी[24] दीप्ती । रत्नदीप शो-

---

१. किंमत ठरवून. 'मोलें नेमुनी' असें पाठांतर. २. वधू व वर यांमधील अंतर्पट. ह्याला नांदीचा किंवा नंदीचा पासोडा ( किंवा शेला )–असेंही म्हणण्याचा प्रघात आहे. ३. नांदी= आनंद, मंगलाचरण. उपनयन–विवाहादि मंगलकार्याचे प्रसंगीं प्रारंभी पितरांना उद्देशून जो विधी करितात त्याला नांदीश्राद्ध–असें म्हणतात. 'नांदेंयुक्त जवनिका' असाही पाठ आहे. जवनिका= पडदा, कनात. मंडपाच्या मध्यभागीं कनात लावून पुरुष आणि स्त्रिया यांच्या बसण्याची व्यवस्था स्वतंत्र केली होती, असें दिसतें. ४. 'चतुर्विंशति' पाठांतर. ५. दोन्ही बाजूंस (वधूकडील बाजूस व वराकडील बाजूस). 'उभय भागी' असें पाठांतर. ६. एखाद्या मंगल संस्कारापूर्वी स्वस्तिवाचन नांवाचें कर्म केलें जातें त्यामध्यें संस्कारकर्त्या यजमानास ब्राह्मण 'ॐ पुण्याहं' असा आशीर्वाद देतात, पुण्याहवाचनाच्या म्हणण्यांत येणारे मंत्र. 'ॐ पुण्या होतां सुखें । प्रकृति पुरुषा सुलग्न' असाही पाठ आहे. ७. विष्णु. 'रमानाथ' असें पाठांतर. ८. शंकर. [श्वेतभानु=चंद्र, बृहद्भानु=अग्नि आणि भानु=सूर्य, हे शंकराचे तीन नेत्र होत. स्तुतिकुसुमांजली, स्तोत्र २ श्लोक ६]. 'उमाकांत' असें पाठांतर. ९. ब्रह्मदेव. 'कमळानाथ' असा अन्य पाठ. १०. सूर्य. ११. 'सुशोभित। कमळासन ज्यापरी' असाही पाठ आहे. १२. अग्नि. १३. 'अमृतें सिंचिला गौरीरमण' असाही पाठ आहे. १४. शिव. १५. देवगण, देवांचा समुदाय. १६. कृष्ण. १७. वृद्धिरूपिणी देवता. वोळगणें=अनुकूल असणें, प्राप्त होणें. १८. सिद्धिरूपिणी देवता. १९. सरस्वती. २०. दुसऱ्या. २१. 'बहुमानें' असें पाठांतर. २२. सुवर्णाचीं तारें. 'एकतारें' असें पाठांतर. 'एकजात, एकाच प्रकारची' असा अर्थ. २३. चकाकी. २४. सुवर्णाच्या समयांवर.

भती. ॥ ५७ ॥ सूक्ष्म ओदन[1] श्वेतवर्णी[2] । पहातां[3] निवती जिव्हा नयनीं, । चंद्र आणी वसंत दोन्ही । वर्णवासा[4] वेधले. ॥ ५८ ॥ जया रुचे जें आवडे । तेंचि तेणें सेविजे कोडें[5], । यालागीं पांच वरान्नें[6] गोडें । ओदनानिकटी वाढिलीं. ॥५९॥ सेवया, सरळीया[7], मालतिया, । गव्हले, बोटवे, कुसुमकळिया, । बीजाकृती आळलीया । क्षीरसाकरीं सुस्वाद[8]. ॥६०॥ कोरवडे, कथिकावडे, । दधीवडे, मधुवडे, । चिंचवडे, निंबवडे, । रायवडे, अरुवार[9]. ॥ ६१ ॥ घृतें पाचिल्यां[10] घारिया, । सुरस श्वेत गुळवरिया[11], । साखरमांडे, पूरिया, । क्षीरसारोळ्या[12] अरुवार. ॥ ६२ ॥ तिळवे लाडू सेवयांचे । भिल्लातकी[13] चारबीजांचे[14] । खसखसखोबरियाचे । फणसबीजांचे साजिरे. ॥ ६३ ॥ अक्रोड बदामफळबीजाचे । सुरस पद्मिणीकंदाचे[15] । आर्त पुरवाया जिव्हेचें । गणेश[16] जाला वऱ्हाडी. ॥६४॥ च-

---

१. पांढऱ्या शुभ्र बारीक तांदुळांचा भात. २. शुभ्रवर्णे. ३. नयनीं (डोळ्यांनीं) पाहतां जिव्हा निवती–असा अन्वय. तो भात पाहातांच जेवणारा तृप्त होत असे–असा भाव. 'निघती जिव्हा' असें पाठांतर. ४. भाताचा रंग (शुभ्र) व वास (घमघमाट) यांच्यावर चंद्र व वसंत हे लुब्ध झाले–असा भाव. ५. कौतुकानें. ६. पक्वान्नें. 'भाताशेजारी पांच प्रकारचीं वरणें वाढिलीं' असें श्री० ह. भ. प. **ल. रा. पां**गाकर लिहितात ( कविवर्य मुक्तेश्वर–चरित्र आणि काव्यविवेचन, पृष्ट ८३ ). पण पांच प्रकारचीं वरणें एकदम वाढण्याचा प्रघात नाहीं. 'पंच पक्वान्नी भोजन', असें म्हणण्याचा प्रघात आहे. तेव्हां वरान्न–म्हणजे पक्वान्न असा अर्थ समजणेंच इष्ट वाटतें. ७. 'सरवळे' असें पाठांतर. ८. 'क्षीरसागर सुस्वादें' असा अन्य पाठ. ९. हळुवार, हलके. १०. तळलेल्या. ११. गुरोळ्या. गुळवरी=गुरवळी, गुरळी. एक पक्वान्न, गुळाची पोळी, साखरपुरी. १२. 'क्षीर घारिया' असें पाठांतर. १३. बिब्यांतील बियांचे. १४. चारोळ्यांचे. 'चारु बीजांचे' असें पाठांतर. १५. कमळाच्या कांद्याचे. १६. गणेश (गण+ईश) किंवा गणपति (गण+पति) हा ॐकाररूप असून त्याची उपासना म्हणजे परब्रम्हाची उपासना होय, हें मत प्राचीन काळापासून सर्वमान्य आहे. म्हणून याला सर्व विद्या व कला यांचा अधिपति समजतात. तसेंच तो विघ्नहर्ता म्हणूनही प्रसिद्ध आहे. यामुळें कोणत्याहि देवतेचे उपासक सर्वांच्या आधीं त्याची पूजा करितात. 'गणानां त्वा गणपतिं' हें गणपतीचें सूक्त प्रसिद्धच आहे. महाभारतासारखा अवाढव्य ग्रंथ लिहिण्याच्या कामीं व्यासांनीं त्याचें साह्य मिळविलें होतें. पण मी मध्यें कोठें थांबणार नाहीं, अशी अट त्यानें घातली. उलट व्यासानींही अर्थ समजल्याशिवाय पुढें लिहूं नको, असें त्यास सांगितलें, व त्यास लिहिण्यास वेळ लागावा व आपणास ग्रंथाची रचना करण्यास सवड मिळावी म्हणून व्यासांनीं महाभारतांत अनेक कूट श्लोक घातले आहेत. (मागें अध्याय ६ ओवी ५९ वरील टीप पहा). अशा ह्या विघ्नहर्त्या, बुद्धिदात्या व कार्यकर्त्या गणपतीची खादाडपणाच्या बाबतींत प्रसिद्धी व्हावी, ही आश्चर्याची गोष्ट होय. त्याचीं निरनिराळीं

णकपिष्टवडियांचे । स्वाद घेऊनी जिव्हा नाचे । नारळ साखर खजुरीचे । शुभ्र-सोजीचे अरुवार. ॥ ६५ ॥ खाज्या, करंज्या, अनारसे, । फेणिया, घृतपूरिया, पयरसें[1], । लुचया[2], वडिया, बतासे, । शुद्धशर्करा निर्मळ. ॥६६॥ मुगवडिया, मुगधिरडीं, । भक्षितां[3] सकुमारता गोडी, । वेटण्या[4] भक्षितां आवडी । मुखपाल-टाकारणें. ॥ ६७ ॥ वाळेकर्पूरसुवासीं । उदक ओपिती हेमकलशीं, । भोजनीं[5] भागले तयांशी । वाळविंझणे[6] विंझिती[7]. ॥ ६८ ॥ सर्व कर्मीं ब्रह्मभावना । पूर्ण प्रतीती उपजे मना । तेंवी वाढिती वरी लवणा[8] । अपूर्णता[9] मग कैंची? ॥ ६९ ॥ घारगे, सांडगे, अमृतफळें[10], । अतिरस मनोहर रसें सकळें. । अधिकमासीं महि-मेआगळे । ते अपूप[11] वाढिले. ॥ ७० ॥ अरुवार सोजिच्या फेणिया, । नौबद[12]-चूर्णें घोळलियाँ[13], । सपीठ कानवले, पोळिया, । कर्दळीगर्भासारिख्याँ[14]. ॥ ७१ ॥ वांगीं, तोंडलीं, पडवळें, । दोडके, कारलीं, भोपळे, । कांकडी, कोहळे[15] कोवळे । गोड वाळकें परिपाकीं[16]. ॥७२॥ पत्रशाखा[17]-चक्रवर्ती[17] । चाकवत, अळुशाख, नी मेथी, । कडोचीं[18] कोमळें तळलीं घृतीं, । अती अरुवार काचरिया. ॥ ७२ ॥ बेलें[19], नेपती[20], आंवळे, । कांकडी, करवंदें, साळफळें, । भोकरें, मायणी[21], सेवगे, मुळे, ।

---

बारा नांवें आहेत:—सुमुख, एकदंत, कपिल, गजकर्णक, लंबोदर, विकट, विघ्ननाश, गणाधिप, धूम्रकेतु, गणाध्यक्ष, भालचंद्र व गजानन. या नांवांवरूनही त्याच्या खादाडपणासंबंधीं उलगडा होत नाहीं. प्रस्तुत प्रसंगीं गणेशाच्या जिव्हालौल्याच्या वर्णनाचा अतिरेक झालेला नाहीं. परंतु मुक्तेश्वरानें आपल्या सभापर्वांत राजसूययज्ञांतील भोजनाच्या प्रसंगीं (अध्याय ९ ओव्या ११४–११६) अप्रासंगिक विनोद करून गणपतीसंबधीं वाचकांस वाटणाऱ्या पूज्यबुद्धीस किंचित् वैगुण्य आणिलें आहे.

१. खिरी. पयरस=पायस, खीर. २. चोखण्याचे पदार्थ. ३. 'भर्जित सकुमार गाढीं' असाही पाठ आहे. ४. कोडबोळी. 'वेढण्या भक्षिजे' असें पाठांतर. ५. 'उष्मा होतसे तयांसी । वाळ–विंजणे जाणविती' असाही पाठ आहे. ६. वाळ्याचे पंखे. ७. वारा घालतात. ८. मीठ. ९. 'अपूर्ण तें पूर्ण करावया' असा अन्य पाठ. १०. अमृतफळ=मोदक. ११. अनारसे. अधिक महिन्यांत भिक्षुकाला अनरशांचें वाण देण्याचा प्रघात आहे. 'तें अपूपें वाढिलीं' असें पाठांतर. १२. खडेसाखरेच्या चूर्णानें. १३. 'कोंदलिया' असें पाठांतर. १४. केळीच्या गाभ्यासारख्या, अत्यंत शुभ्रवर्ण. १५. कोहळा—एक प्रकारचा भोपळा. याचे सांडगे करितात (संस्कृत—कुष्मांड). १६. शिजविण्यांत, रांधण्यांत. १७. पालेभाज्यांत मुख्य. १८. कारलीं, कारेतीं. १९. बेलफळें. २०. नेपती=एक फलवृक्ष. नेपतें=नेपतीचें फळ. २१. माइनमुळें.

कोंभ कोंवळे वंशांचे[1]. ॥ ७४ ॥ आंबे, आर्ले, निंबें सुरसें, । हळदी, कचोरिया[2] सुवासें, । सुरण, मिरें, पिप्पलीघोसें, । कुहरिया, आणि खरसिंगें. ॥ ७५ ॥ ऐसीं लोणचीं चाखतां[3] ओठीं । अरुची पळे बारावाटीं, । जैसे धनवंतरियाचे[4] दृष्टीं । रोग[5] पळती दशदिशा. ॥ ७६ ॥ तिळवेलाडू[6], सेवयालाडू, । चारोळिया, गोडंबियांचे लाडू, । खसखस-फणसबीजाचे लाडू, । अक्रोड-खर्जुरीबीजाचे. ॥ ७७ ॥ चणकपिष्टवडियाचे[7] । अरुवारपणें[8] जिव्हा नाचे, । घारगे-पोळिया-खांडवियांचे[9] । ग्रास घेतां पालटे[10]. ॥ ७८ ॥ नवनीत[11] साजूक सैंघस्तसें[12], । द्वय वाटिया उचंबळती घृतें, । एक शोधिली[13] नवनीतें, । एक थिजेली[14] सुवासें. ॥ ७९ ॥ दधीसारें[15], दुग्धसारें[16], । पय आटिलें तवक्षीरें[17], । परम भाग्याचे जेवणारे । जे जेविती[18] तये पंक्ती. ॥ ८० ॥ गाळूनि चंद्रकळेचा रसू, । माजी मेळविला सुवासू, । ते कथिकेचा[19] घेतां वासू । 'परतें' म्हणती अमृता[20]. ॥ ८१ ॥ समुद्रमंथनींचें अमृत । गोडी देऊनी फिकें करित, । तेथिंच्या उदका न लावी[21] हात । खारवणी[22] म्हणोनी. ॥ ८२ ॥ तेंवी[23] कामधेनूच्या तक्रें[24] । कथिका[25] सेविजे देवशक्रें, । अमृतातें म्हणती वक्रें ।, 'कळकटलें बहुकाळीं[26].' ॥८३॥ तक्रतिथिनी[27], आमळकी[28], ।

१. वेळूचे. २. कुहिऱ्या, कैऱ्या. (कैरीं=कोंवळा आंबा; कुयरी=अगदी कोंवळा फणस ). ३. 'चाखती बोटी' असा अन्य पाठ. ४. धन्वंतरी–हा समुद्रमथनानंतर त्यांतून निघालेला आयुर्वेदप्रवर्तक देव. ५. 'दोष पळती' असें पाठांतर. ६. वरील ओवी ६३ व ही ओवी यांत बरेंच साम्य आहे. ७. चण्याच्या पिठाच्या वड्यांचे फुगे. फुगा=कोणतीही फुगलेली वस्तु. फुग्या फेण्या म्हणून एक पक्वान्नही आहे. मागील ओवी ६५ पहा. ८. नाजुकपणानें, हळुवारपणानें. 'अनिवारपणें' असाही पाठ आहे. ९. खांडवी=पक्वान्न विशेष. हें तांदुळाच्या रव्याचें करितात. १०. जिभेला रुचिपालट होई. ११. लोणी. १२. लोणकढें, ताजें. १३. ऋणमुक्त केली (पूर्णपणें भरली). १४. तल्लीन झाली, वासामुळें निश्चळ झाली. ह्या वाटींत थिजलेलें साजूक तूप होतें–असा भावार्थ. १५. ताजें लोणी. १६. दुधाच्या सायी. १७. तवकील घालून 'शर्करें आळिवें आळिलीं क्षीरें' असाही पाठ आहे. १८. 'जे जेविले' असें पाठांतर. १९. कढीचा. अशा उत्कृष्ट कढीचा लाभ आपणास कसा होणार? २०. अमृताला सुद्धां 'हो पलिकडे' असें ही कढी सांगते! २१. 'न घालावा हात' असाही पाठ आहे. २२. खारट पाणी. २३. 'तेंचि' असें पाठांतर. २४. गाईच्या दुधाच्या ताकाची कढी अशी खुमासदार बनविलेली होती, कीं तीं इंद्र देवाला फार आवडली. 'तक्रं शक्रस्य दुर्लभं' ही म्हण प्रसिद्धच आहे. २५. 'कथिका सेवितां' असें पाठांतर. २६. अमृत हें कधींचें तरी ( फार जुनें ) कळकटलेलें आहे, असें कढ्या अमृताला म्हणूं लागल्या! कढ्या अमृताला रुचीच्या बाबतींत हिणवूं लागल्या! ह्या चमत्काराचें श्रेय विराटराजाच्या बल्लवाचार्यांना दिलें पाहिजे. 'बहुसाळ' अन्य पाठ. २७. ताकतई. २८. आमलक=आंवळा. आमलकी=आंवळकाठी.

ओदन साजिरी वरि निकी, । आमटी, मेथकुटें थोडकीं, । उपचार केले सु-[1]स्वादें. ॥८४॥ बेदरी,[2] कपित्थ,[3] आम्रचूर्ण, । अंबसोलसालचूर्ण, मिरे[4] यांचें पित्त-शमन[5] । दक्ष जन सेविती. ॥ ८५ ॥ ऐशा नानाविध कथिका । भिन्नभिन्न द्रोणीं[6] भरिल्या देखा, । ज्या कां आस्वादतां मुखा । ओदन[7] चाले द्विगुणें.[8] ॥ ८६ ॥ नाना शाकारसांचीं सारें । ओदनासंगीं अत्यंत मधुरें, । जें सेवितां कुपथ्य—वारें । कदाकाळीं बाधेना. ॥८७॥ सांडया, कुरवडिया, पापडे, । अळण[9] सांबारीं स्वादिष्ट गोडें । कोशिंबिरी, रायतीं, मिरेगुंडें,[10] । मेथकुटें[11] मघमघिती. ॥८८॥ कृष्ण भोक्ता जिये पंक्ती । भोजन करी परमआर्ती, । तया पंक्तीकाराचें[12] किती । भाग्य मुखें वर्णावें? ॥ ८९ ॥ आंबे रसाळ, सुरस केळें- । पिकोन उलली गंगाफळें,[13] । पेंडाळु,[14] रताळु गुळगुळे,[15] । कपित्थें[16] पक्कें मघमघिती. ॥ ९० ॥ ऐशिया फळांच्या शिकरणी । जेविल्या आली पूर्ण धणी,[17] । शाखांचेनी सुवासें गगनीं । वेधु[18] उपजवी निर्जरां.[19] ॥ ९१ ॥ फळमूळशाखा, पत्रशाखा, । कंदशाखा, पुष्पशाखा, । त्यांचा स्वाद सेवितां मुखा । शाकांभरी[20] स्वयें आली.[21] ॥ ९२ ॥ अरण्यशाकां-[22]

---

१. 'सुवासें' असें पाठांतर. २. बोर. ३. कवीठ. ४. मिऱ्यांचें. 'मरीचसार'(=मिऱ्यांचें सार) असें पाठांतर (संस्कृत—मरिच=मिरें). ५. पित्तशामक. ६. 'पात्री' असें पाठांतर. ७. भात, अन्न. ८. दुप्पट. 'द्विगुगुणित' असें पाठांतर. ९. चण्याचें पीठ पाण्यांत शिजवून मसाला घालून कालवणाचा पदार्थ करितात तें. 'कळण' असें पाठांतर. १०. 'गाजरें गोड' असें पाठांतर. ११. मेथकुटाचा उल्लेख पूर्वीं ओवी ८४ मध्यें झालेला आहे. १२. पंक्तिकार=पंक्तीला जेवणारा. १३. गंगाफळ=डाळिंब (?). १४. एक कंदविशेष. १५. गुळगुळे=गुळगुळित (?). १६. ओवी ८५. पहा. १७. तृप्ति. १८. आवड. 'जेवितां धाले अंतःकरणीं' असाही पाठ आहे. १९. देवांना. 'सुरवरां' असा पाठभेद. २०. देवतेचें नांव. एकदां देवांनीं आपल्या शत्रूंचा नाश व्हावा ह्या हेतूनें आदिमायेजवळ वर मागितला. तेव्हां देवीनें देवशत्रुदमनार्थ वेळोवेळीं अवतार घेण्याचें कबूल करून आपल्या निरनिराळ्या अवतारांचें वर्णनही केलें. ह्या अवतारांपैकीं 'शाकंभरी' हा एक होय. ह्या अवतारांत देवीनें सर्व प्राणिमात्राच्या पोषणार्थ आपल्या शरीरापासून शाकभाज्या उत्पन्न करण्याचें वचन दिलें होतें (सप्तशती, अध्याय ११ पहा). ह्या देवीच्या कुळधर्माला निरनिराळ्या साठ भाज्या करण्याचा प्रघात आहे. २१. जेवणारांना वाटलें, कीं ज्या अर्थीं स्वयंपाक इतका उत्तम झाला आहे. त्या अर्थीं तो शाकंभरी देवीच्या देखदेखीमुळेंच झाला असावा, असा भाव. २२. 'लवणशाखांचिया' असें पाठातर.

चिया श्रेणी । दध्योदनाच्या[1] सांगातिणी । दधितक्रांचिये मेळणी । ब्रह्मानंद भोक्तयां. ॥ ९३ ॥ विराटभार्येंची कुशळता । देखोनी चोज करिती वनिता,[2] । यादवपांडवांचिया कांता । म्हणती, 'धन्य सुजाणे[3] !' ॥९४॥ कृष्णपंक्ती जे जेविले जाणा । ते आंचवले[4] जन्ममरणा । कृष्णरंगीं रंगून वदना । श्रीकृष्णचि जाले मानसें. ॥ ९५ ॥ त्रयोदशगुणें[5] तांबूलें । वऱ्हाडी डवरिले[6] परिमळें,[7] । वस्त्राभरणीं मत्स्यपाळें । मेदिनीपाळ[8] पूजिले. ॥ ९६ ॥ मूळभारतीं वरिष्ठव्यासें । कथिलें सैंवर[9] एकमासें, । तें येथें बोलतां सुमानसें[10] । विकृति[11] श्रोते मानिती. ॥ ९७ ॥ म्हणोनी आच्छादिला ठावो,[12] । सकळांसहित कृष्णदेवो । जेवुनी धाला, तो अनुभवो । स्वानुभवी जाणती. ॥ ९८ ॥ कुंकुम केशर कस्तुरिका । चंदनचूर्ण उधळिला बुका, । गुंफोनी मालती-चंपककळिका[13] । माळा सूंदल्या[14] सर्वांतें. ॥ ९९ ॥ वाणपालटणें,[15] रुसणें प्रीती[16] । मंडपा आणोनी पूजणें, पुढती । वंशपात्रदान[17] विध्युक्ती । कन्या हातीं निरवणें.[18] ॥ १०० ॥ गृहप्रवेश, लक्ष्मीपूजन,[19] । पूजितां लक्ष्मी बोले वचन, । 'त्रयोदश वर्षें भरतां कृष्ण ।

---

१. दधि+ओदन=दहिंभाताच्या. २. स्त्रिया. ३. 'सुगरिणी' असें पाठांतर. ४. हात धुतले, ( पक्षी ) मुक्त झाले. श्लेषालंकार. ५. विड्याच्या अंगीं असणारे तेरा गुण:—कटु, तीक्ष्ण, उष्ण, मधुर, क्षार, कषाय, वातघ्न, कफघ्न, कृमिहर, दुर्गंधिनाशन, मुखभूषण, शुद्धिकरण व कामसंदीपन. 'तेरा गुणांचिया तांबुलें' असें पाठांतर. ६. सुवासानें भरले. ७. विराटराजानें. ८. पृथ्वीपति, विवाहसमारंभासाठीं आलेले राजे. ९. स्वयंवर. हा विवाहसमारंभ एक महिनाभर चालला होता, असें मुळांत सांगितलेलें नाहीं ( अध्याय ७२ पहा ). 'कथिलें स्वयंवर तैसें' असाही पाठ आहे. १०. चांगल्या मनानें, सद्धेतूनें. ११. तिटकारा, किळस; त्रास. 'विकृति श्रोतीं मानिजे' असाही पाठ आहे. १२. ठाव=शेवटची मर्यादा, सीमा. श्रोत्यांना किंवा वाचकांना कंटाळा येईल म्हणून पुढील वर्णनावर मी आच्छादन घालितों ( पडदा टाकितों ),—म्हणजे हें वर्णन आवरतें घेतों—असा भाव. १३. मालती ( चमेली ) व चांफा यांच्या कळ्या. १४. दिल्या. १५. परस्परांस अहेर करणें. वाण=नमुने, प्रकार ( लुगड्यांचे ). १६. प्रेमानें, केवळ कौतुक म्हणून. १७. लग्नांत वंशवृद्धीसाठीं वधूपक्षाकडून वरमातेस वंशपात्राचें ( झालीचें ) जें दान देतात तें. '°दानविधी भक्ती' असें पाठांतर. १८. हातीं देणें, स्वाधीन करणें. १९. वर आपल्या वधूला प्रथम आपल्या घरीं घेऊन येतो, त्यावेळीं त्या दांपत्याकडून जी लक्ष्मीची पूजा करवितात तो विधि.

घेउनी आला मज संगें.[1] ॥१०१॥ आतां येथेंचि करणें वस्ती, । सहसा[2] नें-[3]
वचें कोठें पुढती. । कौरवगृह टाकोनी सुमती । धर्मधामा[4] पातलें.' ॥ १०२ ॥
धेंडा[5] नाचवितां[6] कौतुकें । हांसोनी श्रीकृष्ण बोले मुखें, । 'कुरुक्षेत्रीं रणभूमिके ।
धेंडा पुढें नाचवूं.[7]' ॥ १०३ ॥ अर्जुन मुख्य करूनी पाहीं । चौघेही गौरविले
व्याही,[8] । बुडविले उचिताचे डोहीं । जेंवी मंदरा[9] समुद्रीं. ॥ १०४ ॥ विराट-
रायाच्या कामिनी,[10] । त्यांमाजी सुधेष्णा मुख्यें[11] राणी, । तिहीं[12] पूजिली याज्ञसेनी, ।
देवांगनीं[13] जेंवि गिरिजा.[14] ॥ १०५ ॥ अपार ओपिलीं[15] वस्त्राभरणें, । मागील
क्लेश विसरली[16] मनें, । जैसी जागृती येतां, नेणे । दुःख दरिद्र स्वप्नींचें. ॥१०६॥
तैसींचि[17] ओपिलीं सुभद्रेतें । सुहृदनृपांच्या स्त्रियांतें, । आणीक ऋषीअंगनांतें[18] ।
गौरविलें सुधेष्णें.[19] ॥ १०७ ॥ वेदपाठक, ज्योतिषी, गणक[20] । शास्त्री, पंडित, पु-
राणिक । गायक, नृत्यक,[21] परिहासक[22] । भांड,[23] कथक,[24] विनोदी, ॥१०८॥ भाट-
नागरीक मागध[25] । वैतालिक[26] नानाविध, । ते दानीं पावोनी परमानंद । दरिद्रातें[27]

---

१ आपल्याबरोबर. २. अविचारानें, अकस्मात्. ३. जाणार नाहीं. ४. धर्माच्या घराला. 'धर्माप्रती' असें पाठांतर. जेथें मूर्तिमंत धर्म आहे तेथें, असा भाव. ५. लग्नसमारंभामध्यें नवऱ्याला एकानें आणि नवरीला दुसऱ्यानें खांद्यावर घेऊन धिंगाणा नाच करण्याचा जो कित्येक स्थळीं देशाचार आहे तो. ६. 'नाचविला' असें पाठांतर. ७. धेंडा नाचविणें=धांगडधिंगा घालणें. धेंडा=दांडगा, मस्त. (पक्षीं) धेंड=बडें प्रस्थ, वजनदार माणूस. भीष्मद्रोणासारख्या बड्या प्रस्थांस नाचावयास लावूं, असा अर्थ. येथें 'धेंड' शब्दावर श्लेष आहे. ८. देणग्यांचे. ९. पूर्वी अमृताच्या प्राप्तीसाठी देवदैत्यांनीं मंदरगिरीचा मंथनदंड व वासुकी नागाची रज्जु करून क्षीरसागराचें मंथन केलें, अशी कथा आहे. त्या कथेवर येथें कविकटाक्ष आहे. (मुक्तेश्वरकृत आदिपर्व, अध्याय ४ पहा). १०. 'शत कामिनी' असाही पाठ आहे. ११. 'मुखरणी' असें पाठांतर. १२. तिनें. 'तेही' असें पाठांतर. १३. देवांगनांमध्यें. १४. पार्वती. १५. दिलीं. १६. द्रौपदी विसरली—असा भाव. १७. 'तैसेंचि पूजिलें सुभद्रेतें' असाही पाठ आहे. १८. 'ऋषी भगंगांतें' असाही पाठ आहे. १९. सुदेष्णेनें. २०. गणितज्ञ. २१. 'नर्तक' असें पाठांतर. २२. थट्टामस्करी करणारे. २३. नकला, तमाशा वगैरे करून चरितार्थ चालविणारे. २४. उत्तरहिंदुस्थानांतील गवयांची एक जात. हे लोक पायांत चाळ बांधून नाचतात. 'कथा विनोदी' असें पाठांतर. २५. स्तुतिपाठक. २६. प्रातःकाळीं स्तुतिपाठ म्हणून राजाला जागृत करणारा. २७. 'दरिद्र याचक विसरले' असाही पाठ आहे. दरिद्र=गरीबी, कंगालपणा.

विसरले. ॥ १०९ ॥ सात[1]सहस्र हेमाभरणी । वारू[2] ओपिले आंदणीं, । दानोदकें स्रवती श्रवणीं[3] । मत्त[4] करीं साजिरे. ॥ ११० ॥ पांचसहस्र मदोन्मत्त । आभरणें झुलीसहित । चारीसहस्र कनकरथ । अश्वयुक्त दीधले. ॥ १११ ॥ सहस्र दासी कुशळ कामीं[5] । धेनू, महिषी, उष्ट्र, वामीं[6] । वस्त्रीं, शस्त्रीं, रत्नहेमीं । पांडव प्रीती पूजिले[7]. ॥११२॥ जाहला अभिमन्युविवाहो, । हर्षे विराट महाबाहो. । अवलोकोनी सुहृत्समूहो । लोटांगण घातलें. ॥ ११३ ॥ वृषभ, धेनू आणि म्हैशी । सुवर्णरत्नांचिया राशी । निर्वेदुनी[8] पांडवांशीं । स्वल्प मानी विं[9]-राटु. ॥ ११४ ॥ ऐसा एक वर्षवरी[10] । सोहळा[11] विराटरायाचे घरीं, । श्रीकृष्णदेव सहपरिवारीं । पांडवसंगीं तोषला. ॥ ११५ ॥ संभ्रमें[12] अभिमन्यूचिया लग्ना । [13]अंगें पातला[13] यादवराणा[14], । हें ऐकोनी दुर्योधना । हृदयस्फोट[15] ओसरलें[15]. ॥११६॥ [16]म्हणे, 'श्रीकृष्ण आणि विराट । सोईरे जाले[17] वरिष्ठ, । पांडवांचें बळ उत्कट[18] ।

---

१. 'पांच सहस्र' असें पाठांतर. मुळांत 'विराटराजानें वायुतुल्य वेगाचे सात हजार घोडे व दोनशें उत्कृष्ट हत्ती आणि विपुल धन अभिमन्यूला दिलें' (अध्याय ७२ श्लोक ३६) असें आहे. मुक्तेश्वरानें देणग्यांची यादी आपल्या इच्छेप्रमाणें वाढविली आहे. २. घोडे. ३. 'धरणी' असें पाठांतर. ४. मदयुक्त हत्ती. मद=गंडस्थलांतून वाहणारा पाण्यासारखा स्राव. ५. कामकाज करण्यांत चतुर. ६. वामी=घोडी; तरुण हत्तीण. ७. 'पांडवांप्रती पूजिलें' असाही पाठ आहे. ८. अर्पून. 'विलोकोनियां' असें पाठांतर. ९. विराटराजानें आपल्या व्याह्यांना इतकें दिलें, तरी तें त्याला थोडेंच वाटलें. हा त्याचा मोठेपणा व 'श्रीकृष्णदेव ··· ··· तोषला' हा वरपक्षीय वऱ्हाडी मंडळीचा थोरपणा ! १०. मुक्तेश्वराच्या ह्या विधानासही मुळांत आधार नाहीं. (ओवी ९७ वरील टीप पहा). मैराळकृत विराटपर्वातही (अध्याय १५ ओवी ९३) 'तैसें एक संवत्सरीं । लग्नसोहळा विराटघरीं ॥' असा पाठ आहे. पण 'पांडवप्रताप'कार श्रीधरस्वामी 'चार दिवस जाहलें लग्न' असें सांगतात (अध्याय ३५ ओवी २२३), तेंच सत्य व सयुक्तिक वाटतें. पांडवांना स्वराज्य मिळवावयाचें असल्यामुळें ते इतके दिवस भोजनभाऊपणा करून राहिले असतील, असें वाटत नाहीं. ११. 'उत्साह विराटाचे घरीं' असा अन्य पाठ. १२. आदरानें; उल्हासानें. १३. स्वतः आला. १४. कृष्ण. १५. हृदयांत फुटणाऱ्या उकळ्या कमी झाल्या, आपणास लवकरच पांडवांचें राज्य मिळणार, असे त्याच्या मनांत उद्भवणारे कल्पनातरंग नाहींसे झाले—असा भाव. 'हृदयस्फोट होतसे' असा अन्य पाठ. १६. ह्याचा कर्ता—दुर्योधन. १७. 'जोडिले' असें पाठांतर. १८. उत्कट=जोरदार, मस्त. आगळें=उंची, वरचढ. फार मोठें बळ—असा अर्थ. पांडवांच्या सामर्थ्याची अतिशयितता दर्शविण्यासाठीं ही विशेषणांची जोडी मुक्तेश्वरानें योजिली असावी. 'उत्कृष्ट' असें पाठांतर.

आगळें कांहीं दिसतसे. ॥ ११७ ॥ तथापी भीष्म, कर्ण, द्रोण । यांचे दृष्टी तृणासमान, । हो कां यादवेंशीं कृष्ण । थैरों न शके संग्रामीं.' ॥ ११८ ॥ पांडव स्थापावे निजपदीं । ऐसी कृष्णाची बुद्धी । तया कार्याचिये सिद्धी । विराटनगरीं राहिला. ॥ ११९ ॥

---

## उपसंहार.

तेंची निरूपण पुढारें । 'उद्योगपर्वी' सविस्तारें ।
श्रवणें करिजे जें का चतुरें । व्यासदेव बोलिले. ॥ १२० ॥
शक्रविधीच्या मस्तकीं । ज्याची पादुका मिरवे निकी, ।
तो विश्वंभर गुरु पिनाकी । विष्णु आपण विश्वात्मा. ॥ १२१ ॥
तेणें प्रेरिला कवी किंकर । तदाज्ञेनें वदे मुक्तेश्वर, ।
परिसोत पुढारें करुणाकर । संत माहेर आमुचें. ॥ १२३ ॥
महाराष्ट्रकाव्याचिये पंक्ती । गुरुत्व गौरव इये ग्रंथीं ।
ऐसा विश्वंभर विश्वमूर्ती । वरद वदे सुवाचा. ॥ १२४ ॥

॥ इति श्रीविराटपर्वणि उत्तराभिमन्युविवाहो नाम अष्टमोऽध्यायः ॥

---

१. यादवांसह. २. टिकूं शकणार नाहीं, टिकाव धरणार नाहीं. थरणें=स्थिर होणें. ३. संपादण्याचा प्रयत्न, सिद्धता. 'संधी' असें पाठांतर. संधी=निमित्तानें, प्रसंगानें. ४. 'श्रवण कीजे' असा पाठभेद. ५. 'शक्रकवीच्या' असा अन्य पाठ. कवि=शुक्राचार्य, दैत्यगुरू. ६. ह्या ओवीच्या पुढें एका पोथींत पुढील ओवी आढळते:—विराटपर्व संपलें येथून । पुढें उद्योगपर्व रसाळ गहन । जन्मेजयासी म्हणे वैशंपायन । राया कथन अवधारी॥. ७. विश्वं भरति धारयतीति विश्वंभरः । म्हणजे सर्व ब्रह्मांडाचा भार वाहाणारा. ८. पिनाक=धनुष्य विशेष, तें धारण करणारा (शिव). ९ 'श्रीमूर्ति' असें पाठांतर.

# नवीन उपलब्ध झालेली कविता.

[ **सूचना**—धुळें येथील **श्रीसमर्थवाग्देवतामंदिरां**तील बाडें चाळीत असतां, त्यांत आम्हाला **मुक्तेश्वरकृत** कांहीं अप्रसिद्ध पद्यें आढळलीं. वस्तुतः त्यांचा समावेश 'स्फुट काव्यें' ह्या सदराखालीं व्हावयास पाहिजे. परंतु इ. स. १९०६ सालीं आम्ही संपादिलेल्या '**मुक्तेश्वरकृत स्फुट काव्यें**' (काव्यसंग्रह–ग्रंथमाला ५४) ह्या पुस्तकाची द्वितीयावृत्ति आणखी १५।२० वर्षें तरी निघण्याचा संभव नाहीं. म्हणून त्या पद्यांचा संग्रह त्याच्या विराटपर्वाबरोबर आम्ही करीत आहों. असें करणें विशेष प्रशस्त नाहीं, हें खरें, तथापि त्यांचा संग्रह करून तीं एकत्र करून ठेवावीं, ह्या हेतूनें केवळ निरुपाय म्हणून तीं पुढें देत आहों. ही योजना भावी संपादकांच्या उपयोगीं पडेल, अशी आशा आहे ].

## अभंग.

गौ[1]हत्या घडली ज्याला । आम्ही संत म्हणूं त्याला. ॥ १ ॥
नाहीं केलें मद्य[2]पान । वृथा त्याचें संतपण. ॥ २ ॥
इतुकें घडे जया ठायीं । मुक्तेश्वर तया पायीं. ॥ ३ ॥

## पद.

फुगडी फू गे! । मागें पुढें तूं गे! ।
चिदानंदीं रंगें बाई! साधूचेनि संगें ।
देहमदें फुगे त्याच्या तोंडावरी थू गे! ॥ ध्रुवपद. ॥
आपुली गे! मांडी बाई! उघडीतां लाज ।
अंतरींची ज्ञानकळा झांकणें हे वोजें[3] ।
वाद हा वेवाद सांडीं जाणिवेचा[4] माज ।
फुगडी घालितां तूज दाखवीन चोजें[5]. ॥ फुगडी० ॥ १ ॥
निंदेची वाहण बाळे! नको धरूं तोंडीं ।
आत्मसाधन बाळे! आतां खेळूं नको [6]रोडी ।
काम, क्रोध, लोभ यांचा समागम सांडीं ।
हरिनामीं हरिरंगीं घालीं फुगडी गे! ॥ फुगडी० ॥ २ ॥

---

१. इंद्रियदमन. २. ब्रह्मानंद. ३. चतुरता, कुशलता. ४. ज्ञानाचा अहंकार. ५. चमत्कार, नवल. ६. रोडी=रडी=खेळांत चिडणें, खोटें खेळणें.

मज तुज भार पाहें कासयाचा बाई! ।
लटिकें साचार आतां मानूं नको कांहीं ।
एका भावें भजें बाळे! गुरुचेचि पायीं ।
लीलाविश्वंभर[1] गुरु सदा गीत गाई. ॥ फुगडी० ॥ ३ ॥

## पद.

आपुली करिं सुटका । करिं सुटका ।
भवभ्रम अवघा लटिका ॥ आपुली० ॥ ध्रुवपद ॥
आधींच नरदेह फुटका ।
शाश्वत मानुं नको क्षणघटिका. ॥ आपुली० ॥ १ ॥
[2]गुरुचरणांबुज-घुटका ।
सेवुनि मनासि लावीं चटका. ॥ आपुली० ॥ २ ॥
करुनि मनाचा मुटका[3] ।
मुक्तेश्वर चुकवी यमझटका. ॥ आपुली० ॥ ३ ॥

## पद. (ओव्या[4])

गरुडारूढ मधूसूदन । हृदयीं धरिला आपण ।
कंठीं सर्पाभरण । नवल काय? ॥ १ ॥

---

१. मुक्तेश्वरानें आपल्या काव्यांत ठिकठिकाणीं जनकजननीनामवाचक अथवा गुरु–गुरुपत्नीनामवाचक 'लीला–विश्वंभर' असें पद योजिलें आहे. (मुक्तेश्वरकृत स्फुटकाव्यें–अधिक टीपा, पृष्ठ २५ पहा). ज्ञानेश्वरानेंही आपल्या पदांच्या व अभंगांच्या शेवटीं 'बाप रखुमादेवीवरू' असें भगवन्नामदर्शक अथवा जननीजनकनामवाचक पद योजिलें आहे. मुक्तेश्वरानें ह्या बाबतींत ज्ञानेश्वराचा कित्ता उचलिला असावा, असें दिसतें. २. गुरुचरणकमलरूपी गुटिका (औषधाची गोळी). ३. गोळा. मन एकाग्र करून–असा भाव. ४. "ह्या तीन ओव्या कोणत्या प्रकरणांतील आहेत, हें समजत नाहीं. मुक्तेश्वराचें 'वत्सलाहरण' नांवाचें एक खंडकाव्य असल्याचें रा० [रघुनाथ भास्कर] गोडबोले, [भारत वर्षीय अर्वाचीन ऐतिहासिक कोशाचे कर्ते] लिहितात. परंतु तें काव्य आमच्या पाहाण्यांत नाहीं. तेव्हां कदाचित् त्या काव्यांतील या ओंव्या असतील, अशी कल्पना धांवते." (कै० बाळकृष्ण अनंत भिडे यांचा मुक्तेश्वरावरील निबंध, पृष्ठ १७). हा निबंध इ. स. १९०५ मध्यें प्रसिद्ध झाला. तरी पण वरील ओव्या कोणत्या अप्रसिद्ध प्रकरणांतील आहेत, ह्याचा अद्याप शोध लागला नाहीं.

मस्तकीं चंद्र सुशीतल । त्याहि वरी गंगाजल ।
कंठीं धरिलें हळाहळ[1] । नवल काय? ॥ २ ॥
अहो! लीलाविश्वंभरा! । शंभो! शिवहरा! शंकरा! ।
तारिसी मुक्तेश्वरा । नवल काय? ॥ ३ ॥

## वरील पदाचा अन्य पाठ.[2]

पवित्र शीतल जीवनी । माथां मंदाकिनी ।
कंठीं धरिला वन्ही । नवल काय? ॥
गरुडारूढ मधुसूदन । हृदयीं वसे पूर्ण ।
कंठीं सर्पाभरण । नवल काय? ॥
सिंहावरी वोळंगत । अंकीं गिरिजा स्वस्थ ।
मारिला [3]कुंजर दैत्य । नवल काय? ॥
अहो! लीला-विश्वंभरा! । कृपामूर्ति जगदोद्धारा! ।
तारिसी मुक्तेश्वरा । नवल काय? ॥

---

१. विष. २. हा पाठ कै० बा. अ. भिडे यांच्या मुक्तेश्वरावरील निबंधाच्या इ. स. १९२६ त छापलेल्या आवृत्तीत आहे (पृष्ठें ४७-४८). ह्या पदांत शंकराचें वर्णन आहे. ३. तारकासुराच्या सेनेंतील एक नायक. तारकासुरास कार्तिकेयानें मारिलें.

# परिशिष्टें.

## १. विराटपर्वाची एक अप्रसिद्ध प्रतिकृति– मैराळकृत विराटपर्व.

मराठी भाषेंत गेल्या ३००।३५० वर्षांत अनेक मराठी कवींनीं महाभारतावर ग्रंथरचना केली आहे. आतांपर्यंत मोरोपंत, वामन, विष्णुदास नामा, श्रीधर, माधवस्वामी, नरहरी, नरहरीमोरेश्वर, रामचंद्रबोवा रामदासी, जिवाशिवा, मालोनाथ, कृष्णदास मुद्गल, गोपाळ, शुभानंत, चंद्रात्मज रुद्र, पद्मनाथ, शंभुदास भानु, गोविंद दीक्षित व मैराळ इत्यादि अनेक मराठीभाषेचे अभिमानी महाभारतरचनाकार म्हणून प्रसिद्ध आहेत. यांतील सर्वांनींच संपूर्ण महाभारत रचिलें असेल असें नाहीं. कदाचित् कांहींजणांनीं सर्व पर्वें रचिलीं असलीं, तरी तीं उपलब्ध नाहींत. मोरोपंताचें 'आर्याभारत' व श्रीधराचा 'पांडवप्रताप' हे महाभारतावरील ग्रंथ उपलब्ध असून ते प्रसिद्धही आहेत. याखेरीज मुक्तेश्वराचीं पहिलीं चार व सौप्तिकपर्व अशीं पांच व नरहरि मोरेश्वर व शुभानंत यांचीं कांहीं मधलींच पर्वें प्रसिद्ध आहेत. वामनपंडितांचें फक्त विराटपर्वच प्रसिद्ध आहे.

प्रस्तुत स्थळीं मैराळ नामक एका कवीची व त्याच्या अप्रसिद्ध विराटपर्वाची वाचकांस तोंडओळख करून द्यावयाची आहे.

१. मैराळासंबंधीं थोडी माहिती सदहू पर्वांत आढळते ती त्याच्याच शब्दांत पुढें देतों:—

आतां नमूं श्रीगुरुदत्ता । जो सुंदरावर कृपा करिता ।
त्या सुंदरें काशीनाथा । वरदहस्त माथां ठेविला. ॥
काशीनाथाचा सुत दिगंबर । त्याचे चरणरज मैराळ किंकर ।
वरदहस्त ठेविला मस्तकावर । तेणें रुक्मिणीवर तुष्टला. ॥

( अध्याय १ ओव्या ९–१० )

श्रीदत्त सुंदर । काशीनाथ दिगंबर ।
सकळीं प्रार्थिला रुक्मिणीवर । मैराळ किंकर सांभाळिला. ॥

दत्तात्रय जगद्गुरू । काशीनाथ सुंदर गुरू ।
दिगंबर मैराळ किंकरू । यांनीं रुक्मिणीवर प्रार्थिला. ॥
( अध्याय १५ ओव्या १०५ व १३४ )

म्हणजे मैराळची परंपरा अशी:—

**गुरुदत्त**
|
**सुंदरगुरु**
|
**काशीनाथ**
|
**दिगंबर**
|
**मैराळ**

ही वंशपरंपरा आहे, कीं शिष्यपरंपरा आहे, हें निश्चित ठरवितां येत नाहीं. परंतु 'मस्तकीं वरदहस्त ठेविला' ह्या उल्लेखावरुन ही शिष्यपरंपराच असावी, असें दिसतें.

२. ह्यानें विराटपर्वाचा समाप्तिकाळ दिला आहे:—

शके सतराशें पांच अवधारीं । क्रोधी नाम संवत्सरीं ।
आषाढ मासामाझारी । ग्रंथ रामक्षेत्रीं संपला. ॥
आंबाळियाचा महिमा पूर्ण । अष्ट तीर्थ येती करून ।
पाहाती सीता, राम, लक्ष्मण । धर्मेश्वरासी वरदान दीधलें. ॥
( अध्याय १५ ओव्या ११४–११५ )

---

१. रामक्षेत्र=रामटेक ह्याची तीर्थस्थान म्हणून दीड हजार वर्षांपासून प्रसिद्धी आहे. हें गांव नागपुरच्या उत्तरेस सुमारें ३० मैलांवर वसलें आहे. ह्या गांवाला लागूनच असलेल्या टेकटीवर श्रीरामचंद्राचें पुरातन देवालय असल्यामुळें त्याचें 'रामटेक' हें नांव पडलें आहे. गांवांत व टेकटीवर अनेक तीर्थें व देवालयें आहेत. कार्तिक महिन्यांत येथें मोठी यात्रा भरते. २. हीं आठ तीर्थें कोणतीं हें निश्चित करणें कठिण आहे, कारण तेथें शंखतीर्थ, अग्नितीर्थ, अंबतीर्थ, वरुणतीर्थ, शुक्रतीर्थ, नृसिंहतीर्थ, चक्रतीर्थ, धनुस्तीर्थ, पितृतीर्थ ( गायखुरी ), रामतीर्थ ( रामतळें ), चक्रतीर्थ इत्यादि अनेक तीर्थस्थानें आहेत. अंबाळें नांवाचा तलाव हें मुख्य तीर्थ होय.

म्हणजे भैराळानें शके १७०५ ( इ. स. १७८३ ) मध्यें विराटपर्व पूर्ण केलें. यावरून हा कवि मोरोपंताचा समकालीन ( जन्म इ. स. १७२९ व मृत्यु इ. स. १७९४ ) होता, हें उघड आहे. तसेंच त्यानें रामक्षेत्रीं म्हणजे नागपुराजवळील रामटेक ह्या प्रसिद्ध क्षेत्रांत हें पर्व लिहून पूर्ण केलें, हें अंबाळें नांवाचा तलाव, सीता, राम व लक्ष्मण ह्यांच्या उल्लेखांवरून सिद्ध होतें.

३. भैराळानें रामटेक येथें विराटपर्व रचिलें हें खरें, तथापि त्यानें जरंड्याच्या मारुतीचा उल्लेख केला आहे आणि त्यानें धौम्यऋषीस कृष्णानदीच्या कांठीं अनुष्ठान करावयास बसविलें असून पांडवांस कृष्णेंत स्नान करावयास लाविलें आहे:—

स्वर्गासि गेला विजयरथ । पांडव प्रवेशले पर्वतांत ।
जरांडियापर्वतीं अंजनीसुत । संवाद करिती बंधूंसीं. ॥ ( अध्याय १२।१८ )

तसेंच—

ऐसा संकेत सांगुन । धौम्य गेला अनुष्ठानालागुन ।
कृष्णातीरीं अर्ध योजन । सिद्धेश्वर स्थापुनी बैसला. ॥ ( अ० १।२१ )
निशीमाजी पर्वतीं जाऊन । सेवे-शुश्रूषें तोषवी पांडुनंदन ।
उदयासी येतां सहस्रकिरण । कृष्णेंत स्नान सारिती. ॥ ( अ० १।७४ )
कृष्णातीरीं जाऊन । प्रातःकाळीं केलें स्नान ।
अंतरनिष्ठेकरून । श्रीकृष्णस्मरण करितसे. ॥ ( अ० ५।६५ )

यावरून त्याला साताऱ्याच्या आसपासच्या प्रदेशाविषयीं बरीच माहिती असून त्या प्रदेशाविषयीं म्हणजे श्रीसमर्थ रामदासांच्या आनंदवनभुवनाविषयीं आपुलकीची भावना त्याच्या मनांत वसत असावी, असें दिसतें.

४. ह्या पर्वाचे अध्याय १५ असून ओवीसंख्या २००९ आहे. निरनिराळ्या अध्यायांत कोणकोणते प्रसंग वर्णिले आहेत ते पहा:—

प्रथमोध्यायीं प्रकरण । विराटनगरीं प्रवेशले पांडुनंदन ।
ब्यायसीं वोव्याये अधिनिरोपण । प्रसंग प्रकरण जाहलें. ॥
द्वितीयोध्यायीं प्रकरण । परीक्षा विराटासी दाखवून ।
एकशत पंचेचाळीस नेमून । ओव्या संपूर्ण लिहील्या. ॥
तृतीयोध्यायीं प्रकरणें । जीमूत मारिला भीमसेनें ।
एकशत अडसष्ट जालें लेखन । गणती पूर्ण जाहली. ॥

चतुर्थोध्यायीं कथन । कीचकद्रौपदीचीं संवाद–भाषणें ।
पुढें जाईल भीमसेन । शायशीं ओव्या गणन जाहलें. ॥
पंचमोध्यायीं कथन । कीचक पावला प्राणहनन ।
पुढें कथेचें अनुसंधान । [ एकाहात्तर ] ओव्या गणन जाहलें. ॥
षष्टमोध्यायीं कथन । कीचकबंधू पावले निधन ।
विजय पावला भीमसेन । ग्रंथकथन हेंचि जाहलें. ॥
सप्तमोध्यायीं प्रकरण । द्वारकेंत होता रेवतीरमण ।
अभिमन्या निघाला सुभद्रा घेऊन । हें कथन जाहलें. ॥
अष्टमोध्यायीं कथन । सुशर्मा त्रिगर्त आणिला धरोन ।
भीमें नकुळें प्रताप करोन । विराट सोडवून आणिला. ॥
नवमोध्यायीं कथन । जालें दक्षिणगोग्रहण ।
बंधूसहित दुर्योधन । वळलीं गो...... ॥
दशमोध्यायीं कथन । उत्तरा पार्थाचीं जालीं संवादसंभाषणें ।
गेला अस्त्रें आणावयालागुन । हेंचि कथन जाहलें. ॥
एकादशोध्यायीं कथन । उत्तरें केलें गोग्रहण ।
दावून विजयकल्याण । पार्थगुरूच्या प्रसादें. ॥
द्वादशोध्यायीं कथन । पराभविला दुर्योधन ।
उरुणावतीचें वर्तमान । ब्रह्मनंदन सांगत. ॥
त्रयोदशाध्यायीं कथन । उरुणावतीं पावले जयकल्याण ।
श्रीकृष्ण पावला द्वारकापट्टन । हेंच कथन जाहलें. ॥
चतुर्दशोध्यायीं कथन । विराटें पाहिला श्रीकृष्ण भगवान ।
येउनी भेटले पंडुनंदन । आनंदघन वोळला. ॥
पंचदशोध्यायीं कथन । अभिमन्याचें जाहलें लग्न ।
मत्स्यपाळें दिधलें आंदण । ग्रंथकथन जाहलें. ॥
अध्यायांची गणती जाली । दोनसहस्त्र नव्याण्णव नेमिली ।
.................... । वाक्पुष्पें समर्पिलीं पांडुरंगा. ॥

( अध्याय १५ ओव्या १७–३२ )

ह्या ओंव्या उतरून घेण्याचा हेतु त्यांच्या योगानें मेराळानें आपल्या ग्रंथाची मांडणी कशी केली आहे, तें वाचकांस कळावें, हा होय.

ह्या पर्वाच्या ७ व्या व ८ व्या अध्यायांत 'वत्सलाहरण' हें कथानक आहे व १३ व्या अध्यायांत यौवनाश्वराजाशीं झालेल्या भीमार्जुनांच्या युद्धाचें वर्णन आहे. पण हे दोन्ही प्रसंग मूळ व्यासकृत विराटपर्वांत नाहींत. यौवनाश्व हा

हस्तिनापुराच्या पूर्वभागीं असलेल्या भद्रावतीनगरीचा राजा होता. वत्सला ही बळिरामाची कन्या. ती अभिमन्यूस द्यावयाची असें ठरलें असतां पांडवांस अज्ञातवासांत राहावें लागल्यामुळें व ते विगतवैभव झाल्यामुळें बळिरामानें ती दुर्योधनपुत्र लक्ष्मण यास द्यावी असें ठरविलें व त्यामुळें घडून आलेल्या घटना वगैरे चमत्कृतिजनक प्रसंगाचें वर्णन, आम्ही लहानपणीं हरिदासांच्या कीर्तनांत ऐकिलें होतें. हीं दोन्ही कथानकें व्यासशिष्य जैमिनीकृत अश्वमेधांत असतील असें पुढील उल्लेखावरून दिसतें:—

भारतकथा विराटपर्वणि। शेष होता पाताळभुवनीं।
त्यानें कथा ऐकिली पद्मपुराणीं। ऋषी जैमिनी बोलिला. ॥ ( अध्याय ८।५ )

दुसरी गोष्ट, नारद व व्यास हे मधून मधून पांडव, विराट, कौरव व कृष्ण यांस भेटत असत व त्यांच्या मार्फत एकमेकांस निरोप पाठविले जात असत, असें मैराळानें वर्णिलें आहे. पण त्यासही व्यासरचित भारतांत आधार नाहीं. मैराळानें आपलें विराटपर्व रचितांना एकट्या व्यासरचित भारताचा आधार घेतलेला नसून रचनासौंदर्यासाठीं व तत्कालीन प्रसंगांच्या पूर्ततेसाठीं जैमिनीकृत भारत व पद्मपुराणादि ग्रंथांचा त्यानें उपयोग केला आहे, हें त्यास भूषणावह आहे.

५. मैराळानें विराटपर्वाच्या शेवटीं पुढील संतांस भक्तिभावानें नमन केलें आहे:—

एकनाथ जनार्दन। तुका नामदेव नारायण।
निवृत्ति ज्ञानदेव सोपान। मुक्ताबाई माया प्रसिद्ध. ॥
माणकोजी बोधला रामदास। बस्वलिंग माळी सावत्यास।
राजाई गोणाई जनाबाई रोहिदास। लवली (?) कूर्मदास प्रसिद्ध. ॥
राका बांका गोरा कुंभार। बाळक तुडवोनी केलें चूर।
विषययोगें तोडिले कर। साह्य रुक्मिणीवर जाहला. ॥

( अध्याय १५ ओव्या १०९–११ )

---

१. जैमिनी हा कृष्णद्वैपायन व्यासाचा सामशाखाध्यायी शिष्य. यानेंही एक भारतग्रंथ रचिला होता, परंतु तो चांगला प्रौढ नव्हता, म्हणून व्यासानें अश्वमेधाशिवाय बाकीचा सर्व बुडविला, अशी समजूत आहे.

याखेरीज ठिकठिकाणीं व्यास, मुक्तेश्वर व श्रीधर ('पांडवप्रताप'कार) यांचाही त्यानें उल्लेख केला आहे. त्यांतही मुक्तेश्वराचा उल्लेख विशेष भक्तिपूर्वक केला आहे. इतकेंच नाहीं, तर त्यानें मुक्तेश्वराच्या ओंव्यांचा अगदीं सढळ हातानें व निःसंकोच मनानें आपल्या ग्रंथांत समावेश करून घेतला आहे. साधारणतः मुक्तेश्वराच्या ओंव्या प्रसाद म्हणून त्यानें कोठकोठें ग्रहण केल्या आहेत, हें एखाद्या चौकस वाचकास शोधावयाचें असल्यास त्यास पुढें निर्देश केलेल्या स्थळांचा उपयोग होईल:—

| मुक्तेश्वर अध्याय | मैराळ अध्याय |
|---|---|
| १ | २ |
| २ | ३ |
| ३ | ४ |
| ४ | ६ |
| ५ | ७ व ९ |
| ६ | १० व ११ |
| ७ | १२ |
| ८ | १४ व १५ |

मुक्तेश्वराच्या पहिल्या व आठव्या अध्यायांतील प्रत्येकीं सुमारें १०० ओंव्या मैराळानें आपल्या विराटपर्वाचा अध्याय २ व अध्याय १४।१५ यांत सन्निविष्ट करून घेतल्या आहेत. इतर ठिकाणीं बेताबातानें घेतल्या आहेत. मैराळानें आपल्या विराटपर्वाची ग्रंथसंख्या २००९ सांगितली आहे ( मागें परिच्छेद ४ पहा ). त्यांतील सुमारें ५०० ओंव्या मुक्तेश्वराच्या असाव्या. पण ही गोष्ट तो लपवून ठेवीत नाहीं. तो म्हणतो:—

> इति श्रीविराटपर्वणि । संस्कृत वदला व्यासमुनी ।
> मुक्तेश्वरें अष्टमप्रसंगालागोनी । प्राकृत चतुर्दश प्रसंग विस्तारोनी ठेविला.॥
>
> ( अध्याय १४ ओवी १११ )

यावरून मुक्तेश्वरानेंच आपल्या आठव्या अध्यायाच्या समावेशानें माझ्या चौदाव्या अध्यायाचा विस्तार केला. पण तो माझा अध्याय 'प्राकृत' म्हणजे अगदीं सामान्य दर्जाचा आहे, मुक्तेश्वरासारखा प्रौढ नाहीं, असा त्याच्या म्हणण्याचा भाव दिसतो.

मुक्तेश्वराच्या ज्या प्रसंगांच्या ओंव्या मैराळास उत्कृष्ट वाटल्या व ज्या आपणास तशा रचतां येणार नाहींत असें त्यास वाटलें, ते प्रसंग ज्यास्त उठावदार व मनोरंजक करण्यासाठीं त्या त्यानें स्वीकारिल्या आहेत. अशा रीतीनें दुसऱ्याच्या काव्यकृतीचा आपल्या ग्रंथांत समावेश केल्याचीं उदाहरणें पूर्वींही घडलेलीं आहेत. कृष्णदयार्णवांनीं श्रीमद्भागवताच्या दशमस्कंधावर अत्यंत विस्तृत अशी ओवीबद्ध टीका रचिली आहे. विस्ताराच्या मानानें ह्या ग्रंथास मराठींत अग्रपूजेचा मान मिळेल. असें असतांही कृष्णदयार्णवांनीं श्रीएकनाथकृत 'रुक्मिणीस्वयंवर' आपल्या 'हरिवरदा' नामक ग्रंथांत उद्धृत केलें आहे. असें करण्याचें कारण काय ? तर एकनाथांनीं लिहिलेलें 'रुक्मिणीस्वयंवर' फार उत्तम आहे व तसें आपणास लिहितां येणार नाहीं, हें होय.

अशा प्रकारचें दुसरें उदाहरण सिंदूरगिरिमाहात्म्य ह्या ग्रंथांत आढळतें. हा रामटेक क्षेत्राविषयीं माहिती देणारा ग्रंथ संस्कृतांत रामानंदानें लिहिला. त्यांत त्यानें सदर्हू 'माहात्म्य' पद्मपुराणाच्या कौमारखंडाच्या आधारें लिहिलें, असें म्हटलें आहे. "पण त्यांतील शंबूकवधाविषयींचा भाग वाल्मीकिरामायणांतून जशाचा तसा घेतलेला दिसतो." ( रा. ब. सरदेसाई स्मारक ग्रंथ, पृष्ठ १२३ )

तसेंच मोरोपंतांनीं आपल्या 'संस्कृत मंत्ररामायणां'त वाल्मीकिरामायणांतील कित्येक श्लोकार्धे व सुंदर शब्दसमुच्चय ग्रथित केले आहेत, हें पंतभक्तांस माहीतच आहे.

पूर्वींच्या काळीं ग्रंथकार ग्रंथ लिही ते केवळ परोपकारबुद्धीनें लिही. आपण लिहिलेला ग्रंथ ही आपली स्वतःची मालमत्ता आहे, असें तो समजत नसे. आपल्या हातून कांहीं ईशसेवा घडावी व कांहीं ज्ञानप्रसार व्हावा, ह्या हेतूनें तो ग्रंथ लिही. यामुळें त्यास स्वार्थ आणि परमार्थ हीं दोन्ही साधत. ज्ञानप्रसार व नीतिमार्गदर्शन ह्या हेतूंच्या सिद्ध्यर्थ आपल्या ग्रंथांचा कोणी कसाही उपयोग केला, तरी ग्रंथकर्त्यास त्याबद्दल विषाद वाटत नसे. सद्यःकालीन ग्रंथकारांसारखी मनोवृत्ति तत्कालीन ग्रंथकारांची नव्हती, हे त्यांचे तत्कालीन समाजावर मोठे उपकार आहेत. अशी उच्च मनोवृत्ति व परोपकारदृष्टी त्यांची नसती,

तर त्या काळांत छापण्याची सोय नसल्यामुळें, श्रोते किंवा वाचक यांना निरनिराळ्या ग्रंथांचा आस्वाद घेतां आला नसता, हें स्पष्टच आहे.

६. मैराळासंबंधीं चरित्रविषयक कांहीं माहिती उपलब्ध नाहीं. परंतु मोरोपंतांचे मित्र व ऋणानुबंधी सत्पुरुष विठोबादादा चातुर्मासे यांचे चिरंजीव मैराळबोवा तेच हे विराटपर्वकर्ते मैराळ असावे, असें वाटतें. मैराळबोवा इ. स. १८०४ ( शके १७२६ ) मध्यें मरण पावले. तेव्हां कालदृष्ट्या तरी असा तर्क करण्यांत कांहीं विसंगति दिसत नाहीं. शिवाय विठोबादादा हे विठोबाचे भक्त असून ते दरसाल चतुर्मासांत पंढरपुरासच जाऊन राहात असत. त्यांचे पुत्र मैराळबोवा हेही विठ्ठलभक्त होते आणि विराटपर्वकर्ते मैराळ हे आपलें कुलदैवत 'विठ्ठल' असल्याचें सांगतातः—

अनेन प्रीयतां देवो भगवान् रुक्मिणीपते ।
श्रीमत्पांडुरंगःसर्वेषामस्माकं कुलदैवतम्. ॥ ( अ० ८।१ )
अनेन प्रीयतां देवो भगवान् रुक्मिणीपते ।
श्रीमद्विठ्ठलः पूर्वेषामस्माकं कुलदैवतम्. ॥ ( अ० ९।१ )

तेव्हां ह्या दोन निराळ्या व्यक्ति नसून ती एकच असावी, असें म्हटल्यास तेंही चालण्यासारखें आहे. परंतु मैराळबोवा पंतांस 'तीर्थरूप महाराज मोरोपंतबाबा अपत्यें मैराळानें' असा मायना लिहीत, अर्थात् ते वयानें लहान असून पंतांचा अधिकार केवढा मोठा आहे, हें त्यांस माहीत होतें. शिवाय ते पंतांस गुरुस्थानीं मानीत व कीर्तनप्रसंगीं पंतांच्या आर्यांवरच त्यांचा सारा भर असे. असें असूनही मैराळानें आपल्या ग्रंथांत पंतांचा इतर महनीय संतांबरोबर उल्लेख केला नाहीं. ( परिच्छेद ५ पहा ). यावरून आमचा तर्क चुकीचा असेल, असेंही वाटतें. कदाचित् पूर्वकालीन व्यक्तीविषयीं जो आदर आपणास वाटतो तसा तो आपल्या समकालिनांविषयीं वाटत नाहीं, हेंही पंतांचा उल्लेख न करण्याचें कारण असणें संभवनीय आहे.

मैराळ हें व्यक्तीचें नांव आहे कीं कुलाचें नांव आहे, अशी एक शंका उत्पन्न होते. ह्या पर्वांत सर्व ठिकाणीं ग्रंथकारानें आपल्याविषयीं जे उल्लेख केले आहेत, त्यांवरून तें व्यक्तीचें नांव असावें, असें दिसतें. आपल्या मराठी कवींची आडनांव देण्याची वहिवाट दिसून येत नाहीं. ते बहुतकरून आपलें

नांव, बापाचें नांव, स्वतःचें गोत्र, मोक्षगुरूचें नांव इतकीच माहिती नमूद करिता. क्वचित् कोणीं आडनांव दिलें, तरी आपलें स्वतःचें नांव देतातच. ह्या नियमास मैराळ हा एक अपवाद होय, असें समजण्यास कांहीं सबळ कारण असेल, असें वाटत नाहीं. तथापि 'मैराळ' हें एक आडनांवही आहे, हेंही आपण विसरतां कामा नये. अर्थात् ही शंका 'मैराळ' विषयक संशोधनाच्या कामीं मार्गदर्शक व्हावी, म्हणून ती आम्ही येथें नमूद करून ठेवीत आहों.

७. मैराळाचें विराटपर्व उपलब्ध झालें आहे. परंतु त्याच्या पूर्वींचीं व पुढचीं पर्वें उपलब्ध नाहींत. तो सांगतोः—

> **विराटपर्व** संपलें येथुनी । पुढें **उद्योगपर्वा**ची मांडणी ।
> मोठी सांपडली पर्वणी । भाविकां उन्मनी येतसे. ॥
> ( अध्याय १५ ओवी ११३ )

यावरून उद्योगपर्व रचण्याचा त्याचा विचार होता, हें दिसून येतें. तसेंच

> **आदिपर्वा**पासून । **सभापर्व** रसाळ गहन ।
> **वनपर्व** करितां श्रवण । पातक दहन होतसे. ॥
> चतुर्थ **विराटपर्व** सुरस । भाविकां सांपडला दिव्य रस ।
> जें बोलिला श्रीव्यास । नौका जनास ठेविली. ॥
> ( अध्याय १५ ओव्या १३६-१३७ )

ह्या उल्लेखांवरून मैराळानें आदिपर्व, सभापर्व व वनपर्व हीं रचिलीं होतीं, असा तर्क केल्यास तो चुकीचा होईल, असें वाटत नाहीं.

ह्या पर्वांशिवाय आणखी 'रामटेक—माहात्म्य' नांवाचा एक ओवीबद्ध ग्रंथ मैराळानें रचिला आहे, असें कळतें. पण तो अद्याप उपलब्ध झाला नाहीं.

८. मैराळाची काव्यरचना साधी असून त्या कामीं तो जितका घटलेला असावा तितका तो नाहीं. त्याची भाषा सोपी असून संस्कृत शब्दांचा भरणा बेताचाच आहे. त्यानें शब्दालंकार व अर्थालंकार यांनीं कवितासुंदरीस नटविण्याचा प्रयत्न फारसा केलेला आढळत नाहीं, पण वर्णनशैली चांगली असून कांहीं ठिकाणचीं वर्णनें मोठीं सुबोध, स्वाभाविक व मनास चटका लावणारीं आहेत.

९. मैराळाचा लेखक गंगाधर नांवाचा ब्राह्मण होता. त्यानें हा ग्रंथ लिहून ठेविला नसता तर तो आपणास उपलब्ध झाला नसता. कदाचित् आतांपर्यंत तो नष्टही झाला असता. तेव्हां ह्या लेखनकार्याबद्दल आपण गंगाधराविषयीं सदैव कृतज्ञ असलें पाहिजे. त्याच्या विषयीं आणखी कांहीं माहिती उपलब्ध नाहीं. त्यानें आपल्यासंबंधीं उल्लेख केला आहे तो—

ग्रंथ हस्तें लिहोन । गंगाधर नामें ब्राह्मण ।
वास्तव्य रामक्षेत्र पूर्ण । मैराळचरण वंदिले. ॥ ( अध्याय १५।१४२ )

ह्याखेरीज अध्याय ७ व ९ यांच्या शेवटीं एक एक ओंवी रचून त्यानें स्वनामोल्लेख केला आहे. पण तेथें देखील त्यानें यापेक्षां ज्यास्त माहिती दिलेली नाहीं.

१०. मैराळानें संस्कृत न जाणणाऱ्या जनतेसाठीं महाभारतांतील कथारत्नें मराठीभाषेच्या कोंदणांत बसवून आपल्यापुढें मांडिलीं. पण आपण त्याच्या श्रमाचें काय चीज केलें ? हा विचार मनांत येतांच मनास मोठा विषाद वाटतो. त्यानें निष्कामबुद्धीनें ही ग्रंथरचना केली व ती लोकांनीं वाचावी अशी त्याची अपेक्षा असणें साहाजिक आहे. तेव्हां ती त्याची अपेक्षा सफळ होवो, अशी परमेश्वरास प्रार्थना आहे. ग्रंथाचें संरक्षण, लेखन, श्रवण, वाचन, प्रकाशन( प्रस्तुत काळीं ग्रंथसंरक्षण करण्याचा हाच एक खात्रीचा व सोपा उपाय आहे ), इत्यादि जो कोणी करील त्यास मैराळानें दिलेल्या आश्वासनाचा प्रत्यय आल्याशिवाय राहाणार नाहीं:—

पांडव पावले विजयकल्याण । तैसेंच होईल श्रोतयांलागुन ।
ग्रंथकथा करितां श्रवण । तेहि दुःखदरिद्रापासून मुक्त होती. ॥
(अध्याय १२ ओवी १७३ )

या पर्वाचें पठन । करितां भाविक जन ।
त्याचे घरीं रुक्मिणीरमण । वस्ती करोन राहील. ॥
या ग्रंथाचा संग्रह करील कोण्ही । त्यासी रक्षी चक्रपाणी ।
मुक्त करी भवभयापासुनी । वैकुंठभुवनीं पावती. ॥
( अध्याय १५ ओव्या १३३ व १४१ )

तथास्तु !

## २. 'वत्सलाहरणाख्याना'चा कर्ता कोण?

कै० रघुनाथ भास्कर गोडबोले ह्या संशोधक व चिकित्सक बुद्धीच्या गृहस्थांनीं "मुक्तेश्वरानें 'वत्सलाहरण' नांवाचें प्रकरण लिहिलें आहे" असा उल्लेख केला आहे. परंतु तें प्रकरण अद्याप उपलब्ध झालें नाहीं. कै० गोडबोले हे अव्वल इंग्रजींतील जाड्या विद्वानांपैकीं एक होते. त्यांनीं सुमारें ७०। ७५ वर्षांपूर्वी 'भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोश', 'भरतखंडाचा अर्वाचीन कोश,' 'मराठी भाषेचा नवीन कोश' इत्यादि महत्वाचे ग्रंथ अत्यंत परिश्रमानें तयार करून प्रसिद्ध केले होते. मुक्तेश्वराचें 'वत्सलाहरण' कोठेंतरी एखाद्या पोथींत पाहिलें असल्याखेरीज त्यांनीं वरील विधान केलें नसेल, हें खास. तें प्रकरण अद्याप उपलब्ध न होण्याचें खरें कारण म्हणजे प्राचीन मराठी काव्यादि ग्रंथांविषयीं आपली अनादरबुद्धी व त्यांच्या संशोधनासंबंधीं आपली अनास्था हें होय.

मैराळाच्या विराटपर्वासंबंधीं परिशिष्ट १ मध्यें माहिती देऊन त्यानें आपली काव्यकृति मुक्तेश्वराच्या ओंव्यांचा हार समर्पून कशी सजविली आहे, तें दाखविलें आहे. ज्या अर्थी मुक्तेश्वराच्या काव्योपवनांतील सुंदर पद्यकुसुमांचे हार गुंफून ते मैराळानें आपल्या कविताकन्यकेच्या गळ्यांत घातले आहेत, त्या अर्थी मुक्तेश्वरकृत 'वत्सलाहरण'रूपी पुष्पगुच्छही त्यानें आपल्या कविताकन्यकेच्या हातांत दिला नसेल कशावरून? अशी शंका उत्पन्न होते. सारांश, मुक्तेश्वराच्या इतर प्रसंगींच्या ओव्या आपल्या पर्वांत मैराळानें उद्धृत केल्या आहेत, तसेंच 'वत्सलाहरण' ही त्यानें आपल्या पर्वांत सामील करून घेतलें असेल, अशी कल्पना केल्यास ती अगदींच भरमसाट किंवा असंभवनीय आहे, असें म्हणतां येणार नाहीं.

---

१. 'वत्सलाहरण' नांवाचें एक पुस्तक गोविंद दिनकर चितळे यांनीं सन १८७६ मध्यें प्रसिद्ध केलें होतें, असें कै० डाक्टर केतकर यांच्या 'महाराष्ट्रीय वाङ्मयसूची' वरून दिसून येतें (पृष्ठ १४४ पाहा). परंतु सदर्हू पुस्तक उपलब्ध नसल्यामुळें त्याच्या स्वरूपासंबंधी नक्की असें कांहींच सांगतां येत नाहीं.

मुक्तेश्वराच्या वनपर्वाच्या कांहीं हस्तलिखित पोथ्यांतून 'हरिश्चंद्राख्यान'[1] आढळतें, पण तें मूळ व्यासरचित भारतांत नाहीं ( काव्यसंग्रह–ग्रंथमाला, मुक्तेश्वरकृत स्फुटकाव्यें, प्रस्तावना–पृष्ठें १४–१७ पहावीं). तसाच कांहीं प्रकार 'वत्सलाहरणा'च्या बाबतींतही झाला असावा, असा आमचा तर्क आहे. मुक्तेश्वरानें प्रथम 'वत्सलाहरण' आपल्या विराटपर्वांत वर्णिलें असावें. कारण पुढें दिलेल्या ओव्या मुक्तेश्वरकृत विराटपर्वाच्या पांचव्या अध्यायाच्या ओव्या ३४ व ३६ यांच्या मध्यें अगदीं चपखल बसलेल्या दिसतात. पण तें कथानक व्यासरचित भारतांत नसल्यामुळें तो भाग त्यानें मागाहून गाळिला असावा. मुक्तेश्वररचित विराटपर्वाच्या फार जुन्या–अर्थात् त्याच्या ह्यातींत किंवा त्याच्या मृत्यूनंतर लौकरच लिहिलेल्या–पोथ्या मिळाल्यास ह्या मुद्याचा निकाल लागेल. परंतु पुढेंमागें ह्या प्रश्नाचा निकाल लागणें सोयीचें व्हावें म्हणून भैराळाच्या विराटपर्वांतील अध्याय ७।८–त्यांतील अनवश्यक भाग गाळून–वाचकांस सादर करीत आहों. उपरि निर्दिष्ट अध्यायांतील ओव्या मुक्तेश्वराच्या आहेत असें ठरलें तर ठीकच आहे. परंतु तसें न ठरलें तरी कौरवपांडवांच्या चरित्रांतील एका अज्ञात प्रसंगाचें मनोरम वर्णन वाचल्याचें श्रेय तरी वाचकांच्या पदरांत खात्रीनें पडेल.

२. पांडव अज्ञातवासांत असल्यामुळें, त्यांचा पत्ता लागणें शक्य नव्हतें; शिवाय ते राज्यभ्रष्ट झालेले असल्यामुळें दुर्योधनानें शकुनीस द्वारकेस पाठवून बळिरामानें आपली कन्या वत्सला ही आपला पुत्र लक्ष्मण यास द्यावी, असा प्रयत्न केला व तो बळिरामास मान्यही झाला. परंतु त्याच्या पूर्वींच कृष्ण व सुभद्रा यांचें बोलणें होऊन वत्सला व अभिमन्यु यांचा विवाह व्हावा, असें त्यांनीं ठरविलें होतें. यामुळें बळिरामाची वरयोजना कृष्णास मान्य नव्हती. परंतु त्यानें तसें आपलें मत स्पष्टपणें प्रदर्शित केलें नाहीं. यामुळें लग्नतिथी निश्चित होऊन सर्व आप्तेष्टांस निमंत्रणपत्रिका पाठविण्यांत आल्या व इतरांबरोबर विदु-

१. मुक्तेश्वरानें मार्कंडेयपुराण व देवीभागवत यांच्या आधारें 'हरिश्चंद्राख्यान' रचिलें असावें (काव्यसंग्रह–ग्रंथमाला–मुक्तेश्वरकृत स्फुटकाव्यें, पृष्ठ १९१, टीप ४ पहा). मुक्तेश्वरानें 'अहिमही–आख्यान' रचिलें असून तें त्यानें अग्निपुराणांतून घेतलें आहे. (महाराष्ट्रसारस्वत, आवृत्ति दुसरी, पृष्ठ ५४५). एकंदरींत मुक्तेश्वराचा पुराणग्रंथवाचनाचा व्यासंग मोठा दांडगा होता, असें दिसतें.

रासही पाठविण्यांत आली होती. त्या वेळीं कुंती व तिचा नातू अभिमन्यु हस्तिनापुरांत विदुराकडे राहात असल्यामुळें त्यांस हें वृत्त सहजच कळलें. तेव्हां प्रस्तुत समयीं आपल्यावर ओढवलेल्या आपत्तीमुळें बळिरामानें आपली कन्या अभिमन्यूस न देतां राजपुत्र लक्ष्मणास देण्याचें ठरविलेलें पाहून त्यांस फार दुःख झालें व अशा रीतीनें झालेला अपमान त्यांस सहन झाला नाहीं, इत्यादि वृत्तांत मैराळकृत विराटपर्वाच्या सातव्या व आठव्या अध्यायांत वर्णिलेला आढळला. तो पुढें वाचकांस सादर करीत आहों:—

## अध्याय[१] सातवा.

( ह्या अध्यायांतील आरंभींच्या बेवीस ओव्यांत कुलदैवतास नमन, मागील अध्यायांतील कथानकाचा गोषवारा व प्रस्तुत अध्यायांतील कथानकाची प्रस्तावना इत्यादि भाग आहे. त्यानंतर मुक्तेश्वराच्या विराटपर्वांतील पांचव्या अध्यायाच्या ओव्या १–३४ उद्धृत केलेल्या असून पुढील कथेचा सांधा जुळविण्याकरितां मैराळानें ७।८ ओव्या रचिल्या आहेत ).

ऐसें होतां हस्तिनापुरीं। पहिली योजना द्वारकापुरीं। बळिरामाची कन्या नोवरी। पांडवासी[२] कुमरी अर्पावी. ॥ ६३ ॥ ऐसा निश्चयो होता केला। पांडव तों गेले वनवासाला। आतां द्यावी लक्ष्मणाला। दुर्योधनसुताला नेमिली. ॥ ६४ ॥ वसुदेवादि उग्रसेन। उद्धव, अक्रूर, संकर्षण। वेगळा करूनि मधुसूदन। वर नेमून ठेविला. ॥ ६५ ॥ म्हणती पांडवीं केलें वनाभिगमन[३]। कांहींच न कळे वर्तमान। म्हणोनि अभिमन्या वर अव्हेरुन। वर लक्ष्मण नेमिला. ॥ ६६ ॥ हेंचि चित्तीं विचारून। ब्रह्मसुतें[४] सांगितलें वर्तमान.। पितापितृव्याचा शोध घ्यावा म्हणून। माता घेऊन निघाला. ॥ ६७ ॥ मार्गीं चालतां तांतडीन। आधीं जावें पांचाळपुरालागोन। पंचबंधु पांचाळनंदन। दळभार घेऊन निघाले. ॥ ६८ ॥ ऐसा मनसुबा करून। रथ हांकिला तांतडीन। मोठें लागलें घोर विपिन। सहस्रकिरण झांकोळेला[५]. ॥ ६९ ॥ वृक्ष अच्युत[६] गेले गगन। मार्गीं लागलें हिडिंबवन। घटोत्कचाचें

---

१. मैराळकृत विराटपर्वाची गंगाधर ब्राह्मणानें लिहिलेली मूळप्रत सध्यां उपलब्ध नाहीं. अध्याय ७।८ मधील उतारे सुमारें ४०।४५ वर्षांपूर्वी उतरवून घेतलेल्या नकलेवरून दिले आहेत. ज्या हस्तलिखित प्रतीवरून नक्कल करवून घेतलेली होती तींत कांहीं हस्तदोष असतीलच. नकलनवीसानें त्यांत कांहीं भर घातलीच असेल. तथापि प्रत्यंतराच्या अभावीं तीं अशुद्धें तशींच राहिलीं आहेत, याबद्दल वाचकांनीं क्षमा करावी. २. पांडवांच्या वंशांतील अभिमन्यूस. ३. वनवासाचा स्वीकार. अभिगमन=जवळ जाणें. ४. ह्याचा कर्ता—अभिमन्यु. ५. झांकला गेला. ६. अविनाशी, बळकट.

वास्तव्यस्थान । रथ ऐकोन धांवले. ॥ ७० ॥ असंख्य मिळाले पिशितांशन । सुभद्रासुतासमवेत रथ घेतला वेष्टुन । शिळा पर्वत टाकिती आणुन । युद्धकंदन मांडलें. ॥ ७१ ॥ मोठा बळिया पार्थवीर । संपूर्ण आटविले निशाचर । मग धाविन्नला हिडंबकुमार । पर्वत्र थोर घेउनी. ॥ ७२ ॥ घटोत्कच टाकी शिळापर्वत । बाणें निवारी सुभद्रासुत । निशाचर मावा करित । अदृश्य होत क्षणक्षणीं. ॥ ७३ ॥ मोठें करी शरसंधान । जेंवी जुझीन्नला सहस्रार्जुन । बाणामागें सोडीत बाण । पाहोनि हिडिंबानंदन खवळला. ॥ ७४ ॥ शिळापर्वेत सारितांचि जाण । एकदा शतावधी वृक्ष टाकी आणुन । तितके उडवी सुभद्रानंदन । शेवटीं रथ धरून ओढिला. ॥ ७५ ॥ अभिमन्या करीं धरिला । आसडोनी भूमीवरी पाडिला । फार मूर्च्छेनें दाटला । व्याकुळ पडला पृथ्वीवरी. ॥ ७६ ॥ अभिमन्या पडतां समरीं । युद्धासी प्रवर्तली सुभद्रासुंदरी । स्वतां वर्षो लागली बाणधारीं । जेंवी पर्जन्य गिरी वर्षत. ॥ ७७ ॥ शेवटीं निर्वाण बाण सोडिला । घटोत्कच मूर्च्छागत पाडिला । हिडंबेसी वृत्तांत जाणवला । तेही युद्धाला सरसाविली. ॥ ७८ ॥ विशाल मुख पसरोन । ग्रासावया सिद्धावली राक्षसीण । सुभद्रेनें सोडिला निर्वाण बाण । हिडिंबा भूमिशयन संपादी. ॥ ७९ ॥ मूर्च्छित हिडिंबा पडतां धरणी । मग सुभद्रा उतरली रथांतूनी । अभिमन्या पडला होता रणीं । अंकावर उचलोनि घेतला. ॥ ८० ॥ पल्लवें मुख पुसोन । करूं लागली दीर्घ रुदन । कैसें कर्मगहन वोढवलें जाण । विपरीत देवानें घडविलें. ॥ ८१ ॥ 'पंडुराजा प्रतापवंत । सोमवंश मोठा विख्यात । श्वशुर माझा समर्थ । ते मी अनर्थ भोगितें. ॥ ८२ ॥ कौरवांनीं दावा साधिला । गोत्रजांनीं घात आरंभिला । वनवास दीधला पांडवांला । म्हणोनि अनर्थ घडला मजलागीं. ॥ ८३ ॥ पांच बंधु प्रतापवान । धर्म, भीम, आणि अर्जुन । नकुळ, सहदेव माद्रीनंदन । पांचाजणा कामिन पांचाळी, ॥८४॥ तया पार्थाचा तूं नंदन । तुझा मातुळ श्रीभगवान । वडील मातुळ संकर्षण । मम पिता जाण वसुदेव. ॥ ८५ ॥ ऐसें असतां उभय कुळ । उभय पक्षीं प्रतापी बळवंत । तुवांहि प्रताप केला अद्भुत । शेवटीं भूमंडळ सेविलें. ॥ ८६ ॥ पृथादेवी ऐकोन । करूं लागली दीर्घ रुदन । पांचांसी होतां श्रवण । श्रम दारुण पावती. ॥ ८७ ॥ ऐसी कर्माची विचित्र गती । म्हणोनी घडली अनर्थी । अभिमन्या पुत्र पडला क्षिती । ऐकोनी धृताराष्ट्रपुत्रांप्रती आनंद'. ॥८८॥ ऐसे गुण आठवोनी । सुभद्रा गडबडां लोळे धरणी । पक्षी, श्वापदें जमा होती । अवघे मिळोनी बोलती. ॥ ८९ ॥ 'संपूर्ण वृक्ष छेदून । अवघें निर्मूळ केलें वन । एकटी श्रम पावतां दारुण । त्या समयीं आकाशवाणी कडकडून जाहली. ॥ ९० ॥ म्हणे, 'सुभद्रे! किमर्थ श्रमतेसी । तुझा बंधु हृषीकेशी । त्यानें दिधलें मुद्रिकेसी । ते अभिमन्याचे मुखासी घालावी. ॥ ९१ ॥ ते मुद्रिका मुखीं घालितांचि जाण । सावचित्त होईल तुझा नंदन । पुढें होईल महदाख्यान । चिंताखंडन जाहलें.' ॥ ९२ ॥ ऐसी होतांचि आकाशवाणी । सुभद्रा उठली तत्क्षणीं । श्रीकृष्णमुद्रिका काढुनी । उदकीं नेउनी प्रक्षाळिली. ॥ ९३ ॥ द्वादश अक्षरांचें करूनि स्मरण । तैसीच अभिमन्याच्या मुखांत घातली नेउन । त्यासि होतांचि एक क्षण । सावध

१. राक्षस. २. पार्थपुत्र अभिमन्यु. ३. माव=कपट, माया, गारुड. ४. कामिनी, स्त्री. ५. 'ॐनमो भगवते वासुदेवाय' हीं बारा अक्षरें.

उठोनि बैसला. ॥ ९४ ॥ अभिमन्यु उठतांचि ते क्षणीं । तैसाचि लागला मातेच्या चरणीं । अकस्मात पातला नारदमुनी । विवक्षा करोनि[1] बोलिला. ॥ ९५ ॥ 'भली संपादली करणी। श्रीकृष्ण ठकाची बहिणी । नाना प्रकारच्या मावा करोनी । म्हणोनी द्वैत......॥ ९६ ॥ एक यशाचा लाभ संपादिला । दुसरा भीमाचा पुत्र मारिला । गोत्रजाचा वध केला । डाग लाविला वंशासी. ॥ ९७ ॥ लाक्षागृहांतून वांचले । तेव्हां हिडंबेनें जगविले । मग भीमासी वरिलें । प्रतापी अर्पिलें पुत्रासी. ॥ ९८ ॥ तो हिडंबेसहित पुत्र मारिला । पुढें कार्यभाग समग्र राहिला । मोठाच आतां अनर्थ घडविला । भीम केला निपुत्री.' ॥ ९९ ॥ ऐसें बोलतां नारदमुनी । हिडंबा ऐकत होती मिष घेऊनी । मृत्युप्राय तेथें पडोनी । वर्तमान श्रवणीं ऐकिलें. ॥ १०० ॥ तैसीच बैसली उठोन । अभिमन्याकडे पाहे न्याहळून, । 'तुझा बंधु मारिला मायेन । लौकिकीं लांच्छन लाविलें. ॥ १०१ ॥ ऐसा भीम प्रतापवंत । त्याही परिस हा बळ अद्भुत । कार्यकर्ता इच्छित । मोठा अनर्थ केला कीं'. ॥ २ ॥ सुभद्रेसी बोले उत्तर, । 'तुझें मन मोठें कठोर । बंधु श्रीकृष्ण निष्ठुर । ठकुनी कंसासुर मारी. ॥ ३ ॥ भीमासी कळतां वर्तमान । मोठा अनर्थ करील दारुण । श्रम पावती चौघेजण । पुत्र मारून टाकिला.' ॥ ४ ॥ ऐसें हिडिंबा बोलतां उत्तरीं । ऐकोनी संतोषली वसुदेवाची कुमरी । श्रीकृष्णमुद्रिका होती करीं । काढुनी झडकरी घेतली. ॥ ५ ॥ तैसीच उदकीं प्रक्षाळुन । मनोभावें केलें पूजन । घटोत्कचाजवळ जाउन । कर मुखावरोन फिरविला. ॥ ६ ॥ तैसीच मुद्रिका घातली मुखांत । घटोत्कच जाला सावचित्त । अभिमन्याचे चरण वंदित । आलिं- गन देत एकमेकां. ॥ ७ ॥ मग वंदिला ब्रह्मनंदन । उभयतांसी घालिती नमन । सुभद्रा हिडिंबा पावती समाधान । उभयतां नंदन पाहोनियां. ॥ ८ ॥ एक भीम, एक अर्जुन । प्रताप पाहातां समसमान । मग पुसे वर्तमान । 'काय कारण?' म्हणोनी. ॥ ९ ॥ 'एका रथानिशीं निघोन । कोठें करीत होते आगमन । काय जाले पांचजण? । सकळ वर्तमान निवेदा.' ॥ १० ॥ ऐसें घटोत्कच बोलतां वचन । अभिमन्या सांगे वर्तमान । धर्मरायें केला राजसूययज्ञ । पाहोनि दुर्योधन संतापला. ॥ ११ ॥ द्यूत खेळतां शकुनी । सकळ संपदा घेतली हिरोनी । वनवास दीधला पांचांलागुनी । समागमें पांचाळनंदिनी नेली असे. ॥ १२ ॥ त्यांनीं केलें वनप्रयाण । आम्हासी मातुळ गेला घेऊन । वस्ती केली द्वारकापट्टन । द्रौप- दीनंदन पांचाळपुरीं ॥ १३ ॥ गेले, त्या दिवसापासुन । चिंता लागली दारुण । ब्रह्मसुतें सांगितलें वर्तमान । विराटनगरीं पांचजण प्रगटले. ॥ १४ ॥ कौरवांनीं समाचार ऐकिला । जीमूत जेठिला पाठविला । तोही बळवानें मारिला; । बंधुसहित मारिला कीचक. ॥ १५ ॥ कीचकाचा वध जालियावर । द्वारकेसी पातला ब्रह्मकुमर । त्याणें सांगितला समाचार । कीं गंधर्व भूतळावर उतरले. ॥ १६ ॥ ऐसें गुह्य सांगितलें वर्तमान । द्वारकापुर सोडा- याचें कारण । वडील मातुळ संकर्षण । त्याची कन्या मजलागुन नेमिली. ॥ १७ ॥ पिता पितृव्य गेले बनवासालागुन । त्यांचा कोठें न लागे ठिकाण । म्हणोनि आमुची हेळणा[2]

१. विवक्षित हेतूनें. २. अवहेळणा, तिरस्कार.

करून । वर लक्ष्मण नेमिला. ॥ १८ ॥ दुर्योधनसुताचा नेम ऐकुन । मग मातेसहित त्यागिलें द्वारकापट्टण । एकला निर्वंडूनी जगजीवन । अवघे मिळूनि एक जाले. ॥ १९ ॥ ऐसा पाहुन विचार । मग सांडिलें द्वारकापुर । पांचाळासी जाणूनि समाचार । जाऊं वधूवर घेऊनिया. ॥ २० ॥ द्रौपदीचे पांच कुमर । पांचाळपुत्र शिखंडी धृष्टद्युम्नवीर । संगें घेउनी दळभार । मग विराटनगर पाहावें. ॥ २१ ॥ ऐसा करूनियां विचार । मग सांडिलें द्वारकापुर । मार्ग क्रमिला दुर्धर । ऐसा प्रकार घडला कीं. ॥ २२ ॥ आधीं तो प्रळयकाळ जाला । शेवटीं आनंदाचा घन वोळला । बंधुमातेचा योग घडला । बळ ऐश्वर्या लाधलें'. ॥ २३ ॥ अभिमन्यें बोलतां वर्तमान । घटोत्कच बोलिला निर्वाणवचन । 'अवघें गांजीन द्वारकापट्टण । नवरी आणीन हिरोनी. ॥ २४ ॥ माझिया बळशक्तिपुढें । उग्रसेनासी लावुनी वेडें........। नवरी तुजकडे देईन. ॥ २५ ॥ एकला निर्वंडूनी श्रीकृष्ण । ख्याती लावीन अवघियां लागुन । नवरी आणीन हिरोन । तरीच भीमाचा नंदन मी खरा. ॥ २६ ॥ माझिया बंधूचा अव्हेर करून । वर नेमिला दुर्योधनाचा नंदन । अवघियांसी संग्राम करीन । गजपुर घालीन पालथें'. ॥ २७ ॥ ऐसी प्रतिज्ञा करून । घटोत्कच बोलिला वचन । देव कौतुक पाहात होते विमानीं बैसोन । पुष्पें दुरोन टाकिती. ॥ २८ ॥ शेवटीं अमृताचा व्रर्षाव केला । अवघा निशाचेरपाळा सावध जाला । हिडंबेसी आनंद वाटला । म्हणे अमृतघन वोळला. ॥ २९ ॥ नारदें कौतुक पाहून । फारच हर्षला चित्तांतून; । म्हणे, 'प्रतिज्ञा करून बोलिला वचन । परंतु सबळ रक्षण द्वारके. ॥ ३० ॥ क्षण एक उसंत नसतांचि जाण । घरटी घाली सुदर्शन । तेथें तुझें कैसें घडेल आगमन । उपाव योजून सांगतों. ॥३१॥ 'द्वादशाक्षरी' मंत्र जपून । आधीं करीं पांडवांचें उच्चारण । मग करीं नारदस्मरण । रामकृष्ण उच्चारण शेवटीं'. ॥ ३२ ॥ ऐसी खूण सांगोन । उल्हास वाटला सकळांलागोन । वंदूनी नारदाचे चरण । उपचार पूजन आरंभिलें. ॥ ३३ ॥ षोडशोपचारें करूनी पूजन । संतोष पावला ब्रह्मनंदन । सत्वर वंदितांचि चरण । प्रत्यागमन संपादिलें. ॥ ३४ ॥ परिभ्रमण करून । द्वारका प्रवेशला ब्रह्मनंदन । सिंहासनाजवळ जाऊन । श्रीकृष्ण भगवान वंदिला. ॥३५॥ मंदिरीं होती रुक्मिण । तीस कळलें वर्तमान । आरती आली घेऊन । भावें ब्रह्मनंदन ओवाळिला. ॥ ३६ ॥ षोडशोपचारीं पूजा केली । उद्धव-अक्रुरांची मांदी मिळाली । नारदें पृच्छा आरंभिली । 'सुभद्रा गेली केउती? ॥ ३७ ॥ नाहीं दिसत पार्थनंदन । काय कैसें जालें वर्तमान?' । लग्नसोहळा द्वारकेलागुन । हर्षें संकर्षण करीतसे. ॥ ३८ ॥ निळयरौंज पुष्कराज शोभती । हिरेमाणिकें रत्नज्योति । लावण्य मुक्तघोंस शोभती । प्रवाळभिंती सुजडिता. ॥ ३९ ॥ पद्मरागाचीं तोरणें । स्तंभ जडिले सुवर्णें । स्वयंवरमंडपीं तारांगणें । नक्षत्रमाळा शोभती. ॥ ४० ॥ म्हणे, 'वर नेमिलें अभिमन्यासी । वत्सला दीधली पांडवासी । तुवां आरंभिलें शोभनासी । पार्थपुत्रासी अव्हेरिलें.' ॥ ४१ ॥ ऐसें बोलतां

---

१. वेगळा करून, सोडून. २. राक्षसांचा समुदाय. ३. विसावा, विश्रांति. ४. गस्त, येरझार. ५. परत जाणें. ६. समुदाय. ७. इंद्रनीलमणी. ८. शोभन=शुभकार्य.

ब्रह्मनंदन। उग्रसेनासी कळलें वर्तमान । बोलावूनी बंदिजन। म्हणे, 'पार्थनंदन शोधावा'. ॥४२॥ घरोघरीं पाहाती जाऊन। सुभद्रेसही न लगे ठिकाण। वसुदेवदेवकीस कळलें वर्तमान । 'लग्नासी गजरीं आणावी.' ॥ ४३ ॥ ऐसें बोलतां रेवतीरमण । ऐकोनि बोले मधुसूदन, । 'समर्थ पाहिला दुर्योधन । म्हणोनी त्यासी कन्यादान करीतसा. ॥ ४४ ॥ संपदा हिरतली[1] दुर्योधनें । म्हणोनी पांडवीं केलें वनप्रयाण । सांडूनियां मानापमान । भूतळालागुन विचरती. ॥ ४५ ॥ जव नष्टचर्याची बुंथी[2] । तावत्काळ ते तुमटती । बाराविंयाचिया अंतीं । तेराविंयांत होती प्रगट. ॥१५०॥ जेंवी सिंहापुढें वृक[3] जाण। कीं व्याघ्रापुढें शृगाल[4] हरिण । तैसेच हो ! धृतराष्ट्रनंदन । पार्थ भीमसेन पाहतांची. ॥ १५१ ॥ तुम्ही हेळसिला सुभद्रासुत । परंतु तोही होय सहस्रार्जुन बळवंत । ख्याती लावील लग्नांत । हें तों विचारवंत जाणती.' ॥ १५२ ॥ ऐसें बोलतां मधुसूदन । उगाचि उठोनि गेला रेवतीरमण । पुढें कथेचें अनुसंधान । जन्मेजयासी वैशंपायन बोलिला. ॥ १५३ ॥

[ त्याच्यापुढील उपसंहारात्मक ५१६ ओव्या गाळिल्या आहेत. ]

## अध्याय आठवा.

[ ह्या अध्यायाच्या आरंभींच्या २१ ओव्यांत ईशवंदन, मागील अध्यायांतील कथेचा गोषवारा व पुढील कथानकाचें दिग्दर्शन केलेलें आहे. ]

घटोत्कच आणि सेनापती[5] । सत्वर निघाले शीघ्रगती । द्वारकापुरी–अंतोती[6] । गुप्तगती राहिले. ॥ २२ ॥ सायंकाळ होतांचि जाण । अस्तासि जातां चंडकिरण । घरटी घाली सुदर्शन । घटोत्कच करी स्मरण । पांचजण उच्चारिले. ॥ २३ ॥ 'धर्म, भीम हो! अर्जुन । नकुळ सहदेव पांचजण । द्रौपदी पतिव्रतांत पूर्ण । साक्षी जाण ब्रह्मसुत. ॥ २४ ॥ याच कार्यभागालागुन । मीही करितों द्वारकाप्रवेशन । अंतर्साक्ष श्रीकृष्ण । तरी आडवें सुदर्शन न ये का. ॥ २५ ॥ सत्यसाधक व्रतआचरण । निःशंक [निष्क] पट पाहिला पिशिताशन । निघोनि गेलें सुदर्शन । द्वारकापट्टन प्रवेशले. ॥ २६ ॥ गुप्त वेषंकरोन । सभास्थानीं पातले संपूर्ण । त्यांत नाहीं श्रीकृष्ण भगवान । मग मंदिरभुवन प्रवेशले. ॥ २७ ॥ चित्तीं संतोष पावून । अंतरनिष्ठें केलें नमन । तैसेंच नमिलें रुक्मिणीकारण । गुप्तवेषें द्वारकापट्टण फिरताती. ॥ २८ ॥ तिकडे दुर्योधन हस्तनापुरीं । लग्नासि निघाला सहपरिवारीं । भीष्म द्रोण घेतले बरोबरी । विदुर गजपुरीं धाडिला. ॥ २९ ॥ मोठा समारंभ घेऊन । हर्षे पावला द्वारका पट्टण । हलधरासि कळलें वर्तमान । कीं आला दुर्योधन लग्नासी. ॥ ३० ॥ महामंडपाची शोभा केली । रेवतीरमणें सामग्री धाडिली । पाकनिष्पत्ती आरंभिली । स्नानें सारिलीं सकळांनीं. ॥ ३१ ॥ संपूर्ण उपचार

१. हरण केली. २. बुरखा, आच्छादन. ३. लांडगा. ४. कोल्हा. ५. घटोत्कचाचा सेनापति. ६. आंत, मध्यें.

करून । अवघियांचीं होतां भोजनें । घटोत्कच आला धांवून । अवघेंचि पाहून क्रोधावला. ॥ ३२ ॥ जंव घ्यावें आपोशनें । तंव वायुदेवाचें केलें स्तवन । पौत्राचें ऐकोन वचन । मोठा प्रभंजन सूटला. ॥ ३३ ॥ समग्र पात्रें उडविलीं । सर्वांसि हुडहुडी भरली । कित्येकांची दांतखिळी बैसली । वेंगेडी वळली सकळिकांची. ॥ ३४ ॥ त्रिवर्ग वेगळे करून । कृपाचार्य, भीष्म, द्रोण । वरकड अवघे करून । श्रम दारुण पावले. ॥ ३५ ॥ यापरि जाला प्रथम दिवस । वराच्या राहिलें पूजनास । वर्तमान कळलें हलधरास । कीं प्रभंजनें सकळांस गांजिलें. ॥ ३६ ॥ मागुती दुसरे दिवशीं शोभा केली । वरात सीमंतिका आरंभिली । पर्जन्याची वृष्टी जाली । गर्दी उठली धुळीची. ॥ ३७ ॥ मंडप पडले खचोनी । अवघेचि भयाभीत द्वारकापट्टणीं । माया केली घटोत्कचानीं । कोणाचें कोणास वर्तमान कळेना. ॥ ३८ ॥ पुत्र गेला म्हणवुन । हिडिंबाही प्रवेशली द्वारकापट्टन । घरोघरीं धुंडाळा घेऊन । जाउनी श्रीकृष्ण पाहिला. ॥ ३९ ॥ तैसेंचि पाहिलें रुक्मिणीसी । मग प्रवेशली मंडपासी । हाव धरोनि विशेषीं । विशाळ रूपासि दाखविलें. ॥ ४० ॥ माया प्रगट केली दारुण । भक्षूं पाहे धृतराष्ट्रनंदन । भयाभीत गेले होऊन । खूण भीष्मद्रोणें वोळखिली. ॥ ४१ ॥ पार्थसुतासि दिधली कुमरी । ते पाठविले वनगव्हरीं । लग्नासी पातले दुराचारी । विघ्न भारी ओढवलें. ॥ ४२ ॥ वृक्ष आणि शिळा, पर्वत । अंतरिक्ष पडती सैन्यांत । मोठी महामारी होत । कितीक प्राणघात पावती. ॥ ४३ ॥ शकुनि, कर्ण, दुःशासन । घार्य-वारें घेतलें पूर्ण । म्हणती मोठें वोढवलें विघ्न । कपटी श्रीकृष्ण खरा कीं. ॥ ४४ ॥ त्यानेंच मांडिला हा खेळ । महामारी मांडिली सबळ । घटोत्कचाची सेना कोपली प्रबळ । प्रचंड शिळा वर्षताती. ॥ ४५ ॥ कुंजर भयाभीत होउन । सैराट पळती सैन्यांतुन । महाप्रतापी भीमनंदन । हस्तीं वारण झेलित. ॥ ४६ ॥ दोहीं हातें धरून । कंदुकप्राय झेली वारण । महामारी पाहुन । कौरव संपूर्ण पळताती. ॥ ४७ ॥ कोण्ही श्रापैंती हलधरा । म्हणती गांजावया द्वारकापुरा । साहाय्य करूनि निशाचरा । सोहळा सारा बुडाला. ॥ ४८ ॥ सौबळ पिटी वदन । म्हणे, 'लग्नसोहळा बुडाला संपूर्ण । आतां कैसे वांचतील प्राण? । वरमायपण बुडालें!' ॥ ४९ ॥ धाक घेउनि अंतःकरणा । समग्र पळूं लागली कौरवसेना । हिकडे हिडंबा बैसली द्वारकापट्टना । मावा नाना दावित. ॥ ५० ॥ मंडप समग्र विध्वंसुन । भ्रांतस्त अवघे द्वारकाजन । अंतरिक्ष पातला ब्रह्मनंदन । कौतुक पाहुन उल्हासला. ॥ ५१ ॥ कौरवांनीं पळ काढिला । जाउनी घटोत्कच आडवा जाला । [म्हणे] 'मार्गती लग्नगौरव दाखवा सकळांला' । तों अकस्मात पातला नारद. ॥ ५२ ॥ म्हणे, 'पिता पितृव्याचा सूड घेइन । अवघे गांजिले धृतराष्ट्रनंदन'. । 'आतां जाउन [न] घ्यावे प्राण । पुढें कारण असे बहु.' ॥ ५३ ॥ ऐसें

---

१. जेवावयास बसावयाचें तोंच. २. बोबडी वळली. ३. शोध, पाहाणी करून. ४. दुष्ट कौरव. ५. हाणाहाणी, प्राणसंकट. ६. घाव लागण्याची किंवा घाव लागून व्याकुळ झाल्यामुळें उत्पन्न होणारी भीति. ७. शाप देती; अकल्याण होवो, असें इच्छिती. ८. हें घटोत्कचाचें भाषण. ९. हें नारदाचें भाषण.

बोलतां ब्रह्मसुत । ऐकोनि घटोत्कच जाला शांत. । नारद म्हणे, 'सोडूनि पुरुषार्थ । गजपुरा पंथ आक्रमीत असा. ॥ ५४ ॥ लग्नसोहळा सांडून । अवघेचि करितां पलायन । फार छळिले पंडुनंदन । आतां आंगवण काय जाली! ॥ ५५ ॥ सकळीं सांडिला पुरुषार्थ । व्यर्थ बोलाचा पसारा बहुत.' । ऐसें बोलतां ब्रह्मसुत । गेला त्वरित द्वारके. ॥ ५६ ॥ कौरवांसी पराभवून । यशस्वी जाला भीमनंदन । मार्गी पाहुनी दुर्योधन । अवघेचि श्रापुन बोलती. ॥५७॥ येकीं घेतिलें घायवारें । म्हणती, 'पळा पळा रे ! । महामारी केली सुभद्राकुमरें । दृष्टिगोचर न देखिला'. ॥ ५८ ॥ कोणाचे मोडिले करचरण । कितीकांचें तुटलें प्राण । लग्नसोहळा बुडाला संपूर्ण । सकळ अपमान पावले. ॥ ५९ ॥ कौरव गेले हस्तनापुरा । वर्तमान सांगती नारीनरा । आश्चर्य करिती महावीरा । भयदाठोरा[1] लाविला. ॥ ६० ॥ घरोघरीं सर्व जन । हस्तनापुरीं सांगती वर्तमान । दुर्योधन अपमान पावून । भग्न केलें घटोत्कचानें. ॥ ६१ ॥ महापराक्रमी भीमसुत । भला केला पुरुषार्थ । काळिमा लावुनी कौरव समस्त । मागें गजपुरा लोटले. ॥ ६२ ॥ मंदिरीं प्रवेशूनि दुर्योधन । स्वस्थ बैसले सकळ जन । आल्हाद जाला अंबिकानंदन । लग्न करूनि पातले. ॥६३॥ ऐसें वर्तमान हस्तनापुरा । नारद पातला द्वारकापुरा । पुरुषार्थ पाहोनी भीमकुमरा । आल्हाद अंतरा मानिला. ॥ ६४ ॥ नारद पातला सभास्थानीं । अवघेचि बैसले श्रांतस्थ होउनी । हिडिंबीचा पराक्रम पाहुनी । घटोत्कच नयनीं देखिला. ॥ ६५ ॥ त्यानें माया करून । सकळ निर्मिले भिन्न भिन्न । यादव आश्चर्य करिती संपूर्ण । पाहुनी रेवतीरमण क्रोधावला. ॥ ६६ ॥ म्हणे, 'म्यां लग्न-निश्चयो आरंभिला । मध्येंच विघ्नाचा उमाळा उठला । दुर्योधनाचा अपमान केला । मागुती गेला फिरोनी.' ॥ ६७ ॥ म्हणोनि उठिला क्रोधेंकरून । हातीं नांगर, मुसळ । घेतलें उचलोन । अंतरिक्षीं उडविलीं. ॥ ६८ ॥ आयुधें उडवितांचि जाण । फारच क्रोधावला रेवतीरमण । माया केली निशाचरान । असंख्य द्वारकापट्टनें उभविलीं. ॥ ६९ ॥ ऐसें कौतुक होतांचि जाण । तों पातले श्रीकृष्ण भगवान । नारदमुनीनें वंदिले चरण । स्वतः आसन घालुनी बैसला. ॥ ७० ॥ बोलिला श्रीकृष्ण भगवान, । 'कोणीकडून जाहलें आगमन । भूतळीं करितां परिभ्रमण । कोठें पंडुनंदन देखिले? ॥ ७१ ॥ लग्न मांडिलें द्वारकापट्टनीं । माहामारी पातली कोणीकडोनी । जैसी जाली विराट नगरालागोनी । हें तों प्रत्यक्ष पाहिलें. ॥ ७२ ॥ शकुनी, कर्ण, दुःशासन । बधूंसहित दुर्योधन । अवघेच पावले अपमान । शेवटीं लग्न राहिलें. ॥ ७३ ॥ ऐसा कोणता पराक्रमी पातला । गुप्त वेषें गांजूं लागला । मोठा पुरुषार्थी नामांथिला[2] । कैसेनि उमगला जाईल. ॥ ७४ ॥ विश्वकर्म्यापरिस ··· । कीं वायुदेव इंद्रादिक । गंधर्वी माया अधिक । दृष्टीसी सम्यक् दिसेना; ॥ ७५ ॥ कीं पातली वैष्णवी माया । तिनें पाडिली मोठी छाया । सकळांसी भुलोनिया । न पडे ठाया कदापी.' ॥ ७६ ॥ ऐसें बोलतां जगजीवन । ऐकोन संतोषला ब्रह्मनंदन । म्हणे, 'तूं अंतरसाक्षी जगजीवन । लीलाविग्रह करूनि दाविसी. ॥ ७७ ॥ परा, पश्यंती, मध्यमा वैखरी । व्यापक असती

१. मोठें भय. दाठोरा=गर्दी, दाटी, दाटण. २. नामांकित.

चराचरीं । जैसा सूर्य घटांतरीं । बिंबोनियां अलिप्त. ॥ ७८ ॥ देवा! तुझा खेळ न कळे कवणा । पंडुपुत्रीं केलिया वनप्रयाणा । ·········· । ते तुझ्या नामस्मरणा न विसंबती. ॥ ७९ ॥ म्हणोनी असती विजयी कल्याण । सांप्रत हलधरें मांडिलें लग्न । पहिला निश्चयो पार्थनंदन । त्यासी उपेक्षुनी दीधलें. ॥ ८० ॥ परंतु जीव पांडवांपाशीं । अखंड कल्याण इच्छितोसी । दुष्ट मांडितां छळनेसी । तत्काळ अपमानसी, देवराया ! ॥ ८१ ॥ अभिमन्या सुभद्रेसहित निघाला । देशदुर्ग उल्लंघित चालला । नाना पर्वत पंथ क्रमिला । वनां उपवनां सांडिती. ॥ ८२ ॥ विंध्याद्रिपर्वतालागुन । विस्तीर्ण असे हिडिंबावन । घटोत्कचाचें वास्तव्य स्थान । अभिमन्य त्यांतुनी चालिला. ॥ ८३ ॥ रथ पाहतां पिशिताशन । शिळापर्वत धांवले घेउन । वृक्षवृष्टी करिती दारुण । तितुकेही पार्थनंदन निवारी त्वरित. ॥ ८४ ॥ सकळांचा संहार होतांचि जाण । मग धांवला हिडिंबानंदन । अभिमन्यासी संग्राम करून । शेवटीं रथांतुनी पाडिला. ॥ ८५ ॥ मग सरसावली सुभद्रासुंदरी । धनुष्यबाण घेतलें करीं । घटोत्कच पाडिला समरीं । हिडिंबा झडकरी धाविन्नली. ॥८६॥ तिनेंही प्रताप दाखवुन । शेवटीं सेविलें समरांगण । मग अभिमन्यु जीवविला तव मुद्रिकेनें । हिडिंबानंदनही ऊठिला. ॥ ८७ ॥ जेव्हां लाक्षागृहांतुनी निघतां जाण । हिडिंब मारिला भीमसेनें । तेव्हां हिडिंबेचा अंगीकार करून । तिसी नंदन जाहला. ॥ ८८ ॥ तितकाचि संधीचा योग घडला । पुत्र प्रतापी निर्मिला । त्यासी वृत्तांत श्रुत जाला । निश्चयें प्रतापी. ॥ ८९ ॥ तेचि प्रतिज्ञा करून । पाहावयासि आला द्वारकापट्टन । अपमानुनी धृतराष्ट्रनंदन । गेले परतोनी गजपुरा. ॥९०॥ तुम्हासी चमत्कार दाखविला। आतां पाहिजे गौरविला । भेटीस पाहिजे बोलाविला । कन्या अभिमन्यासी अर्पावी'. ॥ ९१ ॥ ऐसें बोलतां ब्रह्मसुत । चित्तीं हर्षले कृष्णनाथ । यादव आनंदले बहुत । म्हणती, 'प्रतापवंत भेटवावा.' ॥ ९२ ॥ ऐसा निश्चयो होतांचि जाण । हिडंबेसहित घटोत्कच आला आपण । वसुदेव देवकीस करूनि नमन । उग्रसेनादि संकर्षण वंदिले. ॥ ९३ ॥ उद्धव आणि अक्रूर। लोटांगणीं वंदिला ब्रह्मकुमर । मग नमिला रुक्मिणीवर। साष्टांग नमस्कार घातला. ॥ ९४ ॥ राक्षसी स्वरूप पालटून । जैसा दुजा भीमसेन । महाप्रतापी पाहोन । अनिरुद्ध मदन भेटले.॥९५॥ सकळ बैसले सभास्थानीं । मग बोलूं लागला नारदमुनी, । 'अभिमन्या सुभद्रा आणोनी । वत्सला त्याजलागोनी अर्पावी. ॥ ९६ ॥ वाग्निश्चयाचा योग साधून । विवाहलग्न लावावें गंधर्वानें । पांडव आलिया सोहळा कारण । ऐसें ब्रह्मनंदन बोलिला.' ॥ ९७ ॥ ऐसें बोलोनी नारदमुनी । गेला परिभ्रमणालागोनी । हिडंबेसी भेटली रुक्मिणी । सोळा सहस्र येवोनी वंदिती. ॥ ९८ ॥ देवकी उग्रसेनकांता । हिडंबा भेटली समस्तां । द्वारकापुरींच्या समस्त कांता । ऐकोनि वृत्तांता धांवती. ॥९९॥ सभास्थानीं जाली दाटणी । घटोत्कचानें आणिलें अभिमन्यालागोनी । वेदमंत्रविधी

---

१. वत्सला अभिमन्यूस देण्यासंबधीं केलेला निश्चय. २ कृष्णाचे पुत्र. ३. करणें (?).

करोनी । वत्सला नंदिनी अर्पावी. ॥ १०० ॥ यथाविधी करुनि लग्न । अभिमन्यासी केलें कन्यादान । हिडिंबा सुतासहित गौरवून । सुभद्रासून[1] उल्हासली. ॥ १०१ ॥ विधी संपूर्ण जालियावर । घटोत्कचें आणिले अळंकार । अमोल्य वस्तु परिकर । सुनेसहित द्वारकापुर गौरविलें. ॥ २ ॥ बळिराम चित्तीं संतोषला । भीमसुताचा गौरव केला । हिडिंबेचा बहुमान वाढला । चालिली स्वस्थळाला उठोनी. ॥ ३ ॥ अभिमन्या सुभद्रा राहिली द्वारकेलागुन । हिडिंबा पुत्रासहित गेली निघोन । आपलें पावली स्वस्थान । गजपुरासी ब्रह्मनंदन पातला. ॥ ४ ॥ तेथें विदुरासी भेटुन । संक्षेपें सांगितलें वर्तमान । मागुती निघाला तेथुन । परिभ्रमण संपादिलें. ॥ ५ ॥ विदुर हर्षला ऐकोन । आदरें वंदिला अंबिकानंदन । सांगावया वर्तमान । श्रोतेजन ऐकिती. ॥ ६ ॥ विदुर म्हणे, 'ऐश्वर्यनिधी । सुयोधनें सून मेळविली द्वारकेमधीं । त्या सुखाचा अमृतोदधी । अगस्तिहि घोटेना[2]'. ॥ ७ ॥ ऐसा वृत्तांत ऐकुन । संतोषला अंबिकानंदन । म्हणे, 'मोठें भाग्य धन्य । श्रीकृष्णकन्या[3] सून मिळाली. ॥ ८ ॥ भाग्यबळें ऐश्वर्यवंत । तथापि सोयरा जोडिला श्रीकृष्णनाथ । मजसमान भूतळीं समर्थ । नाहीं पार अनंत वैभवा.' ॥ ९ ॥ ऐसा हर्ष पावतांचि जाण । तों सभेसी पातले भीष्म द्रोण । द्वारकापुरींचें वर्तमान । जालें संपूर्ण जाणविलें. ॥ ११० ॥ म्हणे, 'जेणें गांजिली लंकापुरी । गुप्त घात जाला निशाचरीं । बहुत गौरविले द्वारकापुरीं । शिळापर्वत भारी समर्पिले. ॥ १११ ॥ विशाळ तरूवर येउन । अवघेचि गांजिलें सकळ सैन्य । राहिले ते आले पळोन । स्वमुताचे प्राण वांचले. ॥ १२ ॥ अभिमन्यासी दिधली कुमरी । तेचि वरावयासी गेला दुराचारी । पांडवांचा सखा हरी । शिक्षा भारी पावले.' ॥ १३ ॥ ऐसें वर्तमान ऐकुन । अंधासी वाटे चिंता दारुण । म्हणे, 'प्रारब्ध विचित्र गहन । संकटीं प्राण वांचले.' ॥ १४ ॥ ऐसे जालिया चार मास । तों बकदाल्भ्य ऋषी आला गजपुरास । विराटनगरींच्या वृत्तांतास । दुर्योधनास निवेदिलें. ॥ १५ ॥ 'विराटनगरीं पांच पुरुष । त्यानें बंधूसहित मारिलें कीचकास । साधुनियां देती राज्यास । पुरत्या निश्चयास जाणवे.' ॥ १६ ॥ ऐसे सांगुनी समाचार । तीर्थाटणासी गेला ऋषीश्वर । विचार योजिती धृतराष्ट्रकुमर । म्हणती, 'सैन्यें[4] समग्र पाचारा. ॥ ११७ ॥ जीमूत[5] जेठियांचा रगडा । बळिष्ट कीचक मारिला होडा । पांडवांविण हा पवाडा । कोण कर्ता भूतळीं.' ॥ ११८ ॥ ऐसा विचार चित्तीं समजून । करटाळिया पिटोनि अवघे मिळून । म्हणती निश्चय पंडुनंदन । पुरते जाऊन शोधावे. ॥ ११९ ॥

[ह्या अध्यायाच्या शेवटच्या उपसंहारात्मक ४ ओव्या गाळिल्या आहेत.]

---

१. सुभद्रेची सून (उत्तरा). २. गिळूं शकत नाहीं. ३. बळरामकन्या म्हणजे पर्यायानें कृष्णाचीच कन्या. ४. कौरव व त्याच्याबरोबरची मंडळी. ५. मागें विराटपर्व, पृष्ठ ५ टीप ५ पहा. ६. ही ओवी मुक्तेश्वराच्या विराटपर्वाच्या ५ व्या अध्यायांतील ३६ वी आहे.

प्रस्तुत प्रकरणांत 'आधीं तो प्रळयकाळ जाला । शेवटीं आनंदाचा घन वोळला । बंधुमातेचा योग घडला । बळ ऐश्वर्या लाधलें' ( अध्याय ७।२३ ) अशासारखीं सुरेख पद्यपद्में व राज्य साधणें, मूर्च्छा दाटणें, महदाख्यान होणें इत्यादि मुक्तेश्वरी ठशाचीं शब्दलेणीं मधून मधून आढळतात. तथापि सद्यःस्थितींत ह्या 'वत्सलाहरणा'चा कर्ता कोण, हें निश्चित करणें फारच अवघड आहे. पुढें मागें त्याच्या स्वतंत्र व संपूर्ण हस्तलिखित प्रती उपलब्ध झाल्यास हें गूढ उकलणें शक्य होईल.

वर दिलेल्या उताऱ्यांतील ओव्यांवर अर्थद्योतक टीपा आम्ही जाणूनबुजूनच फार कमी दिल्या आहेत. कारण मुक्तेश्वरकृत विराटपर्व काळजीपूर्वक वाचून त्याच्या भाषासरणीशीं ज्यांचा परिचय झाला आहे, अशा वाचकांस इतक्या टीपा पुरेशा आहेत, असें आम्हांस वाटतें. निष्कारण पृष्ठसंख्या वाढूं नये, हा देखील टीपांच्या बाबतींत काटकसर करण्यांत आमचा हेतु होता, हेंही खरें आहे. पण एकंदरींत ही योजना वाचकांस मान्य होईल, अशी आशा आहे.

# ३. कांहीं पाठभेद व अधिक पद्यें.

[मैराळानें आपल्या विराटपर्वांत मुक्तेश्वरकृत ओंव्यांचा समावेश केला आहे, हें आम्हीं पूर्वीं सांगितलें आहे. ( परिशिष्ट १ परिच्छेद ५ पहा ). त्यांतील ज्या आम्हांस शोधून काढतां आल्या त्यांत जे पाठभेद आढळले किंवा ज्या कांहीं ओंव्या मुक्तेश्वराच्याच असाव्या असें आम्हांस वाटलें, त्यांचा समावेश ह्या परिशिष्टांत केला आहे.]

| ओंवी. | चरण. | मूळ पाठ. | अन्य पाठ. | पृष्ठांक. |
|---|---|---|---|---|
| | | अध्याय | पहिला. | |
| २ | १ | कवतुकार्थ | कौतुकें | १ |
| ,, | ४ | थोपडोनी | थापटुनी | ,, |
| ३ | २ | गुरुनामीं | पदपद्मीं | ,, |
| ५ | ३ | विश्वंभराचे | मुक्तेश्वराचिये | ,, |
| ६ | १ | बोले | बोलती | २ |
| ,, | ४ | | प्रेमभावें सेविती | ,, |
| ९ | ३ | परमभक्ती | परमशक्ती | ,, |
| १२ | २ | क्रमावें | कर्मावें | ,, |
| १४ | २ | चिंतावृत्ती | चिंतावर्ती | ,, |
| १८ | २ | निजाधिकारीं | निज अधिकारी | ३ |
| २० | ४ | पाठविती | बोळवी | ४ |
| २१ | २ | सप्तमपुरीं | सप्तमपुरी द्वारावती | ,, |
| २४ | २ | वेशिया अनेका | वेसिया आणिखा | ,, |
| ,, | ३ | घेऊनियां सुखा | ठेवोनिया स्वसुखा | ,, |
| ,, | ४ | पावविल्या | पाळिल्या | ,, |
| २६ | ४ | लोकां दाखवावें | लौकिकीं वदावें | ,, |
| २७ | ३ | | श्रेष्ठत्व न दाविजे जगातें; व समर्थ बोलिले जे घडीतें | ,, |
| ,, | ४ | शब्दीं | श्रेष्ठीं | ,, |
| २८ | ३ | | इंद्रियनेम निश्चळता | ,, |
| ,, | ४ | वल्लभ | वल्लभ होइजे | ,, |
| २९ | १ | | राजस्त्रियेसीं संवाद | ,, |
| ,, | २ | | पुत्रमित्रेंसीं विनोद | ,, |
| ,, | ३ | | राजपुरोहितेंसीं वाद | ,, |
| ३० | २ | न येइजे | न रिघावें | ५ |
| ३१ | ४ | | तोच्चि ज्ञानी, भूपाळा! | ,, |
| ३२ | २ | वक्रभाव | क्रूर भाव | ,, |
| ३४ | १ | नेमिलिये | निरविलिया | ,, |
| ३७ | २ | न मनीं | न मानी | ,, |
| ३८ | ४ | तोच्चि पावे | तरीच पाविजे | ,, |

| ओवी. | चरण. | मूळ पाठ. | अन्य पाठ. | पृष्ठांक. |
|---|---|---|---|---|
| ३९ | ३ | षड्गुणी | सद्गुणी | ५ |
| ४१ | ३ | | सांगितल्या निगुती | ६ |
| ४३ | २ | गेला | गेले | ,, |
| ४४ | ३ | पांचही | अवघे | ,, |
| ४६ | ३ | | बुद्धिबळें युक्तिबळें सबळ | ,, |
| ४९ | २ | सूपकर्मा | शुद्धकर्मा | ,, |
| ५२ | २ | पै | पंक | ७ |
| ५३ | ३ | | सारथ्यविद्येचिये परी | ,, |
| ,, | ४ | लाधली | साधली | ,, |
| ५६ | ४ | | मंद ऐसे दावणें | ,, |
| ५७ | ४ | | मृत्यत्व करीन रायाचें | ,, |
| ६१ | २ | पाठीं | वाटीं | ८ |
| ६३ | १ | | खडतर मंत्रीं बीजाचें रूप | ,, |
| ,, | २ | | दिसती शस्त्रें सर्प | ,, |
| ,, | ३ | | भयें होउनिया सकंप | ,, |
| ६५ | ४ | सहसा | सर्वथा | ,, |
| ६७ | २ | दुर्गाप्रासाद | दुर्गाप्राकार | ,, |
| ६८ | ३ | ब्रह्म आन | ब्रह्मज्ञान; व–ब्रह्मांड आन | ,, |
| ७१ | १ | विष्णू | विष्णूसी | ,, |
| ,, | २ | | बहुरूपी खेळसी आंगें; व–बहुरूपें दाविसी स्वअंगें | ९ |
| ७२ | २ | क्षयरोगें | महारोगें | ,, |
| ,, | ३ | | अहिल्याशिळा पीडिली भोगें | ,, |
| ७३ | ३ | | श्रेष्ठीं वर्जितां राहाटणें | ,, |
| ७५ | २ | स्वरूपचि | विश्वरूप | ,, |
| ७६ | १ | उक्ता आगमीं | सुगमगामी | ,, |
| ,, | ४ | कौळिकाचारें | लौकिकाचारीं | ,, |
| ७७ | १ | जैन | जन | ,, |
| ,, | २ | देवमती | वेद म्हणती: व–वेदमती | ,, |
| ,, | ३ | | सांख्यमति प्रवृत्ति तुजप्रती | ,, |
| ७९ | २ | भगवती | आदिशक्ती | १० |
| ८० | १ | ‘वर्ष | म्हणे, ‘वर्ष | ,, |
| ८१ | २ | | अदृश्य जाली महाशक्ती | ,, |
| ८३ | १ | आगळा | सोज्वळा | ,, |
| ,, | ४ | श्रेष्ठ आगळा | श्रेष्ठ आंगीं | ,, |
| ८४ | १ | हांसोन | हास्यवदन | ,, |
| ८६ | ३ | मंत्रतंत्रें | एक तंत्रीं; व-यंत्रतंत्रें | ,, |

| ओवी. | चरण. | मूळ पाठ. | अन्य पाठ. | पृष्ठांक. |
|---|---|---|---|---|
| ८७ | २ | | असत्य भाषणीं न शिवे वेळ | १० |
| ,, | ३ | रत्नपरीक्षे मी | रत्नपरीक्षकीं | ,, |
| ८८ | १ | पैं | बहु | ,, |
| ८९ | १ | मान धन | समान धन | ,, |
| ,, | २ | विद्येसारिखें | इच्छेसारिखें | ,, |
| ,, | ३ | स्वस्थ | शाश्वत | ,, |
| ९० | १ | | ऐशा बोलोनी स्नेहगोष्टी | ,, |
| ९१ | ४ | सुढाळें | शोभलें | ११ |
| ९२ | २ | सूपकर्मा | शुद्धकर्मा | ,, |
| ९४ | २ | | विद्या शिकलों बहुसाळ युक्ती | ,, |
| ९७ | ३ | दिव्यांजनें। नेत्रकमळीं | नेत्रींचिया दिव्यांजनें। नेत्रकमळें | ,, |
| ९८ | ४ | कोण | कोणें | १२ |
| १०० | २ | | नाटकशाळेचिया नारी | ,, |
| १०१ | २ | | वारू वागवीं आपुले हातीं | ,, |
| १०१ | ३ | ये गती | गतियुक्ती | ,, |
| १०२ | १ | | नाना युद्धें दृष्टि देखिलीं जाण | ,, |
| ,, | २ | | म्यां विविध संधान | ,, |
| ,, | ३ | | गुरूच्या प्रसादें करोन | ,, |
| १०३ | १ | समयीं | समयासमयीं | ,, |
| ,, | ४ | | उदार वचनें गौरवी | ,, |
| १०५ | १ | प्रतापी चाबुक | प्रतोद चाबुक | ,, |
| ,, | ३ | | अश्वशिक्षाकर्त्ता सुमती | ,, |
| ,, | ४ | कुशळरूप | कुलगुरु | ,, |
| १०६ | २ | चौपाटा | चौफेरी; व–चौपद्य | ,, |
| ,, | ३ | | फिरणें, ठोकणें, उडणें | ,, |
| ,, | ४ | | मद दाबणें मुखसंज्ञा | ,, |
| १०७ | १ | निराळीं | अंतराळीं | ,, |
| ,, | ४ | एके रथीं | एक्या रथें | ,, |
| १०८ | १ | | घोडकियांमाजी युधिष्ठिरु | ,, |
| ११३ | २ | नगरनारीं | नगरद्वारीं | १३ |
| | | ह्या पद्याच्या पुढें मैराळाच्या प्रतींत ज्यास्त ओव्या आढळतात त्याः— | आश्चर्य करिती विश्वजन। म्हणती अपूर्व वस्तु लाधली तुजलागुन। नारी सांगती वर्तमान। कमळा भूतळालागुन अवतरली. ॥ १ ॥ कमळा किंवा सावित्री गौरी। अरुंधती सीता सुंदरी। दमयंती | |

| ओवी. | चरण. | मूळ पाठ. | अन्य पाठ. | पृष्ठांक. |
|---|---|---|---|---|
| | | | भीमककुमरी । भूतळावरी अवतरली. ॥ २ ॥ पांडव गेले वनवासालागुन । संगें द्रौपदी अंगनारत्न । गुप्त वेषें भूतळालागुन । ऐसे संकेत जन बोलती. ॥ ३ ॥ | १३ |
| ११५ | ३ | पाचारुनी | पाळुनियां | ,, |
| ११६ | | ह्या ओवीच्या पुढें अधिक पद्यः— | सुषेण्णा संतोषोनी अंतरीं । म्हणे, 'कोणा सभाग्याची नारी । किंवा साक्षात् शिवाची गौरी । कृत्रिम [वेषें] भूतळवटीं विचरत. ॥ | १४ |
| ११९ | ३ | | माणिकाजवळिक गुंज | ,, |
| ,, | ४ | | ते मी दिसतसें तुजपुढें | ,, |
| १२१ | २ | परार्चें | परार्चें न करीं | ,, |
| १२३ | २ | सरी | घरीं | ,, |
| १२६ | | | मांजरपिलियां ऐसीं कौरवें । कुंजरबालकें कैसेनि झांके । अंधकारांत प्रतापार्के । | १५ |
| १२७ | ३ | | ऐसा तेवीं तयांचा खेळ | ,, |
| | | अध्याय | तिसरा. | |
| १३२ | ३ | | आड केलें सुवर्णपीठ । अरळें घातलीं घनदाट | ४४ |
| | | अध्याय | पांचवा. | |
| ३० | १<br>२ | } | उडुगणें चढोनी जाइजे भीती । तृणें लोटितां वायु पडे पुढती । | ५९ |
| ३२ | ३ | °र्चे कुवाडें | °चे पवाडे | ,, |
| ५१ | १ | | जैसा पारधी एकला जळीं | ६२ |
| ,, | २ | | असंख्य मीन एके गळीं | ,, |
| ,, | ३ | | सपुत्र पांडव विराट बळी | ,, |
| ५८ | १ | काळी | काठी | ६३ |
| ,, | २ | पृष्टीं | प्रलयीं | ,, |
| ७६ | २ | | सहस्र छाया उभारोनि वरुती | ६५ |
| ११२ | २ | कुठार | कुठार जप | ६८ |
| ,, | ३ | | खंडी तैसा उत्तमोत्तम | ,, |
| ११७ | २ | ब्रह्मसंयुति | ब्रह्मसंपत्ती | ६९ |

| ओवी. | चरण. | मूळ पाठ. | अन्य पाठ. | पृष्ठांक. |
|---|---|---|---|---|
| | | अध्याय | सहावा. | |
| २ | ३ | | वीर मारावयालागीं प्रबळ | ७२ |
| ३ | ३ | | दुष्ट गणांचा समुदाव सकळ | ,, |
| ६ | ३ | वेष्टिलीं | लेइलीं | ,, |
| ९ | २ | सूर्यपुटें | सुवर्णपुटें | ७३ |
| १० | ३ | सरळ | महाप्रबळ | ,, |
| १० | ४ | | ऐरावतातें लाजविती | ,, |
| १७ | ३ | | गोधनें हरलीं असंभाव्य नरा | ७४ |
| ,, | ४ | | सैरा धांवती निर्धारें | ,, |
| १९ | ३ | | पुरुषें होइजे भूषणा | ,, |
| २१ | २ | | तरी फोडीन परदळ सांग | ,, |
| २२ | ४ | कुलपुत्रा | जन्मलासी | ,, |
| ,, | | ओवी २२ च्या पुढें ज्यास्त ओवीः- | मत्स्यकुळीं कुळदीपक। व्यर्थ जन्मलासी नपुंसक। उदरीं जन्मलासी भारवाहक। प्राणधाक घेवोनियां. | ,, |
| २६ | | | सैरंध्री म्हणे,'गा! भूपबाळा!। वृत्तांत हा जाणवीं बृहन्नळा। पार्थासंगें संग्रामकळा। वेळवेळा साधिली.॥ | ,, |
| ३१ | ३ | आपण | विराटनंदन | ७५ |
| ,, | ४ | | धुरेसि आपण बैसला | ,, |
| ३५ | ३ | पूर्णकलश | सुवर्ण कलश | ,, |
| ३९ | २ | उचलिले | उंचावले | ७६ |
| ५० | १ | | विकर्ण म्हणे, 'विचित्र चिन्ह गाढें | ७७ |
| ७९ | २ | | (१) जिंकोनी भूपाळांचिया फौजा | ७९ |
| ,, | ,, | | (२) जिंकोनी अरी, सत्कीर्ति-भाजा | ,, |
| ८७ | | | अंतरीं साही शत्रुदमन। बाह्य दृष्टी न घालिजे पूर्ण। नररूप नारायण। भूतळालागुन बोलती. ॥ | ८० |
| ८८ | २ | कृष्णीं | कृष्णरूपीं | ,, |
| ,, | ३<br>४ | } | यालागीं स्नेहें आवडीसी पूर्ण। कृष्ण कृष्ण हें नाम ॥ | ,, |
| ८९ | ३ | ज्याचीं तो | ज्याचीं तो मी | ८१ |
| ९८ | १ | आस्फुरितां | स्फुरिला | ,, |
| १०० | १ | भालीविना | भाळीं लाविती | ,, |
| १०१ | २ | | म्हणे, 'तनमन तुमचिया पायां | ,, |

| ओवी. | चरण. | मूळ पाठ. | अन्य पाठ. | पृष्ठांक. |
|---|---|---|---|---|
| १०१ | ४ | संग्रामीं | निर्धारें | ८१ |
| १०३ | | | लोटोनियां सरितापूरीं । थरकांप सुटला रणसागरीं । कौरव म्हणती महामारी । दृष्टीस खेचरी झोंबली. | ८२ |
| १०८ | ४ | | महायुद्धें माजले | ,, |
| ११२ | २ | कोटी | वर्षाव कोटी | ,, |
| ,, | ४ | | महा अनर्थ माजला | ,, |
| ११३ | ४ | भोंवती | भवंडताती | ,, |
| ११४ | २ | | प्रस्तुत सेना निवटूं पुढां | ८३ |
| ११८ | १ | पिसारें | पिसारेनी | ,, |
| ११९ | ४ | | कर्दळीवन जेंवि खंडी | ,, |
| १२१ | | | पार्थ सदस्त्र कंकबाणें । छेदुनियां झाडिले तत्क्षणें । जैसीं तार्किकाचीं वचनें । वेदांतीय खंडिती. ॥ | ,, |
| १२७ | २ | | जीवीं अदृष्ट देखतांचि मानवदेवीं | ८४ |
| १२९ | २ | | कलहामुळें अपवित्र काग | |
| १३६ | २ | | एक शतें तेविसाक्षरीं | |
| १४७ | २ | | आकर्षिली मौनास्त्रमुद्रा | |
| १६३ | | | तेंवि बृहन्नळा असतां पाठी । कृतांत तोही तृणतुल्य दृष्टी । तुवां संशय न धरावा पाठी । हे सत्य गो राजया ! जाण पां. ॥ | |
| | | अध्याय | सातवा. | |
| १४ | ४ | | 'मी' 'ती' ऐसें भाविती. | ९२ |
| १५ | २ | लेखाकरीं | स्वकरीं | ,, |
| ,, | ४ | | देवविलें देहकाळें | ,, |
| २४ | ३ | | जाणतो जाणताही सर्वज्ञ | ९३ |
| ३७ | ४ | | शब्द ठेवी लौकिकीं | ९४ |
| ५५ | ३ | साष्टांग | स्व-अंगें | ९६ |
| ६१ | ४ | उपसाहिजे | उपहासिजे | ,, |
| ६३ | ४ | | परिस-पाषाण हस्तें उडविला | ,, |
| ६४ | ४ | अपार | अपराध | ९७ |
| ६६ | ४ | | क्षमा करीं गा! दयाळा! | ,, |
| ७२ | ४ | द्वादश | द्वादशदां | ९८ |
| ७४ | २ | वाळा | थाळा | ,, |

| ओवी. | चरण. | मूल पाठ. | अन्य पाठ. | पृष्ठांक. |
|---|---|---|---|---|
| ७८ | | | विशाळ कुंजर मदोन्मत्त । अलंकार भूषणें सालंकृत । पांच पांच सहस्र एक एका देत । स्यंदना ओपित रत्नभूषणें. ॥ | ९८ |
| ८४ | १ | सुहृदाचारी | सदाचारी | ९९ |
| ८६ | | ह्या ओवीच्या पुढें जास्त ओवीः— | धृतराष्ट्र सत्वें सांडवला । पुत्रलोभें भ्रमें भूलला । म्हणोनि सर्वस्वें नष्ट जाला । घात योजिला समूळीं. ॥ | ,, |
| ८८ | २ | पूर्ण | न्यून | ,, |
| ८९ | ३ | | प्राण घेऊनी दुर्योधनें | ,, |
| ९२ | ३ | दीना | जाणा | १०० |
| | | अध्याय | आठवा. | |
| ६ | २ | पातलों | पाठविलें | १०२ |
| ३८ | ४ | | तेंवी मुक्ताफळें तळपती | १०५ |
| | २ | निरसिलें | विसरले | १०६ |
| | | ंगाफळें | पक्क फळें | १११ |
| | ३ | श्रवणीं | रणीं | ११४ |
| ५ | ४ | तोषला | शोभला | ,, |
| | ३ | वरिष्ठ | बळवरिष्ठ | ,, |
| | | | धीर धरों न शके संग्रामीं | ११५ |

## ४. अधिक टीपा.

| पृष्ठांक. | अध्याय. | ओवी. | टीपा. |
|---|---|---|---|
| १ | १ | १ | ह्या ओवींतील व पुढील ६९ व्या ओवींतील कल्पनाच श्रीधरानें उचलली आहेः–जो जगद्गुरु आदिपुरुष । आदिमायेचा भर्त्ता ईश । ब्रह्मा, विष्णु, महेश । बालकें पोटीं निर्मिलीं. ॥ ( पांडवप्रताप, अध्याय ३२ ओवी १ ). 'पांडवप्रतापां'त अनेक ठिकाणीं आढळणाऱ्या कल्पनासादृश्यावरून श्रीधरानें मुक्तेश्वराचें महाभारत काळजीपूर्वक वाचिलें होतें, असें दिसतें. |
| ७ | १ | ५९ | सैरंध्रीचें लक्षणः–चतुःषष्टिकलाभिज्ञा शीलरूपादि शालिनी । प्रसाधनोपचारज्ञा सैरंध्री परिकीर्तिता. ॥ |
| ९ | १ | ७६ | 'विश्वपालक शक्ती तूंच आहेस' असें अंबेस उद्देशून स्तवनपर वर्णन करून पुढें धर्मराज म्हणतातः–आगमामधें तुला 'तारा', शैवधर्मांत गौरी व कौळिकाचारांत 'वज्रादेवी' ह्या अभिधानांनीं संबोधितात. यावरून 'तारा' ही आगमोक्त देवता मानावी लागते. आगममार्गांत तंत्रविद्येस प्राधान्य दिलें आहे. 'तारिणी', 'द्वितीया शक्ता' अशीं दुर्गेचीं अपर नामें आहेत व 'शक्तिरत्नाकर' नामक शाक्तग्रंथांत 'तारिणीतंत्र' म्हणून एक स्वतंत्र प्रकरण आहे. शिवशक्तिपूजेचा विषय आगमांत अंतर्भूत होतो. निगम=वेद; आगम=तंत्रविद्या. ( टीप १६ रद्द समजावी ). |
| १५ | १ | १२७ | कल्पनासादृश्यः–यदि सन्ति गुणाः पुंसां विकसन्त्येव ते स्वयम् । नहि कस्तूरिकामोदः शपथेन निवार्यते. ॥ |
| २८ | ३ | ६ | मुक्तेश्वरानें आदिपर्वांत 'सुंदर प्रौढ समर्थ वनिता' (अध्याय १६।९२) अशी म्हणजे जवळ जवळ येथील प्रथम चरणासारखीच शब्दयोजना केली आहे. |
| ४१ | ३ | १०४ | 'कटिभेखळा' याबद्दल 'कटिमेखळा' असें पाहिजे. |
| ४९ | ४ | ५ | मुक्तेश्वरकृत आदिपर्वांत 'अष्टादश आणि बावन्न । उत्तम मध्यम कनिष्ठ वर्ण' ( अध्याय १५।७ ) असा उल्लेख आहे. |
| ५४ | ४ | ५४ | 'कानांस दोंदें फुटणें' ही कल्पना मूळ एकनाथांचीः–आंतुले कृपेचेनि बळें । बोले मृदुमंजुळ कोवळें । श्रवणासि दोंदें एक वेळे । तेणें वचनमेळें निघालीं. ॥ ( भागवत ) |
| | | | मुक्तेश्वरानंतर मैराळानें देखील तिचा उपयोग केला आहेः–पुढें कथेचा रसास्वाद । ऐकतां श्रोतियां वाटे आल्हाद । प्रेमलहरी येउनी |

| पृष्ठांक. | अध्याय. | ओवी. | टीपा. |
|---|---|---|---|
| | | | सुहृद । वाढे दोंद ऐकतां. ॥ ( विराटपर्व, अध्याय ११ ओवी १६४ ) मैराळानें ह्या कल्पनेचा अर्धवट उपयोग केल्यामुळें ती रम्य वाटत नाहीं. |
| ६३ | ५ | ६३ | वाटीव=वांटलेले, घोटीव, अर्थात् अनुभवी, निवडक. |
| ७४ | ६ | २४ | 'प्रजा न रञ्जयेद्यस्तु राजा रक्षादिभिर्गुणैः । अजागलस्तनस्येव तस्य जन्म निरर्थकम्'. ॥ हें सुभाषित प्रस्तुत स्थळीं बरोबर लागू पडतें. |
| ७८ | ६ | ६० | 'थोडा बहुत श्लेषांचाच आश्रय करून साधलेले व मनाला चोजविणारे वर्णनचमत्कार, पदलालित्य, यमक, लाटानुप्रास इत्यादि शब्दलीलाही फारसे प्रयास न करितां मुक्तेश्वरांनीं मधून मधून, मासल्याकरितांच कीं काय, आपल्या काव्यांत गोविलेल्या आढळतात' ( कैं० बा. अ. भिडे यांचा मुक्तेश्वरावरील निबंध ). ह्या सदराखालीं प्रस्तुत पद्य त्यांनीं उद्धृत केलेलें आहे. तसेंच मागें पृष्ठ ११८ वर छापलेलें पद 'पवित्र शीतल जीवनी' हेंही त्यांनीं ह्याच सदराखालीं उतरून घेतलेलें आहे. |
| ८३ | ६ | ११६ | टीप ४ यांत '°शंखमत्याहि' बद्दल '°शंखमत्स्याहि' असें पाहिजे. |
| ९२ | ७ | १४ | चौथ्या चरणांत 'एसें' ह्याच्याबद्दल 'ऐसें' असें पाहिजे. |
| ,, | ,, | १५ | ईश्वर प्रभूंचिये घरीं प्रारब्ध लेखाकरीं नेमिलें [ असेल ] तें तयातें काळकृषीवळ निर्धारीं देववील–असा अन्वय. ज्याप्रमाणें सावकाराच्या वहीखात्यांत शेतकऱ्याला दिलेलें बीं बियाणें टिपलेलें असतें व त्यास अनुसरून शेतकरी हंगामावर भरणा करितो, तद्वत् ईश्वरानें जें प्रारब्धीं लिहिलेलें विधिलिखित आहे तें काळरूपी शेतकरी निश्चयपूर्वक परतफेड केल्यावांचून राहाणार नाहीं, असा तात्पर्यार्थ. |
| ९५ | ७ | ४५ | विराटराजाच्या सिंहासनावर धर्म बसला असतां अकस्मात् व्यासमुनी तेथें प्रकट झाले, असें मैराळानें वर्णिलें आहेः–भद्रासनीं बैसतां युधिष्ठिर । तो त्याच समयीं आला सत्यवतीकुमर । चरणीं लागला युधिष्ठिर । वृकोदरही वंदित. ॥७३॥ पार्थ, सहदेव लागती चरणीं । नकुळ वंदी लोटांगणीं । द्रौपदी नमस्कार करी जाउनी । कर मूर्ध्नि स्पर्शिला. ॥ ७४ ॥ 'शेष लोटलिया दिवस । विजयलक्ष्मी वरील धर्मास । कौरव पावती मोठा त्रास । प्राणनाश पावती'. ॥ ७५ ॥ ऐसें बोलतां कृष्णद्वैपायन । त्याच समयीं पातला दिव्य स्यंदन । ध्वजस्तंभीं हनुमान । बुभुःकार कडकड्[नी] दीधला. ॥ ७६ ॥ विद्युत्प्राय पताका झळकती । रत्नचाकें प्रकाशमान ज्योती । वस्त्रें आभरणें पाठवी अमरपती । अलंकार शोभती मंडित. ॥ ७७ ॥ व्यास म्हणे, 'कुंती- |

| पृष्ठांक. | अध्याय. | ओवी. | टीपा. |
|---|---|---|---|
| | | | नंदना ! । नष्टचर्याची सरली गणना । वस्त्रें अलंकार कुरुभूषणा ! । अंगीकारीं आवडी. ॥७८॥ बंधु-भाजा तोषवून । सकळीं घ्यावीं अलंकारभूषणें' । ऐसें बोलोनियां व्यास भगवान । अंतर्धान पावला. ॥(अ० १२).<br>मूळभारतांत नाहींत असे कित्येक प्रसंग मैराळानें वर्णिले व उल्लेखिले आहेत. वरील उतारा हा केवळ वानगी म्हणून दिला आहे.<br>मूळमहाभारतांत नसलेलीं कथानकें विराटपर्वांत कशीं आलीं किंवा मैराळानें तीं कोठून घेतलीं, हें कोडें सोडविणें वाटतें तितकें कठिण नाहीं. महाभारताचे दाक्षिणात्य, प्राच्य, औत्तरीय व मध्यदेशीय असे चार पाठ आहेत. त्यांतील मध्यदेशीय व औत्तरीय पाठांत, पर्वानुक्रमणींत, ६७ अध्याय व २०५० श्लोक सांगितलेले आहेत. पण नीलकंठी छापील प्रतींत ( महाराष्ट्रांत हीच मान्य आहे ) ७२ अध्याय व २२५० श्लोक आहेत. प्राच्य ( कलकत्ता ) प्रतींत ७२ अध्याय व २३०६ श्लोक आहेत. दाक्षिणात्य प्रतींत ७८ अध्याय व ३५७५ श्लोक आहेत. यावरून मैराळानें हे महाभारताचे निरनिराळे पाठ पाहून त्यांतून आपणास इष्ट व स्वादिष्ट अशीं वाटणारीं कथानकें निवडून तीं त्यानें आपल्या विराटपर्वांत गोविलीं असावीं. मुक्तेश्वराच्या विराटपर्वांत नसलेले प्रसंग मैराळानें कोठें तरी आधार असल्यावांचून स्वीकारिले नसावे, असें वाटतें. |
| १०८ | ८ | ५८<br>–९२ | ह्या वर्णनाबरोबर वाचकांनीं रामदासकृत मानसपूजा–समास ३–५ हेही वाचावे. म्हणजे त्यांस स्वयंपाकिणी, स्वयंपाकाचें साहित्य व स्वयंपाकपात्रें यांच्याविषयीं आणखी थोडी माहिती मिळेल. |
| १११ | ८ | ९० | गंगाफळाचा उल्लेख रामदासांनींही केला आहेः–'गंगाफळें काशीफळें' । ( मानसपूजा, समास ४ ओवी ६ ). |
| ११५ | ८ | | कै० विनायक लक्ष्मण भावे 'महाराष्ट्र–सारस्वता'चे कर्ते (ठाणें) यांनीं सदर्हू पुस्तकांत ( आवृत्ति दुसरी ) लिहिलें आहे—<br>"मुक्तेश्वरी विराटपर्वाच्या सुमारें ८।१० पोथ्या मी पाहिल्या आहेत. पण त्यांपैकीं फक्त एकाच पोथींत पुढील दोन ओव्या अखेरीस आढळतातः—<br>हेचि कथा परीक्षितीसी । सांगितली मुनेश्वर व्यासीं ।<br>कृष्ण वस्त्र शुभ्रतेसी । पावलें तात्काळ. ॥ १२१ ॥<br>श्रीशुकमुखें श्रवण । राजा संतुष्ट अंतःकरण ।<br>उठिला वेदपारायण । दृष्टी भासे नृपातें. ॥ १२२ ॥<br>ही पोथी शके १७१६ मध्यें लिहिलेली कोणा एका बडव्याची आहे." |